পু-গ্র.
৬০২

~~वा.इ.७८~~
वा.भू.अ.७२
८४
શોધ ધા

# महाराष्ट्र देशांतील किल्ले.

## भाग पहिला.

हा ग्रंथ,


**चिंतामण गंगाधर गोगटे,**

‘ छत्रपति थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र,’
‘ बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें चरित्र ’ व
‘ औरंगजेब बादशाहाचें चरित्र ’
या पुस्तकांचे कर्ते,


यांनीं लिहिला.


तो

**पुणें येथें**

सदाशिव पेठेंत ‘ **इंदिरा** ’ छापखान्यांत छापिला.

शके १८१८.—सन १८९६.

**किंमत १२ आणे.**



( ह्या ग्रंथासंबंधी सर्व हक्क कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

प्रथमपासूनच हिंदुस्थानाच्या संबंधानें ऐतिहासिक ग्रंथ फार कमी; व अद्यापिही तशा प्रकारचे ग्रंथ लिहिण्याकडे फार थोड्या लोकांचा कल दिसतो. तेव्हां अर्थातच आमच्या इतिहासाच्या संबंधानें माहिती आम्हांला मुख्यत्वें इंग्रजी ग्रंथांतून घ्यावी लागते. परंतु अलीकडे रावसाहेब काशिनाथ नारायण साने व कै॰ जनार्दन बाळाजी मोडक, यांनीं अश्रांत परिश्रम करून 'काव्येतिहाससंग्रह' रूपानें पुष्कळ जुन्या बखरी छापून प्रसिद्ध केल्यामुळें या बाबतींत केवळ दुसऱ्याच्याच तोंडाकडे पहाण्याची आतां गरज राहिली नाहीं. याबद्दल सर्व हिंदुस्थानवासी मराठे लोक त्यांचे अत्यंत ऋणि आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. तथापि मराठी इतिहासाच्या संबंधाची पुष्कळ माहिती अद्यापि प्रसिद्ध होणें राहिली आहे, व काव्येतिहाससंग्रहाच्या मागून देशाभिमानी म्हणविणाऱ्या विद्वान् लोकांकडून आजपर्यंत वरच्याप्रमाणें एखादा प्रयत्न होऊं नये ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. असो.

शिवाजी महाराजांनीं मराठी राज्याचा पाया घातला, त्या वेळीं इतर सर्व सामग्रीबरोबर त्यांनीं महाराष्ट्रदेशांत अनेक डोंगरी व भुईकोट किल्ले आणि जंजिरे बांधले,

व ते किल्ले होते म्हणूनच पुष्कळ प्रसंगीं मराठ्यांन आपली बाजू चांगली संभाळतां आली. शिवाजी महा राजांच्यापूर्वीं मुसलमान लोकांनीं कांहीं किल्ले बांधले, त्यांच्यापूर्वीं कोल्हापुरच्या शिलाहार राजांनीं कांहि किल्ले बांधलेले आहेत. त्यांच्याहीपूर्वी कदाचित् कोणीं किल्ले बांधले असतील, परंतु त्या संबधाची माहिती मिळत नाहीं

ज्या किल्ल्यांच्या जोरावर शिवाजी महाराजांनीं आपली बाजू राखली व ज्यांच्याकडे मराठी राज्याच्या भरभराटीच्या वेळीं परकीयांना पाहण्यासही भय वाटत असे, तेच किल्ले आज जमीनदोस्त झालेले आहेत. त्यांचें पूर्वीचें वैभव व आतांची त्यांची दैना हीं मनांत आलीं म्हणजे आनंद व दुःख या परस्पर विरोधी विकारांनीं कांहीं वेळ चित्तवृत्ति विचारशून्य होते! मराठ्यांच्या संबंधाच्या ज्या बखरी लिहून ठेवलेल्या आहेत, त्यांत ऐतिहासिक माहिती पुष्कळ आहे. परंतु त्यांमध्यें ह्या किल्ल्यांच्या संबंधाचें फारच थोडें वर्णन दिलेलें आहे. इ० स० १८१८ त इंग्लिश लोक आमचे प्रभु झाले, त्या वेळीं त्यांनीं बरेच किल्ले पाडून टाकिले, व तेंव्हांपासून हे किल्ले ओसाड पडलेले आहेत. आज स्वतःच्या संबंधाची आमची आठवण इतकी बुजून गेली आहे, व आम्ही इतके आळशी झालों आहों कीं, हल्लींची आमची स्थिति आम्हांला फार प्रिय वाटूं लागली आहे. शाळेंतील विद्यार्थी परदेशांतील साधारण गांव सुद्धां बिनचूक सांगूं शकेल, परंतु हिंदुस्थानांतील त्याच्याच गांवा-शेजारीं दोन कोसांवर असलेला एखादा प्रसिद्ध किल्ला त्याला

 धु.मी.५२

सांगतां येणार नाहीं; म्हणजे हल्लींच्या आमच्या शिक्षणाची तऱ्हा फारच चमत्कारिक झाली आहे. असो.

महाराष्ट्रदेशांतील किल्लयांची एकंदर माहिती एके ठिकाणीं मिळत नाहीं, ही आमच्या मराठी ग्रंथसमूहांत एक मोठी उणीव आहे; आणि ती अंशतः तरी दूर करण्याच्या उद्देशानें हा ग्रंथ लिहिण्यास मीं सुरवात केली आहे. ह्याचे तीन भाग करावे असा उद्देश आहे. पहिल्या भागांत सातारा, पुणें व कुलाबा हे जिल्हे घेतले आहेत, व किल्लयांचा विशेष भरणा ह्याच जिल्ह्यांत आहे. ह्या ग्रंथाला लोकाश्रय चांगला मिळाल्यास पुढचे दोन भागही लवकरच काढण्याचा विचार आहे. ग्रंथवृद्धीला मुख्य राजाश्रय पाहिजे; परंतु त्याचा आमच्या इकडे अभाव असल्यामुळें, व जे कांही छोटे छोटे संस्थानिक आहेत त्यांचा या महत्त्वाच्या विषयाकडे कल नसल्यामुळें, व स्वतः ग्रंथकर्त्यास ग्रंथ प्रसिद्ध करण्यास द्रव्य-सामर्थ्य नसल्यामुळें पुष्कळ हस्तलिखित ग्रंथ वाळवीच्या किंवा किड्यांच्या भक्ष्यस्थानीं पडलेले आहेत व पडत आहेत. असो. दुसऱ्या भागांत ठाणें, रत्नागिरी, सावंतवाडी, व कोल्हापूर या प्रांतांतील किल्लयांचें वर्णन, व तिसऱ्यांत बेळगांव, धारवाड, सोलापूर, नगर, नाशिक, खानदेश व विजापूर या प्रांतांतील किल्लयांचें वर्णन देण्याचा विचार आहे.

हा ग्रंथ लिहितांना ग्रांट डफ, क्यांबेल व दुसरे इंग्लिश व मराठी ग्रंथकार यांच्या ग्रंथांतून माहिती मिळविली आहे, व कांहीं किल्ले स्वतः जाऊन पाहिले आहेत.

प्रत्येक जिल्ह्यांतील किल्ल्यांचें तालुकेनिहाय वर्णन दिलें आहे, व कांहीं प्रसिद्ध किल्ल्यांचे नकाशे दिले आहेत. त्याचप्रमाणें प्रत्येक जिल्ह्याचा नकाशा देऊन, त्यांत किल्ल्यांचीं स्थळें दाखविलीं आहेत; तसेंच एकंदर किल्ल्यांची अनुक्रमणिकाही दिली आहे.

हें पुस्तक प्रसिद्ध करतांना मित्र रा० रा० हरि कृष्ण दामले यांनीं वेळोवेळीं साह्य केलें त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे.

ह्या पुस्तकास डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें दक्षिणा फंडांतून २०० रुपयांचें बक्षीस दिलें आहे, व त्याबद्दल ग्रंथकर्ता त्या संस्थेचा फार आभारी आहे. या ग्रंथाच्या पुढील भागांसही सदर सोसायटी अशाच प्रकारें आपला उदार आश्रय देईल अशी आशा आहे.

**ग्रंथकर्ता.**

मू. प्र. ८२

# अनुक्रमणिका.

## सातारा जिल्हा.


| | | पृष्ठ. | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कमालगड. .... | २ | | संतोषगड. .... | ३३ |
| २ | पांडवगड. .... | ३ | १५ | भोपाळगड. .... | ३६ |
| ३ | वैराटगड. .... | ५ | १६ | मच्छिंद्रगड. ... | |
| ४ | वंदन.... .... | ६ | १७ | प्रति... | |
| ५ | कंजळगड. .... | | | | |


...ण्याचा...




पण्यास
ण रुंदी
रस मैल
तीवरून
म जमा-
राज्य
राज्यांत
असून,
आहे. हा
व फल-
जिल्हा
ानापैकीं
दक्षिणेस
नदी हीं
ाहेत—ह्या नदीच्यापलीकडे कोल्हापूर संस्थानाची सर-

| | पृष्ठ. | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ६ चाकणचा किल्ला. | ७२ | ११ सिंहगड किंवा कोंडाणें. .... | ९३ |
| ७ राजमाची. .... | ७८ | १२ मल्हारगड किंवा सोनोरी. .... | १०८ |
| ८ कुवारी.... .... | ८२ | १३ पुरंदरचा किल्ला. | १०९ |
| ९ लोहगड. .... | ८९ | | |
| १० विसापूर.... .... | ९२ | | |


## कुलाबा जिल्हा.


| | | | |
|---|---|---|---|
| १ कुलाबा किंवा अ-[illegible]चा किल्ला. | १२४ | १८ भिंवगड.... .... | १६३ |
| | | १९ धकचा किल्ला .. | १६३ |
| | | २० अवचितगड..... | १६३ |
| | | बिरवाडी किल्ला. | १६६ |


ह्या पुस्तक[illegible] [illegible] टीनें दक्षिणा फंडांतून २०० [illegible] व त्याबद्दल ग्रंथकर्ता त्या संस्थेचा फा[illegible] [illegible]गड किंवा [illegible] ग्रंथाच्या पुढील भागांसही सदर सोसायटी अशाच प्र[illegible] आपला उदार आश्रय देईल अशी आशा आहे.

ग्रंथकर्ता.

---

# जिल्हा सातारा




स. गो.

...न.

...किंवा
...पण्यास
...ण रुंदी
...रस मैल
...तीवरून
...स जमा-

... राज्य
... राज्यांत
... असून,
... आहे. हा

... व फल-
... जिल्हा
...नापैकीं
... दक्षिणेस
... नदी हीं

आहेत—ह्या नदीच्यापलीकडे कोल्हापूर संस्थानाची सर-

६
१९८८

# महाराष्ट्रांतील किल्ल्यांचें वर्णन.

## भाग पहिला.

६ ७८

### सातारा जिल्हा.

सातारा जिल्हा हा, ज्या प्रदेशाला दख्खन किंवा दक्षिण असें म्हणतात, त्याच्या पश्चिमेकडील कोपऱ्यास आहे. याची पूर्वपश्चिम लांबी ८९ मैल व उत्तरदक्षिण रुंदी ८० मैल आहे. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ ४९८७ चौरस मैल आहे. इ० स० १८९१ त जी खानेसुमारी झाली तीवरून या जिल्ह्याची लोकसंख्या १२२५९८२ आहे, व जमाबंदी २३११९९० रुपये आहे.

इ० स० १८४८ त इंग्लिशांनीं साताराचें राज्य खालसा केलें, त्या वेळीं त्यांनीं जेवढा मुलूख आपले राज्यांत सामील केला, तेवढा सर्व सातारा जिल्ह्यांत मोडत असून, शिवाय तासगांव तालुका ज्यास्त सामील केला आहे. हा तालुका पूर्वीं बेळगांव जिल्ह्यांत मोडत होता.

ह्या जिल्ह्याचे उत्तरेस निरानदी, आणि भोर व फलटण हीं संस्थानें आहेत—ह्यांच्यापलीकडे पुणें जिल्हा लागतो; पूर्वेस सोलापूर जिल्हा, प्रतिनिधीच्या संस्थानापैकीं आटपाडी तालुका, व जथ संस्थान हीं आहेत; दक्षिणेस सांगली संस्थान, बेळगांव जिल्हा, व वारणा नदी हीं आहेत—ह्या नदीच्यापलीकडे कोल्हापूर संस्थानाची सर-

हद्द लागते; आणि पश्चिमेस सह्याद्रीची ओळ असून तिच्या पलीकडे रत्नागिरी व कुलाबा हे जिल्हे लागतात.

ह्या जिल्ह्याचे एकंदर ११ तालुके केलेले आहेत. ते येणेंप्रमाणें:—१ वांई, २ सातारा, ३ कोरेगांव, ४ खटाव, ५ माण, ६ खानापूर, ७ तासगांव, ८ वाळवें ९ कऱ्हाड, १० पाटण, आणि ११ जावळी. ह्या जिल्ह्यांत लहान मोठे २७ किल्ले असून त्यांचें तालुकेनिहाय वर्णन खालीं दिल्याप्रमाणें आहे.

---

# वांई तालुका.

—:०☀०:—

१. **कमालगड**.—हा किल्ला **वांई** तालुक्यांत **वांई**च्या थेट पश्चिमेस १० मैलांवर समुद्राच्या सपाटीपासून ४५११ फूट उंच आहे. या किल्ल्याच्या उत्तर दिशेकडून **वाळकी** नदी वाहत येते, व दक्षिण दिशेकडून कृष्णा नदी वाहत येते, व त्या दोहींचा संगम त्याच्या पूर्वेस झाला आहे. पूर्वेस आसगांव, उत्तरेस **वासोली** व दक्षिणेस **परीटवाडी**, एथून आडवळणी पायमार्गांनीं किल्ल्यावर जाण्याचे रस्ते आहेत. या किल्ल्याचें क्षेत्रफळ सुमारें तीन चार एकर असून याचा माथा अगदीं सपाट आहे, व त्याच्या सभोंवार तुटलेला कडा आहे. किल्ल्याच्या माथ्यावर जाणें असेल तर शिड्या लावून मोठ्या कष्टानें वर गेलें पाहिजे. पूर्वी किल्ल्याच्या पायथ्याशीं जमिनींतून वर जाण्याला वाट केलेली होती. परंतु हल्लीं तेथें माती, दगड वगैरे पडून तो रस्ता अगदीं बुजून गेला आहे. माथ्यावर इमारतीची वगैरे मुळींच खूण नाहीं. त्याचे तट पडून गेलेले असून पूर्वींच्या दरवाज्यांची वगैरे

कांहींएक खूण हल्लीं नाहीं. वर एक कुव्यासारखी खोल जागा आहे तेथें पूर्वी विहीर होती असें सांगतात. ही विहीर खडकांत खोदलेली आहे. हल्लीं तिची खोली साधारण २० फूट आहे, व अद्यापि तिच्यांत पाणी आहे. पूर्वी ही ४० फूट खोल होती असें म्हणतात. ह्या विहिरीविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, पूर्वी, हिच्या बाजूंत खडकामध्यें मोठमोठे कोनाडे केले होते, त्यांत फार मोठे गुन्हे करणाऱ्या कैदी लोकांस नेवून ठेवीत असत. त्या ठिकाणीं त्या कैदी लोकांनीं खालीं विहिरींत उडी टाकून जीव तरी द्यावा, किंवा उपासमर पडून तडफडून त्यांचा जीव तरी जावा, याशिवाय दुसरी तोडच नव्हती. हल्लीं हे कोनाडे दृष्टीस पडत नाहींत. हा किल्ला हल्लीं अगदीं ओसाड स्थितींत आहे. तो **आसगांव** खेड्याखालीं मोडतो. पूर्वी किल्ल्याचे गडकरी कोण होते तें कांहीं कळत नाहीं. किल्ल्याजवळच कड्याच्या जरा पश्चिमेस **गोरक्षनाथाचें** ओबडधोबड बांधलेलें एक देवालय आहे. हा किल्ला कोणीं केव्हां बांधला तें कळत नाहीं; परंतु तो फार जुना असावा असें अनुमान होतें. इ० स० १८१८ च्या एप्रिल महिन्यांत **मेजर थ्याकर** साहेबाच्या हाताखालील इंग्लिश फौजेची एक लहानशी टोळी व मराठे लोकांची किल्ल्यांतील शिबंदी यांची लहानशी चकमक झडून तो इंग्लिशांचे हातीं आला.

२. **पांडवगड.**—हा किल्ला **वांई** तालुक्यांत **वांईच्या** ईशान्य दिशेस ४ मैलांवर एका टेंकडीवर बांधलेला आहे. याची उंची समुद्राच्या सपाटीपासून ४१७७ फूट आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता **शेलारवाडी** नांवाच्या खेड्यावरून आहे. थोडीशी चढण चढून वर गेलें म्हणजे

कोळ्यांचीं कांहीं झोंपडीं लागतात. हे कोळी किल्ल्यांत जीं देवस्थानें आहेत त्यांचे पुजारी आहेत. ह्या झोंपड्यांच्या वरचा २०० यार्ड लांबीचा चढाव फार अवघड आहे, व तो चढून जाण्याकरितां खडक फोडून ओबडधोबड पायऱ्या बांधलेल्या आहेत. किल्ला साधारण चौरस असून त्याचें क्षेत्रफळ सहा एकर आहे. त्याचा दरवाजा उत्तराभिमुख आहे. त्याचें कांहीं काम फार जुनें आहे, व कांहीं अलीकडील बांधणीचें आहे. त्याच्या माथ्यावर १०० फूट लांब व ६० फूट रुंद असें एक तळें आहे. परंतु हल्लीं त्यांत पाणी वगैरे कांहीं नाहीं. ह्याशिवाय किल्ल्यांत आणखीं १४ लहान लहान तळीं किंवा टांकीं आहेत. त्यापैकीं फक्त दोन टांक्यांचें पाणी फार चांगलें आहे. आंत दोन देवीचीं देवालयें आहेत. हा किल्ला कोल्हापुरच्या शिलाहार राजांपैकीं पन्हाळ्याचा राजा दुसरा भोज (इ० स० ११७८-११९३) यानें बांधला अशी दंतकथा सांगतात. इ० स० १६४८ च्या सुमारास तो, विजापुरच्या बाद्शाहाचा वांई येथें जो मोकासदार होता त्याच्या ताब्यांत होता. इ० स० १६७३ त तो शिवाजी महाराजांनीं घेतला. पुढें इ० स० १७०१ त तो औरंगजेब बादशाहाचे हातीं आला. इ० स० १७१३ त शाहू महाराजांचा सेनापति चंद्रसेन जाधव व बाळाजी विश्वनाथ यांच्यामध्यें तंटा लागला, तेव्हां सचिवानें[1] बाळाजीस आश्रय न दिल्यामुळें तो पिलाजी जाधव व नाथाजी धुमाळ या दोन शिलेदारांच्या साह्यानें पांडवगडचे आश्रयास येऊन राहिला.

---

१ त्या वेळीं नारो शंकर हा सचिव होता; परंतु तो अज्ञान असल्यामुळें राझेकर या आडनांवाचा मनुष्य त्याचें काम

चंद्रसेनानें त्या किल्ल्यास वेढा दिला. पुढें बाळाजीनें आपलें रक्षण करण्याविषयीं शाहू महाराजांस विनंती केली, तेव्हां त्यानीं बाळाजीस अभयपत्र देऊन किल्ल्याचा वेढा उठविण्याविषयीं चंद्रसेनास आज्ञा केली. परंतु चंद्रसेनानें वेढा न उठवितां शाहू महाराजांस असें सांगून पाठविलें कीं, "बाळाजीस आमचे स्वाधीन करावें, नाहीं तर स्वामींचे पाय आम्हांस अंतरतील." शाहू महाराजांस या उद्धट निरोपाचा मोठा राग येऊन त्यांनीं हैबतराव निंबाळकर नांवाच्या आपल्या सरदारास चंद्रसेनावर पाठवून दिलें. तेव्हां चंद्रसेन पांडवगडचा वेढा उठवून पळून गेला. पुढें हैबतरावानें त्याचा जेऊर येथें पराभव केला. इ० स० १८१७ त दुसरे बाजीराव पेशवे यांचा आवडता मंत्री त्रिंबकजी डेंगळा यानें बंड केलें, तेव्हां त्याच्या लोकांनीं पांडवगड किल्ला घेतला. पुढें इंग्लिशांची व मराठ्यांची लढाई सुरू झाली तेव्हां इ० स० १८१८ च्या एप्रिल महिन्यांत मेजर थ्याकर याच्या हाताखालच्या ९ व्या काळ्या पायदळ पलटणीनें तो किल्ला सर केला. पांडवगडाजवळ धावडी नांवाच्या खेड्यांत काहीं पाहण्यासारखीं कोरींव लेणीं आहेत.

३. वैराटगड.—हा किल्ला वांई तालुक्यांत वांईच्या नैर्ऋत्येस ६ मैलांवर व मालकमपेठेच्या थेट पूर्वेस २० मैलांवर असून तो पांचगणीकडून जी सह्याद्रीची ओळ गेली आहे, तिच्या एका फांट्यावर बांधलेला आहे. ह्या किल्ल्याच्या उत्तरेस त्याला लागूनच व्याजवाडी व जांबुळणें हीं खेडीं आहेत, व दक्षिणेस म्हसवें नांवाचें खेडें आहे. म्हसवें ऊर्फ बावधन येथून किल्ल्यावर जाण्याचा रस्ता आहे. हा रस्ता सुमारें २

मैल लांबीचा आहे. किल्ल्याच्या सभोंवारचा कडा ३० फूट उंचीचा असून वर ७ फूट भिंत बांधलेली आहे, व तिला गोळीबार काढण्याकरितां मधून मधून भोकें ठेविलेलीं आहेत. वरील भिंतीचे दगड मोठमोठे असून तिचें काम चुन्याशिवाय केलेलें आहे. किल्ल्यावर सदरकचेरीची जागा व शिपाई लोकांस राहण्याकरितां बांधलेलीं घरें वगैरे कांहीं इमारती आहेत. परंतु हल्लीं त्या अगदीं मोडकळीस आलेल्या आहेत. किल्ल्यांत एकंदर ९ तळीं आहेत. हा किल्ला कोल्हापुरच्या शिलाहार राजांपैकीं दुसरा भोज राजा ह्यानें बांधला, अशी दंतकथा सांगतात. ह्या किल्ल्याला वैराटगड हें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, ह्या डोंगरावर पूर्वीं वैराट नांवाचे रानटी लोक रहात असत; त्यांना पांडवांनीं जिंकलें. बावधनच्या डोंगरावरून ह्या किल्ल्यावर चांगला मारा चालतो. ह्या किल्ल्यावरून आसमंतात् भागाचा देखावा फारच मनोहर दिसतो. इ०-स० १८१८ त हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला.

४. **वंदन**.—हा किल्ला **वांई** तालुक्यांत **सा**ताऱ्याच्या ईशान्येस सुमारें १० मैलांवर आहे. हा किल्ला फार मोठा व उंच आहे—म्हणजे समुद्राच्या सपाटीपासून त्याची उंची ३८४१ फूट आहे. जरंड्याहून ह्या किल्ल्यावर जाण्याचा मार्ग आहे. त्या मार्गाची हल्लीं जी स्थिति आहे तीवरून तो पूर्वीं फारच मोठा असावा असें अनुमान होतें. मधून मधून त्याच्या पायऱ्या उंचसखल असून त्या गडगड्या किंवा गुंडेवजा दगडांनीं बांधलेल्या आहेत. उत्तरेच्या बाजूस फार मोठा चढाव आहे, व तेथून पुढें गेलें म्हणजे

एक मोठें वळण लागतें. नंतर पूर्वेच्या बाजूनें तसेंच पुढें जावें म्हणजे किल्ल्याचा पहिला दरवाजा लागतो. हा दरवाजा अजूनपर्यंत फार चांगल्या स्थितींत आहे. परंतु त्याच्या पिछाडीच्या भागाची बरीच पडापड झाली आहे. एथून पुढें वळणावळणांनीं जावें लागतें. नंतर दुसरा दरवाजा लागतो. हा दरवाजा पहिल्या दरवाज्यापेक्षां फार जुनाट दिसतो. हल्लीं तेथें दगडमाती वगैरे पडून तो अगदीं भरून गेला आहे. ह्या दरवाज्यावर फार्शी भाषेंत लिहिलेला एक शिलालेख आहे. आंतल्या बाजूस पहारेकरी लोकांच्या बऱ्याच खोल्या आहेत. एथून कांहीं पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याच्या माथ्यावर मनुष्य जातें. किल्ल्यांतील प्रदेश फार मोठा असून पूर्वी आंत फार मोठी शिबंदी असावी असा तर्क होतो. किल्ल्यांत पडापड झालेलीं जुनीं घरें व त्यांचे चौथरे पुष्कळ आहेत; व एके ठिकाणीं तर ह्या चौथऱ्यांची ओळची ओळ दृष्टीस पडते. तिला पूर्वी ब्राह्मणआळी म्हणून म्हणत असत असें सांगतात. एथून थोड्याशा पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे सरकारवाडा लागतो. हा वाडाही आतां पडून गेला आहे. ह्या ठिकाणीं दोन वडाचे व एक शेवरीचा असे तीन फार जुनाट वृक्ष आहेत, व त्यांनीं आपल्या गतवैभव प्रभूवर जणूं काय छत्रच धरलें आहे असा भास होतो. हे वृक्ष फार लांबून दृष्टीस पडतात. वाड्याला लागूनच दुसरी एक इमारत असून तिला तीन दालनें आहेत, व तिच्यावरील छप्पर अद्यापि कायम आहे. त्याच्या पश्चिमेस एक मशीद आहे, व तीही अद्यापि चांगल्या स्थितींत आहे. परंतु तेथें पूर्वी गुरें बांधीत असत असें अनुमान होतें. तिच्यापलीकडे मुसलमान लोकांची

न्हाणीची जागा आहे, व तिच्याजवळ दोन थडगीं आहेत. ही थडगीं कोणाचीं तें कांहीं कळत नाहीं; परंतु त्यांचे संबंधानें एका मनुष्यास कांहीं इनाम असून तो त्यांची नेहमी देखरेख करीत असतो. ह्या थडग्यांवर नेहमीं चादर घातलेली असते. किल्ल्यांत पाण्याचे मोठमोठे बरेच खजिने आहेत; परंतु सरकारवाड्याच्या खालच्या अंगास एक व कबरस्थानाजवळ एक असे दोन खजिने फारच मोठे आहेत, व त्यांचें पाणीही फार उत्कृष्ट आहे. वायव्य दिशेच्या कोंपऱ्यांत एक फार मोठें तळें असून, त्यांतील पाणी अडविण्याकरितां कड्याच्या बाजूनें एक मोठा धक्का बांधलेला आहे. परंतु त्या धक्कयाला भोंक पडल्यामुळें हल्ली त्यांत पाणी रहात नाहीं. किल्ल्याच्या माथ्यावरची जागा सपाट नाहीं. किल्ल्यांत सरकारवाड्यापेक्षां १०० फूट उंचीची अशी एक टेंकडी आहे, व तिच्यावर जाण्याच्या पायऱ्या अगदीं उभ्या आहेत. तिच्या माथ्यावर पडापड झालेला एक मोठा वाडा आहे. हा वाडा पूर्वीचें क्रीडामंदिर होतें असें सांगतात. ह्या किल्ल्याला जरी सभोंवार एकसारखा तट नाहीं, तरी जरूर वाटली त्या ठिकाणीं अतिशय भक्कम तट बांधलेले आहेत, व कोंपऱ्याकोंपऱ्यांनीं बुरूज ठेवलेले आहेत. इ० स० १८५७ सालच्या बंडांत किल्ल्यावरील तोफा उडविण्याकरितां क्याप्टन रोझ साहेब वर आला होता; त्या वेळी त्यानें वर सांगितलेल्या तळ्याचा धक्का फोडला असावा. आतां वर एकही तोफ नाहीं. पूर्वी येथें एक सुभेदार व त्याच्या हाताखालीं २०० गडकरी इतके लोक रक्षणा करतां ठेवलेले असत.

९. **केंजळगड.**—हा किल्ला **वांई** तालुक्यांत वांईच्या

ईशान्येस सुमारें ११ मैलांवर महादेवाचे डोंगरांत मांधारदेव नांवाचा एक सुळका आहे त्यावर बांधलेला आहे. त्याची उंची समुद्राच्या सपाटीपासून ४२६९ फूट आहे. टेंकडीचा माथा सपाट असून ती २५० यार्ड लांब व १०० यार्ड रुंद आहे. लांबून किंवा जवळून पाहिलें तरी हा किल्ला अतिशय बळकट दिसतो. हा किल्ला पूर्वेस २ मैलांवर येरूलीअस्रें व डोईचीवाडी म्हणून दोन उंचवट्याचे प्रदेश व पश्चिमेस १ मैलावर जांबळीचा डोंगर यांच्या चांगला माऱ्यांत आहे. हा किल्ला म्हणजे एक लहानसें खेडेंच आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता वांईच्या अंगानें असेंखवली ह्या खेड्यांतून फुटतो. ज्या शिखरावर हा किल्ला बांधलेला आहे तें मुख्य डोंगरांतून सुळक्यासारखें नीट उंच गेलेलें आहे, व तें साऱ्या सातारा जिल्ह्यांत अतिशय उंच आहे. त्याची उंची ८० पासून १०० फुटांपर्यंत आहे. किल्ल्यांत जाण्याचा रस्ता उत्तरेच्या बाजूनें आहे. प्रथमतः नीट उंच अशा १०० पायऱ्या लागतात. त्या चढून वर गेलें म्हणजे आणखी वर ७ फूट किल्ला राहतो. येथें खालील पायऱ्यांशीं काटकोन करणाऱ्या दुसऱ्या पायऱ्या फुटतात. ह्या सर्व पायऱ्या खडक खोदून तयार केलेल्या आहेत. त्या पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे किल्ल्यांत प्रवेश होतो. वर सांगितलेल्या पायऱ्या अशा विलक्षण रीतीनें बांधलेल्या आहेत कीं, त्या पहातांक्षणींच पहाणाराचे मनाचा कांहीं विलक्षण ग्रह होऊन जातो. अशा प्रकारच्या पायऱ्या सातारा जिल्ह्यांतील दुसऱ्या कोणत्याही किल्ल्याला नाहींत.

व दुसऱ्या बाजूस भयंकर खोल तुटलेला कडा, असा देखावा पाहून पायऱ्या चढणारा मनुष्य भित्रा असेल तर त्याची गाळणच होऊन जाईल! मराठ्यांचे वेळीं किल्लयावर हल्ला करतांना ह्या पायऱ्यांवरून पुष्कळ लोक खालील कड्यांत पडून मेले असतील असें वाटतें. पायऱ्या जेथून लागतात तेथें एक मोठा बुरूज बांधलेला आहे. तो किल्लयाच्या दरवाज्याच्या संरक्षणाकरितां बांधलेला असावा असें वाटतें. किल्लयांत सहा मोठ्या व तीन लहान अशा एकंदर ९ इमारती जमिनदोस्त झालेल्या दृष्टीस पडतात; परंतु त्यांची बांधणी बरीच अलीकडील दिसते. पूर्वींची कचेरीची जागा म्हणून जें ठिकाण दाखवितात तेथें हल्लीं एक मोठा औदुंबराचा वृक्ष आहे. दारूखान्याची जागा मात्र अद्यापपर्यंत बऱ्याच चांगल्या स्थितींत आहे. त्याच्या भिंती भक्कम दगडांनीं बांधलेल्या असून त्याचें क्षेत्रफळ सुमारें ३० फूट आहे. किल्लयाचा तटही मोठमोठ्या दगडांनीं चुन्याशिवाय बांधलेला आहे. किल्लयांत तीन मोठीं व सात लहान अशीं एकंदर नऊ तळीं आहेत. त्यांतील पाणी हल्लीं फार खराब झालेलें आहे. आंत जिवंत पाण्याचा असा कोठेंच झरा नाहीं. पश्चिमेच्या बाजूस नाकाच्या आकाराचें असें एक डोंगराचें टोंक पुढें गेलेलें आहे. हें टोंक मुख्य शिखरापेक्षां सखल आहे. ह्याची तटबंदी मोठी मजबूत आहे. ह्याच्याखालीं ३०० फुटांवर खिलंजगडचें खेडें आहे.

हा किल्ला पन्हाळयाच्या भोज राजांनीं १२ व्या शतकांत बांधला असें सांगतात. त्याच्या बळकटीविषयीं प्रसिद्ध एल्फिन्स्टन साहेब असें लिहितात कीं, "किल्लयांतील लोक जर नेटानें हरकत करूं लागले तर हा किल्ला

 ३.प्र.८२.

घेणें मुष्किलीचेंच काम आहे." किल्ला सुध्या रीतीनें इंग्लिशांचे हातीं आला नाहीं. इंग्लिशांची व मराठ्यांची चकमक झडून तो तारीख २६ मार्च इ० स० १८१८ रोजीं कर्नल प्रिझलर साहेबाच्या हाताखालच्या एका टोळीनें घेतला.

---

# सातारा तालुका.

—:o*o:—

६. **साताऱ्याचा किल्ला.**—साताऱ्यास गेल्यावर तेथील किल्ला पहाणें हें प्रत्येकाचें अवश्य कर्तव्यकर्म होय असें म्हटल्यास हरकत नाहीं. साताऱ्याचा किल्ला दक्षिणेच्या अं-गास सह्याद्रीच्या अगदीं एकीकडे झुकलेल्या अशा एक भोंसले ड्यावर बांधलेला आहे. या किल्ल्याची उंची सुमारें ९ असेंही आहे; वर गेलें म्हणजे त्याच्या पायथ्याशीं वसलेलें स शहर व आसमंतात् भागचा उंचसखल प्रदेश यांचा देखावा फारच रमणीय दिसतो. पूर्वेच्या बाजूस नजर फेंकली म्हणजे लांबच लांब एकसारखी लागत गेलेली अशी डोंग-रांची ओळ दृष्टीस पडते, व तीमधून चंदन व वंदन हे किल्ले व जरंड्याचा डोंगर हे भीत भीत मान वर करून जणूं काय आपल्या प्रभूचा दर्शनलाभच घेत आहेत, पश्चि-मेच्या बाजूस यौतेश्वर व दुसरे कांहीं डोंगर प्रभुपदकमलीं लीन होऊन गादीची सेवा करण्याकरितांच जसे काय कर-द्वय जोडून उभे आहेत, त्याचप्रमाणें वायव्य दिशेस पर-ळीचा किल्ला आपल्या शिष्याला अडचणीच्या प्रसंगीं योग्य सल्लामसलत देण्याकरतां गादीसन्निधच जणूं काय गाश्रम बांधून राहिला आहे, असा भास होतो. कि-

ल्याची पूर्वपश्चिम लांबी ११०० यार्ड व दक्षिणोत्तर रुंदी ६०० यार्ड आहे, व त्याचा माथा त्रिकोणाकृति आहे. किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. थोरला दरवाजा उत्तरेच्या बाजूस आहे, व धाकटा दरवाजा दक्षिणेच्या बाजूस आहे. धाकट्या दरवाज्याजवळचा डोंगराचा भाग सुळक्या-सारखा असल्यामुळें खालून वर जाण्यास रस्ता नाहीं. थोरल्या दरवाज्याकडे जाण्याचा रस्ता ८ फूट रुंद असून तो फार चांगला आहे; हा रस्ता सुमारें २ मैल लांबीचा आहे. हा रस्ता गोडोरी नांवाच्या खेड्याजवळ फुटून सुमारें १॥ मैलावर राणीचा महाल ज्या टेंकडीवर बांधलेला होता तिकडून पुढें जातो, व तेथून अर्धा मैल पुढें बराचा रणजे किल्ल्याच्या उत्तरेकडील माचीवर मनुष्य येऊन बऱ्याच ।. येथून किल्ल्याचा माथा २५० फूट वर राहतो. दगडांनी, पश्चिम बाजूच्या कोंपऱ्यांतील बुरूज व थोरल्या दरवाज्याच्या आग्नेयीस २०० यार्डांवर दुसरा जो एक बुरूज आहे त्या दोहोंच्या माऱ्यांत आहे. हा रस्ता इंग्लिश सरकारानें नवीन बांधला आहे. किल्ल्यांत जाण्याचे जुने रस्ते अवघड असून ते वळणावळणांनीं गेले आहेत. एक रस्ता भवानी पेठेंतून फुटतो व दुसरा अदालतवाड्याच्या पूर्वेस सुमारें १०० यार्डांवर फुटतो. किल्ल्याच्या तटाची रुंदी १० फूट असून उंची साधारण १९ फूट आहे. किल्ल्यांत एकंदर ९ तळीं असून दुसरे बाजीराव पेशवे यांनीं बांधलेला एक वाडा व कांहीं घरें आहेत. ईशान्य दिशेच्या कोंपऱ्यास मंगळाई देवीचें देवालय आहे. बहुतेक तळीं पाण्यानें तुडुंब भरलेलीं असून त्यांत मोठमोठे मासे आहेत. बाजीरावाचा वाडा दुमजली असून अगदीं साधा आहे.

पूर्वी जेव्हां इंग्लिशांचें लष्कर ह्या किल्ल्यांत होतें, तेव्हां ह्या वाड्यांत गोरे घोडेस्वार राहत असत. कालमाहात्म्य कांहीं विचित्र आहे. " पंके निमग्ने करिणि भेको भवति मूर्धगः ! " हल्लीं उन्हाळ्यांत येथें बडेबडे साहेब लोक हवा खाण्याकरतां येऊन राहतात. अलीकडे ह्या किल्ल्यांत इंग्लिशांनीं आपली कांहीं फौज ठेविली आहे, व कधीं काळीं धामधुमीचा प्रसंग आला तर त्या वेळीं हा किल्ला आपल्या पुष्कळ उपयोगीं पडेल, असे विचार इंग्लिश सरकाराचे मनांत येत आहेत. फक्त यौतेश्वराचा डोंगर काय तो किल्ल्याच्या बराच जवळ म्हणजे सुमारें ३६०० यार्डांवर आहे. किल्ल्याच्या उतरणींवरचें रान तोडून टाकून, दक्षिणेकडील व आग्नेयीकडील उतरणींची जागा श्रीमंत आबासाहेब भोंसले यांची आहे. ती त्यांचेकडून विकत घ्यावयाची, असेंही इंग्लिश सरकारचे मनांत आलें आहे.

हा किल्ला कोल्हापुरच्या शिलाहार राजांपैकीं दुसरा भोज राजा ( इ० स० ११७८—११९३ ) ह्यानें इ० स० ११९० च्या सुमारास बांधला. ह्या किल्याचा पाया घातला तेव्हां एक महाराचा मुलगा व मुलगी यांस येथें बळी दिलें असें सांगतात. विजापुरच्या बादशाहांनीं ह्या किल्ल्याची व्यवस्था फार उत्कृष्ट तऱ्हेची ठेविली होती; व बडेबडे राज्यकारणी कैदी अटकेंत ठेवावयाचे ते ह्या किल्ल्यांत ठेवीत असत. इ० स० १५८० त अहमदनगरची प्रख्यात राणी चांदबिबी, व इ०स०१५९२त

---

१ चौथा बाहामणी राजा महमदशाहा ( इ० स० १३५८–१३७५ ) याच्या कारकीर्दींत साताऱ्याचा किल्ला बांधला असें फेरिस्ता लिहितो.

विजापुरचा दिलावरखान नांवाचा एक सरदार यांस ह्या किल्ल्यांत कैद करून ठेविलेलें होतें. शिवाजीनें परळीचा किल्ला घेतल्यानंतर इ० स० १६७३ त साताऱ्च्या किल्ल्यास वेढा दिला, व तीन महिन्यांनीं किल्ला त्याचे हातीं आला. पुढें स०इ० १६९९ त औरंगजेबानें ह्या किल्ल्यास वेढा दिला, परंतु ९ महिनेपर्यंत मराठ्यांनीं मोंगलांस दाद दिली नाहीं. औरंगजेबानें आपली प्रचंड सेना मुंगीप्रमाणें किल्ल्याच्या सभोंवार पसरून दिली. त्यानें चाऱ्ही बाजूंनीं नाकेबंदी केली होती. उत्तरेच्या बाजूस करंजगांवाजवळ आपण स्वतः राहिला. पश्चिमेच्या बाजूस शहापूर येथें त्यानें आपला मुलगा अजीमशाहा यास ठेविलें, दक्षिणेच्या बाजूस शिरजीखान यास ठेविलें, व पूर्वेस तरावियतखानाची योजना केली. किल्ल्याचा हवालदार प्रयागजी प्रभू यानें मोठ्या शौर्यानें बरेच दिवस किल्ल्याचें संरक्षण केलें. किल्ल्यांत फक्त २ महिने पुरण्यासारखी धान्यसामग्री होती. औरंगजेबानें वाटोळा वेढा दिल्यामुळें बाहेरचा पुरवठा बंद पडला; तेव्हां परशुराम त्रिंबक प्रतिनिधी त्या वेळीं परळी किल्ल्यावर होता त्यानें अजीमशाहास वश करून घेऊन आंतील लोकांस धान्याचा पुरवठा केला. वेढा देऊन किल्ला हातीं येत नाहीं अशी औरंगजेबाची खातरी झाल्यावर सुरुंग लावून किल्ल्याचें भिंताड पाडून किल्ल्यावर हल्ला करण्याचा त्यानें निश्चय केला, व तें काम त्यानें तरावियतखानास

---

१ विजापुरच्या राज्यांतील मुख्य मंत्री किशवारखान यानें चांदबिबी हिनें आपला भाऊ अहमदनगरचा राजा मूर्तिजा निजामशहा यास विजापुरावर स्वारी करण्यास सांगितलें असा खोटाच आरोप ठेवून तिला साताराचे किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें.

सांगितलें. खानानें हुकुमाप्रमाणें सुरुंग तयार केले. बाहेर काय चाललें आहे याची दाद आंतील लोकांस कांहींच लागेना. तरबियतखानास त्या सुरुंगांविषयीं इतकी खातरी होती कीं, त्यानें बादशाहास ती मजा पाहण्याकरितां मुद्दाम बोलविलें. तेव्हां औरंगजेब मोठ्या थाटामाटानें तेथें आला, व स्वारीचा तो अप्रतिम थाट पाहण्याकरितां किल्ल्यांतील लोकही तटावर येऊन बसले. प्रयागजी प्रभूही या लोकांबरोबर तटावर आला होता. परंतु त्याच तटाच्या खालीं सुरुंग खोदलेला आहे हें त्या बिचाऱ्यास काय माहीत? पहिला सुरुंग उडतांच तटाला मोठमोठ्या भेगा पडल्या व वरची भिंत उडून गेली. तीबरोबर तटावरील मंडळी पक्ष्याच्या परांप्रमाणें आकाशांत उडून खालीं पडली. तटावर आलेले सर्व लोक ठार झाले. फक्त प्रयागजी मात्र आयुष्याची दोरी सबळ म्हणून वांचला. भिंत उडाल्याबरोबर प्रयागजीही वर उडाला व खालीं पडला. परंतु त्या वेळीं अशी एक अतर्क्य गोष्ट घडून आली कीं, ज्या ठिकाणीं प्रयागजी पडला त्याच्या तीन बाजूंस तीन मोठमोठ्या शिला येऊन पडल्या व वरून मातीचा डोंगर झाला. तीन बाजूंनीं त्रिकोणाकृति शिला येऊन पडल्यामुळें प्रयागजी आंत सुरक्षित राहिला. पुढें त्याच्या लोकांनीं दगडमाती एका अंगास लोटून प्रयागजीस बाहेर काढिलें. इतक्यांत दुसरा सुरुंग उडाला. परंतु तो बाहेरच्या अंगास उडाला व त्याचे खालीं मोंगलांचे २००० लोक ठार झाले. इतकें झालें तरी प्रयागजी मोठ्या नेटानें राहिला. परंतु पुढें अजीमशाहा किल्ल्यांत धान्यसामग्री जाऊं देईना; तेव्हां उपासमार पडूं लागल्या कारणानें आंतील लोकांचा निरुपाय

होऊन ते अजीशाहाचे मार्फत तो किल्ला औरंगजेबाचे स्वाधीन करून तेथून निघून गेले. अजीमशाहाचे मध्यस्थीनें किल्ला मिळाला म्हणून बादशाहानें त्या किल्ल्याचें नांव अजीमतारा असें ठेविलें. पुढें इ० स० १७७६ त आनाजीपंत नांवाच्या एका मनुष्यानें मोठ्या युक्तीनें तो किल्ला परशुराम त्रिंबक प्रतिनिधि यास घेऊन दिला. हा आनाजीपंत पूर्वी राजारामाचे वेळीं मावळे लोकांच्या टोळीवरचा एक कारकून होता. ज्या वेळीं झुलफिकारखानानें जिंजी घेतली, व राजाराम तेथून निघून साताऱ्यास आला, त्या वेळीं तो (इ० स० १६९९) मोंगलांच्या हातीं सांपडला, व त्यांनीं त्याला जिंजी येथें कैदेंत ठेविलें. तेथून तो मोठ्या युक्तीनें सुटून गोसाव्याच्या वेषानें साताऱ्यास यावयास निघाला (इ० स० १७०६). वाटेनें त्याची व सातारच्या किल्ल्यावर जाणाऱ्या मोंगलांच्या एका टोळीची गांठ पडली. त्यानें त्या शिपाई लोकांस कांहीं चटकदार गोष्टी सांगून व गाण्याचे चुटके गाऊन अगदीं खूश करून टाकलें; तेव्हां ते त्याला आपल्याबरोबर सातारच्या किल्ल्यांत घेऊन गेले. कांहीं दिवस झाल्यावर त्यानें परशुराम त्रिंबक यास किल्ला घेण्याचा आपला बेत कळविला; व संधि साधून तो कांहीं मावळे लोकांस किल्ल्यांत घेऊन गेला, व मोंगलांच्या शिपायांस जागच्या जागीं ठार मारून त्यानें किल्ला सर केला. इ०स०१७०८ त शाहूमहाराज धनाजी जाधवासह चंदनवंदन येथें आल्यावर त्यांनीं परशुराम त्रिंबक यास "सातारचा किल्ला आमचे हवालीं करून तुम्हीं भेटीस यावें" म्हणून आज्ञा केली. परंतु प्रतिनिधि ताराबाईच्या पक्षाचा पडल्यामुळें त्यानें

शाहूमहाराजांच्या आज्ञेचा कांहीच विचार केला नाहीं. शेख मिरा व प्रयागजी प्रभु यांनीं किल्ला शाहूमहाराजांच्या स्वाधीन करावा, म्हणून प्रतिनिधीस सांगितलें. परंतु तो त्यांचें म्हणणें कबूल करीना. शेवटीं त्या दोघांनीं प्रतिनिधीस कैद करून किल्ला शाहूमहाराजांचे स्वाधीन केला. पुढें इ० स० १७३० त श्रीपतराव प्रतिनिधीनें वारणेच्या कांठीं कोल्हापुरच्या संभाजी राजाचा पराभव केला, तेव्हां ताराबाई व तिची सून राजसबाई ह्यांस प्रतिनिधीनें कैद करून शाहूमहाराजांच्या स्वाधीन केलें; व त्यांनीं त्या दोघींस सातारचे किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. इ० स० १७४६ त जेव्हां मराठ्यांनीं कर्नाटकावर स्वारी केली तेव्हां अर्काटचा नबाब चंदासाहेब यास कैद करून सातारचे किल्ल्यावर आणून ठेविलें होतें. इ० स० १७४८ त शाहूमहाराज मरण पावल्यावर ताराबाईचा नातू रामराजा गादीवर आला. त्या वेळीं बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब हे पेशवाईच्या गादीवर होते. ताराबाई पेशव्यांचा फार द्वेष करीत असे. संपूर्ण मराठी राज्याचीं सूत्रें आपल्या हातांत असावीं असें तिला निरंतर वाटत असे. तेव्हां तिनें राज्यांत मोठा बखेडा माजविण्याचा प्रयत्न चालविला, व इ० स० १७५१ त नानासाहेब औरंगाबादेस गेले होते, ती संधि साधून तिनें दमाजी गायकवाडास असा निरोप पाठविला कीं, "सातारच्या राजाचें व संपूर्ण मराठी राज्याचें ब्राह्मणांच्या कावेबाजपणापासून रक्षण करणें असेल तर आपण ताबडतोब निघून यावें." रामराजा ह्या कटांत सामील होईना, तेव्हां दमाजी गायकवाड जवळ आला आहे, असें तिला समजल्यावर तिनें

रामराजास मेजवानीकरतां म्हणून किल्ल्यांत बोलावून नेलें व त्यास एकदम कैद केलें. तिनें रामराजास फारच वाईट रीतीनें वागविलें. नानासाहेबांस ही गोष्ट समजतांच त्यांनीं मोठ्या युक्तीनें लढाईचा वगैरे प्रसंग न आणतां ताराबाईशीं सल्ला केला. ह्यापुढील सातारचे राजे फक्त नामधारी असून सर्व सत्ता पेशव्यांच्या हातांत होती. इ० स० १७९८ त दुसरे शाहूमहाराजांना ही पेशव्यांची कैद न आवडून त्यांनीं थोडेसे हातपाय हालविण्याचा विचार केला; व सातारच्या किल्ल्याची ते डागडुजी करूं लागले. पुढें परशुरामपंत पटवर्धन यानें किल्ल्यास वेढा दिला, तेव्हां आंतील लोकांस अन्नसामग्रीचा तोटा येऊन उपास-मार पडूं लागल्यामुळें शाहूमहाराजांनीं तो किल्ला परशु-रामपंताचे स्वाधीन केला. इ० स० १८१८ त मराठ्यांबरो-बरच्या तिसऱ्या लढाईच्या वेळीं जनरल स्मिथ व जनरल प्रिझलर हे मार्च महिन्याच्या ८ व्या तारखेस साताऱ्यास आले, व १० व्या तारखेस किल्ल्यावर इंग्लिशांचें निशाण फडकूं लागलें. अद्यापि हा किल्ला फार चांगल्या स्थितींत आहे.

७. परळी किंवा सज्जनगड.—हा किल्ला साता-रच्या पश्चिमेस ६ मैलांवर सह्याद्रीच्या एका फांट्यावर बांधलेला आहे. ह्याचा घेर १८२४ यार्ड आहे; व जमिनीच्या पृष्ठभागापासून याची उंची १०४९ फूट आहे. इ० स० १८९० व इ० स० १८८१ ह्या वर्षांचे जे पाहणीच्या हकीकतीचे लेख आहेत त्यांत असें लिहिलें आहे कीं, या किल्ल्याच्या उत्तरेस ३९०० यार्डांवर यौतेश्वराचा डोंगर आहे, दक्षिणेस २९०० यार्डांवर जुना सातारा आहे, व वायव्येस

११०० यार्डांवर नांक नांवाचा डोंगर आहे. ह्या किल्ल्यावर जाण्याचा रस्ता साताऱ्यापासून उरमोडी नदीपर्यंत फार चांगला आहे. पुढचा किल्ल्यापर्यंतचा चढाव बराच अवघड आहे. किल्ल्यांत जाण्याचा दुसरा एक रस्ता परळी खेड्यांतून आहे, परंतु तो फारच अडचणीचा आहे. या किल्ल्याला दोन दरवाजे असून ते दक्षिणच्या बाजूच्या कोंपऱ्यांत आहेत. हे दोन्ही दरवाजे दुरुस्त असून चांगले भक्कम आहेत. खालचा दरवाजा खडकांत असून त्याच्याजवळ आल्याशिवाय तो दृष्टीस पडत नाहीं. दरवाज्याजवळचा भाग व वायव्य दिशेकडील कोंपरा ह्यांची तटबंदी इतर तटबंदीपेक्षां फारच मजबूत आहे; कारण ह्या दोन ठिकाणीं फक्त शिड्या लावून किंवा दुसऱ्या कांहीं साधनांनीं शत्रु किल्ल्यांत येण्याचा संभव आहे. बाकीचा डोंगराचा भाग ऊंच व तुटलेला असल्यामुळें तिकडून शत्रु येण्याची मुळींच भिति नाहीं. किल्ल्यांत पडापड झालेली एक मशीद व तीन देवालयें आहेत. ह्यांपैकीं रामाचें देवालय किल्ल्याच्या साधारण मध्यावर असून त्याच्या सभोंवार एक लहानसें खेडें वसलेलें आहे, व त्यांत सुमारें ३५ घरें असून २०० लोकांची वस्ती आहे. त्यांत ब्राह्मण व वाणी हे विशेष आहेत. किल्ल्यांत पुष्कळ तळीं आहेत; परंतु चांगल्या पाण्याचें असें एकच तळें आहे व तें राममंदिराच्या उत्तरेस आहे.

किल्ल्यापासून परळी गांव १२०० यार्डांवर त्याच्या पायथ्याशीं आहे. गांवांत १३० घरें असून शिवाय पुष्कळ देवालयें आहेत. येथें दर रविवारीं बाजार भरत असतो. परळी हें खेडें शिवाजीमहाराजांचे गुरु प्रसिद्ध रामदास स्वामी

यांचें आवडतें स्थान होय ( इ० स० १६०८–१६८१ ). हें स्वामींस इनाम दिलेलें होतें. स्वामींचें देवालय गांवाच्या मध्यभागीं असून त्याच्या सभोंवार त्यांच्या उपासक मंडळीचीं घरें आहेत. हें देऊळ आकाबाई व दिवाकर गोसावी म्हणून कोणीं स्वामींचे भक्त होते त्यांनीं बांधलें. येथें दरवर्षास फेब्रुवारी महिन्यांत मोठी जत्रा भरत असते.

परळीचा किल्ला फार जुना म्हणजे मुसलमान लोकांचा दक्षिणेंत अंमल होण्याच्याही पूर्वी बांधलेला असावा असें दिसतें; व याची साक्ष किल्ल्याजवळच हेमाडपंती चालीचीं जीं दोन देवालयें आहेत तीं देतात. हा किल्ला मुसलमानांपासून शिवाजीच्या शूर मावळे लोकांनीं इ० स० १६७३ च्या मे महिन्यांत घेतला. रामदास स्वामी इ० स० १६८१ त समाधिस्त झाले, त्याच्यापूर्वी कांहीं दिवस त्यांनीं शिवाजीमहाराजांचा पुत्र संभाजी यास उपदेशात्मक एक [1]पत्र पाठविलें

---

१ ह्या पत्रांतील मजकूर ओवीबद्ध असून तो फारच मनोवेधक आहे, सबब तें पत्र या ठिकाणीं दिलें असतां अगदींच अप्रासंगिक होणार नाहीं:—

।। श्री ।। अखंड सावधान असावें । दुश्चित्त कदापी नसावें । तजवीज करीत बसावें । एकांत स्थळीं ।। १ ।। कांहीं उग्र स्थिती सोडावी । कांहीं सौम्यता धरावी । चिंता लागावी परावी । अंतर्यामीं ।। २ ।। मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे । सुखी करून सोडावे । कामाकडे ।। ३ ।। पाटांतील तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना । तैसें जनांच्या मना । कळलें पाहिजे ।। ४ ।। जनांचा प्रवाहो चालला । म्हणजे कार्यभाग आटोपला । जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे खोटें ।। ५ ।। श्रेष्टीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बैसलें । तरी मग जाणावें फावलें । गनीमांसी ।। ६ ।।

( पुढें चालू )

होतें, तें येथूनच पाठविलें. इ० स० १६९९ त जेव्हां मोंगलांनीं सातारच्या किल्ल्यास वेढा दिला, तेव्हां त्या किल्ल्यांतील शिबंदीस धान्यसामग्री व दारूगोळा यांचा पुरवठा परशुराम त्रिंबक प्रतिनिधी हा परळी किल्ल्यांतून करीत असे. इ० स० १७०० च्या एप्रिल महिन्यांत सातारा हातीं

---

( मागील पृष्टावरून पुढें चालू )

ऐसें सहसा करूं नये। दोघे भांडतां तिसऱ्या जय। धीर धरूनी महत्कार्य। समजूनी करावें ॥७॥ आधींच पडली धास्ती। म्हण जे कार्यभाग होय नास्ति। याकारणें समस्तीं॥ बुद्धि शोधावी ॥८॥ राजी राखितां जग। मग कार्यभागाची लगबग। ऐसें जाणोनी सांग। समाधान करावें॥ ९॥ सकळ लोक एक करावे। गनिमा लोटोनि काढावें। एणें करितां कीर्ति धावे। दिगंतरीं ॥ १०॥ आधीं गाजवावे तडाखे। तरी मग भूमंडळ धाके। ऐसें न होतां धक्के। राज्यास होती॥ ११॥ समय प्रसंग ओळखावा। राग निपटून सांडावा। आला तरी कळों न द्यावा। जनांमध्यें॥ १२॥ राज्यामध्यें सकळ लोक। सलगी देऊनि करावे साक। लोकांचे मनामध्यें धाक। उपजोचि नये॥ १३॥ बहुत लोक मेळवावे। लोक विचारें भरावे। कष्ट करोनी घसरावें। म्लेंच्छांवरी॥ १४॥ आहे तितुकें जतन करावें। पुढें आणीक मेळवावें। महाराष्ट्र राज्यचि करावें। जिकडे तिकडे॥ १५॥ लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी। चढती वाढती पदवी। पावाल येणें॥१६॥ शिवराजास आठवावें। जीवित्व तृणासमान मानावें। इहलोकीं परलोकीं तरावें। कीर्तिरूपें॥ १७॥ शिवराजाचें आठवावें रूप। शिवराजाचा आठवावा साक्षेप। शिवराजाचा आठवावा प्रताप। भूमंडळीं॥ १८॥ शिवराजाचें कैसें बोलणें। शिवराजाचें कैसें चालणें। शिवराजाची सलगी देणें। कैसी असे॥ १९॥ सकळ सुखाचा त्याग। करोनी साधिजे तो योग। राज्य साधण्याची लगबग। कैसी केली॥ २०॥ याहूनि करावें विशेष। तरिच म्हणावें पुरुष। याउपरी आतां विशेष। काय ल्याहावें॥ २१॥

आल्यावर औरंगजेबानें परळीस वेढा दिला, व कांहीं दिवसांनीं त्यानें तोही घेतला. परंतु औरंगजेब त्या किल्ल्यास वेढा देऊन बसला असतां एके दिवशीं एकाएकीं अतिशय पाऊस पडून त्याचें अतोनात नुकसान झालें. औरंगजेबानें ह्या किल्ल्यास त्या वेळीं नवरसतारा हें नांव दिलें. इ० स० १७९० च्या जमाबंदीच्या खर्ड्यांत परळी हें, एका परगण्याचे ठाणें असून त्याचा वसूल २२६०० रुपये होता असें लिहिलें आहे. हा किल्ला इ० स० १८१८ त इंग्लिशांचे हातीं आला. त्या वेळीं त्यांनीं वर एक काळ्या लोकांचें पलटण ठेविलें होतें. इ० स० १८५७ सालचे बंडाचे वेळीं एका बंडखोर टोळीनें हा किल्ला बळकावला. परंतु पुढें लौकरच इंग्लिशांनीं त्या टोळीचा पराभव करून तो परत घेतला. पुढें चौकशी अंतीं सरकारास असें कळून आलें कीं, सातरचा राजा प्रतापसिंह याचा दिवाण रंगो बापूजी हा बंडखोर मंडळीस सामील असून तो त्या किल्ल्यांत ६ आठवडे होता.

---

# कोरेगांव तालुका.

—:०✻०:—

८. नांदगिरी किंवा कल्याणगड.—हा किल्ला कोरेगांवच्या उत्तरेस ८ मैलांवर व साताऱ्याच्या आग्नेयीस सुमारें १४ मैलांवर असून विखलें व भाडळी ह्या खेड्यांवरून वायव्य दिशेस महादेवाच्या डोंगराचा जो फांटा गेला आहे त्यावर बांधलेला आहे. त्याची उंची समुद्राचे सपाटीपासून ३५३७ फूट आहे. हा किल्ला व मुख्य डोंगर यांच्यामध्यें एक मोठी खिंड आहे. याच्या ईशान्येस

डोंगर आहे. किल्ल्याच्या सर्व बाजूंनीं तुटलेला कडा आहे. पायथ्याशीं धुमाळवाडी म्हणून एक खेडें आहे, तेथून किल्ल्यावर जाण्याची वाट आहे. हा रस्ता वळणावळणांचा असून अतिशय अवघड आहे. किल्ल्याचा दरवाजा उत्तराभिमुख आहे. निमे रस्ता चढून गेलें म्हणजे एक तळें व त्याच्या जवळच एक सुंदर झरा लागतो. ह्या ठिकाणीं एक पिंपळाचा व एक चिंचेचा असे दोन भव्य वृक्ष आहेत. तळ्यांतही पाणी पुष्कळ असून फार चांगलें आहे. किल्ल्यांत जाण्याला दोन दरवाजे लागतात. पहिल्या दरवाज्यांतून आंत शिरलें म्हणजे एक तळघर लागतें. ह्यांत पूर्वीं धान्य ठेवीत असत असें सांगतात. पूर्वेच्या एका अंगास गवी या नांवाचें टांकें आहे. याचें पाणी फार चांगलें आहे. ह्या टांक्यांतून किल्ल्याच्या बाहेर एक पाट काढून नेलेला आहे; त्यामुळें बाहेरच्या मंडळीस किल्ल्यांत येण्याचा त्रास न पडतां बाहेरच्या बाहेर पाणी मिळतें. ह्या टांक्याच्या सभोंवतीं हल्लीं कांटेरीं झुडुपें फार वाढल्यामुळें जवळ जातां येत नाहीं. दुसऱ्या दरवाज्यांतून आंत शिरलें म्हणजे प्रथमतः उंचवट्याचा प्रदेश लागतो. हा सुमारें २०० यार्ड लांब व १०० यार्ड रुंद आहे. येथें पडकीं जुनीं घरें पुष्कळ दृष्टीस पडतात. किल्ल्यांत एकंदर ४ तळीं आहेत. त्यांपैकीं मोठें तळें ९० फूट लांब, ३० फूट रुंद व २० फूट खोल आहे. ज्या ठिकाणीं पूर्वीं सदर कचेरीची जागा होती, तेथें हल्लीं एक उंचवटा व अर्ध्या उभ्या अर्ध्या पडलेल्या अशा कांहीं भिंती मात्र दृष्टीस पडतात. ह्या कचेरीजवळ अबदुल करीम नांवाच्या

नास बरेच लोक जातात. ह्या कबरीवर नेहमीं चादर पसरलेली असते. कबरीच्या मागच्या अंगास एक मोठा भव्य वटवृक्ष आहे. हा फार लांबून दृष्टीस पडतो. किल्ल्याचा माथा अगदीं सपाट असून वाटोळा आहे. ह्या किल्ल्यांत पूर्वीं दोन तोफा होत्या. परंतु इ०स०१८५७ सालच्या धामधुमीच्या वेळीं इंग्लिश सरकारानें त्या तेथून नाहींशा केल्या. मराठी राज्याचे वेळीं येथें जो मामलेदार व जो कारकून होता, त्यांचे नातू अद्यापि जिवंत आहेत. त्यांच्या सांगण्यांत असें येतें कीं, " पूर्वीं येथें तालुक्याचें ठाणें असे, व येथें सरकारी तिजोरी असून एक मामलेदार, एक फडनीस, एक सबनीस, एक हवालदार, एक दफेदार, २ कारकून, ३ नाईक व १६० शिपाई इतके लोक नेहमीं असत." हा किल्ला पन्हाळ्याचा राजा दुसरा भोज ह्यानें बांधला अशी दंतकथा सांगतात. इ० स० १६७३ त तो शिवाजीच्या हातीं आला. पुढें पहिले बाजीराव पेशवे व श्रीपतराव प्रतिनिधी यांच्यामध्यें इ० स० १७२४ त शाहूमहाराजांच्या दरबारीं तंटा सुरू झाला, तेथपर्यंत त्याचें स्वामित्व प्रतिनिधींकडे होतें. त्यानंतर त्याची व्यवस्था प्रतिनिधींकडून काढून शाहूमहाराजांनीं पेशव्यांकडे दिली. इ० स० १७९१ त मेजर प्राईस यानें या किल्ल्याचें असें वर्णन केलें आहे कीं, " दुरून हा किल्ला एखाद्या मोठ्या गलबताप्रमाणें दिसतो. ह्याच्या समोर दुसरी एक टेंकडी आहे व माथ्यावर पुष्कळ देवस्थानें आहेत. " मराठ्यांबरोबर इंग्लिशांची जी शेवटची लढाई झाली त्या वेळीं म्हणजे इ०स० १८१८ च्या एप्रिल महिन्यांत लढाईचा वगैरे

आला. इ० स० १७६२ त सरकारानें एकंदर डोंगरी किल्ल्यांची एक यादी तयार केली आहे. तींत ह्या किल्ल्याच्या संबंधानें असें लिहिलें आहे कीं, " ह्या किल्ल्याची पडापड झालेली आहे; ह्याच्यांत वस्ती मुळींच नाहीं; किल्ल्यांत जाण्याचा रस्ता फार चढावाचा आहे; दरवाजा भक्कम आहे; परंतु किल्ल्यांत **पाणी** व दुसरी सामग्री कांहीं नाहीं. " परंतु एच. आर. कुक सी. एस्. यांनीं असें लिहिलें आहे कीं, " ह्या किल्ल्याच्या संबंधानें मुख्य लिहिण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे ह्यांत **पाण्याची** चांगली सुबत्ता आहे. वर केलेल्या या किल्ल्याचे वर्णनावरून ह्यांपैकीं कोणचा लेख खरा आहे, हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

९. **चंदन.**—चंदन हा किल्ला वंदनकिल्ल्यापासून सुमारें अर्ध्या मैलावर आहे. हा वंदन किल्ल्यापेक्षां कमी उंच असून वंदन किल्ल्याला मध्यंतरीं जसें टेंकाड आहे तसें याला नाहीं. किल्ल्याचा दरवाजा नैर्ऋत्य दिशेस आहे. वंदनाहून ह्या किल्ल्यावर येण्याचा रस्ता मधील डोंगरावरून असून तो फार अवघड व खडकाळ आहे. किल्ल्याच्या दरवाज्यापर्यंत जाण्याचा रस्ता मात्र थोडा बिकट आहे. दरवाज्यांतून आंत शिरलें म्हणजे थोड्याशा पायऱ्या लागतात व त्या चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याच्या माळ्यावर मनुष्य येऊन पोहोंचतें. आंतील प्रदेश सपाट आहे. तेथें जवळच एक महादेवाचें देवालय आहे, व एक मोठा सुंदर वटवृक्ष आहे. येथून पुढें रुंद व सुरेख रीतीनें बांधलेल्या अशा कांहीं फरसबंदी पायऱ्या लागतात. त्या पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याचा माथा लागतो. येथें

दोहों बाजूंस दोन फार मोठे व चमत्कारिक तऱ्हेनें उभे केलेले असे दोन दगडी खांब आहेत. प्रत्येक खांबास चार दगड आहेत. त्यांच्याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, विजापुरचा सहावा बादशाहा दुसरा इब्राहिम आदिलशाहा (इ० स० १५८०-१६२६) ह्यानें इ० स० १६०० त हा किल्ला बांधला, त्या वेळीं त्यानें हे दोन खांब उभे केले.—प्रथयतः एक मोठा थोरला दगड जमिनींत पुरला. नंतर त्याच्याजवळची जमीन त्याच्या उंची इतकी सारखी करून घेतली व दुसरा दगड त्या जमिनीवरून ढकलीत ढकलीत नेऊन पहिल्या दगडावर बसविला, व अशाच रीतीनें तिसरा व चौथा हे दगड उभे केले. अशा रीतीनें वरील खांब तयार झाल्यावर आजूबाजूची माती काढून टाकली. ह्या दोन भव्य खांबांशिवाय किल्ल्यांत पाहण्यासारखी दुसरी कांहीं एक वस्तु नाहीं. एकदां ह्या किल्ल्यांत फार मोठी वस्ती असावी असें तेथील खाणाखुणांवरून वाटतें, व सरकारवाड्याचीही तेथें खूण आहे. किल्ल्यांत एक तळें आहे; परंतु त्याचा बांध मुद्दाम फोडून टाकल्यामुळें त्यांत पाणी वगैरे कांहीं नाहीं. पूर्वीं येथें एक सुभेदार असे, व हल्लींच्या कोरेगांव तालुक्यांत मोडणाऱ्या कांहीं गांवांवर त्याचा अंमल असे. वंदन किल्ल्याप्रमाणें ह्या किल्ल्याला जरूर वाटलें त्या ठिकाणीं तट घालून कोंपऱ्या कोंपऱ्यांनीं बुरूज बांधले आहेत.

चंदन व वंदन हे किल्ले एकमेकांस लागून असल्यामुळें

---

१ ग्रांट डफनें इ० स० ११९० च्या सुमारास पन्हाळ्याच्या राजांनीं बांधलेल्या १५ किल्ल्यांचीं जीं नांवें दिलीं आहेत त्यांत या दोन किल्ल्यांचीं नांवें दिलीं आहेत.

त्यांच्या संबंधाचें ऐतिहासिक वर्णन एकेच ठिकाणीं दिलेलें आहे. इ० स० १६७३ त हे किल्ले शिवाजीनें मुसलमानां-पासून घेतले. पुढें इ० स० १७०१ त ते औरंगजेबानें मराठ्यांपासून घेतले. पुढें शाहूमहाराज औरंगजेबाच्या कैदेंतून सुटून दक्षिणेंत आले, व त्यांचा व ताराबाईचा गादीविषयीं तंटा लागला, तेव्हां इ० स० १७०८ त शाहूमहाराजांच्या सैन्याची छावणी चंदनवंदन येथें पडली होती. ह्या पुढील त्यांच्या संबंधाची ऐतिहासिक माहिती कांहीं नाहीं. इ० स० १७९० च्या सुमारास तयार केलेल्या जमाखर्चाच्या खर्ड्यो-वरून चंदनवंदन हा पूर्वीं विजापुरच्या राज्यांतील एक परगणा होता, व त्याचें सालीना उत्पन्न २१६४४ रुपये होतें, असें बेअरिंग साहेबांनीं आपल्या इतिहासांत लिहिलें आहे. हे किल्ले इ० स० १८१८ त कांहीं एक आयास न पडतां इंग्लिशांचे हातीं आले.

---

## खटाव तालुका.

—०:*:०:—

१०. **वर्धनगड.**—हा किल्ला महादेवाच्या डोंगराचा भाडळीकुंडल नांवाचा जो फांटा आहे, त्यावर कोरेगांव व खटाव ह्या तालुक्यांच्या सीमेवर कोरेगांवच्या ईशान्येस ७ मैलांवर व साताऱच्या ईशान्येस १७ मैलांवर बांधलेला आहे. हा किल्ला कोरेगांवच्या बाजूनें ९०० फूट व खटावच्या बाजूनें ७०० फूट उंच आहे. खटावच्या बाजूला किल्ल्याच्या पायथ्याशीं माची म्हणून खेडें आहे, तेथून किल्ल्यावर जाण्याचा रस्ता फुटतो. किल्ल्याचा दरवाजा लांकडी असून

त्यावर बाहेरच्या बाजूनें तोफेचे गोळे लागलेल्या खुणा अद्यापि आहेत. हे गोळे इ० स० १८०५ त फत्तेसिंग मानेे ह्यानें किल्ला घेतला त्या वेळीं लागलेले आहेत. किल्ल्याचा तट डोंगराच्या माथ्यावर नसून बराच खालीं बांधलेला आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें २० एकर आहे. पूर्वेच्या बाजूस दोन तळीं आहेत. पूर्वीं जेथें रखवालदार राहत असत, तेथें हल्लीं कांटेरी झाडें वाढलीं आहेत. वर दोन लहान तोफा आहेत. हा किल्ला इंग्लिश सरकारचे हातीं आल्यावर आंतील जुन्या लोखंडाचा सरकारानें लिलांव केला हा लिलांव ज्यानें घेतला त्याचा हल्लीं निर्वंश झाला आहे; व त्यानें तो लिलांव घेतला, म्हणूनच त्याचा निर्वंश झाला, असें तेथील लोक म्हणतात. हा किल्ला लालगून व रामेश्वर ह्या दोन डोंगरांचे माऱ्यांत आहे. किल्ल्यांत पूर्वेच्या बाजूस पिण्यासारखें पाणी आहे.

हा किल्ला बांधण्यास इ० स० १६७३ त शिवाजीनें सुरुवात केली; व इ० स० १६७४ त त्याचें काम पुरें झालें. पुढें तो प्रतिनिधीच्या ताब्यांत होता. इ० स० १८०० त तो शिंद्याच्या लष्करानें घेतला. इ० स० १८०३ मध्यें किल्ल्याचा अमलदार बळवंतराव बक्षी व येसाई साहेब फिरंगी यांची मोठी लढाई झाली. त्या वेळीं फिरंग्यास खंडणीदाखल ३००० रुपये द्यावे लागले. इ० स० १८०५ त

---

१ माने हा होळकराचा सेनापति होता. त्याच्याजवळ एकंदर ३०००० फौज होती. त्यानें होळकराच्या सांगण्यावरून दक्षिणेकडील मुलूख अगदीं उद्ध्वस्त करून टाकला. पुढें वऱ्हाडचा मुतालीक बळवंतराव फडनवीस व चिंतामणराव पटवर्धन यांनीं त्याचा पराभव करून सातारा प्रांतांतून त्याला पिटाळून लाविलें. ग्रांट डफ.

फत्तेसिंग माने यानें किल्ल्यावर हल्ला केला, कारखा-ननीस आणि दुसरी किल्ल्यांतील मंडळी यांस ठार मारिलें, व शेजारच्या खेड्यांतून पुष्कळ घोडीं धरून नेलीं. इ० स० १८०६ त वसंतगडची लढाई झाल्यानंतर बापू गोखले प्रतिनिधीस चिमणगांवास घेऊन आला, तेव्हां त्यानें हा किल्ला त्याचे हवालीं केला. तो इ० स० १८११ पर्यंत गोखल्यांचे ताब्यांत होता. पुढें त्यांनीं तो दुसरे बाजी-राव पेशवे यांस दिला; व इ० स० १८१८ त त्याचें स्वामित्व इंग्लिशांकडे आलें.

११. भूषणगड.—हा किल्ला खटाव तालुक्यांत वडूथच्या नैर्ऋत्य दिशेस ११ मैलांवर आहे. खालच्या सपाट प्रदेशा-पासून याची उंची ६०० फूट आहे. ईशान्य दिशेस जी उतरण आहे तिच्या साधारण मध्यावर ब्राह्मण लोकांची वस्ती आहे; व पूर्वी किल्ल्याच्या रक्षणाचें काम त्या लोकां-कडेच सोंपविलेलें होतें. किल्ला शिखराकडे निमुळता होत गेलेला आहे. आंत जाण्याचा दरवाजा ईशान्य दिशेस असून तेथचा तटबंदीचा भाग फारच मजबूत आहे. किल्ल्याची बाकीची तटबंदी इतकी भक्कम नाहीं. पूर्वी माथ्यावर एक मोठें तळें होतें परंतु हल्लीं आंत माती वगैरे पडून तें होरून गेलें आहे. किल्ल्याची चढण फार सोपी आहे व त्याचे आसपास ९ मैलपर्यंत दुसरी टेंकडी नाहीं.

हा किल्ला शिवाजीनें इ० स० १६७६ च्या सुमारास बांधला. इ० स० १८०९ त फत्तेसिंग माने ह्यानें हल्ला करून तो घेतला. त्या वेळीं फत्तेसिंग रहिमतपूर येथें छावणी देऊन राहिला होता. पुढें ह्या किल्ल्याचे संबंधानें लिहिण्या-

सारखी अशी कांहींएक गोष्ट घडली नाहीं. इ०स०१८४८त इंग्लिशांनीं साताराचें राज्य खालसा केलें तेव्हां तो इंग्लिशांस मिळाला.

---

# माण तालुका.

—:०✻०:—

१२. महिमानगड.—हा किल्ला माण तालुक्यांत दहिवडी नांवाच्या खेड्याच्या पश्चिमेस सुमारें ९॥ मैलांवर शिंदीबुद्रुक नांवाच्या खेड्यांत मोडतो. हा किल्ला पाहण्यास जावयाचें असेल तर प्रथमतः साताऱ्याहून पंढरपुराकडे जो रस्ता जातो त्यानें माण तालुक्याचा सखल प्रदेश जेथें लागतो तेथपर्यंत जावें; व तेथेंच किल्ल्यावर जाण्याचा मार्ग फुटतो. ह्या रस्त्यापासून किल्ला सुमारें अर्ध्या मैलावर आहे. वर जाण्याचा रस्ता बराच रुंद आहे. थोडेंसें चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याच्या उत्तरेकडील उतरणीवर तीन लहान लहान खेडीं लागतात. तेथून किल्ल्याची उंची सुमारें २९० फूट आहे. त्याचा आकार साधारण तिकोनी असून पूर्वेकडील टोंक बरेंच पुढें आलेलें आहे. वरील खेड्यांपासून पुढचा रस्ता ९ फूट रुंद असून चांगला स्वच्छ आहे. प्रत्येक पायरी ३।४ फूट रुंद आहे. वरचा चढाव बराच कठीण आहे; व दरवाज्याजवळ जाण्याला सुमारें ९ मिनिटें लागतात. आंत न जातां बाहेरच्या अंगास दरवाज्याच्या बाजूनें जरा पुढें गेलें म्हणजे एक लहानसें टांकें लागतें. ह्या टांक्याला जिवंत झरा असून तें नेहमीं पाण्यानें तुडुंब भरलेलें असतें.

उन्हाळ्याच्या दिवसांत खालच्या खेड्यांतील माणसें येथूनच पाणी नेतात. किल्ल्याचा दरवाजा कमानदार असून ७ फूट उंच व ५ फूट रुंद आहे. दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे खडक फोडून तयार केलेल्या अशा २२ पायऱ्या लागतात. ह्या चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याचा माथा लागतो. पूर्वेच्या बाजूस एक लहानसा उंचवटा आहे, तेथें पूर्वी सदरकचेरीची जागा होती. हल्लीं त्या ठिकाणीं इमारतीचा कांहींच मागमूस नाहीं. त्याच्याच थोडेंसें पुढें एक ३० फूट परिघाचें तळें आहे, व त्याला लागून दोन हौद आहेत. त्याच्या जरा दक्षिणेस एक दगडी तळघर आहे, व तेथें पूर्वी कैदी लोकांस कोंडून ठेवीत असत. येथून ५० यार्ड पुढें गेलें म्हणजे एक गच्चीसारखा भाग लागतो. त्याच्यावर पूर्वी एक तोफ होती. किल्ल्याचा तट बराच मजबूत आहे. त्याला एकंदर तीन बुरूज आहेत. पूर्वेकडे जो बुरूज आहे त्यावर जगन्नाथ महादेवाचें लिंग आहे; त्याची नेहमीं पूजा होते. वर्षांतून एकदां येथें जत्रा भरत असते. किल्ल्याच्या वायव्येकडील बुरुजावर एक पिराचें स्थान आहे.

हा किल्ला, शिवाजीनें आपल्या पूर्वेकडील प्रांतांचें संरक्षण करण्याकरतां जी किल्ल्यांची रांग बांधली, तीपैकीं एक आहे. परंतु ह्या किल्ल्याच्या आसपासच्या खेड्यांतील रहिवाशी लोक हा किल्ला मुसलमानी अमलापासून आहे असें सांगतात, व किल्ल्यांत असलेलें पिराचें स्थान आपल्या सांगण्याला पुराव्यादाखल दाखवितात. परंतु बारीक रीतीनें पाहिलें तर त्याची बांधणी शिवाजीनें दुसरे जे किल्ले बांधले आहेत त्यांच्या बांधणीशीं पुष्कळ अंशीं

मिळते. पूर्वी किल्ल्याच्या रखवालीकरतां महार व रामो
मिळून ७९ इसम ठेविलेले होते; व त्यांना इनाम करू
दिलेल्या जमिनींचा त्यांचे वंशज अद्यापि उपभोग घे
आहेत. ह्याशिवाय किल्ल्याचा हवालदार व सबनीस यांचे
इनामें अद्यापि त्यांचे वंशज पाटील व कुळकर्णी यांच्या
कडे चालू आहेत. हा किल्ला इ० स० १८१८ त कांही
एक दंगाधोपा न होतां इंग्लिशांचें हातीं आला.

१३. **वारूगड.**—हा किल्ला **माण** तालुक्यांत दहिव
डीच्या ईशान्येस २० मैलांवर **पनवन** नांवाच्या खेडयांत आहे
किल्ल्यावर जाण्याचा रस्ता म्हटला म्हणजे प्रथम दहि
वडीहून ४ मैलांवर **पिंगळीबुद्रुक** येथें जावें; तेथून पुढे
**जाधववाडीस** जावें; व तेथून **तोंडल्यास** जावें; म्हणजे
किल्ल्याच्या अगदीं नजीक मनुष्य येतें. दरवाज्याजवळ
जाण्याचा रस्ता घोडयावर बसून जाण्यासारखा आहे.
जवळच **घोडवाडी** म्हणून एक खेडें आहे. येथील बहुतेक
लोक पूर्वीच्या गडकऱ्यांचे वंशज आहेत. किल्ल्याचा एक
कोंपरा फार लांबून दिसतो; व त्यावरून सकृद्दर्शनीं हा
किल्ला फार लहान असावा असें वाटतें. परंतु जवळ जाऊन
पाहिलें तर तो आंतील बालेकिल्ल्याचा कोंपरा आहे असें
दिसतें. बाहेरील किल्ला फार मोठा व मजबूत आहे.
किल्ल्याचा दरवाजा उत्तराभिमुख असून आठ फूट लांब
व सहा फूट रुंद आहे. दक्षिणच्या बाजूसही असाच एक
दरवाजा आहे. आंत **बहिरवनाथाचें** एक देवालय व दुसरी
कांहीं घरें आहेत; शिवाय पडापड झालेल्या दुसऱ्या इमारती
पुष्कळ आहेत. आंत दोन तळीं आहेत. बालेकिल्ल्याचा तट
अद्यापि बराच चांगला आहे. आंत एक इमारत आहे, व तेथे

पूर्वी किल्लेदार रहात असे. त्याचप्रमाणें तेथें एक तुरुंगाची जागा आहे व एक पाण्याचा हौद आहे. शिपाई लोकांचीं रहाण्याचीं पूर्वीं बांधलेलीं घरें पडून गेलीं आहेत. हा किल्ला शिवाजीनें बांधला असें सांगतात. येथें पूर्वीं २०० पहारेकरी असून शिवाय बरीच शिबंदी होती. पूर्वीं येथें परभू जातीचा किल्लेदार होता; व त्याचे वंशजांस किल्ल्याशेजारींच जमिनीचें उत्पन्न असून ते अद्यापि तेथें आहेत. हा किल्ला इ० स० १८१८ त सातारच्या राजाचा फडणीस विठ्ठलपंत यानें २०० लोक पाठवून दुसरे बाजीराव पेशवे यांजपासून घेतला.

**१४. ताथवडें किंवा संतोषगड.**—हा किल्ला माण तालुक्याच्या ईशान्य कोंपऱ्यांत दहिवडीच्या उत्तरेस २० मैलांवर व फलटणच्या वायव्येस १२ मैलांवर आहे. साताऱ्याहून पंढरपुरास जो रस्ता जातो, त्यानें प्रथमतः पुसेगांवास यावें; तेथून लालगून व डिकसाळ ह्या खेड्यां-वरून महादेवाच्या डोंगराच्या पायथ्याशीं मनुष्य येऊन पोहोंचतें. उघाडीचे दिवसांत ह्या रस्त्यानें घोड्यांचे तांगे चालतात. डिकसाळ येथून थोडेंसें वर चढून आलें म्हणजे घांटास आरंभ होतो. हा घांट खालच्या सपाट प्रदे-शापासून १००० फूट उंच आहे, व त्याच्या एकीकडच्या एका फांट्यावर संतोषगड बांधलेला आहे. मुख्य डोंगरांची रांग व हा किल्ला ह्यांच्यामध्यें एक ९०० फूट उंचीचा लहान डोंगर आहे. या किल्ल्याचा आकार साधारण त्रिकोणाकृति असून त्याच्या उत्तरेस ताथवडें नांवाचें खेडें आहे. या खेड्यांत सुमारें ७००।८०० लोकांची वस्ती आहे. या किल्ल्याला तीन बाजूंनीं तट असून आंत बालेकिल्ला

आहे. त्याचा तट सभोंवार बांधलेला असून तो १९ फूट उंच व २० फूट रुंद आहे. तटावरची भिंत ६ फूट उंच व ४ फूट रुंद आहे. परंतु ही भिंत हल्लीं पुष्कळ ठिकाणीं पडून गेली आहे. किल्ला शत्रूच्या हातीं गेल्यास आंतील शिबंदीस पळून जातां यावें म्हणून ठिकठिकाणीं चोरदोरे ठेवलेलीं आहेत. बालेकिल्ल्याला तीन बाजूंनीं सुमारें ६० फूट अंतरावर दुसरा एक तट बांधलेला आहे. बालेकिल्ल्यांत जाण्याचे दरवाजे फारच अरुंद म्हणजे २ फूट रुंदीचे आहेत. मुख्य किल्ल्याचा दरवाजा पूर्वाभिमुख असून त्यावर एक भक्कम बुरूज बांधलेला होता. उत्तरेकडील बाजूस एकाखालीं एक अशा दोन भिंती बांधलेल्या आहेत. परंतु त्या असाव्या तशा बळकट नाहींत. बालेकिल्ल्याचे आंतील जागा सुमारें २० एकर आहे. आंत पूर्वीं फार मोठमोठ्या इमारती होत्या. सदरकचेरीची जागा दोन्हीकडच्या पडव्या धरून ५० फूट लांब व २० फूट रुंद आहे. येथें पूर्वीं किल्लेदार रहात असे. ह्याच जागेला लागून पश्चिमेच्या अंगास ४० फूट लांब व २० फूट रुंद अशी दुसरी एक दगडी इमारत आहे. ह्या इमारतीला तीन मोठालीं दालनें आहेत. तेथें पूर्वीं धान्यसामग्री व दारूगोळा ठेवीत असत. जवळच एक मोठें तळें आहे. त्यांत बारामास पाणी असतें, परंतु त्याला जिवंत झरा नाहीं. हें तळें पुष्कळ खोल आहे व आंत उतरण्यास पूर्वेच्या बाजूस पायऱ्या आहेत. ह्या पायऱ्या निमे उतरून खालीं गेलें म्हणजे आंत तातोबा[1] महादेवाचें एक देवालय लागतें. किल्ल्याला ताथव-

[1] तातोबा नांवाचा एक विरक्त साधु पूर्वीं ह्या ठिकाणीं राहत असे व त्यानेंच हें महादेवाचें देवालय बांधलें.

ड्याचा किल्ला म्हणून जें नांव पडलें आहे, तें तरी ह्या साधूच्या नांवावरूनच पडलें आहे. किल्ल्यांत इतर ठिकाणीं इतकीं कांटेरी झाडें वाढलीं आहेत कीं, तिकडे जाण्याची सोयच नाहीं. किल्ल्याच्या माथ्यावर मुसलमान शिपायांना नमाज पढण्याकरतां एक मशीद बांधलेली आहे. आग्नेयी व वायव्य या दिशांकडील तट-बंदी बरीच पडलेली आहे. ह्याचीं दोन कारणें संभवतात; एक, तिची कोणी दुरुस्ती केली नसावी, किंवा दुसरें, इंग्लिशांनीं जेव्हां किल्ल्यावर तोफांचा मारा चालू केला, तेव्हां तोफांचे गोळे लागून ती पडली असावी. किल्ल्यांत कांहीं पडापड झालेलीं घरें आहेत.

हा किल्ला **शिवाजीनें** बांधला अशी दंतकथा सांग-तात. इ० स० १६६६ त हा किल्ला **विजापुरच्या** बाद-शाहाचा बडा सरदार व **फलटणकरांचा** मूळपुरुष **बाळाजी नाईक निंबाळकर** याच्या ताब्यांत होता. पुढें त्याच वर्षीं **औरंगजेब** व **शिवाजी** यांच्यामध्यें **जयसिंगाचे** मध्य-स्थीनें तह झाल्यावर **शिवाजीनें** कांहीं निवडक मावळे बरोबर घेतले, व तटाला शिड्या लावून त्यानें तो किल्ला मोठ्या मर्दुमकीनें घेतला. परंतु पुढें लौकरच तो **विजा-पुरकरांनीं** पुनः जिंकून घेतला. **शिवाजीनें** इ० स० १६७३ त तो पुनः घेतला. पुढें इ० स० १६८९ त तो किल्ला मोंगलांनीं मराठ्यांपासून घेतला. नंतर इ० स० १७२० त **बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून** चौथाई व सर-देशमुखी या हक्कांच्या सनदा घेऊन आला, त्या वेळीं तो किल्ला दिल्लीच्या बादशाहानें **शाहूमहाराजांस** दिला. इ० स० १७९० त **ताथवडें** हें **नहिमदुर्ग** सरकाराच्या ताब्यांतील

एक तालुक्याचें ठिकाण होतें, व त्याचें सालीना उत्पन्न ११२० रुपये होतें. हा किल्ला इ० स० १८१८ त जनरल प्रिझलर यानें तोफांचा भडिमार करून हस्तगत करून घेतला. ह्या वेळीं किल्ल्याच्या तटबंदीला फार मोठा धक्का बसून पुष्कळ इमारतींचा नाश झाला. इंग्लिशांच्या तोफांपुढें मराठ्यांचें कांहीं चालेना, तेव्हां ते किल्ला सोडून निघून गेले, व किल्ला इंग्लिशांच्या हातीं आला. इ० स० १८२७ त प्रख्यात उमाजी नाईक हा ह्या किल्ल्याचे खोऱ्यांत रहात असे. एकदां एक ब्राह्मण धान्याची मोट डोकीवर घेऊन ह्या रस्त्यानें ताथवड्यास जात होता. वाटेंत त्याची व उमाजी नाईकाची गांठ पडून त्यानें ती मोट खालीं पाडली. परंतु आंत द्रव्य वगैरे कांहीं नसून फक्त धान्यच आहे असें उमाजीनें पाहून त्या ब्राह्मणास २९ रुपये दिले, व त्यास वाटेस लाविलें.

---

# खानापूर तालुका.

—०:*:०—

**१९. भोपाळगड.**—हा किल्ला खानापूर तालुक्याच्या अगदीं नैर्ऋत्य कोंपऱ्यास बाणूर नांवाच्या खेड्याजवळ आहे. ह्या किल्ल्याला जाण्याचा अगदीं सोपा मार्ग म्हटला म्हणजे खानापुराहून प्रथम पळशीस जावें. पुढें बाणरच्या थेट पूर्वेस चार मैलपर्यंत खडकाळ प्रदेशांतून जावें लागतें, म्हणजे किल्ल्याजवळ मनुष्य येऊन पोहोंचतें. हा किल्ला ज्या डोंगरावर बांधला आहे तो सभोंवतालच्या उंचवट्याच्या

प्रदेशापेक्षां ६० फूट उंच आहे. या किल्ल्याचा तट एकसारखा बांधलेला नसून मधूनमधून जेथें जेथें म्हणून बचावाकरतां तट बांधणें जरूर वाटलें, तेथें तेथें तो बांधलेला आहे. मध्यभागीं एक लहानशी टेंकडी आहे, तिला बालेकिल्ला म्हणतात; परंतु तिला तट वगैरे कांहीं नाहीं. वर एक महादेवाचें देवालय मात्र आहे. बाणूर हें खेडें किल्ल्याचे हद्दींत दक्षिणेच्या बाजूस आहे. किल्ल्याचें क्षेत्रफळ सुमारें ३०० एकर आहे. नैर्ऋत्य, पूर्व व उत्तर ह्या दिशांकडे ७०० फूट खोल असा तुटलेला कडा असल्यामुळें तिकडून किल्ल्यावर चढण्याची कांहींच सोय नाहीं. दक्षिण व पश्चिम ह्या दिशांकडे किल्ल्याची उंची खालच्या उंचवट्याच्या प्रदेशापेक्षां ६० पासून १००फुटांपर्यंत आहे. हा किल्ला पश्चिमेच्या बाजूस अर्ध्या मैलावर ज्या दुसऱ्या टेंकड्या आहेत त्यांच्या चांगला माऱ्यांत आहे. नैर्ऋत्य दिशेस ९ मैलांवर जरंडी म्हणून एक गांव आहे तेथून किल्ल्यांत सामानसुमानाचा पुरवठा करण्याकरतां पूर्वी बराच मोठा रस्ता बांधलेला होता. किल्ल्यांत एक लहान व एक मोठें अशीं दोन तळीं व एक विहीर आहे. मोठें तळें नेहमीं पाण्यानें तुडुंब भरलेलें असतें.

हा किल्ला भोपाळ नांवाच्या एका राजानें बांधला अशी दंतकथा सांगतात. तो प्रथमतः शिवाजीचे ताब्यांत होता. पुढें इ० स० १६७९ त संभाजीनें शिवाजीविरुद्ध बंड केलें, तेव्हां तो संभाजीनें घेतला. ह्यानंतरची ह्या किल्ल्याचे संबंधाची माहिती उपलब्ध नाहीं. तो इ० स० १८१८ सालीं इंग्लिशांचे हातीं आला. हल्लीं तो अगदीं मोडकळीस आलेला आहे.

4

———

# वाळवें तालुका.

—:o*o:—

१६. मच्छिंद्रगड.—इ० स० १६७६ च्या सुमारास आपल्या राज्याला बळकटी आणण्याकारतां म्हणून शिवाजीनें सह्याद्रींत जी किल्ल्यांची रांग बांधिली तीपैकीं मच्छिंद्रगड हा शेवटचा किल्ला होय. हा किल्ला कऱ्हाडच्या नैर्ऋत्येस १० मैलांवर एका वाटोळ्या उंच टेंकडीवर बांधलेला आहे. कऱ्हाडाहून तासगांवाकडे जो रस्ता जातो त्यानें गेलें म्हणजे वाटेनें पश्चिमेच्या बाजूस हा किल्ला दृष्टीस पडतो. ह्या किल्ल्यांत पाहण्यासारखी अशी कांहीं गोष्ट नाहीं. तो खालच्या सपाट प्रदेशापासून ८०० फूट उंच आहे. वर जाण्याचा रस्ता वळणावळणांनीं असून फार चढावाचा आहे. पायथ्यापासून किल्ल्यांत जाण्यास सुमारें पाव तास लागतो. किल्ल्याचा दरवाजा कमानदार आहे; परंतु हल्लीं त्याची बरीच पडापड झालेली आहे. आंत कांहीं जुन्या इमारतींचे अवशेष राहिलेले भाग अद्यापि दृष्टीस पडतात. दक्षिणेच्या बाजूस मच्छिंद्रनाथाचें एक लहानसें देवालय आहे. इ० स० १८३० त कऱ्हाडच्या दक्षिणेस ६ मैलांवर काळी म्हणून एक लहानसें खेडें आहे, तेथून एक देवाचा उपासक किल्ल्यांत येऊन राहिला; त्यानें प्रथमतः त्या देवाची पूजा सुरू केली. त्याचे वंशज अद्यापि किल्ल्यांत राहत असून देवाची पूजा करीत आहेत. ह्या देवालयाजवळ साधूंच्या समाधि व सतींचे दगड पुष्कळ आहेत. ह्या दगडांवरून हातपायांचीं चिन्हें खोदलेलीं आहेत. दर-

वाज्याच्या वायव्येस ९० यार्डांवर एक तळें आहे; परंतु त्यांतील पाणी अतिशय खराब झालेलें आहे. दक्षिणेच्या बाजूस एक पाण्याचा झरा आहे, व किल्ल्यांतील मंडळी ह्याच झऱ्याचें पाणी नेतात. ह्या किल्ल्यांत मच्छिंद्रनाथाची जत्रा दरवर्षी भरत असते. यात्रेची वेळ आली म्हणजे देवाचा पुजारी वर येण्याचा रस्ता झाडून साफ करतो. देवालयाजवळ पुष्कळ झाडें लाविलेलीं आहेत. हा किल्ला इ० स० १८१० त **बापू गोखले** यानें प्रतिनिधीशीं लढाई करून घेतला. नंतर इ० स० १८१८ पर्यंत पेशव्यांच्या वतीनें **बापू गोखलेच** त्याची देखरेख करीत असे. पुढें मराठ्यांबरोबर लढाई सुरू झाली तेव्हां **कर्नल हीवेट** ह्याच्या हाताखालच्या टोळीनें तो इ० स० १८१८ त जिंकून घेतला.

१७. **प्रचितगड**.—हा किल्ला **वाळवें** तालुक्यांत **पेठे**च्या ईशान्येस ४० मैलांवर सह्याद्रीच्या एका फांट्यावर बांधलेला आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता डोंगराच्या माथ्यावरून दाट अरण्यांतून आहे. किल्ल्याचा तट मोठा मजबूत असून त्याला बंदुका सोडण्याकरितां मधून मधून भोंकें ठेविलेलीं आहेत. किल्ल्याच्या पश्चिम बाजूस एक टेंकाड असून त्यालाही तटबंदी केलेली आहे. किल्ल्यांत उत्कृष्ट पाण्याचीं पुष्कळ टांकीं आहेत, शिवाय दोन तीन तळीं आहेत. आंत पडापड झालेलीं पुष्कळ घरें आहेत. मुख्य कचेरीची जागा साधारण मध्यावर आहे. दुसऱ्याही पडापड झालेल्या इमारती दृष्टीस पडतात. परंतु त्या कशाकरितां बांधल्या होत्या तें समजत नाहीं. प्रचितगड कोणीं कधीं बांधला तें कळत नाहीं; परंतु त्याच्या बांधणीवरून

तो मुसलमानांचा इकडे अंमल होण्याच्यापूर्वी बांधलेला असावा असें वाटतें.

इ० स० १८१७ पर्यंत प्रचितगडाच्या संबंधानें घडून आलेली विशेष महत्त्वाची अशी कोणतीही गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध नाहीं. त्या वर्षी (इ० स० १८१७) चतुरसिंग नांवाचा एक गोसावी तो किल्ला बळकावून बसला. हा चतुरसिंग आपणास सातारच्या दुसऱ्या शाहूमहाराजांचा कनिष्ठ बंधु म्हणून म्हणत असे. खरा चतुरसिंग फार शूर होता, व त्या वेळीं पेशवे व सातारचे राजे यांच्यांत तंटा उपस्थित झाल्यामुळें तो फार प्रसिद्धीस आला होता. त्याला त्रिंबकजी डेंगळे यानें तहाचें बोलणें लावण्याच्या मिषानें बोलावून आणून विश्वासघातानें कैद केलें, व इ० स० १८१२ त त्याला कोंकणांत कांगोरी किल्ल्यावर पाठवून दिलें. तेथें तो इ० स० १८१८ त मरण पावला. या तोतया चतुरसिंगानें मी कोंकणांतून सुटून आलों आहें, अशी कंडी पिकवली. त्यानें तो किल्ला मोठ्या धाडसानें घेतला पूर्वीपासून किल्ल्यांतील घरें वगैरे शाकारण्याकरितां गवतकाडी वगैरे खालील खेड्यांतील लोक वर नेत असत. चतुरसिंगानें प्रथमतः पहारेकऱ्यांस वश करून घेतलें. नंतर आपल्या शिपायांस त्यानें कुणब्यांचे पोषाक देऊन त्यांच्या डोकीवर त्यानें एक एक गवताचा भारा देऊन त्यांत त्यांचीं हत्यारें घातलीं, व अशा हिकमतीनें तो त्या सर्वांस घेऊन किल्ल्यांत गेला. आंत प्रवेश होतांच त्यानें आंतील शिबंदीवर एकदम हल्ला करून एकूनएक मनुष्यांस कापून टाकलें; व अशा प्रकारच्या विलक्षण कर्तबगारीनें त्यानें तो किल्ला सर केला. नंतर हा ढोंगी चतुरसिंग आस-

पासच्या मुलखाला फार उपद्रव देऊं लागला. पुढें इ० स० १८१८ च्या जून महिन्याच्या १० व्या तारखेस कर्नल कनिंगहाम यानें तो किल्ला जिंकून घेतला. त्यानें प्रथमतः किल्ल्याच्या जितका जवळ देतां आला तितका जवळ आपल्या सैन्याचा तळ दिला. नंतर त्यानें जवळच एक उंच टेंकडी आहे ती आपल्या ताब्यांत घेतली; व तेथून त्यानें चतुरसिंगास किल्ला खालीं करून देण्याविषयीं निरोप पाठविला. ह्या कामाकरतां त्यानें क्यापटन स्पिलर यास किल्ल्यांत पाठविलें होतें. प्रथमतः तो किल्ला देण्यास कबूल झाला. परंतु कनिंगहाम याची खातरी होईना, सबब त्यानें दरवाज्यावर तोफांचा मारा सुरू केला. परंतु दरवाज्यावर त्याचा कांहींच इलाज चालेना; ह्या गोष्टीमुळें किल्ल्यांतील लोक फार चढून गेले. नंतर स्पिलरनें दरवाज्याजवळ खिंडार पाडून आंत जाण्याचा निश्चय केला; व दरवाज्याजवळ आपण काय करतों आहों हें आंतील लोकांस समजूं नये म्हणून त्यानें किल्ल्याच्या पलीकडच्या बाजूस आपले कांहीं लोक पाठवून दिले. त्या बाजूस त्यांनीं गोळीबारांचा मोठा सपाटा चालविल्यामुळें दरवाज्याशीं काय चाललें आहे हें किल्ल्यांतील लोकांस समजलें नाहीं. इतक्या अवधींत स्पिलरनें तटाला खिंडार पाडलें व कनिंगहाम आपल्या लोकांसह आंत शिरला. त्यानें एकदम शत्रूवर चाल केली. त्या झटापटींत किल्ल्याचा सुभेदार गोळी लागून पडला, व तो तोतया चतुरसिंग आपल्या कुटुंबासह इंग्लिशांचे हातीं सांपडला.

# कऱ्हाड तालुका.

—:o*:o—

१८. **वसंतगड.**—वसंतगड हा किल्ला कऱ्हाडच्या वायव्येस असून कऱ्हाडाहून साताऱ्यास जो रस्ता येतो, व कऱ्हाडाहून कुंभार्लीस जो रस्ता जातो त्या दोन्ही रस्त्यांवरून दृष्टीस पडतो. हा किल्ला अतिशय बळकट आहे. किल्ल्याचे पूर्व बाजूस तळविड नांवाच्या खेड्याजवळून किल्ल्यावर जाण्यास पायरस्ता आहे. पूर्वी किल्ल्याचे आग्नेयीस खोडशी नांवाच्या खेड्यावरून किल्ल्यांत तोफा नेण्याचा मार्ग केलेला होता. किल्ल्यास दोन दरवाजे असून माथ्यावर कांहीं इमारती व देवालयें आहेत.

हा किल्ला इ० स० १६५९ त शिवाजीनें विजापुरकरांकडून घेतला. इ० स० १६९९ त औरंगजेबानें वसंतगडास वेढा दिला, व तीन दिवसांत तो त्याचे हातीं आला. इ० स० १७०६ त परशुराम त्रिंबक प्रतिनिधि यानें तो किल्ला मोंगलांपासून परत जिंकून घेतला. इ० स० १८०७ त दुसरे बाजीराव पेशवे व प्रतिनिधि यांच्यांत तंटा उपस्थित झाला, तेव्हां पेशव्यांचा सेनापति बापू गोखले यानें वसंतगडाजवळ प्रतिनिधीचा पराभव केला, व त्याला कैद करून त्यानें पुण्यास पाठवून दिलें. या वेळीं प्रतिनिधीची आश्रित ताई तेलीण हिनें बापू गोखले याच्याशीं बरेच

---

१ वासोटा येथें शूर बापू गोखले यांचीं हाडें जिनें खिळ[illegible] करून टाकलीं तीच ही तेलीण. ह्या संबंधाची एक आ[illegible] ती वासोटा किल्ल्याचे वर्णनांत दिली आहे.

दिवस टक्कर दिली. इ० स० १८१५ त गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा खून केल्यामुळें त्रिंबकजी डेंगळे यास कैद करून वसंगतगड येथें आणून ठेविलें होतें; पुढें लौकरच तो तेथून पळून गेला. ता. १३ मे इ० स० १८१८ रोजीं इंग्लिशांचा सरदार मनरो यानें हा किल्ला सर केला.

**१९. सदाशिवगड.**—हा किल्ला कऱ्हाडच्या आग्नेयीस ४ मैलांवर एका टेंकडीवर बांधलेला आहे. शिवाजीनें सह्याद्रीमध्यें किल्ल्यांची जी ओळ बांधली, तीपैकींच हा एक आहे. या किल्ल्याच्या भिंतींची हल्लीं अगदीं पडापड होऊन गेली आहे. कऱ्हाडाहून विजापुराकडे जो रस्ता जातो त्यानें गेलें म्हणजे एका लहानशा खेड्याजवळ किल्ल्यावर जाण्याचा रस्ता फुटतो. रस्ता अरुंद व अडचणीचा असून चढाव फारच बिकट आहे. माथ्याचा घेर सुमारें २३ एकर आहे. परंतु किल्ल्यांत पूर्वीं वस्ती होती अशाबद्दल कांहींच खूण दिसत नाहीं. दरवाजा उत्तराभिमुख आहे. किल्ल्यांत पाण्याचीं कांहीं टांकीं आहेत, परंतु तीं गाळानें हल्लीं भरून गेलीं आहेत. आंत महादेवाचें देवालय असून दरवर्षी शिवरात्रीस तेथें मोठी जत्रा भरत असते. हल्लीं ह्या किल्ल्याची सर्वत्र पडापड झालेली आहे. हा किल्ला इंग्लिशांनीं कधीं घेतला तें कळत नाहीं. परंतु तो घेण्याचा प्रयत्न न करतां इ० स० १८१८ त ज्या वेळीं त्यांनीं मराठ्यांचा बहुतेक मुलूख काबीज केला, त्याच वेळीं तो अनायासें त्यांचे हातीं आला असावा.

# पाटण तालुका.

—:o*o:—

२०. **गणवंतगड किंवा मोरगिरी.**—हा किल्ला पाटणच्या वायव्येस एका नीट उंच गेलेल्या चौकोनी टेंकडीवर बांधलेलाआहे. जमिनीच्या पृष्ठभागापासून त्याची उंची १००० फूट आहे. किल्ल्याचा तट पडून गेला आहे. आंत एक विहीर आहे. पूर्वीं किल्ल्यांत वस्ती असल्याची कांहींच खुणखाण दृष्टीस पडत नाहीं, व किल्ल्याचे दरवाजे पूर्वीं कोठें होते, तेंही हल्लीं कळत नाहीं. सह्याद्रीच्या नैर्ऋत्य दिशेकडच्या एका शिखरावर हा किल्ला बांधलेला आहे. किल्ल्याच्या ईशान्य दिशेस फार खोल तुटलेला कडा आहे, व वायव्येकडील भाग कोठें उंच व कोठें सखल अशा रीतीनें चढउताराचा आहे. किल्ल्याच्या नैर्ऋत्य दिशेस पायथ्याशीं मोरगिरी नांवाचें खेडें आहे. हा किल्ला कधीं व कोणीं बांधला तें समजत नाहीं. १८ व्या शतकांत ह्या किल्ल्यावर पेशव्यांची शिबंदी होती, व त्याच वेळीं दातेगड म्हणून जवळच दुसरा एक किल्ला आहे, तो पंतप्रतिनिधींच्या ताब्यांत होता, असें दिसतें. या दोन्ही किल्ल्यांवरचे किल्लेदार, पेशवे व प्रतिनिधी यांचें आपसांत वैमनस्य असल्यामुळें, विरुद्ध पक्षाचा एखादा हुकूम आल्यास तो मान्य करीत नसत. इ० स० १८१८ त मराठ्यांबरोबरच्या शेवटच्या लढाईच्या वेळीं लढाईचा प्रसंग न येतां हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला.

---

१ वरील शोध ह्या किल्ल्याच्या संबंधानें तपास करीत असतां जे कागदपत्र सांपडले त्यांवरून लागला, असें क्यांबेल साहेब लिहितात.

**२१. दातेगड किंवा सुंदरगड.**—हा किल्ला पाटणच्या ईशान्य दिशेस सुमारें ३ मैलांवर असून खालच्या सपाट प्रदेशापासून याची उंची २००० फूट आहे. ज्या शिखरावर हा किल्ला बांधलेला आहे, त्याच्या इतकें उंच शिखर आसपास बरेच मैलांत दुसरें नाहीं. किल्लयांत प्रवेश होण्याला तीन मैल डोंगर चढून जावें लागतें. हा किल्ला चतुष्कोण बांधला असून त्याची लांबी ६०० फूट व रुंदी १८० फूट आहे. किल्लयांत जाण्याचा दरवाजा पश्चिमाभिमुख आहे. हा दरवाजा २७ फूट उंच व ७ फूट रुंद असा खडक फोडून तयार केलेला आहे. त्याला एक १० फूट उंचीची कमान केलेली होती, परंतु हल्लीं ती पडून गेली आहे. येथून पुढें खडक फोडून तयार केलेल्या अशा २० पायऱ्या लागतात; व त्या चढून वर गेलें म्हणजे किल्लयाचा माथा लागतो. किल्लयांत एक मारुतीची मूर्ति असून तिची पूजा वगैरे नेहमीं होत असते. किल्लयाचा तट हल्लीं बरेच ठिकाणीं पडून गेला आहे. पूर्वेच्या बाजूस एक चमत्कारिक अंधारकोठडी आहे.—प्रथमतः खडकांत ८ फूट उतरावें लागतें. नंतर एक खोली दृष्टीस पडते. अंधारकोठडीच ती, तेव्हां आंत काळोख किती असेल तें सांगण्याची जरूर नाहीं ! आंत शिरतांना भयानें मनुष्य गर्भगळीत होऊन जातें. आंत हवा येण्याकरतां फक्त २ लहान झरोके ठेविलेले आहेत. ही खोली ३० फूट लांब, १२ फूट रुंद व ८ फूट उंच आहे. त्याचप्रमाणें ह्या किल्लयांत एक चमत्कारिक विहीर आहे. ही विहीर खडकांत खोदलेली असून १०० फूट खोल आहे, व तिच्या तोंडाचा घेर सुमारें २० फूट आहे. ह्या

विहीरींत पाणी विपुल असून तें पिण्यासारखें आहे, ह्या विहीरीविषयीं अशी आख्यायिका सांगतात कीं, हिचा कोयना नदीशीं संबंध आहे, व एका विशेष ठिकाणीं पान, फूल, किंवा दुसरी एखादी खुणेची तरंगणारी वस्तु टाकली तर ती ह्या विहीरींत दृष्टीस पडते. किल्लयांत २ मोठीं व ३ लहान अशीं ५ टांकीं आहेत. हीं पूर्वीं कोरडीं असून आंत धान्य ठेवीत असत. दक्षिणेच्या बाजूस उत्तराभिमुख अशा पडापड झालेल्या चार इमारती आहेत, व त्यांच्याजवळच पूर्वींची सदरकचेरीची जागा आहे. पूर्वीं किल्लयाचे रक्षणार्थ कायमचे असे १५० लोक नेमिलेले होते, व त्यांना किल्लयालगतच्या जमिनी इनाम दिलेल्या होत्या. हा किल्ला शिवाजीनें बांधला अशी दंतकथा आहे. परंतु लेखी पुराव्यावरून तो शिवाजीच्यापूर्वीं मुसलमान लोकांचे ताब्यांत होता असें दिसून येतें; परंतु किल्लयांतील एकंदर स्थितीवरून तो मुसलमानांचेही अगोदर पुष्कळ वर्षे बांधलेला असावा असें अनुमान होतें. वर सांगितलेली विहीर पुरातन काळच्या ऋषींनीं बांधली, अशी तिची दंतकथा आहे. पूर्वेच्या बाजूस खडकांत एक मोठें टांकें असून त्याला गायमुख केलेलें आहे. ह्या टांक्याचा झरा येवढा मोठा आहे कीं, कालवा बांधून त्याचें पाणी पाटण येथें पिण्याकरितां व शेतकीच्या उपयोगाकरतां न्यावें असें इंग्लिश सरकारच्या एकदां मनांत आलें होतें. परंतु कालवा बांधण्याला मध्यंतरीं अडचणी फार असल्यामुळें तो बेत रहित झाला.

इ० स० १८१८ त इंग्लिशांनीं साताराची गादी पुनः स्थापन केल्यावर क्यापटन ग्रांट साहेब हा त्याच वर्षाच्या मे महिन्यांत किल्ला घेण्याकरितां गेला. किल्ला खालीं

करून देण्याविषयीं निरोप जातांच किल्लेदारानें ग्रांट साहेबास असें कळविलें कीं, " आमचे पांच घोडे इंग्लिशांनीं धरून नेले आहेत ते परत मिळतील, व आमचीं व आमच्या शिपाई लोकांचीं हत्यारें व चीजवस्त तुम्ही घेणार नाहीं, किल्ला तुमचे हवालीं करतों. " त्यानें ती अट कबूल केली, व मराठे किल्ला सोडून निघून गेले. अशा रीतीनें लढाईचा प्रसंग न येतां तो किल्ला इंग्लिशांचे हातीं आला.

२२. **जंगली जयगड**.—हा किल्ला हेलवाक[१] नांवाच्या खेड्याच्या ईशान्य दिशेस ६ मैलांवर सह्याद्रीच्या कोंकणच्या बाजूस झुकलेल्या एका डोंगराच्या शिखरावर बांधलेला आहे. किल्ल्यावर जाण्याचा सोपा मार्ग म्हटला म्हणजे प्रथमतः तोरणें नांवाच्या खेड्यापर्यंत तीन मैल चढाव चढावा लागतो. हा चढाव सोपा आहे. येथून पुढें डोंगराच्या माथ्यावरून एक पाउलवाट लागते. ह्या वाटेनें आणखी ३ मैल जावें लागतें. येथें नांवेंजें नांवाच्या खेड्याहून मराठ्यांचे वेळीं तोफा वगैरे नेण्याकरतां जो रस्ता केला होता तो येऊन मिळतो. हा रस्ता किर्र झाडींतून आलेला आहे. येथून पुढें पातेरा तुडवीत तुडवीत १ मैल जावें लागतें, व पुढें बांबूंचें दाट अरण्य लागतें; ह्यांतून मोठ्या कष्टानें रस्ता काढीत पुढें जावें लागतें; नंतर एका टेंकडीच्या माथ्यावर मनुष्य येऊन पोहोंचतें; येथून पुढें नजर फेंकली म्हणजे सुमारें १०० हात लांबीवर बराच खालीं असा हा किल्ला दृष्टीस पडतो; तेथें जाण्याला पुनः खालीं उतरत उतरत कारवीच्या दाट झाडींतून महत्प्रयासानें जावें लागतें; व अशा

---

१ हें खेडें पाटणच्या पश्चिमेस १३ मैलांवर आहे.

२ हें पाटण तालुक्यापैकीं एक खेडें आहे.

रीतीनें किल्ल्याच्या दरवाज्याच्याखालीं आपण येतों. येथून हातपाय टेंकीत मोठ्या कष्टानें व सावधगिरीनें थोडासा खडक को ढून वर गेलें म्हणजे किल्ल्याच्या दरवाज्यांत प्रवेश होतो. हा फूट रवाजा उत्तराभिमुख असून त्या बाजूचा तट कोसळून पडलेला त आहे. हा किल्ला चौकोनी असून १८० फूट लांब व १९० फूट रुंद आहे. आंत पडापड झालेल्या पुष्कळ इमारती आहेत. तसेंच आंत तळींही पुष्कळ आहेत. त्यांत दोन बरींच मोठीं आहेत. ह्या खुणांवरून ह्या किल्ल्यांत पूर्वी कायमची शिबंदी असावी असा तर्क होतो. किल्ल्याच्या बाहेरच्या कडणीवर पुष्कळ टांकीं आहेत व त्यांचें पाणी फार चांगलें आहे. पश्चिमेच्या बाजूस १०० फूटांपर्यंतची उतरण साधारण सोपी आहे; परंतु पुढची कोंकणच्या बाजूची उतरण म्हटली म्हणजे भयंकर तुटलेला कडा आहे. मधील दाट अरण्य तोडून साफ केलें, तर नांवज्याहून या किल्ल्यावर येण्याचा रस्ता बराच सोपा होईल. वर जाण्याचा रस्ता अवघड व अतिशय दाट झाडींतून असल्यामुळें तो पहाण्याला फारसें कोणीं जात नाहीं हें खरें; परंतु ह्या किल्ल्यावरून मकरंदगडापर्यंत सह्याद्रीचा जो भव्य, सुंदर व मनोवृत्ति तल्लिन करणारा देखावा दृग्गोचर होतो, तसा देखावा दुसऱ्या कोठूनही दृष्टीस पडणार नाहीं. सृष्टीची अद्वितीय शोभा व सृष्टिकर्त्यानें त्या ठिकाणीं खर्च केलेलें आपलें अतुल्य चातुर्य ज्याला म्हणून पहाणें असेल, त्यानें कितीही कष्ट झाले तरी हा किल्ला पाहण्याकरतां अवश्य जावें.

ह्या किल्ल्याच्या संबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, इ० स० १८१० त प्रतिनिधीची आश्रित ताई तेलीण नांवाची एक शूर बायको होती, तिच्या ताब्यांत तो होता.

पुढें दुसरे बाजीराव पेशवे यांचा सेनापति बापू गोखले यानें तिचा पराभव करून तिला किल्ल्यांतून हांकून दिलें. इ० स० १८१८ च्या मे महिन्यांत कर्नल हीवेट साहेबाच्या हाताखालील इंग्लिश फौजेनें तो घेतला.

२३. **बहिरवगड**.—हा किल्ला पाटणच्या वायव्येस २० मैलांवर व माळच्या[1] पश्चिमेस ४ मैलांवर आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता माळ येथून फुटतो. हा रस्ता गडगड्या दगडांचा ओबडधोबड बांधलेला असून वर जातांना वाटेनें दाट अरण्य लागतें. हा किल्ला सह्याद्रीच्या एका शिखरावर बांधलेला असून तिचें १०० फूट लांबीचें एक शृंग कोंकणच्या बाजूकडे गेलेलें आहे. पूर्वेच्या बाजूस जो तुटलेला कडा आहे तो, व ही टेंकडी ह्यांच्यामध्यें ३० यार्ड लांबीची एक अरुंद डोंगराची पट्टी आहे. वर सांगितलेला कडा ह्या पट्टीच्यावर ३०० फूट उंच आहे. टेंकडीचें क्षेत्रफळ सुमारें ९ मैल आहे, व तिच्या पूर्वेस बहिरोबाचें देवालय आहे. या नांवावरूनच ह्या किल्ल्याला बहिरवगड असें नांव मिळालें आहे.

ग्रांट डफच्या इतिहासांत बहिरवगड पन्हाळ्याच्या शिलाहार राजांनीं बांधला असें लिहिलें आहे. मराठ्यांचे वेळीं ह्या किल्ल्यावर साताऱ्याहून फौजफांटा पाठवीत असत. किल्ल्यांत पूर्वीच्या इमारती व घरें ह्यांचा हल्लीं कांहीं मागमूस राहिला नाहीं; व त्याच्या तटाचीही पडापड झाली आहे. मराठ्यांबरोबर इंग्रजांची जी शेवटची लढाई झाली,

---

१ माळ हें खेडें पाटण तालुक्यांत पाटणच्या वायव्येस १६ मैलांवर आहे. येथून रत्नागिरी व संगमेश्वर येथें जाण्याला कुंभार्ली घांट लागतो.

त्या वेळीं तारीख २३ मे इ० स० १८१८ रोजीं हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला. त्या वेळीं चिपळूण तालुक्यांत सावर्डें येथें कर्नल केनेडी साहेब होता. त्यानें केपन साहेबास, बरोबर १०० लोक देऊन, बहिरवगड घेण्याकरतां पाठवून दिलें. केपन साहेब किल्ल्याचे पायथ्याशीं तळवडें म्हणून गांव आहे तेथें येऊन पोहोंचला. त्यानें किल्ला खालीं करून देण्याविषयीं किल्लेदारास निरोप पाठविला. तेव्हां "आमचीं व आमचे लोकांचीं हत्यारें व चीजवस्त आम्हांस घेऊं द्याल व पाटण येथें जाऊन पोहोंचेपर्यंत आम्हांस कोणच्याही तऱ्हेनें उपद्रव लागणार नाहीं, अशी हमी घ्याल तर उद्यां सकाळीं किल्ला तुमचे स्वाधीन करतों" असें किल्लेदारानें केपन साहेबास सांगितलें. त्याच्या अटी त्या साहेबानें कबूल केल्या, व अशा रीतीनें तारीख २३ मे इ० स० १८१८ रोजीं सुध्या रीतीनें हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला. हा किल्ला हल्लीं अगदीं ओसाड स्थितींत आहे.

---

## जावळी तालुका.

—०:*:०:—

२४. महिमंडणगड.—हा किल्ला जावळी तालुक्यांत बामणोली नांवाच्या खेड्याच्या पश्चिमेस ११ मैलांवर शिंदी नांवाच्या खेड्याजवळ आहे. हा किल्ला खालच्या सपाट प्रदेशापासून ६०० फूट उंच आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें १० एकर आहे. किल्ल्यांत जाण्याचा रस्ता शिंदी खेड्यांतून असून तो फार सोपा आहे.

त्यांच्या सभोंवार त्याच्यापेक्षां उंचउंच अशा दुसऱ्या पुष्कळ टेंकड्या आहेत. यामुळें सभोंवतालच्या प्रदेशाच्या रक्षणाच्या कामीं ह्याचा पूर्वीं फारसा उपयोग झाला असेल असें वाटत नाहीं. आंत एक तळें आहे. ह्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. किल्ल्याचा बहुतेक सर्व तट पडून गेला आहे. क्वचित् स्थळीं किल्ल्याची साक्ष देण्याकरतां कांहीं भिताडें आपल्या गतवैभवावर रूदन करीत अद्यापि उभीं आहेत. परंतु तींही थोडक्याच काळांत आपले देह खालीं ठेवितील असा अजमास आहे. हा किल्ला जिंकून घेण्याची इंग्लिशांस कांहींच खटपट पडली नाहीं.

२५. **प्रतापगड**—हा किल्ला **जावळी** तालुक्यांत मेढ्याचे ईशान्य दिशेस २० मैलांवर व **महाबळेश्वराकडून** जी सडक जाते तिनें गेलें तर पश्चिमेस ८ मैलांवर **महाबळेश्वराजवळ** **सह्याद्रीच्या** फांट्यांचें जें जाळें बनलें आहे त्यांपैकीं **पार** व **किन्हेश्वर** या खेड्यांच्यामध्यें जो फांटा आहे त्यावर बांधलेला आहे. दुरून पाहिलें तर ह्या किल्ल्याचा आकार वाटोळा दिसतो. मुख्य माथ्याच्या खालीं किल्ल्याच्या सभोंवार एक तट बांधलेला आहे. **मालकमपेठेहून** ह्या किल्ल्यास जाण्याचा रस्ता म्हटला म्हणजे फिटस्‌जीरल्ड वारीनें साधारण एक तासाच्या रस्त्यावर भेरोशी खेड्यांत वाडें किंवा आंबेनळी म्हणून एक वाडी आहे, तेथें एक उतारकरू लोकांकरितां बंगला बांधलेला आहे, तेथें जावें. फक्त पावसाळ्याचे दिवस खेरीज करून इतर वेळीं एथें किल्ल्यावर जाण्याला घोडीं किंवा खुर्च्या मिळतात. चढाव साधारण सोपाच आहे व दरवाज्याजवळ जाण्याला जवळ जवळ पाऊण तास लागतो. वाटेनें कोठें दाट व कोठें

पातळ झाडी लागते. आंत शिरलें म्हणजे दरवाज्याजवळच उजव्या हातास अबदुल्लाचा बुरूज लागतो, व डाव्या हातास वरच्या किल्ल्यावर जाण्याचा रस्ता फुटतो. खालच्या किल्ल्यांत पूर्वेच्या अंगास भवानीचें देवालय आहे. किल्ल्याच्या उत्तर व पश्चिम ह्या बाजूंस अतिशय खोल व भयंकर तुटलेला कडा आहे. कोठें कोठें त्याची खोली ८०० फुटांहून ज्यास्त आहे. ह्या भागाकडील बुरूज ३०–४० फूट उंचीचे आहेत.

इ० स० १८४२ च्या पाहणीच्या हकीकतीबद्दलच्या लेखांत असें लिहिलें आहे कीं, "प्रतापगड हा किल्ला एका अतिशय उंच डोंगरावर बांधलेला असून त्याच्या सभोंवतालचा देखावा फारच मजेचा दिसतो." पूर्व व दक्षिण ह्या बाजूंची उतरण साधारण सोपी आहे; परंतु तिकडे अतिशय दाट आरण्य आहे; ह्या किल्ल्याचे "खालचा किल्ला" व "वरचा किल्ला" असे दोन भाग आहेत. वरचा किल्ला २०० यार्ड लांब व २०० यार्ड रुंद आहे. ह्यांत कांहीं पहाण्यासारख्या इमारती आहेत व एक महादेवाचें देवालय आहे. खालचा किल्ला ३९० यार्ड लांब व १३० यार्ड रुंद आहे. ह्याला पूर्व व दक्षिण ह्या बाजूंस काय तो तट आहे. पूर्वेच्या बाजूस मुख्य तटाच्या बाहेर दुसरी एक बळकट भिंत बांधलेली आहे व तिच्या प्रत्येक टोंकास एकेक बुरूज आहे. ही भिंत शिवाजीनें, विजापुरचा सरदार अबदुल्ला किंवा अफजूलखान ह्याला ठार मारल्यानंतर बांधली; व तिच्या एका बुरुजाखालीं त्यानें अबदुल्लाचें डोकें पुरलें. तेव्हांपासून त्या बुरुजाला अबदुल्लाचा बुरूज हें नांव पडलें. ही बाहेरची भिंत खाळच्या

किल्ल्याला जेथें मिळते तेथें पूर्वी दरवाजा होता म्हणून म्हणतात; परंतु हल्लीं तेथें फार पडापड झालेली आहे. इ० स० १८६२ त इंग्लिश सरकारानें एकंदर डोंगरी किल्ल्यांचा जो तक्ता तयार केला, त्यांत असें लिहिलें आहे कीं, "प्रतापगड हा किल्ला अतिशय बळकट असून आंत पाणी विपुल आहे व आंत साताराच्या पोलिसखात्यापैकीं १० शिपायांचें एक ठाणें आहे."

हा किल्ला इ० स० १६५६ त शिवाजीच्या हुकुमावरून त्याचा मुख्य प्रधान मोरो तिरमल पिंगळे यानें बांधला. प्रथमतः शिवाजीनें आपलें ठाणें या किल्ल्यांत ठेविलें होतें; कारण निरा व कोयना या नद्यांचें कांठचा जो मुलूख त्यानें मिळविला होता, त्याचा बंदोबस्त तो ह्या किल्ल्यांत राहून करीत असे.

इ० स० १६५९ त विजापुरच्या बादशाहानें अफजूलखान नांवाच्या आपल्या सरदारास शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून दिलें. तो अतिशय गर्विष्ठ असे. त्यानें शिवाजीस पकडून आणतों, अशी आपल्या धन्याचे दरबारांत फुशारकी मारिली होती. पुढें शिवाजीनें विजापुरकरांशीं तहाचें बोलणें सुरू केलें, व अफजूलखानास प्रतापगडाजवळ भेटीस बोलाविलें. परंतु भेटीच्या प्रसंगीं त्यानें शिवाजीस कैद करण्याचे हेतूनें दोन्हीं हातांनीं जखडून धरिलें. शिवाजीही तयारीनेंच गेला होता. खानाचा दुष्ट हेतु दिसून येतांच अस्तनींत लपवून ठेवलेल्या वाघनखांची एक चपेट मारून त्यानें त्यास खालीं पाडिलें, व त्याचें शिर कापून तें त्यानें प्रतापगड किल्ल्यावर नेऊन पुरलें. शिवाजीनें अफजूलखानाचा मुद्दाम खून केला असा कित्येक

इंग्रज इतिहासकारांचा त्याच्यावर आरोप आहे. परंतु प्राणावर येऊन बेतल्यावर शेळीही वाघावर चाल करते, मग शिवाजी म्हणजे शिवाजीच होता. अफज़लखानानें त्यास पकडण्याचा प्रयत्न केला व त्यामुळें शिवाजीस त्याला ठार मारणें भाग पडलें. बेअरिंग साहेबाचेंही यासबंधानें असेंच मत आहे.

शिवाजी प्रतिवर्षी तुळजापुरीं भवानीच्या दर्शनास जात असे. परंतु इ० स० १६६१ त त्याला कांहीं कारणामुळें तुळजापुरीं जातां आलें नाहीं; म्हणून त्याच वर्षी त्यानें प्रतापगडावर भवानीचें देवालय बांधलें. इ० स० १७७८ त प्रख्यात सखाराम बापू बोकील ह्याला नाना फडनविसानें एथें कैदेंत ठेविलें होतें. इ० स० १७९६ त दौलतराव शिंदे व त्याचा दिवाण बाळोबा तात्या कुंजर यांनीं पुण्यांत जेव्हां गोंधळ माजवून दिला, तेव्हां नाना फडनवीस वांईस निघून गेला, व प्रथमतः त्यानें प्रतापगडाचा चांगला बंदोबस्त केला. इ० स० १८१८ त जरी हा किल्ला नीट दुरुस्त होता, व आंत शिबंदीही पुष्कळ होती, तथापि उभय पक्षांमध्यें सलोख्याचीं बोलणीं होऊन रक्तस्रावाचा प्रसंग न येतां तो इंग्लिशांचे हातीं आला.

२६. **मकरंदगड.**—हा किल्ला महाबळेश्वरास जाणाऱ्या बहुतेक मंडळीच्या पाहण्यांत येतो. माल्कम पेठेच्या वायव्येस सुमारें ७ मैलांवर हा किल्ला आहे. हा दोहींकडे सपाट अशा उंचवट्याच्या प्रदेशांतून नीट उंच गेलेल्या सह्याद्रीच्या एका शिखरावर बांधलेला आहे. मुंबई टोंक[1] व बाबिंगटन टोंक[1] ह्या दोन्ही टोंकांवरून वायव्येकडे नजर फेंकली म्हणजे उंचसखल शिखरांचा जो भव्य व मनोहर देखावा

[1] हीं सर्व शिखरें महाबळेश्वरावर आहेत.

दिसतो त्यांच्यामध्यें ह्या किल्ल्याचा आकार व रंग हे स्पष्टपणें ओळखतां येतात. सासून[1] टोंकावरून तर हा चांगलाच दिसतो. महाबळेश्वरापेक्षां तो ६९० फूट खालीं आहे. हा किल्ला पाहण्यास जावयाचें असेल तर प्रथमतः महाबळेश्वराहून १८०० फूट खालीं कोयना नदीच्या खोऱ्यांत उतरावें लागतें, व तेथून किल्ल्याजवळ जावयास १०।१२ मैल चालत गेलें पाहिजे. हा किल्ला पाहण्यास जाण्याचा सोपा रस्ता म्हटला म्हणजे प्रथमतः बाबिंगटन टोंकावरून खालीं उतरावें. नंतर देवली खेड्यावरून कोयना नदी उतरून पुढें जावें. नंतर थोडासा चढाव चढून गेलें म्हणजे घोणसपूर म्हणून एक खेडें लागतें व तेथून वर चढून गेलें म्हणजे हा किल्ला लागतो. किल्ल्याच्या दोन्ही अंगांस जीं दोन टेंकाडें आहेत, त्यांपैकीं नैर्ऋत्य दिशेकडील टेंकाडावर शिडी लावून चढतां येतें. त्यावर शिवाजीनें बांधलेलें मल्लिकार्जुनाचें देवालय आहे. वायव्येकडील टेंकाडावर जाण्याचा कांहींच इलाज नाहीं. किल्ल्याचा तट हल्लीं पडून गेला आहे; व पूर्वीं तरी तो मोठा भक्कम असावा असें दिसत नाहीं. हा किल्ला प्रतापगड किल्ला बांधला त्याच सुमारास म्हणजे इ० स० १६५६ च्या सुमारास शिवाजीनें बांधला. मराठ्यांचे वेळीं त्यांना ह्या किल्ल्याचा विशेष उपयोग झाला असेल असें दिसत नाहीं. कारण ह्याच्या आसपास रहदारीचे असे कोणतेच घांट किंवा रस्ते नाहींत. शिवाजीनें डोंगरी किल्ल्यांची जी सांखळी तयार केली तींत प्रतापगड व वासोटा यांच्या दरम्यान् दुव्याची भर घालण्याकरतां फक्त

---

१ हीं सर्व शिखरें महाबळेश्वरावर आहेत.

हा किल्ला बांधला असावा. हा किल्ला तारीख १४ मे इ० स० १८१८ रोजीं इंग्लिशांचे हातीं आला.

२७. **वासोटा किल्ला**.—हा किल्ला जावळी तालुक्यांत तांबी नांवाच्या गांवाच्या कांहींसा ईशान्येस ९ मैलांवर कोयना नदीच्या खोऱ्याच्या कोपऱ्यावर बांधलेला आहे. खोऱ्याच्या तोंडाशीं वासोटा नांवाचें खेडें आहे. परंतु किल्ला मेटइंडोली नांवाच्या खेड्यांत मोडतो व तो सह्याद्रीच्या एका फांद्यावर बांधलेला आहे. हा किल्ला ८०० फूट उंच आहे, व कोंकणच्या बाजूनें ३७०० फूट उंच आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता मेटइंडोली येथून आहे. वर जातांना प्रथम बरेंच दाट जंगल लागतें, व पुढें कारवीच्या रानांतून जातां जातां जीव नकोसा होतो. किल्ल्याच्या अगदीं जवळचा प्रदेश मात्र उघडा आहे, व त्याचा दरवाजा दुहेरी आहे. कमानीचें काम मुसलमानी तऱ्हेचें आहे, व माथ्यावरील प्रदेश सपाट असून सुमारें १९ एकर आहे. वर महादेवाचें एक व चंडीचें एक अशीं दोन देवालयें आहेत. आंत दोन तळीं आहेत. ह्यांपैकीं धाकट्या तळ्याचें पाणी चांगलें आहे. आंत जमीनदोस्त झालेली एक भव्य इमारत आहे, व तेथें पूर्वी किल्ल्याचा अंमलदार रहात असे. किल्ल्याचीं बरींच भिताडें पडलीं आहेत; व त्याचा कांहीं भाग फार जुना व कांहीं अलीकडे बांधलेला दिसतो. पश्चिमेच्या भागास १९० फूट खोल असा एक तुटलेला कडा आहे. येथून पूर्वी कडेलोट करीत असत. ह्या कड्याला बाबूखाड म्हणतात. पश्चिमेच्या बाजूस समुद्रापर्यंतचा कोंकणचा देखावा फारच रमणीय दिसतो.

हा वासोट्याचा किल्ला फार जुना आहे, व तो कोल्हा-

पुरच्या शिलाहार राजांपैकीं दुसरा भोजराजा ह्यानें बांधला. किल्ल्याचा दरवाजा मुसलमानी तऱ्हेचा दिसतो. परंतु मुसलमानांचें पाऊल या किल्ल्याला कधीं लागलें असेल असें दिसत नाहीं. जावळीचा अधिकारी चंद्रराव मोरे ह्याला ठार मारून तें संस्थान जिंकल्यानंतर इ० स० १६५९त हा किल्ला शिवाजीनें घेतला. त्याच्यापूर्वीं तो माने व शिरके या मराठे सरदारांच्या ताब्यांत होता. शिवाजीनें त्याला वज्रगड असें नांव दिलें होतें, परंतु तें पुढें चाललें नाहीं. पुढें ह्या किल्ल्यांत राजकीय कैदी ठेवीत असत. बाजीराव पेशव्याचा इ० स० १८१७ त खडकी येथें पराजय झाल्यानंतर त्यानें सातारचा राजा व त्याचें कुटुंब यांस वासोट्याच्या किल्ल्यावर आणून ठेविलें. परंतु पुढें एक महिन्याच्या आंतच तो पंढरपुराहून जुन्नराला जात असतां त्यानें तें कुटुंब पुनः आपणाबरोबर घेतलें.

ह्याच वेळेच्या सुमारास हैदराबादेहून पुण्यास हंटर व मॉरिसन असे दोन साहेब कांहीं लोकांसह येत होते. त्यांना पेशव्याच्या सैन्यानें उरळी येथें कैद केलें व कुलाबा जिल्ह्यांत कांगोरी किल्ल्यावर पाठवून दिलें. तेथें त्यांचा फार छळ झाला. पुढें त्यांना वासोट्यास आणून ठेवलें, व तेथें बापू गोखले याच्या हुकमावरून म्हातारजी कान्होजी चव्हाण म्हणून एक मनुष्य त्यांच्यावर देखरेख करणारा होता, त्यानें त्यांना फार चांगल्या तऱ्हेनें वागविलें. ब्रिटिश सैन्य हा किल्ला घेण्याकरतां मेढ्याहून बामणोली व तांबी या दोन रस्त्यांनीं निघालें व त्यांची इंडोली येथें गांठ पडली. त्या वेळीं किल्ल्याचा अंमलदार भास्करपंत नांवाचा मनुष्य होता, त्याच्याशीं किल्ला खालीं

करून देण्याविषयीं इंग्लिशांनीं बोलणें लावलें. परंतु तो सुध्या रीतीनें किल्ला खालीं करून देईना. तेव्हां इंग्लिशांनीं किल्ल्यावर तोफा सुरू केल्या. तेथील लोक ह्या वेळची अशी गोष्ट सांगतात कीं, हें बोलणें सात दिवस चाललें होतें. पुढें तोफा लावून किल्ला सर करण्याचा इंग्लिशांनीं निश्चय केला. पहिला तोफेचा गोळा किल्ल्यावरून कोंकणांत जाऊन पडला. दुसरा दारूखान्यांत पडून सर्व दारूगोळा जळून गेला. तिसरा चंडकीच्या देवळावर पडला, व चौथा किल्लेदार राहण्याच्या इमारतीच्या मध्यंतरीं पडला. तेव्हां तो घाबरून त्यानें किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन केला. ग्रांट डफ ह्या संबंधानें असें लिहितो कीं, किल्ल्यावर २० तासपर्यंत सारखा तोफांचा मारा चालला होता. नंतर तो इंग्लिशांच्या हस्तगत झाला. ह्या किल्ल्यांत शिपायी लोकांना बक्षिसादाखल २ लाख रुपये मिळाले; व साताऱ्च्या राजाचें ३ लाख रुपये किंमतीचें जवाहीर त्यास परत मिळालें (इ०स० १८१८). ह्या किल्ल्याच्या संबंधानें दुसरी एक प्रसिद्ध गोष्ट आहे, परंतु ती इंग्लिश इतिहासांत कोठें आढळत नाहीं. हा वासोटा किल्ला पूर्वी ताई तेलीण या नांवाची एक स्त्री प्रतिनिधीची आश्रित होती, तिच्या ताब्यांत होता. तो किल्ला तिच्यापासून घेण्याविषयीं बापू गोखले यानें पुष्कळ प्रयत्न केले; परंतु ताई फार शूर बायको होती. तिनें बापू गोखल्याचें पुष्कळ दिवसपर्यंत कांहींएक चालूं दिलें नाहीं. ह्या संबंधाची एक आर्या आहे ती येणेंप्रमाणें:—

**श्रीमंत पंत प्रतिनिधि यांचा किल्ला अजिंक्य वासोटा।**
**तेलिण मारी सोटा बापू गोखल्या [illegible]**

# पुणें जिल्हा.

पुणें जिल्हा हा उत्तर अक्षांक्ष १७° ५४' व १९° २२' आणि पूर्व रेखांश ७३° २४' व ७५° १४' यांचेमध्यें असून त्याचें क्षेत्रफळ ५३६९ चौरस मैल आहे. इ० स० १८९१ त झालेल्या खानेसुमारीवरून या जिल्ह्याची लोकसंख्या १०९७८०० आहे व त्याची जमाबंदी ११५३५०० रुपये आहे. सह्याद्रीच्या बाजूनें या जिल्ह्याची लांबी ७०—८० मैल असून तेथून आग्नेयी दिशेकडे तो १३० मैल पसरत गेलेला आहे. या जिल्ह्याचे उत्तरेस अहमदनगर जिल्ह्यापैकीं आकोलें, संगमनेर व पारनेर हे तालुके आहेत; पूर्वेस त्याच जिल्ह्यापैकीं श्रीगोंदें, पारनेर व कर्जत हे तालुके आहेत, व सोलापूर जिल्ह्यापैकीं करमाळें तालुका आहे; दक्षिणेस सोलापूर जिल्ह्यापैकीं माळशिरस तालुका, सातारा जिल्ह्यापैकीं वांई तालुका, फलटण संस्थान व भोर संस्थान हीं आहेत; आणि पश्चिमेस, कुलाबा जिल्ह्यापैकीं रोहें, पेण, व कर्जत हे तालुके, भोर संस्थान व ठाणें जिल्ह्यापैकीं मुरबाड तालुका हे आहेत.

पुणें शहर शिवाय करून या जिल्ह्याचे ८ तालुके आहेत ते येणेंप्रमाणें:—१ जुन्नर. २ खेड. ३ मावळ. ४ हवेली. ५ शिरूर ( घोडनदी ). ६ पुरंदर. ७ भिमथडी. ८ इंदापूर. या जिल्ह्यांत जुन्नर तालुक्यांत

तालुक्यांत १, व पुरंदर तालुक्यांत २, मिळून एकंदर १३ किल्ले आहेत. त्यांचे तालुकेनिहाय वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें:—

---

## जुन्नर तालुका.

—:o❋o:—

१. **चावंडचा किल्ला.**—हा किल्ला जुन्नरच्या ईशान्येस १० मैलांवर, व नाणे घांटाच्या नैर्ऋत्येस १० मैलांवर आहे. ह्या किल्ल्याची हल्लीं फार पडापड झालेली आहे. जुन्नराहून ह्या किल्ल्याला जाण्याची वाट दोन डोंगरांच्या खाऱ्यामधून आहे. ह्यांपैकीं एका डोंगरावर हडसरचा किल्ला आहे, व दुसऱ्यावर चावंड व जिवधन हे किल्ले आहेत. हे तीन किल्ले व शिवनेरी किल्ला यांच्या माऱ्यांत नाणेघांट आहे. चावंड किल्ल्याचीं रक्षणाचीं साधनें स्वतःसिद्धच आहेत. जिकडून किल्ल्यावर हल्ला करण्याचा संभव होता तिकडून मजबूत तटबंदी केलेली होती. परंतु इ० स० १८२० त इंग्लिशांनीं ती पाडून टाकिली. फक्त डोंगरी लोक मात्र हल्लीं त्या टेंकडीवर चढतात. शिखराच्या सभोंवार एक खोल तुटलेला कडा आहे. ह्याच्यावर फक्त दोरीनें चढतां येतें. खालच्या उंचवट्याच्या प्रदेशावर चावंडाबाईचें देवालय आहे. ह्या ठिकाणीं पाणी विपुल आहे; परंतु इतर धान्यसामग्री मिळणें कठीण पडतें. हा किल्ला इ० स० १४८७ त अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना करणारा मालिक अहमद याला [illegible] प्रांतांतील जे किल्ले मिळाले त्यांत चावंड

किल्ल्याचें नांव आहे. दुसरा बुऱ्हाण निजाम ( इ० स० १५९०–९४ ) ह्याचा अज्ञान मुलगा बाहादुरशाहा ह्याला इ० स० १५९४ त ह्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. तेथें तो एक वर्ष होता. पुढें त्याला अहमदनगरची गादी मिळाली. इ० स० १६३७ त हा किल्ला शहाजी भोंसले यानें मोंगलांस दिला. इ० स० १८१८ त हा किल्ला घेण्याकरतां इंग्लिशांची एक टोळी आली. ता० १ मे रोजीं इंग्लिशांचें लष्कर त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचलें, व त्यांनीं किल्ला खालीं करून देण्याविषयीं आंतील लोकांस निरोप पाठविला. परंतु धन्याच्या हुकुमाशिवाय आम्ही किल्ला खालीं करून देत नाहीं, असा किल्लेदारानें परत जबाब पाठविला. नंतर इंग्लिशांनीं किल्ल्यावर तोफा सुरू केल्या, व थोड्याच वेळांत किल्ला त्यांचे हातीं आला. आंत एकंदर १५० मराठे शिपाई होते, त्यांचीं शस्त्रें घेऊन इंग्लिशांनीं त्यांस घालवून दिलें.

२. **हडसरचा किल्ला.**—हा किल्ला जुन्नरच्या वायव्येस ८ मैलांवर व पुण्याच्या उत्तरेस ६० मैलांवर नाणेघांटाजवळ एका उंच डोंगरावर बांधलेला आहे. हा किल्ला हडसर नांवाच्या खेड्यांत मोडतो. हें खेडें किल्ल्याच्या पायथ्याशींच आहे. किल्ल्याला जाण्याकरितां जुन्नराहून निघालें म्हणजे कुकडी नदीच्या खोऱ्यांतून दोन उंच डोंगरांच्या रांगांमधून रस्ता आहे. हा रस्ता गाड्या जाण्यायेण्यासारखा आहे. परंतु पावसाळ्यांत कुकडी नदीला पाणी आलें म्हणजे मग नदीला उतार मिळत नाहीं. किल्ल्यावर जाण्यास निघालें म्हणजे किल्ला व त्याच्या पश्चिमेस एक टेंकडी आहे, ह्या दोहोंच्या मध्यें २० यार्ड

लांबीची एक भिंत लागते. माथ्यावर जाण्याला ६५ यार्ड लांबीचा खडक फोडून रस्ता केलेला आहे; व ह्या रस्त्यानें वर गेलें म्हणजे दोन दरवाजे लागतात. ह्याशिवाय किल्ल्यांत जाण्याचा दुसरा मार्ग नाहीं. टेंकडीचा घेर सुमारें ३२०० यार्ड आहे व जुन्नरच्या सपाट प्रदेशापेक्षां ही टेंकडी १००० फूट उंच आहे. टेंकडीच्या वाटोळा १५०-२०० फुटांपर्यंत खोल तुटलेला कडा आहे. किल्ल्याचा आकार त्रिकोणाकृति असून त्याच्या दोन बाजू सारख्या लांबीच्या आहेत. किल्ल्यांत सदर कचेरीची जागा, एक लहानसें देवालय, व दुसऱ्या पडापड होऊन धुळीस मिळालेल्या कांहीं घरांच्या खुणा दृष्टीस पडतात. आंत पाण्याचीं पुष्कळ टांकीं आहेत.

इ० स० १६३७ त शहाजी भोंसले यानें मोंगलांस पुणें प्रांतांतील जे ५ किल्ले दिले, त्यांत हडसर हा किल्ला होता. जुन्नरचा किल्ला ( शिवनेरी ) इंग्लिशांनीं घेतल्या-नंतर लौकरच त्यांनीं हा किल्ला घेतला. इंग्लिशांचें लष्कर जुन्नरास येत आहे असें कळतांच जुन्नरचा किल्लेदार अण्णा रत्तीकर हा तेथून पळून हडसरच्या किल्ल्यांत येऊन राहिला. मेजर एल्ड्रिज याला ही गोष्ट समजतांच त्यानें मेजर एम्. लिओड ह्याला हडसरास पाठवून दिलें. त्यानें हडसरचा किल्ला घेऊन किल्ले-दारास कैद केलें, व त्याचे २० घोडे व ४ उंट इंग्लिशांचे हातीं लागले.

**३. जिवधनचा किल्ला.**—हा किल्ला समुद्राचे सपा-टीपासून ३००० फूट उंच असून तो पुण्याच्या वाय-व्येस ६५ मैलांवर व जुन्नरच्या पश्चिमेस १६ मैलांवर एका

उंच खडकाळ टेंकडीवर बांधलेला आहे. त्याची लांबी १००० यार्ड व रुंदी ५०० यार्ड आहे; व तो घाटघर नांवाच्या खेड्यांत मोडतो. त्याच्या सभोंवार तुटलेला कडा आहे; व कोंकणच्या बाजूचा भाग तर फारच खोल आहे. जिवधन किल्ला जवळ जवळ शिवनेरी किल्ल्यासारखाच आहे. जुन्नराहून निघालें म्हणजे किल्ल्याच्या पायथ्या-पर्यंतचा रस्ता घोड्यावर बसून जाण्यासारखा आहे. किल्ल्याची चढण फार अवघड असून १ मैल लांबीची आहे. हा किल्ला इ० स० १८२० त इंग्लिशांनीं पाडून टाकला. किल्ल्याच्या माथ्यावर हल्लीं जातां येत नाहीं. किल्ल्याचा दरवाजा पश्चिमाभिमुख होता. वर पाण्याचीं पांच टांकीं आहेत. या किल्ल्यांत बौद्धधर्माच्या लोकांचीं कांहीं कोरींव लेणीं आहेत; व एक मुसलमानी तऱ्हेची इमारत आहे. इ० स० १८१८ त जेव्हां हा किल्ला इंग्लि-शांनीं घेतला, तेव्हां त्या लेण्यांतून धान्य ठेवीत असत असें त्यांस दिसून आलें. हा किल्ला इ० स० १४८९ त अहम-दनगरच्या निजामशाहीचा मूळपुरुष मालिक अहमद यानें घेतला. इ० स० १६३७ त पुणें प्रांतांतील जे पांच किल्ले शहाजी भोंसल्यानें मोंगलांस दिले, त्यांपैकीं हा एक होता. इ० स० १८१८ च्या मे महिन्याच्या ३ ऱ्या तारखेस मेजर एल्ड्रिज हा हा किल्ला घेण्याकरतां आला. किल्ले-दार लढाईला उभा राहिला. तेव्हां इंग्लिशांनीं आपला तोफखाना सुरू केला. त्यामुळें किल्लेदार भिऊन जाऊन इंग्लिशास शरण आला, व त्यानें किल्ला त्यांचे हवालीं केला. इंग्लिशांनीं मराठे शिपायांस निःशस्त्र करून तेथून घालवून दिलें.

**४. शिवनेरी किंवा जुन्नरचा किल्ला.**— हा किल्ला जुन्नरच्या पश्चिमेस सुमारें अर्ध्या मैलावर आहे. हा खालच्या सपाट प्रदेशापासून १००० फूट उंच असून त्याची लांबी सुमारें १ मैल आहे, व त्याचा आकार त्रिकोणाकृति आहे. किल्ल्याच्या शिखरावर एक मशिदीसारखें प्रार्थनागृह आहे. ह्या किल्ल्यावर पांच निरनिराळ्या राज्यकर्त्यांच्या खुणा अद्यापि अवशेष आहेत. खिस्ती शकाच्या पहिल्या तीन शतकांत ह्याचें स्वामित्व बौद्धधर्माच्या लोकांकडे होतें, असें किल्ल्याच्या तीन बाजूंवर खडकांत खोदलेल्या सुमारें ५० बसण्याच्या जागा व कांहीं कोरींव टांकीं आहेत त्यांवरून दिसतें. बौद्धधर्माच्या लोकांनीं खोदलेल्या पायऱ्यांहून निराळ्या अशा खडकांत खोदलेल्या खोल व रुंद अशा दुसऱ्या कांहीं पायऱ्या आहेत, व त्यांवरून बौद्धधर्माच्या लोकांच्यामागून ह्या ठिकाणीं देवगिरीच्या यादव राजांचा अंमल असावा, असें अनुमान होतें ( इ० स० ११७०-१३१८ ). किल्ल्याच्या नोकदार कमानी व त्याची बहुतेक तटबंदी मुसलमानी अमलाची साक्ष देत आहे. ह्याशिवाय मुसलमानांचे वेळच्या त्या ठिकाणीं कांहीं पडापड झालेल्या इमारती, अंबारखाना, एक थडगें, व एक मशीद यांचे अवशेष भाग अद्यापि दृष्टीस पडतात ( इ० स० १३००-१७५० ). जरी शिवाजी इ० स० १६२७ त ह्याच किल्ल्यांत जन्मास आला, तरी कांहीं जुन्या तटाच्या भिंतीची दुरुस्ती, व शिवाबाईचें देवालय यांशिवाय तेथें मराठ्यांचे अमलाची कांहींच खूण नाहीं; व ऑलीव नांवाचीं झाडें व सागाचीं झाडें हीं हल्लींच्या इंग्रजी अमलाचीं चिन्हें आहेत,


किल्ला शिवने

ाचें

ंभ होतो.

ें आहे.

रें



ज्य

धम

उर

एव

पु. चं. प्र. प्रे.

किल्ल्यांत जाण्याची वाट जुन्नरच्या नैर्ऋत्य दिशेकडून लेंडी नांवाच्या ओढ्यावरून मुसलमान लोकांच्या बागा व त्यांचें कबरस्थान यांच्यामधून आहे. उजव्या अंगास एक तटबंदी केलेलें आवार लागतें. ह्याला जुना घाटकिल्ला किंवा भातखळें म्हणतात. येथें पूर्वी मामलेदाराची कचेरी असे. याच्या पाठीमागें शिवनेरी डोंगर आहे; व डाव्या बाजूस बाराबावडी नांवाची एक मोठी विहीर आहे. येथून पुढें गेलें म्हणजे सुमारें ६०० कदमांवर एक वडाचें झाड लागतें, व येथून किल्ल्याच्या चढावास प्रारंभ होतो. पायथ्याशीं सोमतवाडी नांवाचें एक ओसाड खेडें आहे. येथें फक्त एक पाटलाचें व एक महाराचें अशीं दोन घरें आहेत. वडाचे झाडापासून सुमारें ११०० पावलांवर किल्ल्याचा १ ला दरवाजा लागतो. येथून ८०–९० पावलांवर दुसरा दरवाजा आहे. ह्याला परवानगीचा दरवाजा असें म्हणतात. येथून ८० पावलांवर तिसरा दरवाजा लागतो. ह्याला हत्तीदरवाजा म्हणतात. येथून २० पावलांवर चौथा दरवाजा आहे. ह्याच्याजवळ पिराचें स्थान असल्यामुळें ह्याला पिराचा दरवाजा म्हणतात. येथून २५० पावलें चालून गेलें म्हणजे ५ वा दरवाजा लागतो. ह्याला शिवाबाईचा दरवाजा म्हणतात. हा दरवाजा सागवानी लांकडाचा मोठा भक्कम असून त्याला लोखंडी मोठमोठे चोंचीचे खिळे मारलेले आहेत. दरवाज्याच्या आंत शिरून डाव्या बाजूनें गेलें म्हणजे बौद्ध धर्माच्या लोकांचीं कांहीं लेणीं व टांकीं लागतात; व उजव्या बाजूस टेंकडीवर जाण्याच्या रस्त्याशिवाय आणखी एक दरवाजा लागतो. ह्या रस्त्यानें २९० यार्डांवर एक

लहान कमानदार दरवाजा लागतो, व थोड्याशा पायऱ्या वर चढून गेलें म्हणजे शिवाबाईचें देवालय लागतें. देवालय विशेष मोठें नाहीं; व तें एका बौद्धधर्माच्या लोकांनी खोदलेल्या भुयारावर बांधलेलें आहे. भुयाराचा रस्ता देवीच्या मागच्या बाजूस आहे. पूर्वेच्या बाजूस पडकी भिंत डाव्या हाताला टाकून दुसरा एक रस्ता आहे. ह्या रस्त्यानें गेलें म्हणजे फाटक बुरूज लागतो. पश्चिमेच्या बाजूस २ तळीं आहेत. देवळाजवळ चांफ्याचीं झाडें बरींच आहेत, व एक पिंपळाचा व एक चिंचेचा असे दोन भव्य व गगनचुंबित वृक्ष आहेत. शिवाबाईचें दर्शन घेतलें म्हणजे पुनः मागें फिरावें लागतें. शिवाबाईच्या दरवाज्याच्या पूर्वेस व कांहींसें आग्नेयीस सुमारें १०० यार्ड गेलें म्हणजे एक उंच चढाव लागतो, व पुढें दोन दरवाजे लागतात. पहिल्याला फाटक दरवाजा व दुसऱ्याला कुलापकर (?) दरवाजा म्हणतात. ह्या दरवाज्यांतून आंत शिरलें म्हणजे पुष्कळ पडापड झालेलीं घरें दृष्टीस पडतात. येथून पुढें गेलें म्हणजे किल्ल्याच्या माथ्यावर मनुष्य येऊन पोहोंचतें. माथ्यावर पडापड झालेलीं घरें, पाण्याचीं टांकीं व ऑलीव नांवाचीं झाडें बरींच आहेत. हीं झाडें इ० स० १८४१ त हिंदुस्थानांतील जंगलखात्याचा पहिला अधिकारी डाक्तर गिप्सन् यानें लाविलीं. येथें पूर्वीचें धान्य ठेवण्याचें एक कोठार आहे, त्याला अंबारखाना असें म्हणतात. ह्याशिवाय एक कबर आहे व एक कमान आहे. त्याचप्रमाणें मुसलमानांचा एक इदगा आहे. ह्याशिवाय या किल्ल्यांत कमान टांकें, गंगाजमना टांकें, मोतीं टांकें, अशीं एकंदर बावन्न टांकीं आहेत. कमान टांकें हें नांव

पडण्याचें कारण असें आहे कीं, त्याच्यावर एक मोठी कमान बांधलेली आहे. गंगाजमना टांक्याचें पाणी फारच उत्तम आहे. ह्या टांक्यांच्या आंतून मोठमोठे दगडी खांब कोरलेले आहेत.

शिवनेरी किल्ल्यांत हनुमान व गणपति ह्या ज्या दोन देवांच्या मूर्ति आहेत, त्यांच्या आकृतींवरून हा किल्ला पूर्वी देवगिरीच्या यादवांच्या ताब्यांत असावा असें वाटतें (इ०स० ११७०–१३१८). इ०स० १४४३ त मालिक उल् तुजार म्हणून एक बाहामणी सरदार होता, त्याच्या हातीं तो किल्ला गेला. त्या वेळीं जुन्नर एका कोळी जातीच्या सरदाराच्या ताब्यांत होतें. इ०स०१४७० त अथनाशिअस निकिटिन म्हणून एक रशियन फिरस्ता जुन्नर येथें आला होता. तो असें लिहितो कीं, "हें शहर एका खडकावर बसलेलें असून तें प्रत्यक्ष सृष्टिकर्त्यानेंच निर्माण केलें कीं काय, असें वाटतें." ह्या वेळीं दौलताबादेचा सुभेदार मालिक उल् तुजार याचा प्रतिनिधि जुन्नर येथें राहत असे. इ०स० १४८५ त अहमदनगरच्या निजामशाहीचा स्थापनकर्ता मालिक अहमद हा मालिक उल् तुजाराचा प्रतिनिधि होऊन जुन्नर येथें आला. त्या वेळीं शिवनेरी किल्ल्याचा किल्लेदारें किल्ला त्याचे स्वाधीन करीना. अहमदानें किल्ल्यास वेढा घालून कांहीं दिवसांनीं तो घेतला. त्या वेळीं महाराष्ट्र देशाच्या पांच वर्षांच्या वसुलाची बाकी किल्ल्यांत शिल्लक होती, ती अनायासें अहमदाच्या हातीं सांपडली. त्या पैशाच्या जोरावर त्यानें फौजफांटा ज्यास्त ठेविला, व तिकडचा सर्व मुलूख घेतला. इ० स० १४८६ त मालिक उल् तुजाराचा खून झाला, तेव्हां अहमद जंजिरा प्रांतांत

राजपुरी येथें होता. तो लगेच जुन्नर येथें परत आला, व निजाम उल्मुल्क भइरी असा किताब धारण करून स्वतंत्र रीतीनें वागूं लागला. दुसरा महमदशाहा बाहामणी यानें चाकणचा सुभेदार युसफ अदिलखान यास त्याचें पारिपत्य करण्याकरतां पाठवून दिलें. अहमदानें आपलें सर्व कुटुंब शिवनेरी किल्ल्यांत ठेविलें, व त्याच्याशीं सामना करण्याच्या उद्देशानें तो निघाला. प्रथमतः मोठ्या शूरपणानें त्यानें चाकणचा किल्ला घेतला, व नंतर बाहामणी सैन्याचा पराभव करून तो जुन्नर येथें परत आला. नंतर त्यानें कांहीं दिवस आपल्या प्रांताची अंतस्थ स्थिति सुधारण्यांत घालविले. इ० स० १४९४ त अहमदानें एक नवीन शहर बसविलें व त्यास अहमदनगर हें नांव देऊन तेथें आपल्या गादीची स्थापना केली. इ० स० १५२९ त निजामशाहीचा दुसरा राजा बुऱ्हाण निजाम ( इ० स० १५०८-५३ ) याचा, गुजराथचा सुभेदार सरदार बाहादुरशाहा ( इ० स० १५२६-३६) यानें पराभव केला; त्यामुळें तो जुन्नरास पळून गेला. इ० स० १५६५ त निजामशाहीचा तिसरा राजा हुसेन निजामशाहा ( इ० स० १५५३-६५ ) याचा विजयानगरचा रामराजा ( १५४१-६५ ) व विजापुरचा बादशाहा अल्लि अदिलशाहा ( १५५७-१५८० ) यांनीं पाठलाग केल्यामुळें तो आपल्या सैन्यासह जुन्नरच्या डोंगरांत पळून आला, व त्यानें सभोंवतालचा पंढरपुरापर्यंतचा प्रदेश उद्ध्वस्त करून टाकिला. इ० स० १५६५ त अहमदनगरचा चौथा राजा मूर्तिजा निजामशाहा ह्यानें आपला भाऊ शाहा काशीम यास शिवनेरी किल्ल्यांत

कैदेंत टाकिलें. इ० स० १५९५ त दुसरा बहादुरशाहा निजाम ( इ० स० १५९५–१६०५ ) यानें शिवाजीचा आजा मालोजी भोंसले यास पुणें व सुपें हे दोन प्रांत व शिवनेरी व चाकण हे दोन किल्ले, व त्यांच्या आसपासचा मुलूख जहागीर दिला. पुढें मालोजीचा पुत्र शहाजी भोंसले लढाईच्या कामांत गुंतला असतां त्यानें आपली बायको जिजाबाई ही गरोदर होती म्हणून तिला शिवनेरी किल्ल्यांत ठेविलें. ह्या ठिकाणीं इ० स० १६२७ त मराठी राज्याचे स्थापनकर्ते छत्रपति शिवाजी महाराज यांचें जन्म झालें. पुढें अहमदनगरचें राज्य अगदींच खालावलें, तेव्हां विजापुरकरांनीं शहाजीस आपल्याकडे नोकरीस बोलाविलें, परंतु शहाजी ती गोष्ट मान्य करीना, व आपले प्रांत व किल्ले त्यांना देईना. तेव्हां विजापुरचा बादशाहा महमद व मोंगलांचा सरदार रणदुल्लाखान ह्या दोघांनीं शहाजीस जिंकण्याचा बेत केला. शेवटीं निरुपाय होऊन शहाजीनें विजापुरच्या दरबारांत नोकरी पतकरली, व शिवनेरी किल्ला त्यांना दिला. इ० स० १६५० च्या सुमारास पुणें प्रांतांतील कोळी लोकांनीं फार मोठें बंड केलें. तेव्हां मोंगलांनीं आपलें सैन्य पाठवून त्यांचा पराभव केला. त्यांनीं हजारों कोळी लोकांची कत्तल केली, व हजारों लोकांस कैद केलें; कैदी लोकांची डोकीं शिवनेरी किल्ल्यांत उडविलीं, व जेथें त्यांस मारिलें तेथें फरस बांधला. तो फरस अद्यापि कोळीचौथरा या नांवानें प्रसिद्ध आहे. इ० स० १६५७ त शिवाजीनें जुन्नरावर स्वारी करून ११ लाख रुपयांची लूट नेली. इ० स० १६७० व १६७५ ह्या दोन्हीं वर्षीं शिवाजीनें शिवनेरी

किल्ला घेण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या कामांत त्याला यश आलें नाहीं. इ० स० १७१६ त **शाहू** महाराजांनीं शिवनेरी किल्ला मोंगलांपासून घेतला. इ० स० १७६२ त मोंगलांच्या सैन्यानें **पेशव्यांचे** सैन्याचा **पुणें** व **नगर** यांच्या दरम्यान् पराभव केला, त्या वेळीं **राघोबा** दादानें शिवनेरी किल्ला मोंगलांस दिला. इ० स० १७७७ त **नाना फड-णविसाचा** मेहुणा **बळवंतराव बडे** यानें पांच फरारी झालेल्या कोळी लोकांस **जुन्नर** येथें पकडून ठार मारलें. परंतु ते पिशाचरूपानें त्याच्या पाठीस लागले. तेव्हां त्यांना शांत करण्याकरतां त्यानें किल्ल्याच्या पायथ्याशीं त्यांच्या नांवानें पांच लिंगें स्थापून त्यांवर एक देवालय बांधलें. त्याला हल्लीं **पंचलिंगांचें** स्थान असें म्हणतात. इ० स० १७९३ त **नानाफडणविसानें राघोबादादाचे** पुत्र **बाजी-राव** व **चिमणाजी** आपा यांस **जुन्नरच्या** गढींत कैदेंत ठेविलें. इ० स० १७९५ त **सवाई माधवराव** कैलास-वासी झाल्यावर **परशुरामभाऊ पटवर्धन** हे **जुन्नरास** गेले, व हातांत गाईचें शेंपूट धरून " आपणास पेशवाईचा अधिकार मिळाला आहे " अशी त्यांनीं दुसरे **बाजीरावांपाशीं** शपथ

---

उ १ **क्यांबेल.** कांहीं लोक अशीही दंतकथा सांगतात कीं, पूर्वीं मुसलमानी अमलांत **जुन्नर** येथें कोणी ब्राह्मण सुभेदार होता. त्याच्यावर बादशाहाची कांहीं कारणावरून इतराजी होऊन त्यानें त्यास दरबारांत बोलाविलें. त्या वेळीं त्या ब्राह्मणानें " मी या संकटांतून मुक्त होऊन परत आलों तर पंचलिंगांचें देवालय बांधीन " असा नवस केला. पुढें दैवयोगानें तो बादशाहाचे दरबारांतून निर्दोषी ठरून परत आला, व त्यानें पुढें हें देवालय बांधिलें. **क्यांबेल** साहेबांच्या लिहिण्यापेक्षां हीच दंतकथा ज्यास्त संभवनीय वाटते,

वाहिली. नंतर बाजीराव साहेब त्यांच्याबरोबर पुण्यास येऊन पेशवाई पदावर आरूढ झाले. इ० स० १८१८ त मेजर एल्ड्रिज बाजीरावाचा पाठलाग करीत करीत जुन्नर येथें आला, व तारीख २१ मे रोजीं त्यानें शिवनेरी किल्ला घेतला. किल्ल्याचा अधिकारी अण्णाभाई रत्तीकर हा अगोदरच हडसरच्या किल्ल्यावर पळून गेला. परंतु पुढें त्यास इंग्लिशांनीं पकडलें. इ० स० १८४१ त येथें चिनी कैदी लोकांस आणून ठेविलें होतें. त्यांनीं किल्ल्यांत बरीच शाकभाजी व फळफळावळ तयार केली होती; व हल्लीं किल्ल्यांत जीं सागाचीं झाडें दृष्टीस पडतात; तीं सुद्धां त्यांच्याच हातचीं आहेत. इ० स० १८४९ त राघोजी भांगरे यानें बंड केलें. त्या वेळीं इंग्लिशांनीं आपली एक टोळी ह्या किल्ल्यांत आणून ठेविली होती. अद्यापि हा किल्ला बऱ्याच चांगल्या स्थितींत आहे.

९. **नारायण गड**.—हा किल्ला जुन्नराजवळ नारायणगांवाच्या पूर्वेस सुमारें ३ मैलांवर अगदीं तुटक अशा एका टेंकडीवर बांधलेला होता. या टेंकडीच्या उत्तर, दक्षिण व पश्चिम या बाजूंस तुटलेला कडा असल्यामुळें तिकडून किल्ल्याचा स्वतःसिद्धच बंदोबस्त झालेला होता. त्याची तटबंदी विशेष मजबूत नव्हती. इ० स० १८२० त हा किल्ला इंग्लिशांनीं पाडून टाकला. अद्यापि किल्ल्याची एक लहानशी भिंत व ४ बुरूज जीव धरून आहेत. किल्ल्यांत अगदीं शिखरावर हटसाबाईचें देवालय आहे. आंत पाण्याची दोन टांकीं असून त्यांना जिवत झरे आहेत; शिवाय पुष्कळ हौदही आहेत. येथील अशी एक दंतकथा सांगतात कीं, इ०स० १८३०त

भगवान् नारायणाची मूर्ति एका टांक्यांतून वर आली, व परमेश्वरानें आपल्या भक्तमंडळीस दर्शन दिलें. त्यानंतर तीन वर्षांनीं तेथें एक फार मोठी यात्रा भरली होती. किल्ल्याचा दरवाजा अद्यापि आहे व त्यावर नारायणाची मूर्ति व वाघाची दोन चित्रें खोदलेलीं आहेत. हा किल्ला बाळाजी विश्वनाथ यानें बांधला असें सांगतात. हा किल्ला बाळाजीनें सयाजी पोकर नांवाच्या मनुष्यास सरंजामादाखल दिला होता. इ० स० १८१८ त इंग्लिशांच्या तोफखान्याच्या एक गोळा किल्ल्यावर जाऊन आदळतांच आंतील लोक भयभीत होऊन त्यांनीं किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन केला.

---

## खेड तालुका.

—:o✱:o—

**६. चाकणचा किल्ला ( भुईकोट ).**—हा किल्ला पुण्याहून नाशिकास जाण्याच्या रस्त्यावर खेडच्या दक्षिणेस ६ मैलांवर व पुण्याच्या उत्तरेस १८ मैलांवर आहे. तो इ० स० १८५८ त इंग्लिशांनीं पाडून टाकला. ग्रांट डफनें इ० स० १८३६ त ह्याचें असें वर्णन केलें आहे कीं, “ हा किल्ला साधारण चतुष्कोण आहे. त्याच्या पुढच्या बाजूस पुष्कळ बुरूज असून शिवाय कोंपऱ्या कोंपऱ्यांवर उंच बुरूज घातलेले आहेत. किल्ल्याचा तट बराच उंच असून त्याच्या सभोंवतीं खंदक आहे. ह्या खंदकांत उत्तरेच्या बाजूस मात्र पाणी आहे. इतर ठिकाणीं तो कोरडा असून ३० फूट खोल व १५

फूट रुंद आहे. किल्ल्यांत जाण्याचा दरवाजा पूर्वेच्या बाजूस असून आंत जाण्याला आणखीं पांच सहा दरवाजे लागतात." तटाच्या पलीकडे पडापड झालेला कांहीं भाग दृष्टीस पडतो. हा भाग इ० स० १२९५ त एका हबशी सरदारानें किल्ल्याला बाहेरून एक तट बांधला होता, त्याचा अवशेष भाग आहे म्हणून सांगतात. दुसरा अल्ला-उद्दीन बाहामणी (इ०स०१४३५–१४५७) ह्यानें आपला सरदार मालिक उल् तुजार ह्याला कोंकणचे किल्ले घेण्या-करतां पाठविलें होतें, तेव्हां त्यानें आपलें ठाणें चाकण येथें ठेविलें होतें ( इ० स० १४४३ ). त्यानें येथून कोंक-णांत ज्या स्वाऱ्या केल्या, त्यांपैकीं शेवटच्या स्वारीच्या प्रसंगीं वाटेनें त्याला भयंकर अरण्य लागल्यामुळें त्याचे दक्षिणी व हबशी लोक पुढें जाण्यास पाय धरीनात; व मालिक उल् तुजार आपला पुढें जाण्याचा हेका सोडीना. शेवटीं त्या लोकांनीं बंड करून मालिक तुजार व त्याचे ५०० मोंगल लोक यांस वाटेंत कापून टाकलें. तेव्हां राहिलेले मोंगल लोक चाकणास परत आले. दक्षिणेंतील सरदारांच्या मनांत मोंगलांनीं कोंकणांतून परत निघून जावें असें होतें, त्यामुळें त्यांनीं बादशाहास असें खोटेंच कळविलें कीं, मालिक याच्या अविचारामुळें व मोंगल लोकांच्या उद्धट व दांडगाईच्या वर्तनामुळें हा प्रसंग आला, व हल्लीं त्या लोकांनीं मोठा बंडावा केला आहे. तेव्हां बादशाहानें त्या सरदारांस असें लिहून पाठविलें कीं, "एकंदर मोंगल लोकांस ठार मारून टाकावें." पुढें त्या सरदारांनीं लगेच चाकणास वेढा दिला. दोन महिनेपर्यंत मोंगलांनीं त्यांना दाद दिली नाहीं. शेवटीं त्या सरदारांनीं अशी युक्ति लढविली कीं, बाद-

शाहाच्या सहीचें एक बनावट पत्र तयार करून त्यांत "तुम्हीं किल्ला सोडून एकदम निघून जावें" असें लिहिलें, व तें मोंगल लोकांकडे पाठवून दिलें. तेव्हां मोंगलांच्या दोन टोळ्या बाहेर येऊन राहिल्या. पुढें एके दिवशीं आंत जे मोंगलांचे लोक शिलक राहिले होते, त्यांना त्या सरदारांनीं एका बड्या मेजवानीस बोलावून ठार मारून टाकिलें, व लगेच त्या दोन टोळ्यांवर हल्ला करून त्यांपैकीं एकीची कत्तल केली. दुसरी मात्र मोठ्या संकटानें त्यांच्या हातून निसटली. पुढें हें दगाबाजीचें कृत्य अल्ला-उद्दीन यास कळून त्यानें त्या सरदार लोकांस मोठ्या कडक शिक्षा केल्या; व त्या वेळापासून **चाकण** येथें मुसल-मानांचें कायमचें ठाणें राहूं लागलें.

इ० स० १४८६ त **चाकणचा** अधिकारी **झैनुद्दीन** यानें बंड केलें, तेव्हां मालिक अहमद हा किल्ला घेण्या-करितां चाकण येथें आला. तेव्हां झैनुद्दीन यानें विजा-पुरचा अधिकारी यूसफ अदिलखान याजपाशीं मदत मागितली. पुढें त्याच वर्षाच्या अखेरीस अहमद हा दुसरा अहमदशाहा बाहामणी ( इ० स० १४८२-१५१८ ) याचें स्वामित्व कबूल करीना, व तो स्वतंत्र रीतीनें वागूं लागला. तेव्हां त्या बादशाहानें यूसफ व झैनुद्दीन यांस त्याच्यावर जाण्यास हुकूम दिला. अहमदानें झैनुद्दीन यास आपणाकडे फितविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तो सफल झाला नाहीं. बाहामणी सैन्य आपणावर चाल करून येत आहे, असें अहमदास कळतांच त्यानें आपलें सर्व कुटुंब शिवनेरी किल्ल्यांत ठेविलें, व त्या सैन्याशीं सामना देण्याकरतां तो आपल्या सैन्यासह निघाला. एके दिवशीं

रात्रीस तो आपल्या निवडक लोकांनिशीं अकस्मात् चाकणास आला, व मोठ्या छातीनें तटाला शिड्या लावून किल्ल्यांत शिरला. किल्ल्यांतील पहारेकरी जागे होत तोंपर्यंत त्याचे एकंदर १७ लोक वर चढले. झैनुद्दीन याचे किल्ल्यांत बरेच लोक होते. त्यांची व अहमदाची मोठी निकराची लढाई झाली; परंतु अहमदाचे लोक फार थोडे असल्यामुळें त्याचें कांहीं चालेना. परंतु पुढें ऐन हातघाईचा प्रसंग आला, तेव्हां झैनुद्दीन यास वार लागून तो ठार झाला. झैनुद्दीन खालीं पडतांच त्याचे लोक भिऊन गेले व अहमदास शरण येऊन त्यांनीं आपलीं शस्त्रें खालीं ठेविलीं. अशा रीतीनें चाकणचा किल्ला हातीं येतांच अहमद, बादशाहाच्या सैन्यावर चाल करून गेला, व त्याचाही त्यानें पराभव केला. इ० स० १५९५ त अहमदनगरचा १० वा बादशाहा बाहादुरशाहा (इ०स० १५९६—९९) ह्यानें चाकणचा किल्ला शिवाजीचा आजा मालोजी भोंसले यास दिला. इ० स० १६३६ त अहमदनगरचें राज्य लयास गेलें, तेव्हां चाकणचा किल्ला शिवाजीचा बाप शहाजी भोंसले याच्या ताब्यांत राहिला. त्यानें फिरंगोजी नरसाळा यास त्या किल्ल्याचा किल्लेदार नेमिलें. पुढें इ० स० १६४७ त त्या किल्लेदारास वश करून घेऊन शिवाजीनें तो किल्ला घेतला. इ० स० १६६२ त मोंगलांचा सरदार शाहिस्तेखान हा शिवाजीची बंडाळी मोडण्याकरितां दक्षिणेंत आला. त्यानें प्रथमतः सुपें घेतलें व तो चाकण येथें आला. हल्ला करून किल्ला हातीं येणें कठीण असें त्यास वाटल्यावरून सुरंग लावून किल्ल्याचा तट पाडण्याचा त्यानें निश्चय केला. दोन

महिनेपर्यंत मराठे लोकांनीं मोंगलांची डाळ शिजूं दिली नाहीं. शेवटीं मोंगलांनीं सुरुंग लावून एक बुरूज उडविला. त्या वेळीं पुष्कळ मराठे शिपाई ज्याप्रमाणें कबूतरें आकाशांत उडावीं, त्याप्रमाणें आकाशांत उडाले व खालीं पडून प्राणास मुकले. मोंगल लोक आंत घुसले, परंतु मराठ्यांनीं अगोदरच बुरुजाच्या आंत मातीचा दुसरा बुरूज तयार केला होता. लढाई सर्व दिवसभर चालली होती, व तींत मोंगलांचे पुष्कळ लोक पडले. तथापि ते मोठ्या निकरानें लढत होते, व सूर्यास्त झाला तरी ते मागें फिरले नाहींत. अन्नपाण्यावांचून त्यांनीं ती सर्व रात्र तेथेंच काढली; व सूर्योदय होतांच पुनः लढाईस सुरुवात झाली. मराठयांचे लोक थोडे होते. त्यामुळें शेवटीं त्यांचा मोड झाला. त्या लढाईंत मोंगलांचे एकंदर ९०० लोक पडले. फिरंगोजी हा आपल्या लोकांसह बालेकिल्ल्यांत जाऊन राहिला. पुढें त्याच्या लोकांची अन्नपाण्यावांचून उपासमर होऊं लागली, तेव्हां निरुपाय होऊन तो मोंगलांच्या स्वाधीन झाला. शाहिस्तेखानानें फिरंगोजीस फार चांगल्या तऱ्हेनें वागविलें, व त्यास शिवाजीकडे पाठवून दिलें. खऱ्या शूराचें लक्षणच हें,—मग तो कोणत्याही जातीचा कां असेना. शिवाजीनें फिरंगोजीची त्याच्या शूरत्वाबद्दल फार तारीफ करून त्याला मोठें बक्षीस दिलें. शाहिस्तेखानानें इ० स० १६६३ त ह्या किल्ल्याची दुरुस्ती केली, व त्या ठिकाणीं त्यानें उसबेगखान नांवाच्या आपल्या सरदारास कांहीं लोकांनिशीं ठेविलें. पुढें त्याच वर्षी शिवाजीनें पुणें मुक्कामीं शाहिस्तेखानावर छापा घालून मोंगलांची राळ केली. तेव्हां औरंगजेबास शाहिस्तेखा-

नाचा मोठा राग येऊन त्यानें त्यास बंगालच्या सुभेदारीवर पाठवून दिलें, आपला पुत्र मोअजीम याची दक्षिणेच्या सुभेदारीवर नेमणूक केली, व चाकण व शिवनेरी यथ आपल्या मुलखाच्या बंदोबस्ताकरितां कांहीं फौज ठेवून बाकीच्या लोकांस उत्तरहिंदुस्थानांत परत बोलाविलें. पुढें एके प्रसंगीं शिवाजी पुण्यास प्रसिद्ध साधुवर्य तुकाराम बुवा यांचें कीर्तन ऐकत असतां, चाकण ऐथील मोंगलांच्या टोळीनें अकस्मात् त्याच्यावर छापा घातला. परंतु त्या वेळीं शिवाजी त्यांचे हातून निसटून गेला. इ० स० १६६४ त औरंगजबानें शिवाजीस राजा हा किताब, व पुणें, सुपें व चाकण हे परगणे जहागीर दिले. पुढें इ० स० १६७१ त मोंगलांचा सरदार दिलावरखान यानें मराठ्यांपासून चाकणचा किल्ला परत घेतला. इ०स० १६८९ त औरंगजबाचा बंडखोर मुलगा अकबर याचा मोंगलांनीं याच ठिकाणीं पराभव केला. इ० स० १७९६ त शिंद्याचा दिवाण बाळोबातात्या कुंजर यानें पेशव्यांचा खासगी सेनापति बाबूराव फडके यास कैद करून चाकणच्या किल्ल्यांत ठेविलें. इ० स० १८१८ त मराठ्यांबरोबर इंग्लिशांची जी शेवटची लढाई झाली, त्या वेळीं लेफ्टेनेंट कर्नल डीकन साहेब बरोबर मोठें सैन्य घेऊन तारीख २९ फेब्रुवारी इ० स० १८१८ रोजीं किल्ल्याजवळ आला. पुढें त्याची व मराठ्यांची लढाई झाली, तींत मराठ्यांचा पराभव होऊन किल्ला इंग्लिशाचे हातीं आला. इ०स० १८२७त कॅप्टन् क्लून्स चाकणच्या किल्ल्याच्या संबंधानें असें लिहितो कीं, “ येथें बाजाराची

मोठी जागा असून गांव व किल्ला मिळून एकंदर ३०० घरें आहेत व किराण्या जिन्नसांची वगैरे ७ दुकानें आहेत." हा किल्ला हल्लीं जमीनदोस्त करून टाकलेला आहे.

---

## मावळ तालुका.

—o:*o:—

७. राजमाची.—हा किल्ला अगदीं ओसाड प्रदेशांत बोरघांटापासून ६ मैलांवर सह्याद्रीच्या एका फांद्यावर बांधलेला आहे. ह्या फांद्याला दोन शृंगें आहेत. हा किल्ला बोरघांटाच्या उत्तरेस असून तेथून पायवाटेनें १० मैल लांब आहे. ज्या फांद्यावर किल्ला बांधलेला आहे, तो नीट उभा असून त्याच्या पायथ्याशीं कोंकणच्या बाजूस निबिड अरण्य आहे. ह्या बाजूस त्याची उंची ३००० फुटांहून ज्यास्त आहे. जसजसें त्याच्या माथ्याकडे जावें, तसतशी झाडी नाहींशी होत जाते, व वरील सर्व प्रदेश रखरखीत भासूं लागतो. वर सांगितलेल्या दोन्ही शृंगांनाही तटबंदी केलेली आहे. त्यांपैकीं आतल्या बाजूच्या शृंगावर जो किल्ला बांधलेला आहे, त्याला श्रीवर्धन असें म्हणतात, व बाहेरच्या बाजूच्या शृंगावर जो किल्ला बांधलेला आहे, त्याला मनरंजन असें म्हणतात.

मुख्य किल्ल्यापासून सुमारें अर्ध्या मैलावर एक बळकट दगडी तट बांधलेला आहे. ह्या तटाची उंची १० फूट व रुंदी ८ फूट आहे; व त्याला तोफा व बंदुका मारण्याकरतां मधून मधून द्वारें ठेविलेलीं आहेत. ह्या भिंतीच्या आंत पुष्कळ शेतकीची जागा आहे, व पूर्वी किल्ल्यांतील




किल्ला राजमाची

…जमिनीपा-
…००–४००
…कडा अति
…चालावयाचा
…गाचें स्वतः-
…मात्र दुहेरी
…यामध्यें जी

…बहिरोबा व
…महाराज, व
…रनिराळ्या वेळीं
…आहेत. हल्लीं

…जूस मनरं-
…श्रीवर्धन हा
…डील बाजूस
…ठिकाणीं ह्या
…हे. दक्षिणेच्या
…त्याची हल्लीं
…शिरलें म्हणजे
…. हींत पूर्वी
…याचा मोठा
…बाजूंत एक

…णी फारच उत्तम आहे, व तेथ…

मोठी जागा असून गांव व किल्ला मिळून एकंदर ३०० घरें आहेत व किराण्या जिन्नसांची वगैरे ७ दुकानें आहेत." हा किल्ला हल्लीं जमीनदोस्त करून टाकलेला आहे.

---

## मावळ तालुका.

—०:*:०:—

७. **राजमाची.**—हा किल्ला अगदीं ओसाड प्रदेशांत बोरघांटापासून ६ मैलांवर सह्याद्रीच्या एका फांट्यावर बांधलेला आहे. ह्या फांट्याला दोन शृंगें आहेत. हा किल्ला बोरघांटाच्या उत्तरेस असून तेथून पायवाटेनें १० मैल लांब आहे. ज्या फांट्यावर किल्ला बांधलेला आहे, तो नीट उभा असून त्याच्या पायथ्याशीं कोंकणच्या बाजूस निबिड अरण्य आहे. ह्या बाजूस त्याची उंची ३००० फुटांहून ज्यास्त आहे. जसजसें त्याच्या माथ्याकडे जावें, तसतशी झाडी नाहींशी होत जाते, व वरील सर्व प्रदेश रखरखीत भासूं लागतो. वर सांगितलेल्या दोन्ही शृंगांनाही तटबंदी केलेली आहे. त्यांपैकीं आंतल्या बाजूच्या शृंगावर जो किल्ला बांधलेला आहे, त्याला श्रीवर्धन असें म्हणतात, व बाहेरच्या बाजूच्या शृंगावर जो किल्ला बांधलेला आहे, त्याला मनरंजन असें म्हणतात.

मुख्य किल्ल्यापासून सुमारें अर्ध्या मैलावर एक बळकट दगडी तट बांधलेला आहे. ह्या तटाची उंची १० फूट व रुंदी ८ फूट आहे; व त्याला तोफा व बंदुका मारण्याकरतां मधून मधून द्वारें ठेविलेलीं आहेत. ह्या भिंतीच्या आंत पुष्कळ शेतकीची जागा आहे, व पूर्वीं किल्ल्यांतील



किल्ला राजमाची

जमिनीपा-
०० — ४००
कडा अति
वालावयाचा
गाचें स्वतः-
मात्र दुहेरी
यामध्यें जी
बहिरोबाचें
दिपमाळी
बहिरोबा व
महाराज, व
रनिराळ्या वेळीं
आहेत. हल्लीं

जूस मनरं-
श्रीवर्धन हा
डील बाजूस
ठिकाणीं ह्या
. दक्षिणेच्या
त्याची हल्लीं
शिरलें म्हणजे
. हींत पूर्वी
ण्याचा मोठा
बाजूंत एक
न त्याचें
मुदलींच

शिबंदीस धान्य, सर्पण, गवत वगैरेचा पुरावा ह्या जमिनीपासून होत असे. मनरंजन किल्ल्याची एक बाजू ३००–४०० फूट एकसारखी सरळ होत गेलेली आहे. हा कडा अति भयंकर असून तिकडून शत्रूचा कांहींच इलाज चालावयाचा नाहीं. पश्चिमेच्या बाजूस अशा प्रकारच्या रक्षणाचें स्वतःसिद्ध कांहींच साधन नसल्यामुळें तिकडून मात्र दुहेरी भक्कम तट घातलेला आहे. दोन शृंगांच्यामध्यें जी जमिनीची जरा सखल अशी पट्टी आहे, तीवर बहिरोबाचें देवालय आहे. ह्या देवालयापुढें तीन दगडी दिपमाळी आहेत. हें देवालय लहानच आहे, परंतु त्यांत बहिरोबा व जोगेश्वरी यांच्या शिवाजी महाराज, शाहूमहाराज, व पहिले बाजीराव साहेब पेशवे यांनीं निरनिराळ्या वेळीं दिलेल्या निरनिराळ्या मूर्ति स्थापिलेल्या आहेत. हल्लीं तेथें देवाचा पुजारी रहात असतो.

ह्या पट्टीच्या एका बाजूस श्रीवर्धन व दुसऱ्या बाजूस मनरंजन हे किल्ले आहेत, हें पूर्वी सांगितलेंच आहे. श्रीवर्धन हा पूर्वेकडे असून फार उंच आहे, व ह्याच्या उत्तरेकडील बाजूस अतिशय खोल तुटलेला कडा आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं ह्या किल्ल्याच्या रक्षणार्थ तिहेरी तट बांधलेला आहे. दक्षिणेच्या बाजूस किल्ल्यांत जाण्याचा दरवाजा होता. त्याची हल्लीं पडापड झालेली आहे. ह्या दरवाज्यांतून आंत शिरलें म्हणजे प्रथमतः एक खडकांत खोदलेली खोली लागते. हींत पूर्वी धान्य ठेवीत असत. हिच्याच शेजारीं एक पाण्याचा मोठा हौद आहे. उत्तरेच्या बाजूस तुटलेल्या कड्याच्या बाजूंत एक सुंदर टांकें आहे. ह्या टांक्याला जिवंत झरे असून त्याचें पाणी फारच उत्तम आहे, व तेथें सूर्यकिरणांचा मुदलींच

प्रवेश होत नाहीं. याशिवाय आंत कांहीं पडापड झालेल्या इमारती व एक गढी आहे. बाहेरच्या किल्ल्याला मनरंजन असें म्हणतात हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ह्याच्या रक्षणाचीं साधनें स्वतःसिद्ध नसल्यामुळें त्याच्या सभोंवार दुहेरी मजबूत तट घातलेला आहे. बाहेरील भिंतीच्या आंत कांहीं पाण्याचीं टांकीं व हौद आहेत, व आंतील भिंतीच्या आंत दारूखान्याची जागा, एक टांकें, किल्ल्याच्या सुभेदाराच्या जमीनदोस्त झालेल्या वाड्याचा पाया वगैरे आहेत. किल्ल्याच्या पश्चिम बाजूचा देखावा फारच रमणीय दिसतो; व मुख्यतः ह्याच गोष्टीवरून ह्या किल्ल्याला मनरंजन हें नांव दिलें असावें. खालील माचीचा प्रदेश पाहिला तर उत्तरेकडच्या बाजूस एकसारखी किर्र झाडी असून मधून मधून लहान लहान नद्यानाले दृष्टीस पडतात. पश्चिमेच्या बाजूचा प्रदेश अगदीं मोकळा असून जिकडे तिकडे लागवडीच्या जमिनीशिवाय कांहींच दृष्टीस पडत नाहीं. दक्षिणेच्या बाजूस कांहीं कोळी लोकांचीं झोंपडीं, एक मोठा तलाव, व भातशेतीचीं मोठमोठीं खाचरें दृष्टीस पडतात. खालच्या उंचवट्याच्या प्रदेशाच्या उत्तर व दक्षिण ह्या बाजूंस सह्याद्रीची मुख्य ओळ एकसारखी लागत गेलेली आहे. ह्या ओळींत कोठें सूर्यकिरणांचाही प्रवेश होणें कठीण अशा प्रकारचें अटव्य अरण्य, कोठें निर्वृक्ष व रखरखीत अशीं सह्याद्रीचीं गगनचुंबित शिखरें, कोठें डोंगरांच्या माचींवर ताली बांधून लागवडीस आणलेलीं शेतें, अशा रीतीचा उत्तरेस हरिश्चंद्रगडापासून तों दक्षिणेस १८ मैलांवर भोज्य डोंगरापर्यंतचा, सुमारें

---

१ हा किल्ला नगर जिल्ह्यांत आहे.

७० मैल लांबीच्या प्रदेशाचा देखावा फारच अप्रतिम दिसतो. पश्चिमेकडे सह्याद्रीचे लांब लांब पसरलेले फांटे, त्यांच्यामधील भयंकर दऱ्याखोरीं व त्यांच्या पायथ्याशीं दाट झाडींतून मंद गतीनें वाहत जाणारे नद्यानाले यांचें प्रवाह यांचा देखावा एकसमयावच्छेदेंकरून दृग्गोचर झाल्यामुळें कांहीं वेळपर्यंत आनंद व आश्चर्य यांच्या योगानें मनाची प्रवृत्ति कांहीं चमत्कारिक तऱ्हेची होते, व ज्या सर्वशक्तिमान् परमेश्वरानें ह्या सर्व गोष्टी निर्माण केल्या, त्याच्यापुढें आम्हां क्षुद्र मर्त्यांची व आमच्या क्षुद्र कृत्यांची कथा काय, अशा विचारांनीं मन गोंधळून जातें. उजव्या अंगास जरा लांब नजर फेंकली म्हणजे माहुली, तुंगार, व साष्टी परगण्यांतील उंच उंच डोंगर जणूंकाय आपल्या प्रभूची काय आज्ञा होते, ती ऐकण्याकरतां मोठ्या नम्रतेनें परंतु गादीपासून जरा लांब उभे राहिले आहेत, पुढच्या अंगास माथेरान, प्रबळ वगैरे डोंगर जणूंकाय एकनिष्ठपणें सेवा करण्याकरितां आपल्या प्रभुपदकमलीं लीन झालेले आहेत; त्याच्याही पलीकडे लांब नजर फेंकली म्हणजे मुंबई शहर व आरबी समुद्र एथपर्यंतचा प्रदेश सपाट असल्यामुळें व मध्यंतरी भातखाचरें व ताडामाडांचीं इतर झाडें असल्यामुळें राजदरबारीं जणूंकाय हा एक चित्रविचित्र रंगांचा गालीचाच पसरला आहे असें वाटतें; व डाव्या बाजूस नागोठणें व सागरगड या परगण्यांतील सखल डोंगर हे जणूंकाय खालीं वांकून सेवकवृत्तीनें वर सांगितलेला गालीचा झाडून पुसून साफ करण्याच्या कामांत गुंतले आहेत असा भास होतो.

हा किल्ला प्रथमतः इ० स० १६४८ त शिवाजी

महाराजांनीं घेतला. पुढें इ० स० १७१३ त शाहू-
महाराजांनीं तो कान्होजी आंग्रे यास दिला, व त्यानें इ०
स० १७३० त तो पहिले बाजीराव पेशवे यांस दिला.
इ० स० १७७६ त सदाशिवराव भाऊ तोतया ( हा
सदोबा नांवाचा एक कनोजा ब्राह्मण होता ) हा कोंकण
प्रांत काबीज करीत करीत बोरघांटापर्यंत आला. त्या
ठिकाणीं मराठ्यांनीं त्याला अडथळा केला, परंतु त्यांना
न जुमानतां त्यानें बोरघांट आपल्या ताब्यांत घेतला;
व राजमाची किल्ल्याच्या सुभेदारानें कांहीं एक तकरार
न करितां तो किल्ला त्याचे स्वाधीन केला. ह्या तोतयाचें
प्रस्थ बरेंच माजल्यामुळें पेशव्यांच्या दरबारीं मोठी गडबड
होऊन गेली, व नाना फडनविसानें त्याच्याशीं तहाचें
बोलणें सुरू केलें. ह्या सर्व गोष्टींमुळें तो तोतया इतका
फुगून गेला कीं, सर्वांत आपणच श्रेष्ठ व सर्व महाराष्ट्र-
देशाचे आपणच अधिपति असें त्याला वाटूं लागलें. पुढें
तो बेसावधपणें वागूं लागला, व त्याच्या सैन्याची पूर्वीची
शिस्त मोडली. अशा रीतीनें घमेंडींत बसला असतां
पेशव्यांच्या दोन सरदारांनीं त्याच्यावर अकस्मात् हल्ला
करून त्याच्या सैन्याची दाणादाण करून दिली. सदोबा
मुंबईस पळून गेला, व त्याला पुढें आंग्रयानें पकडून पुण्यास
पाठवून दिलें; व तेथें त्याला हत्तीच्या पायीं देऊन ठार
मारलें. इ० स० १८१८ त कांहीं एक प्रयास न पडतां
हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला.

८. कुवारी.—हा किल्ला पुणें जिल्हा व कुलाबा
जिल्हा यांच्या सीमेवर मुळशी पेठ्यांत आंबवणी घांटाच्या
शेजारीं भोरच्या दक्षिणेस २० मैलांवर व पुण्याचे पश्चि-

मेस ४० मैलांवर एका टेंकडीवर बांधलेला आहे. त्याचा घेर सुमारें १॥ मैल आहे, व त्याचा मुख्य दरवाजा आग्नेयी दिशेस आहे. ह्या दरवाज्याची हल्लीं पडापड झालेली आहे. पश्चिमेच्या बाजूस दुसरा एक दरवाजा आहे. किल्ल्याच्या सभोंवार मोठा भक्कम तट आहे. किल्ल्यांत दोन मोठीं तळीं असून त्यांत पाणी विपुल आहे. याशिवाय आंत कुवारी देवीचें देवालय आहे. हा किल्ला इंग्लिशांनीं इ० स० १८१८ त घेतला तेव्हां त्यांनीं देवीचे दागिने मुंबईस आणून मुंवा देवीस दिले. किल्ल्यांत निरुपयोगी अशा ७ तोफा आहेत. त्यांत लक्ष्मी नांवाची तोफ फारच मोठी आहे. तिचा गोळा आंबवणी घाटांत जाऊन पडत असे असें सांगतात.

अहमदनगरच्या मुसलमानी राज्याचा स्थापनकर्ता मालिक अहमद यानें सन १४८६ त हा किल्ला घेतला. पुढें कांहीं दिवसांनीं तो त्याच्या हातून गेला. सत्राव्या शतकांत पिंपळगांव ( हें खेडें महाडच्या खोऱ्यांत आहे ) येथील कोळ्यांचा नाईक लुमाजी भोकर याला सर्व कोळी लोकांचा सरनाईक व्हावयाचें होतें. त्यानें विजापुरच्या बादशाहास असें कळविलें कीं, कुवारी किल्ल्यांत एक फार उमदा घोडा आहे, व मला पैशाची मदत मिळेल तर पूर्वी तो घोडा खावंदांस आणून देईन. तेव्हां बादशाह त्यामुळें मागितलेला पैसा दिला. नंतर त्यानें गले, अशी पूर्वीची लोक एकत्र करून किल्ल्यास येण्या लोहगांवापासून सुरू लोकांनीं १ वर्ष त्याला दाद ... एकंदर ४ दरवाजे आहेत, त्याला असा निरोप पाठविला न बाजूंस दोन मोठमोठाले बुरूज घोडा आला तर ठीकच आहे, दरवाज्याच्या जवळच २ भुयारें

पाळेंमुळें खणून काढीन. अशा प्रकारचा कडक निरोप ऐकून पुष्कळ कोळी लोक लुमाजीस सोडून पळून गेले. फक्त लुमाजी व त्याचे कांहीं जिवाचे स्नेही मात्र शिलक राहिले. पुढें लुमाजी स्त्रीवेष धारण करून किल्ल्यांत शिरला, व त्यानें किल्ल्याच्या तटाला वरून एक शिडी बांधली. नंतर खालीं येऊन तो आपले लोक घेऊन शिडीपाशीं आला. परंतु पहातो तों शिडी आपल्या डोक्यावर ७।८ फूट आणखी उंच आहे; तेव्हां मोठें धाडस करून एकाच्या खांद्यावर दुसरा, दुसऱ्याच्या खांद्यावर तिसरा, अशा रीतीनें त्यानें आपले ८० लोक किल्ल्यांत नेले. नंतर त्यांनीं आंतील लोकांचा पराभव केला, व ते घोडा घेऊन निघून गेले. परंतु इतक्यांत किल्ल्यांतील एका बरकनदारानें त्या घोड्यावर गोळी घालून त्याला ठार मारलें. बादशाहा आतां आपपास देहांत शासन करणार असें लुमाजीस खास वाटलें; परंतु त्याचें तें धाडसाचें कृत्य ऐकून बादशाहा फार खुश झाला, व त्याला त्यानें आपल्या पदरीं लष्करांत मोठी हुद्यांची जागा दिली. इ०स०१८१८ त लोहगड, विसापूर, राज-

माची, तुंग, तिकोना वगैरे किल्ले घेतल्यानंतर कर्नल
मुंबई... साहेब कुवारीस आला. प्रथमतः किल्ल्यावर हल्ला
पाठवून दि... प्रोथर साहेबास फार परिश्रम पडले. परंतु पुढें
मारलें. इ० स० १८... १८१८ रोजीं त्यानें किल्ल्यावर
हा किल्ला इंग्लिशांचे हातीं ... त्यामुळें किल्ल्यांत पुष्कळ नाश

८. **कुवारी**.—हा किल्ल... ला, सर्व इमारती पेटल्या,
जिल्हा यांच्या सीमेवर मुळशी पे... ला—तेव्हां निरुपाय होऊन
शेजारीं भोरच्या दक्षिणेस २० ... शरण आले. सुमारें ७००

शिपाई लोक व किल्लेदार जानोबा भाऊ यांस इंग्लिशांनीं कैद केलें. ह्या किल्ल्यांत इंग्लिशांस १ लाख रुपयांची लूट मिळाली.

९. **लोहगड आणि विसापूर.**—हे किल्ले **कारलें** स्टेशनाच्या दक्षिणेस ४ मैलांवर व **खंडाळ्याच्या** पश्चिमेस ८ मैलांवर दोन निरनिराळ्या टेंकड्यांवर बांधलेले आहेत. पश्चिमेच्या बाजूस जो आहे, त्याला **लो**हगड म्हणतात, व पूर्वेच्या बाजूस जो आहे, त्याला **वि**सापूर म्हणतात. कारल्याच्या दक्षिणेस १ मैलावर **भाजें** म्हणून एक गांव आहे, तिकडून ह्या किल्ल्यांवर जाण्याचा रस्ता आहे. **भा**ज्याच्या थोडेंसें पुढें गेलें म्हणजे दोन रस्ते फुटतात. पश्चिमेच्या बाजूचा रस्ता **लो**हगडास जातो, व पूर्वेच्या बाजूचा रस्ता **वि**सापुरास जातो. **लो**हगडाच्या अगदीं जवळ गेलें म्हणजे एक लांब डोंगराचें टोंक पुढें आलेलें दिसतें. त्याला **विं**चूकांटा असें म्हणतात. हा **विं**चूकांटा व **लो**हगड यांच्या दरम्यान् एक कमानदार दरवाजा लागतो; व जवळच एक **लो**हगांव म्हणून खेडें आहे. वाटेनें डाव्या हातास मोठमोठे ओसाड चौथरे दृष्टीस पडतात. येथें पूर्वी बडेबडे देशमुख राहत असत असें सांगतात. जवळच एक मोठी होरलेली विहीर आहे. तींत पूर्वी एक नवरानवरीचें जोडपें पडून मेलें, त्यामुळें तेथील लोक ती जागा सोडून गेले, अशी पूर्वीची दंतकथा आहे. किल्ल्याच्या पायऱ्या **लो**हगांवापासून सुरू होतात. किल्ल्यांत जाण्याला एकंदर ४ दरवाजे आहेत, व प्रत्येक दरवाज्याच्या दोन बाजूंस दोन मोठमोठाले बुरूज बांधलेले आहेत. पहिल्या दरवाज्याच्या जवळच ३ भुयारें

आहेत व एक पाण्याचें टांकें आहे. ह्या टांक्याला आंतून २ मोठाले दगडी खांब आहेत. ह्याच्या वरच्या बाजूस ३० फूट अंतरावर दुसरीं दोन भुयारें आहेत. हीं किल्ल्याच्या बाहेर आहेत, व त्यांना पांडवकृत्यें असें म्हणतात. पहिल्या दरवाज्याला **गणेशदरवाजा** म्हणतात, व तो इ० स० १७८९ त जेव्हां **नाना फडनविसानें** किल्ल्याची नीट दुरुस्ती केली तेव्हां बांधला. ह्या दरवाज्याच्या संबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, ज्या वेळीं त्याचें काम सुरू केलें, तेव्हां त्याच्या दोन्ही बाजूंच्या बुरुजांचे पाये मुळींच ठरेनात; त्यामुळें कांहीं दिवस तें काम तसेंच पडून राहिलें. पुढें एके दिवशीं **नाना फडनवीस** निजला असतां त्याच्या स्वप्नांत कोणी पुरुष येऊन त्यानें त्यास असें सांगितलें कीं, ह्या ठिकाणीं नवराबायकोचें एक जोडपें बळी दिल्याशिवाय देवतेची शांति होणार नाहीं, व बुरूजही बांधला जाणार नाहीं. तेव्हां **साबळे** या आडनांवाच्या एका मनुष्यानें आपला वडील मुलगा व सून यांस त्या ठिकाणीं बळी दिलें, व त्यांना तेथेंच पुरलें. नंतर पुनः बुरुजांचें काम सुरू केलें; व पुढें तें काम शेवटपर्यंत निर्विघ्नपणें तडीस गेलें. **नानानीं लोहगांवची** पाटिलकी पूर्वी **घडशी** यांचेकडे होती, ती लगेच त्यांचेकडून काढून **साबळे** यास दिली. त्याचा चौथा पुरुष हल्लीं **लोहगांवचा** पोलिसपाटील आहे. दुसऱ्या दरवाज्याला **नारायण** दरवाजा म्हणतात, तिसऱ्याला **हनुमान** दरवाजा म्हणतात, व चौथ्याला **महादरवाजा** म्हणतात. पहिला, दुसरा व चौथा हे **नाना फडनविसानें** बांधले, व तिसरा मुसलमानांचे वेळचा आहे, असें सांगतात. हे दरवाजे सागवानी लांकडाचे भरभक्कम

आहेत. गणेशदरवाज्याला मोठमोठे चोंचीचे पुष्कळ लोखंडी खिळे मारलेले आहेत. ह्या सर्व दरवाज्यांच्या बुरुजांच्या खालीं किंवा वर लहान लहान निरुपयोगी तोफा पडलेल्या आहेत. गणेशदरवाज्याच्या आंत गणपतीची छिन्नभिन्न झालेली मूर्ति पडलेली आहे. गणेश व नारायण ह्या दरवाज्यांच्या साधारण मध्यंतरीं खडकांत खोदलेल्या एका कोनाड्यांत गौरीची एक मूर्ति आहे. नारायण व हनुमान् ह्या दरवाज्यांच्या दरम्यान् दोन भुयारें आहेत. ह्यांपैकीं एकांत मराठ्यांचे वेळीं, नाचणी ठेवीत असत, व दुसऱ्यांत भात ठेवीत असत, असें सांगतात. हनुमान दरवाज्याच्या तोंडाशीं खडकांत एक मारुतीची मूर्ति खोदलेली आहे. हा दरवाजा औरंगजेबानें बांधला असें सांगतात; परंतु त्याच्या एकंदर बांधणीवरून तो त्याच्याही पूर्वीं अहमदनगरच्या राजांनीं बांधला असावा, असें अनुमान होतें. हनुमान दरवाज्याच्या आंत कांहीं पायऱ्या चढून गेलें म्हणजे एक कमान लागते, व ह्या कमानीच्या पुढें महादरवाजा लागतो. महादरवाज्याच्या समोर एक दगडी मशीद आहे. हींत दोन थडगीं आहेत, व तीं औरंगजेब व त्याची बायको यांच्या नांवानें बांधलेलीं आहेत असें सांगतात. ह्या मशिदीला लागूनच धाकट्या सदरकचेरीची जमीनदोस्त होऊन गेलेली इमारत दृष्टीस पडते. तिच्या जरा पुढें पूर्वींची लोहारखान्याची जागा आहे. मशिदीच्या मागच्या अंगास टेंकडीचा माथा १०० फूट उंच आहे, व उजव्या अंगास सुमारें ३० फूट उंचीवर एक चार चौकी जागा आहे, तिला थोरली सदर म्हणतात. हिच्या पाठीमागें खडकांत ४ भुयारें आहेत, व

एक पाण्याचें टांकें आहे. ह्या टांक्याला आंतून दगडी खांब आहेत. ह्याच्या उजव्या बाजूस खालींवर अशा दोन कोठ्या आहेत. ह्यांपैकीं वरचीला " खजीनदार की कोठी " किंवा जामदारखाना म्हणतात. ह्याच्याही जरा पुढें गेलें म्हणजे ओळंबलेल्या अशा खडकाखालीं आणखीं एक कोठी आहे. हिला लक्ष्मीकोठी असें म्हणतात. हिच्यांत पूर्वी लोमेष ऋषि तपश्चर्या करण्याकरतां बसले होते, अशी दंतकथा सांगतात. लक्ष्मीकोठीच्या पलीकडे आणखी दोन लहान लहान कोठ्या आहेत. हल्लीं ह्या बहुतेक कोठ्या गाळ व पाणी यांनीं भरून गेल्या आहेत. हीं सर्व पांडवकृत्यें आहेत असें म्हणतात; परंतु हीं सर्व लेणीं खिस्ती शकाच्यापूर्वी एक दोन शतकें बौद्ध लोकांनीं कोरलीं असावीं असा तर्क होतो. येथून वर गेलें म्हणजे एका तट घातलेल्या आवारांत आपण येऊन पोहोंचतों, व तेथें शेख उमर अवलिया या नांवाच्या एका मुसलमान साधूची कबर आहे. ह्या अवलियाविषयीं अशी दंतकथा सांगतात कीं, हा आपल्या सहा बंधूंसह आरबस्थानांतून इकडे आला. बाबा मलंग हा त्यांपैकीं एक होय, व त्याच्या नांवाची टेंकडी कल्याणाजवळ आहे; व दुसरा पुण्याचा प्रसिद्ध शेख सल्ला होय. बाकीच्यांचीं नांवें मिळत नाहींत. हा शेख उमर, मुसलमानांचा अमल हिंदुस्थानांत बसण्याच्यापूर्वी, इकडील लोकांस आपल्या धर्माची दीक्षा देण्याकरितां आपल्या बंधूंसह इकडे आला होता. ह्या थडग्याचा जो हल्लीं मुजावर किंवा पुजारी आहे, त्याची ही सातवी पिढी आहे. तो अशी गोष्ट सांगतो कीं, जेव्हां शेख उमर लोहगडास आला,

तेव्हां त्याला तेथें एक हिंदु साधु पुरुष आढळला. तेव्हां त्यानें त्याचा एक पाय धरून त्याला शेजारच्या **विसापूर** किल्ल्यावरून फेंकून दिलें. तो ज्या ठिकाणीं पडला तेथें त्याची अद्यापि **वनदेव** या नांवानें पूजा करतात, व त्याचा पुजारी एक कोळी असून तेथें प्रतिवर्षीं पौष शुद्ध पौर्णिमेस मोठी जत्रा भरते. टेंकडीच्या माथ्यावर एक मोठें तळें आहे. त्याला दोन्ही बाजूंनीं पायऱ्या आहेत. त्याच्या एका बाजूवर “ शके १७११ ( इ० स० १७८९ ) त हें तळें **बाळाजी जनार्दन भानू** ( **नाना फडनवीस** ) यानीं बांधलें, **धोंडो बल्लाळ नितसुरे** यांना ह्या कामावर नेमलें होतें, व त्याचें बांधकाम करणारा **बाजी चट** हा होता” अशा अर्थाचा एक शिलालेख आहे. हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला तेव्हां ह्या तळ्यांत आपणाला अतिशय संपत्ति सांपडेल, ह्या आशेनें त्यांनीं तळ्याचें पाणी फोडून दिलें, ह्यामुळें तें तळें हल्लीं कोरडें ठणठणीत पडलें आहे. ह्याच्या दक्षिणेच्या बाजूस एक **त्रिंबकेश्वराचें** पडकें देवालय आहे, व ह्या देवालयाजवळ एक टांकें व एक उत्कृष्ट पाण्याची विहीर आहे. किल्ल्यांत कांहीं तोफा व तोफांचे गोळे पडलेले आहेत. माथ्याच्या वायव्येस **त्रिंचू**-कांटा ह्या टेंकडावर जाण्याचा दरवाजा आहे. हें टेंकाड १९०० यार्ड लांब व ३०।४० यार्ड रुंद आहे; व त्याच्या सभोंवतीं तट बांधलेला आहे.

महाराष्ट्र देशांत जे डोंगरी किल्ले आहेत, त्या सर्वांत **लोहगड** हा किल्ला फारच बळकट आहे. त्याचप्रमाणें तो फार प्राचीनही आहे. येथून **बोर**घांटांतील रस्त्यावर चांगला मारा लागू पडतो; ह्यामुळें त्याला पूर्वीं येवढें

महत्त्व आलें होतें. आंतील कोरींव लेण्यांवरून असें अनुमान होतें कीं, ख्रिस्ती शकाच्यापूर्वी दोनशें वर्षे तेथें बौद्ध लोकांची वस्ती होती. ह्या किल्ल्याच्या संबंधानें अलीकडील माहिती म्हटली म्हणजे इ० स० १४८९ त जेव्हां मालिक अहमद यानें निजामशाहीची स्थापना केली, तेव्हां त्यानें लोहगड बाहामणी राजांपासून जिंकून घेतला. पुढें अहमदनगरचा सातवा राजा दुसरा बुऱ्हाण निजाम ( इ० स० १५९०-९४ ) ह्याला त्याचा भाऊ गादीवर असतां त्यानें इ० स० १५६४ त ह्या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें होतें. इ० स० १६३० त अहमदनगरचें राज्य मोडल्यानंतर तो किल्ला विजापुरसरकारचे अमलाखालीं गेला; परंतु पुढें लौकरच म्हणजे इ० स० १६४८ त तो शिवाजीनें बळकाविला. इ० स० १६६५ त जयसिंग व दिलावरखान ह्या दोन सरदारांना औरंगजेबानें शिवाजीची दक्षिणेंतील बंडाळी मोडण्याकरतां पाठविलें, तेव्हां शिवाजीला तो किल्ला मोंगलांस देणें भाग पडलें. परंतु पुढें पांच वर्षांनीं ( इ० स० १६७० त ) शिवाजीनें तो किल्ला पुनः हस्तगत करून घेतला; फिरून तो मराठ्यांचे हातून गेला, व इ० स० १७०४ त मराठ्यांनीं तो फिरून घेतला. इ० स० १७१३ त तो शाहूमहाराजांनीं कान्होजी आंग्र्यास दिला, व त्यानें इ० स० १७२० त तो बाळाजी विश्वनाथास दिला. परंतु त्याची देखरेख वगैरे सर्व आंग्रेच पहात असत. इ०स० १७७०त जावजी बोंबले या नांवाच्या कोळ्यानें नाना फडनविसाच्या सांगण्यवरून तो किल्ला आपले ताब्यांत घेतला. पुढें दुसऱ्या

बाजीरावाचे कारकीर्दींत नाना दिवाणगिरीचें काम पहात असतां त्यांनीं धोंडोपंत नितसुरे यास त्या किल्लयाचा अधिकारी नेमून त्याला लोहगडास पाठवून दिलें, व आपला सर्व खजिना तेथें पाठविला. इ० स० १८०० त नाना फडनवीस मरण पावल्यावर इ० स० १८०२ तारीख १२ नवंबर रोजीं नानांची पत्नी लोहगडास येऊन राहिली. इ० स० १८०३ पर्यंत तो किल्ला धोंडोपंताचे ताब्यांत होता. पुढें जनरल वेल्सलीच्या मध्यस्थीनें पेशवे व धोंडोपंत यांच्यामध्यें असा करार ठरला कीं, “धोंडोपंतानें बाजीरावाशीं इमानानें वागावें, व बाजीरावानें तो किल्ला त्याच्याकडेच ठेवावा.” पुढें कृष्णेच्या कांठच्या एका किल्लयावरून धोंडोपंताच्या एका बारगिरानें बाजीराव पेशवे देवदर्शनास जात होते त्यांच्यावर आपली बंदुक सोडली. वेलसलीला ती गोष्ट समजतांच त्यानें लोहगड घेण्याचा निश्चय केला. कांहीं दिवसांनीं धोंडोपंत वेल्सली साहेबास शरण आला, व नानांच्या बायकोस सालीना १२०० रुपयांची नेमणूक करून घेऊन त्यानें किल्ला सोडून दिला, आपण ठाण्यास जाऊन राहिला, व नानांच्या पत्नीस पनवेलीस पोहोंचतें केलें. अशा रीतीनें तो किल्ला इंग्लिशांचे हातीं आल्यावर इ० स० १८०३ च्या अक्टोबर महिन्यांत त्यांनीं तो दुसरे बाजीराव पेशवे यांस परत दिला. पुढें इंग्लिश व बाजीराव यांचा बेबनाव झाल्यावर इ० स० १८१८ च्या मार्चच्या ४ थ्या तारखेस जनरल प्रोथर साहेब बरोबर मोठें सैन्य घेऊन लोहगडास आला; त्यानें प्रथमतः शेजारचा विसापूर किल्ला घेतला; विसापूर इंग्लिशांचे हातीं जातांच दुसऱ्याच

दिवशीं मराठे **लो**हगड सोडून पळून गेले, व लढाईचा वगैरे कांहीं एक प्रसंग न येतां किल्ला आपोआप इंग्लिशांचे हातीं आला. इ० स० १८४९ पर्यंत ह्या किल्ल्यावर इंग्लिशांची फौज होती. अद्यापि हा किल्ला चांगल्या स्थितींत आहे.

१०. **विसापूर.**—**लो**हगडच्या उत्तरेस अर्ध्या मैलावर हा किल्ला आहे. हा **लो**हगडापेक्षां मोठा आहे, व त्याची उंची समुद्राचे पृष्ठभागापासून ३९९० फूट आहे. किल्ल्याच्या आंत एक टेंकाड आहे, त्याला बालेकिल्ला असें म्हणतात. परंतु त्याला पूर्वी तट होता, अशा बद्दलच्या कांहींच खुणा दिसत नाहींत. पश्चिमेच्या बाजूस मात्र एकसारखा भक्कम तट बांधलेला आहे; इतर ठिकाणीं जागेचा अवघडपणा व सवघडपणा पाहून त्या मानानें किल्ल्याचा बंदोबस्त केलेला आहे. किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. एकाला **कों**कणदरवाजा व दुसऱ्याला **द**क्षिणदरवाजा अशीं नांवें आहेत. हे दोन्ही दरवाजे इंग्लिशांचे हातीं तो किल्ला आल्यावर त्यांनीं पाडून टाकले. किल्ल्यांत बिनछपराच्या दोन दगडी इमारती आहेत. तेथें पूर्वी सरकारी कचेऱ्या होत्या. आंत एक तिकोनी तळें आहे, व त्याच्याचजवळ एक टांकें आहे. किल्ल्यांत एक १० फूट लांबीची तोफ आहे, तीवर पूर्वीं इंग्लंडांत **ट्यु**डर नांवाचें राजघराणें होतें त्याचें राजचिन्ह—एक गुलाबाचें फूल व मुगूट—आहे, व तिच्यावर E. R. अशीं इंग्रजी अक्षरें आहेत. इंग्लंडची राणी इलिझाबेथ हिच्या कारकीर्दींत इंग्लिश लोकांचीं जहाजें हिंदुस्थानांत व्यापाराकरितां येऊं लागलीं, तेव्हां त्यांपैकीं एखाद्यावर **आं**ग्रयाची धाड पडून त्यानें ती

तोफ घेतली असावी, व आपले यजमान पेशवे यांस ती दिली असावी असा अजमास होतो. तिच्या कान्यांत खिळे मारून ती हल्लीं निरुपयोगी करून टाकलेली आहे.

हा किल्ला बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं बांधला म्हणून म्हणतात. इ०स०१८१८त इंग्लिश लोक पेशव्यांचे एका मागून एक सर्व किल्ले घेत चालले असतां लोहगड किल्ला फारच मजबूत आहे, असें त्यांना समजल्यावरून त्यांनीं तो किल्ला घेण्याची विशेष तयारी केली होती. ता० ४ मार्च इ० स०१८१८ रोजीं जनरल प्रोथर यानें विसापुरावर हल्ला केला. त्याची व मराठ्यांची लहानशी लढाई होऊन मराठे पळून गेले, व किल्ला इंग्लिशांचे हातीं आला. किल्ला हातीं येतांच त्यांनीं प्रथम त्याचे दरवाजे पाडून टाकले. हल्लीं ह्या टेंकडीवर थोडींशीं धनगरांचीं खोपटें मात्र आहेत.

---

# हवेली तालुका.

—:०✻०:—

**११. सिंहगड किंवा कोंडाणे:**—हा किल्ला पुण्याचे नैर्ऋत्येस १९ मैलांवर सिंहगडभुलेश्वर[1]डोंगरांच्या रांगेंतील एका उंच टेंकडीवर बांधलेला आहे. ह्याची उंची समुद्राच्या सपाटीपासून ४३२२ फूट व खालच्या सपाट प्रदेशापासून २३०० फूट आहे. उत्तर व दक्षिण ह्या दिशांकडे सिंहगडाची चढण फार बिकट आहे, व ह्याच बाजूस तो फार उंच आहे.

---

१ पुणें जिल्ह्यांत हें एक प्रसिद्ध देवस्थान आहे.

पुण्याहून घोड्याचे गाडींत बसून या किल्ल्याचे पायथ्याशीं येण्यास सुमारें तीनचार तास लागतात, व वाटेनें विठ्ठलवाडी, खडकवासलें, डोणजें वगैरे खेडीं लागतात. पायथ्याशीं अतकरवाडी नांवाचें एक लहानसें खेडें आहे, व तेथें वर जाण्यास खुर्च्या मिळतात. सुमारें दीड मैल चढाव चढून गेलें म्हणजे मेट म्हणून एक विसावा घेण्याची जागा आहे. तेथें कुणब्यांची १।२ घरें आहेत. तेथून सुमारें एक मैल चढाव चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याचे बाहेरचे बाजूस एक गुहेसारखा भाग दृष्टीस पडतो, व त्यांत खोल पाणी आहे. यासंबंधानें अशी दंथकता सांगतात कीं, पूर्वीं मुसलमानाचे वेळीं किल्ल्याचें भिताड उडविण्याकरितां त्यांनीं तेथें एक सुरुंग खोदला होता. परंतु तो खोदीत असतां आंतून एकदम पाण्याचा मोठा लोंढा आला, व त्यांचा तो प्रयत्न फुकट गेला.

किल्ल्यावर जाण्याच्या कांहीं बिकट पायवाटा आहेत व दोन साधारण सोपे मार्ग आहेत. बिकट पायवाटांनीं फक्त मावळी लोक मात्र चढून वर येतात; व त्या वाटांनीं वर चढणें म्हणजे जिवावरचेंच काम आहे. किल्ल्यांत जाण्याला दोन दरवाजे लागतात, एक आग्नेयी दिशेस आहे व दुसरा ईशान्य दिशेस आहे. ईशान्येकडील दरवाज्यास पुण्याचा दरवाजा म्हणतात, व आग्नेयीकडील दरवाज्यास कल्याणचा किंवा कोंकणी दरवाजा म्हणतात. पुण्याच्या दरवाज्याकडचा रस्ता फार अवघड आहे; कोंकणी दरवाज्याकडचा रस्ता इतका अवघड नाहीं. ह्या दरवाज्याच्या रक्षणार्थ एकाच्या माग्यांत दुसरा असे आणखी तीन दरवाजे बांधलेले आहेत. प्रत्येक दरवाज्याला भक्कम बुरूज




पुणें चंद्रप्रकाश प्रेस.

ज्ञानेश्वर ... 

बांधलेले आहेत. किल्ल्यांत शिरल्याबरोबर तोंडाशीं खडकांत खोदलेली एक घोड्यांची पागा आहे. या पागेंत सुमारें १०० घोडे बांधतां येतील अशी जागा आहे.

हा किल्ला साधारण त्रिकोणाकृति असून त्याची तटबंदी फार मजबूत आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें २ मैल आहे. ह्या किल्ल्याची पूर्वपश्चिम लांबी १००० फूट व उत्तर-दक्षिण रुंदी २५०० फूट आहे. त्याची उत्तरेकडची बाजू स्वतःसिद्धच फार मजबूत आहे. कारण त्या अंगास अति खोल तुटलेला कडा आहे. परंतु दक्षिणेकडची बाजू तशी नाहीं. इ० स० १८१८ त इंग्लिशांनीं हा किल्ला सर केला, तो ह्याच बाजूनें. ह्या किल्ल्यांत पूर्वी इंग्लिश, पारशी वगैरे लोकांनीं बांधलेले बरेच बंगले आहेत, परंतु ते आतां बहुतेक रिकामे पडलेले आहेत. महाबळेश्वरास जाण्याचा रस्ता होण्यापूर्वी येथें मोठमोठी कामगार मंडळी उन्हाळ्यांत हवा खाण्यास येत असत. मध्यम स्थितींतील लोकांस उन्हाळ्याचे दिवसांत कांहीं दिवस विश्रांति घेण्यास स्थळ फार उत्तम आहे. ह्या किल्ल्यावरून चारी बाजूंस फार लांबवरचा देखावा अतिशय रमणीय दिसतो.

पूर्वी ह्या किल्ल्याला **कोंडाणे** असें म्हणत असत. इ० स० १६४७ त **शिवाजीनें** ह्या किल्ल्याच्या किल्लेदारास लांच देऊन वश केलें, व तो आपले ताब्यांत घेतला, व त्याचें नांव त्यानें **सिंहगड** असें ठेविलें. ह्याचा पूर्वीचा इतिहास असा आहे कीं, **महमद तघलक** (इ०स० १३२५–१३५१ ) ह्यानें इ० स० १३४० त ह्या किल्ल्यावर प्रथमतः हल्ला केला. त्या वेळीं तो किल्ला **नाग नाईक** नांवाच्या एका कोळी सरदाराच्या ताब्यांत होता. त्यानें

तघलक सैन्याशीं मोठ्या शूरपणानें बरेच दिवस टक्कर दिली; परंतु शेवटीं त्याचा पराभव होऊन त्याला किल्ल्यांत परत यावें लागलें. नंतर महंमदानें किल्ल्याची तटबंदी पाडण्याचा उद्योग आरंभिला; परंतु त्या कामांत त्याला तादृश् यश आलें नाहीं. तेव्हां त्यानें किल्ल्याला वेढा देऊन त्याची नाकेबंदी केली. किल्ल्यांतील लोकांनीं ८ महिनेपर्यंत त्याला दाद दिली नाहीं. परंतु पुढें आंतील धान्यसामग्री संपली, व आंतील लोकांची उपासमर होऊं लागली, तेव्हां नाग नाईकास किल्ला सोडून देणें भाग पडलें. किल्ला हातीं आल्यावर महमद दौलताबादेस परत आला. इ० स० १४८६ त निजामशाही घराण्याचा स्थापनकर्ता मालिक अहमद ह्याचे हातीं हा किल्ला आला. इ० स० १६३३ त शिवाजीमहाराजांची मातुश्री जिजाबाई हिला त्रिंबकच्या मुसलमान सरदारानें कैद केलें होतें; परंतु मराठ्यांनीं तिला सोडवून ह्या किल्ल्यावर आणून ठेविलें ( ग्रांट डफ ). कांहीं दिवसपर्यंत अहमदनगरच्या राज्याचा मुख्य प्रधान ह्या नात्यानें हा किल्ला शहाजी भोंसले याच्या ताब्यांत होता (ग्रांट डफ). परंतु इ० स० १६३७ त मोंगल व विजापुरकर हे एकत्र होऊन शहाजीचा पाठलाग करूं लागले, तेव्हां त्याला विजापुरकरांच्या नोकरींत शिरणें भाग पडलें. त्या वेळीं त्याला त्याच्या ताब्यांतील ९ किल्ले मोंगलांस द्यावे लागले; त्यांपैकीं सिंहगड हा एक होता. पुढें मोंगलांनीं तो विजापुरकरांस दिला ( इलिअट व डौसन ). इ० स० १६४७ त शिवाजीमहाराजांनीं तेथें एक मुसलमान किल्लेदार होता त्याला

१ हा वृत्तांत फेरिस्तामध्यें दिलेला आहे.

वश करून तो घेतला व त्याला सिंहगड हें नांव दिलें, हें मागें सांगितलेंच आहे (ग्रांड डफ, मराठ्यांची बखर). इ०स० १६६२ त औरंगजेबानें शिवाजीला जिंकण्याकरतां शाहिस्तेखान नांवाच्या आपल्या सरदाराला दक्षिणेंत पाठवून दिलें. शिवाजीला ती बातमी कळतांच तो सुप्याहून सिंहगडास निघून आला. शाहिस्तेखान पुण्यास येऊन दाखल झाला व शिवाजीचा गुरु दादोजी कोंडदेव याच्या वाड्यांत येऊन उतरला. शिवाजीनें प्रथमतः दोन हुशार ब्राह्मण पुढची तयारी करण्याकरतां पुण्यास पाठवून दिले. पुढें एप्रिल महिन्यांत एके दिवशीं अस्तमानसमयीं तो आपल्या बरोबर कांहीं निवडक लोक घेऊन सिंहगडाहून निघाला. वाटेनें ठिकठिकाणीं त्यानें आपल्या लोकांच्या लहान लहान टोळ्या ठेविल्या; व आपल्याबरोबर फक्त येसाजी कंक, तानाजी मालुसरे वगैरे २९ निवडक लोक घेतले. पूर्वी जे दोन ब्राह्मण पाठविले होते, त्यांनीं शाहिस्तेखानाच्या सैन्यांत जे मराठे लोक होते, त्यांच्यांत अगोदरच फितूर करून ठेविला होता. शिवाजीनें आपल्या २९ लोकांच्या दोन टोळ्या केल्या. एकीनें आम्ही लग्नाकरतां जात आहों, अशा बहाण्यानें शहरांत प्रवेश केला; व दुसरीनें आम्हीं कांहीं कैदी लोक आणले आहेत, असा बहाणा करून शहरांत प्रवेश केला; व आंत आल्यानंतर नेमलेल्या ठिकाणीं ते लोक एकत्र मिळाले. नंतर सर्वांनीं चिलखतें चढविलीं, व सशस्त्र होऊन ऐन मध्यरात्रीस चोरवाटेनें ज्या ठिकाणीं खान उतरला होता त्या ठिकाणीं ते आले. त्यांनीं प्रथमतः मुदपाकखान्यांत प्रवेश करून आंतील आचारी वगैरे लोकांस कापून काढलें, व एक खिडकी होती तींतून

तीन असामी खानाच्या खोलींत शिरले. परंतु खिडकींतून खालीं उड्या टाकतांना २ असामी पाण्याचे हौदांत पडले; तिसऱ्यानें आपल्या तरवारीनें खानावर वार केला, परंतु तो निसटता लागल्यामुळें खानाचा एका हाताचा फक्त आंगठा तुटला. इतक्यांत खानानें आपला भाला त्याच्यावर फेकून त्याला ठार मारिलें. इतक्यांत दोन बाया येऊन त्यांनीं खानाला एका खोलींत ओढून नेलें. शिवाजीनें वाड्यांतील इतर लोकांवर छापा घालून पुष्कळ लोकांस कापून टाकलें; त्यांत कांहीं बायकाही प्राणास मुकल्या, व तेथें एक पोक्त म्हातारा मुसलमान होता, तोच शाहिस्तेखान असें समजून त्यानें त्याचें डोकें कापलें. अशा रीतीनें खानाची दाणादाण करून मशाली पेटवून शिवाजी सिंहगडास परत आला ( ग्रांट डफ ). मराठी बखरींतून या संबंधानें असें लिहिलें आहे कीं, शिवाजी-पासून आपल्या जिवाचें रक्षण करण्याकरितां शाहिस्तेखान खिडकीस दोर बांधून खालीं उतरूं लागला; इतक्यांत शिवाजीनें आपल्या भवानीचा फटकारा मारून त्याच्या हाताचीं तीन बोटें उडविलीं. दुसऱ्या दिवशीं वराती पाठीमागून घोडे या रीतीनें मोंगलांची एक टोळी शिवा-जींचें पारिपत्य करण्याकरितां सिंहगडाकडे जाण्यास निघाली. परंतु तिच्यावर शिवाजीच्या छपून बसलेल्या लोकांनीं अकस्मात् चोहींकडून हल्ला केला. ह्या टोळीवर गोळ्यांचा सारखा पाऊस पडूं लागला, त्यामुळें तिची अशी धांदल उडून गेली कीं, मोंगल लोक अल्ला अल्ला, तोबा तोबा, करीत जिकडे वाट फुटेल तिकडे सैरावैरा पळत सुटले. ह्या वेळीं त्यांचे बहुतेक लोक ठार झाले; व कांहीं

परत गेले असले तर फारच थोडे परत गेले असावे. पुढें औरंगजेबाचा सरदार यशवंतसिंग यानें पुनः एकवार सिंहगडास वेढा देण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. ह्यानंतर कांहीं दिवसपर्यंत शिवाजी सिंहगड येथें राहून आपल्या सर्व मुलुखाचा कारभार पहात असे. इ० स० १६६४ त शिवाजी सुरत शहर लुटीत असतां शहाजीच्या मरणाचें वर्तमान त्याला समजलें, यामुळें तो लगेच सिंहगडास परत आला, व आपल्या पित्याचें और्ध्वदेहिककर्म त्यानें तेथेंच केलें. नंतर त्यानें अहमदनगर शहर लुटलें, विजापुरकरांच्या सैन्याची एके ठिकाणी भयंकर कत्तल केली, वेंगुर्लें शहर लुटून जाळून टाकलें, व तो पुनः सिंहगडास परत आला ( ग्रांट डफ ). इ० स० १६६९ च्या एप्रिल महिन्यांत मोंगलांनीं पुरंदरचा किल्ला घेतला, व लवकरच सिंहगडास वेढा दिला. शिवाजीनें आपले बहुतेक लोक बरोबर घेतल्यामुळें किल्ल्यांत थोडेसे शिपाई लोक, शिवाजीची पत्नी सईबाई व दुसरे कांहीं नातेवाईक एवढी काय ती मंडळी शिलक होती. मोंगलांनीं सर्व रस्ते बंद केले, तेव्हां आंतील मंडळीस सोडविण्याचा बाहेरून कांहींच इलाज चालेना. शेवटीं निरुपाय होऊन मोंगलांचा सेनापति राजा जयसिंग याच्यापाशीं शिवाजीनें तहाचें बोलणें सुरू केलें. नंतर तह होऊन शिवाजीचे लोक खालीं उतरले, व किल्ला मोंगलांचे हातीं आला. ह्या वेळीं शिवाजी व औरंगजेब

---

१ इलियट व डौसन. मराठी बखरींतून व ग्रांट डफचे इतिहासांत या संबंधानें अशी हकीकत दिली आहे कीं, इ० स० १६६५

( पुढें चालू )

ठाणे

यांच्यामध्यें जो तह झाला त्यांत शिवाजीनें आपल्या ३२ डोंगरी किल्ल्यांपैकीं २० किल्ले औरंगजेबास देऊं केले. ह्या तहामुळें या वेळीं सिंहगड व पुरंदर हे दोन किल्ले त्यांच्या सभोंवतालच्या प्रदेशासुद्धां मोंगलांस मिळाले. इ० स० १६६६ त जयसिंगानें पुरंदर, सिंहगड व लोहगड यांचा पक्का बंदोबस्त करून प्रत्येक ठिकाणीं मोंगलांचें पुष्कळ लष्कर ठेविलें. दरम्यान् शिवाजीला औरंगजेबानें वाङ्मस भेटीस बोलावून अटकेंत ठेविलें. परंतु मोठ्या कौनें तेथून सुटून तो ह्याच वेळीं (दिसेंबर स० इ० १६६६) क्षिणेंत परत आला. त्यानें एकामागून एक आपले र्व किल्ले मोंगलांपासून परत घेतले. स० इ० १६६७ त औरंगजेबानें शिवाजीला राजा असा किताब दिला, व पुणें, चाकण व सुपें हे प्रांत जहागीर दिले. परंतु त्या वेळीं त्यानें सिंहगड व पुरंदर हे किल्ले मात्र शिवाजीला परत न देतां ते खास अमलाखालीं ठेविले. शिवाजीनें हे किल्ले घेण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें स० इ० १६७० त सिंहगड घेतला.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

न जयसिंग व दिलावरखान दाक्षिणेंत आले. पुढें जयसिंगानें सिंहगडास वेढा दिला, व दिलावरखानानें पुरंदरास वेढा दिला. नंतर, त्या दोघांबरोबर लढाईस उभे राहून आपला निभाव लागणार नाहीं असें शिवाजीस वाटल्यावरून त्यानें जयसिंगाशीं तहाचें बोलणें सुरू केलें, व त्यामुळें सिंहगडच्या वेढ्याचें काम ढिलें पडलें. दिलावरखानानें पुरंदरचा किल्ला घेण्याविषयीं आपली शिकस्त केली, परंतु शिवाजीचा शूर सरदार मुरार बाजी व त्याच्या हाताखालचे मावळे व हेटकरी लोक यांनीं त्याचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं. पुढें शिवाजीनें जयसिंगाशीं तह केल्यामुळें सिंहगड व पुरंदर या दोन्ही किल्ल्यांचे वेढे आपोआप उठले.

शिवाजीनें मराठ्यांच्या हातून जीं अचाट कामें करविलीं, त्यांपैकींच सिंहगड घेतला हें एक होय. त्याचा वृत्तांत येणेंप्रमाणें:—

सिंहगडावर उदेभान नांवाचा मोंगलांचा रजपूत सरदार असून त्याच्या हाताखालीं मोंगल व रजपूत लोकांची एक निवडक टोळी होती. किल्ला स्वतस्सिद्ध फार मजबूत असल्यामुळें आंतील शिबंदी बिनघोर असे, व त्यामुळें त्यांची तयारीही बरोबर नव्हती. शिवाजी ह्या वेळीं रायगड येथें होता. त्यानें सिंहगड सर करण्याचें काम तान्हाजी मालुसरे यास सांगितलें. तान्हाजीनें आपणाबरोबर निवडक १००० मावळे लोक व आपला भाऊ सूर्याजी मालुसरे यांस घेतलें. पुढें त्यानें पांच पांचशें लोकांच्या दोन टोळ्या करून एक आपणाबरोबर घेतली, व दुसरी सूर्याजीच्या हाताखालीं दिली. ते दोघे रायगडाहून निघून निरनिराळ्या वाटांनीं सिंहगडाजवळ एकमेकांस येऊन मिळाले. नंतर तान्हाजीनें सूर्याजीस त्याच्या लोकांसह मागें ठेविलें, व प्रसंग पडल्यास तुम्हीं चाल करून या, असें त्याला सांगून तो आपल्या लोकांसह किल्ल्याच्या पश्चिमेशीं आला. काळोख पडल्यावर किल्ल्याच्या नैर्ऋत्य दिशेकडून एक मावळी शिपाई कड्यांतून वर चढून त्यानें तटावर घोरपड टाकिली व तो वर चढला. नंतर तटाला शिड्या बांधून प्रथमतः तान्हाजी वर चढला, व तटावर पडून राहिला. नंतर एकामागून एक असे १०० मावळे वर चढून तटावर पडून राहिले. परंतु इतक्यांत किल्ल्यांतील लोकांस ह्या मंडळीची चाहूल लागून त्यांच्यांत मोठी चळवळ दिसूं लागली. मोंगलांचा एक मनुष्य बाहेर काय

प्रकार आहे तो पाहण्याकरतां पुढें आला; परंतु एका मावळ्यानें त्याच्यावर अचूक बाण सोडून तेथेंच त्याला गार केलें. तें पाहून मोंगलांचें सर्व सैन्य तयार झालें. आतां त्यांच्यावर एकदम हल्ला केल्याशिवाय दुसरा परिणाम नाहीं असें समजून तान्हाजी एकदम मोंगलांवर चाल करून गेला. त्या ठिकाणीं फार भयंकर लढाई झाली. शिवाजीच्या कच्या मावळी लोकांनीं रजपूत शिपायांचीं हाडें खिळखिळीं करून टाकिलीं. अशा प्रकारें दोन्ही फौजा हातघाईवर आल्या असतां सूर्याजी बाकीचे सर्व लोक घेऊन वर चढला. मोंगलांचे लोक फार होते, तथापि त्या राकट मावळ्यांनीं त्यांना जेरीस आणलें. परंतु त्या ऐन हातघाईच्या प्रसंगीं त्यांचा शूर सरदार तान्हाजी गोळी लागून ठार झाला, त्यामुळें मावळी लोकांचा धीर खचून ते मागें हटूं लागले. सूर्याजीनें ती स्थिति पाहून अगोदर तटाच्या शिड्यांचे दोर कापून टाकले; नंतर पुढें होऊन तो त्या पळत असलेल्या मावळे लोकांस मोठ्या वीरश्रीनें बोलला कीं, "वीर हो! तुमचा शूर सरदार तान्हाजी ह्या ठिकाणीं मरून पडला असून त्याचा सूड उगवावयाची गोष्ट एकीकडे ठेवून तुम्हीं भागूबाईप्रमाणें पलायन करण्याच्या तयारीस लागावें ही गोष्ट फार लाजिरवाणी आहे; व तुम्ही पळून गेलां तथापि मी शिड्यांचे दोर कापून टाकले आहेत, तेव्हां येथून तुमची सुटका होण्याचा कांहींच मार्ग उरला नाहीं. या करितां तुम्हीं आपल्या तान्हाजीबद्दल मोंगलांचा सूड ध्या, आपल्या पूर्वजांचें नांव राखा, व शिवाजी महाराजांच्या नांवास कलंक लावूं नका." याप्रमाणें सूर्याजीचें वीरश्रीचें भाषण ऐकून

मावळे लोकांच्या अंगांत दुप्पट हिंमत आली. ज्याप्रमाणें एखादा चवताळलेला वाघ मेंढरांच्या कळपांत शिरावा, त्याप्रमाणें ते मावळे ' हर हर महादेव ' असा जयघोष करून रजपुतांवर चाल करून गेले, व आपणापुढें असलेल्या लोकांचा फडशा पाडीत चालले. त्या जिवावर उदार झालेल्या मावळ्यांपुढें रजपूत लोकांच्यानें टिकाव धरवेना, व ते सैरावैरा पळत सुटले. ह्या लढाईंत ३०० मावळे व ५०० रजपूत पडले. याशिवाय पुष्कळ रजपूत लोकांनीं तटावरून खालीं उड्या टाकून आपले प्राण वांचविण्याचा प्रयत्न केला; परंतु खालीं भयंकर कड्यांत त्यांचा चुराडा होऊन ते मरण पावले. अशा रीतीनें अलौकिक धाडसानें सूर्याजीनें किल्ला सर केला. त्यानें आपल्या जयाची बातमी शिवाजी रायगडास होता त्याला कळावी म्हणून किल्ल्यांत एक मोठें गवती छप्पर होतें त्याला आग लाविली. तो आगीचा डोंब रायगडास शिवाजी महाराजांच्या दृष्टीस पडतांच त्यांना अतिशय आनंद झाला. मोंगलांचा सरदार उदेभान हाही ह्या लढाईंत प्राणास मुकला. सिंहगडावर तान्हाजी व उदेभान यांचीं थडगीं एकमेकांपासून सुमारें १५० यार्डाच्या अंतरावर किल्ल्याच्या वायव्य कोंपऱ्यांत आहेत. उदेभानाचें थडगें हें पिराचें स्थान आहे असें मानतात. ग्रांट डफच्या बखरींत उदेभानास तान्हाजीनें ठार मारिलें असें लिहिलें आहे; परंतु सिंहगडच्या पोवाड्यांत तान्हाजी पडल्यावर त्याचा शेलार या आडनांवाचा एक मामा होता, त्यानें उदेभान यास ठार मारिलें असें लिहिलें आहे. तान्हाजीच्या मरणाचें वर्तमान शिवाजी महाराजांना कळलें, त्या वेळीं त्यांना अतिशय दुःख झालें, व आज माझा उजवा हात

गेला असें त्यांना वाटूं लागलें." 'गड' हातीं आला, परंतु 'सिंह' गेला," असें महाराजांनीं प्रत्यक्ष बोलून दाखविलें. एवढ्यावरून तान्हाजी किती शूर होता, याची सहज कल्पना करतां येईल. शिवाजी महाराजांनीं सूर्याजीची फार मोठी तारीफ केली, व त्याला मोठें इनाम देऊन सिंहगडचा किल्लेदार केले व त्याच्या हाताखालच्या प्रत्येक मावळ्याला एकेक रुप्याचें कडें बक्षीस दिलें.

इ० स० १६८९ त औरंगजेबानें जुन्नर व सिंहगड यांचे मध्यंतरीं आपलीं ठाणीं बसविलीं. इ० स० १७०० च्या फेब्रुवारी महिन्यांत शिवाजीमहाराजांचा कनिष्ठ पुत्र राजाराम हा प्रकृति बिघडल्यामुळें सिंहगडास येऊन राहिला व पुढें एक महिन्यानें तो तेथें मरण पावला. इ० स० १७०१–१७०३ या सालांचे दरम्यान् औरंगजेबानें ह्या किल्ल्याला वेढा दिला. साडेतीन महिन्यांनंतर किल्लेदारास मोठा लांच देऊन त्यानें तो किल्ला घेतला, व त्याचें नांव "बक्षिंदाबक्ष" किंवा "ईश्वराची देणगी" असें ठेविलें. पुढें इ० स० १७०६ त मोंगलांचें सैन्य पुणें प्रांतांतून विजापुराकडे गेलें तेव्हां शंकराजी नारायण सचिव यानें सिंहगड मोंगलांपासून परत घेतला. सिंहगड मराठ्यांनीं परत घेतला ही गोष्ट औरंगजेबास इतकी लागली कीं, त्यामुळें अगोदरच क्षीण झालेली त्याची प्रकृति ज्यास्तच बिघडली, व त्यायोगानें थोड्याच महिन्यांत त्याचा अंत झाला. मध्यंतरीं त्यानें झुलपिकारखानास किल्ला परत घेण्याकरितां पाठवून दिलें, व त्यानें किल्ल्याला वेढा देऊन दाणावैरणीची बंदी केल्यामुळें कांहीं दिवसांनीं मराठ्यांना तो किल्ला सोडून

देणें भाग पडलें. परंतु झुलपिकारखान तेथून माघारा फिरला नाहीं तोंच शंकराजी नारायणानें पुनः तो मोंगलांपासून घेतला ( ग्रांट डफ ). इ० स० १७५० त राजारामाची स्त्री प्रसिद्ध ताराबाई ही राजारामाच्या समाधीचें दर्शन घेण्याकरतां सिंहगडास आली, व तेथून तिनें सचिवाला आपल्या पक्षाकडे ओढण्याचा यत्न चालविला. ह्या वेळीं मराठी दरबारांत दुफळी होती. सातारच्या गादीवर रामराजा असून सर्व सत्ता बाळाजी बाजीरावाच्या हातांत होती. ताराबाईला ही गोष्ट बरी वाटत नसे. ती मोठी महत्त्वाकांक्षी असल्यामुळें सर्व अधिकार आपणाकडे असावा असें तिला वाटत असे, व त्यासंबंधानें तिनें आपल्यापक्षाकडे बरीच मंडळी ओढली होती ( ग्रांट डफ ). पुढें त्याच वर्षी बाळाजी बाजीराव पेशव्यानें सिंहगडच्या मोबदला तुंग व तिकोना हे किल्ले सचिवास दिले, व सिंहगड आपणाकडे घेतला. इ० स० १८०२ च्या आक्टोबर महिन्याच्या २५ व्या तारखेस यशवंतराव होळकर यानें पुण्याच्या लढाईत दुसरे बाजीराव पेशवे यांचा पराभव केला, तेव्हां पेशवे सरकार सिंहगडास पळून गेले. नंतर तीन दिवसांनीं बाजीरावानें पुण्याचा रेसिडेंट कर्नल क्लोज याच्या मार्फतीनें इंग्लिशांशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं, इंग्लिशांनीं पेशव्याच्या रक्षणार्थ आपलीं ६ पलटणें पुण्यास ठेवावीं, व त्यांच्या खर्चाबद्दल पेशव्यानें त्यांना सालीना २५ लाख रुपये द्यावे. इ० स० १८१७ त बाजीराव इंग्लिशांशीं लढाईची तयारी करूं लागला; तेव्हां पुण्याचा रेसिडेंट एल्फिन्स्टन साहेब यानें बाजीरावास असें सांगून पाठविलें कीं, ' गंगाधर

शास्त्रयाचा खून करणारा नीच त्रिंबकजी डेंगळा याला तुम्हीं तावडतोब आमचे स्वाधीन करावें, नाहीं तर त्याला आपले राज्यांतून घालवून तरी द्यावें; व ह्या दोन्ही गोष्टींतून एकही तुम्हांस मानवत नसेल तर लढाईला उभें रहावें.' कांहीं दिवसपर्यंत बाजीरावानें कांहींच उत्तर पाठविलें नाहीं, तेव्हां एल्फिन्स्टन साहेबानें बाजीरावाला पुनः सांगून पाठविलें कीं, 'तुम्हीं एक महिन्याचे आंत त्रिंबकजीस आमचे स्वाधीन केलें पाहिजे, व तो आमचे स्वाधीन होई तोंपर्यंत सिंहगड, पुरंदर व रायगड हे किल्ले आमचे हवालीं केले पाहिजेत.' परंतु याचाही जबाब बाजीरावानें पाठविला नाहीं. पुढें इ० स० १८१७ च्या मे महिन्याच्या ९ व्या तारखेस जेव्हां इंग्लिशांचे घोडेस्वार पुण्याच्या सभोंवार घिरट्या घालूं लागले, तेव्हां बाजीराव भिऊन गेला, व त्यानें वरील किल्ले इंग्लिशांचे हवालीं केले. पुढें तारीख १३ जून सन १८१७ रोजीं इंग्लिश व पेशवे यांच्यांत तह होऊन ते किल्ले पेशव्यास परत मिळाले. सन १८१७ च्या नोवेंबर महिन्याच्या ५ व्या तारखेस पेशव्याचा खडकी येथें पराभव झाल्यानंतर मराठे लोकांनीं आपल्या कांहीं तोफा सिंहगडाजवळ नेऊन ठेविल्या. परंतु तारीख १८ जानेवारी रोजीं इंग्रज लोकांनीं तेथें जाऊन त्यांपैकीं १५ तोफा मराठ्यांपासून हिसकावून आणिल्या. तारीख २ मार्च सन १८१८ पर्यंत सिंहगड मराठ्यांचे हातांत होता. पुढें जनरल प्रिझलर व मराठे यांची मोठी लढाई होऊन किल्ला इंग्लिशांचे हातीं आला. किल्ला इंग्लिशाचे हातीं आला त्या वेळीं, तोफा, बंदुका, दारूगोळा वगैरे पुष्कळ युद्धोपयोगी सामान इंग्लिशांस

मिळालें. याशिवाय हिरे, मोतीं, सोनें वगैरे अपार खजिना इंग्लिशांचे हातीं आला. कांहीं दिवसपर्यंत इंग्लिशांचे गोरे शिपाई लोक आपल्या टोप्यांतून हिरे, मोतीं, सोनें वगैरे भरून त्या जिनसांची खरी योग्यता न जाणतां त्या जिनसा वाटेल त्या किमतीला विकीत असत. ( हिंदुस्थानांतील १५ वर्षें, पान ४९० Fifteen years in India, page 490 ). त्याच वेळीं सिंहगडच्या किल्ल्यांत एका खांबामध्यें लपविलेली गणपतीची सोन्याची मूर्ति इंग्लिशांस सांपडली. ह्या मूर्तीची किंमत ५ लाख रुपये होती, व तिच्याकरतां बाजीरावानें इंग्लिशांस १५०००० रुपये भरले.

ह्या किल्ल्यांत एक हजार मनुष्य राहण्यासारखी जागा असून आंत पाण्याचीं लहान मोठीं दहा बारा टांकीं आहेत. त्यांचें पाणी नेहमीं थंडगार असून फार गोड आहे. किल्ल्यांत राजारामाची छत्री असून आंत एक सांबाचें लिंग आहे, व त्याची पूजा करण्याकरितां एक ब्राह्मण ठेविलेला आहे. किल्ल्यांत एक धर्मशाळा असून तेथें पाहिजे त्यास रहावयास जागा मिळते. भाजीपाला वगैरे जिनसांचा पुरवठा डोणजें व पेंठ शिवापूर येथून होतो. हा किल्ला अद्यापि फार चांगल्या स्थितींत आहे.

---

१ पांडुरंग हरी पान ४५ मध्यें ज्या मूर्तीचा उल्लेख केलेला आहे ती बहुधा हीच मूर्ति असावी—कर्नांचेल.

# पुरंदर तालुका.

—:o*o:—

**१२. मल्हारगड किंवा सोनोरी.**—हा किल्ला सोनोरी नांवाच्या गांवांत सासवडच्या उत्तरेस ६ मैलांवर व दिवे घांटाच्या पश्चिमेस ३ मैलांवर एका डोंगराच्या फांट्यावर बांधलेला आहे. किल्ल्याला दुहेरी तट आहे. त्याचा घेर सुमारें ७०० यार्ड आहे. हा किल्ला दिवे घांटाच्या शेजारीं असल्यामुळें पूर्वी त्या घाटानें जाणारी मंडळी ह्या किल्ल्याला फार भीत असे; कारण येथें दगा होण्याचा विशेष संभव असे. किल्ल्याची बाहेरची भिंत १३ फूट उंच व ६ फूट रुंद आहे. दक्षिणेच्या बाजूचा तट अगदीं जमिनदोस्त झालेला आहे, व इतर ठिकाणीं त्याची बरीच पडापड झालेली आहे. आंतील भिंत ९ फूट रुंद व ९ फूट उंच आहे. हिचीही बाहेरच्या भिंतीप्रमाणेंच पडापड झालेली आहे. पूर्वी किल्ल्याच्या मुख्य दरवाज्या-शिवाय किल्ल्यांत जाण्यास आणखीही चोरवाटा होत्या. किल्ल्यांत खंडोबाचें एक व महादेवाचें एक अशीं दोन देवालयें आहेत; या शिवाय एक टांकें व ३ विहिरी आहेत. हा किल्ला सन १७७९ त भिवराव यशवंतराव पानसे व कृष्णाजी माधवराव पानसे यांनीं बांधला, व त्याचें नांव मल्हारगड असें ठेविलें. हें नांव ठेवण्याचें कारण असें सांगतात कीं, किल्ल्याचा पाया खणीत असतां एके ठिकाणीं जमिनींतून रक्त वाहूं लागलें. हा खंडोबा किंवा मल्हारी याचा आपणावर कोप आहे असें वाटून सदर पानसे यांनीं किल्ला पुरा झाल्यावर तुझ्या नांवानें आम्ही

किल्ल्यावर एक देवालय बांधूं, असा खंडोबास नवस केला. त्याबरोबर रक्त बंद झालें. पुढें किल्ला पुरा झाल्यावर त्यांनीं तेथें देवालय बांधून आंत मल्हारीची स्थापना केली, व त्या किल्ल्याला मल्हारगड असें नांव दिलें. ह्या किल्ल्याच्या संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

१३. **पुरंदरचा किल्ला.**—हा किल्ला सासवडचे वायव्येस ६ मैलांवर एका डोंगरावर बांधलेला आहे; व तो समुद्राचे पृष्ठभागापासून ४४७२ फूट उंच आहे. हा किल्ला पुण्याचे कांहींसा दक्षिणेस व कांहींसा आग्नेयीस २० मैलांवर आहे. किल्ल्याकडे जाण्याची सडक सासवडाहून रहदारीबंगल्यावरून जाते. हा किल्ला ज्या टेंकडीवर बांधलेला आहे, तिला दोन शिखरें आहेत. ह्यांपैकीं जें ज्यास्त उंच आहे त्यावर महादेवाचें देवालय आहे. हें देवालय वरच्या किल्ल्यांत आहे. उत्तरेच्या बाजूस देवालयाचे खालीं ३०० फूट, व पायथ्याशीं जो सपाट प्रदेश आहे त्याच्या वर १००० फूट उंच असा कांहीं उंचवट्याच्या मैदानाचा प्रदेश आहे. तेथें हल्लीं इंग्लिश सरकारचे फौजेची छावणी आहे. ह्या मैदानाच्या पूर्वेच्या बाजूस शिपाई लोकांच्या राहण्याच्या बराकी किंवा चाळी आहेत, व पश्चिमेस दवाखाना आहे. उत्तरेच्या बाजूस भक्कम तट असून त्याला मध्यंतरीं अर्धवर्तुलाकृति पुष्कळ बुरूज आहेत, व एक दरवाजा आहे. ह्या प्रदेशाला किल्ल्याची माची म्हणतात. पायथ्याशीं विश्रांतिगृह आहे, तेथून किल्ल्यावर जाण्याचा रस्ता फारच उत्तम रीतीनें बांधलेला आहे. साधारण मध्यावर गेलें म्हणजे रस्ता दुभंगतो. उजव्या हातचा रस्ता दवाखान्याकडे जातो, व डाव्या हातचा रस्ता बराकींकडे जातो

येथून वळणावळणांनीं ८३० यार्ड वर चढून गेलें म्हणजे पुढें ओबडधोबड पायऱ्या लागतात, व त्या पायऱ्या चढून गेलें म्हणजे दिल्लीदरवाज्यापाशीं मनुष्य येऊन पोहोंचतें. ह्या दरवाज्याचे दोन्ही बाजूंस दोन मोठे भव्य बुरूज बांधलेले आहेत.

दिल्लीदरवाज्यानें आंत गेलें म्हणजे उजव्या हाताकडे दोन तटबंदी भिंतींच्या मधून कंदकडा नांवाच्या बुरुजाकडे रस्ता जातो. परंतु तिकडे जाण्याला ३०० फूट उतरण लागते. हा बुरूज किल्ल्याचें अगदीं पूर्वेकडचें टोंक होय. येथून वज्रगड, बॉटल हिल, भीमेचें खोरें ( भीमा ज्या प्रदेशांतून वाहत जाते तो प्रदेश ), महादेवाचा डोंगर, यांचा देखावा फारच रमणीय दिसतो. येथें कर्नल लेसन नांवाच्या साहेबानें बांधलेला एक बंगला आहे. हा बंगला हल्लीं किल्ल्यांत जे बंगले आहेत, त्या सर्वांत जुना आहे. ह्या ठिकाणीं एक पाण्याचा हौद आहे, व तटाला एक लहानसा दरवाजा आहे. त्याला चोरदिंडीदरवाजा म्हणतात. नंतर पुनः आल्या वाटेनें परत दिल्लीदरवाज्यापाशीं यावें लागतें. नंतर उजव्या बाजूस कांहीं पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे गणेश दरवाजा लागतो. जातांना उजव्या बाजूस एक कोठडी लागते. शिवाजीचा पिता शहाजी भोंसला याला इ० स० १६४८ त विजापुरचा बादशाहा महमद अदिलशाहा ( इ० स० १६२६–१६५६ ) यानें शिवाजीची दक्षिणेंतील बंडाळी मोडण्याकरितां ज्या कोठडींत कोंडून ठेविलें होतें, ती ही कोठडी होय असें सांगतात. दरवाज्याजवळ डाव्या बाजूस गणपतीची छिन्नभिन्न झालेली मूर्ति पडलेली आहे. येथून पुढें गेलें म्हणजे बावटा बुरूज



लागतो, व त्यालाच लागून तिसरा दरवाजा बांधलेला आहे. तेथून जरा पुढें गेलें म्हणजे एक दगडी इमारत लागते. ही पूर्वीं धान्याची कोठी होती. हल्लीं तींत उन्हाळ्याचे दिवसांत चाप्लेन जाऊन राहतो. त्याच्याचजवळ पुरंदरे घराण्याचा मूळ पुरुष अंबाजीपंत पुरंदरे याचा वाडा होता. हल्लीं तेथें चौथऱ्यासारखी एक उंच जागा मात्र आहे. त्याच्याच जरा पुढच्या अंगास ईगल्स नेस्ट (गरुडकोटर) नांवाचा बंगला आहे, व त्याच्याजवळच एक मशीद आहे. नंतर पश्चिम दिशेस रस्ता वळतो व तिकडून पुढें गेलें म्हणजे दोन लहानशीं थडग्याच्या आकाराचीं आच्छादित अशीं टांकीं लागतात. त्यांतून पूर्वीं तेल व तूप ठेवीत असत; उजव्या बाजूस एका टेंकाडाखालीं दारूगोळ्याची पूर्वींची जागा आहे. ह्या टेंकाडाला इंग्लिश लोक 'लव्ज सीट' (प्रेमविहार) असें म्हणतात. ह्या जागेवर पूर्वीं राजवाडा होता, व तो शाहूमहाराजांनीं (इ० स० १७०८-१७४९) स्वतःकरितां बांधला होता. येथून पुढें गेलें म्हणजे एक सुंदर टांकें लागतें; ह्याला म्हसोबाचें टांकें म्हणतात. टांक्याला जिवंत झरे असून ऊन्हाळ्यांत किल्ल्यांतील लोकांस ह्या पाण्याचाच पुरवठा होतो. त्याच्या पलीकडे खडकांत खोदलेल्या दोन खोल्या आहेत. ह्यांतून पूर्वीं कैदी लोक ठेवीत असत. येथून पुढें थोडासा चढाव लागतो, व पुढें उत्कृष्ट फरसबंदी पायऱ्या लागतात. त्या पायऱ्या चढून गेलें म्हणजे शिखरावर महादेवाचें सुंदर देवालय लागतें. हें पुरंदऱ्यांचा मूळपुरुष अंबाजीपंत पुरंदरे यानें बांधलें. नंतर पुनः आल्या रस्त्यानें खालीं उतरावें लागतें; व उतरण संपली म्हणजे पूर्वींच्या महार लोकांच्या पडापड झालेल्या घरांवरून खऱ्या

दरवाज्याकडे रस्ता जातो. हा दरवाजा पेशव्यांनीं महादेवाच्या पुजाऱ्याकरितां मुद्दाम बांधला होता. त्याच्याजवळच एका टोंकावर फत्तेबुरूज नांवाचा एक भव्य बुरुज बांधलेला आहे. इ० स० १७९० च्या सुमारास कुरोजी नाईक नांवाच्या कोळ्यानें आपल्या लोकांसह किल्ल्यावर हल्ला केला, तेव्हां आंतील शिबंदी भिऊन गेली व त्या लोकांनीं ह्या बुरुजावरून खालीं उड्या टाकून पलायन केलें असें सांगतात. पुढचा रस्ता जरा अरुंद आहे. ह्या रस्त्यानें पुढें निघालें म्हणजे किल्ल्याच्या अगदीं वायव्य कोंपऱ्यास कोंकणी बुरुजाजवळ मनुष्य येतें. येथें खालीं ३०० फूट खोल तुटलेला कडा आहे. बुरुजाला लागूनच २० माणसें राहतील अशी एक खोली आहे, व येथून पूर्वी कडेलोट करीत असत असें सांगतात. ह्याच्या पलीकडे ईशान्य बाजूस हत्तीच्या डोक्याच्या आकाराचा तिहेरी एक बुरूज आहे. ह्याला हत्तीबुरूज म्हणतात. ह्या बुरुजावरून पुढें गेलें म्हणजे दोन टांकीं लागतात, व त्यांच्यापुढें शेंडीबुरूज लागतो. ह्या बुरुजाखालीं नवरानवरीचें एक जिवंत जोडपें पुरलेलें आहे असें सांगतात. इनाम कमेटींत ह्या संबंधानें ताम्रपट सांपडले, त्यांत असें लिहिलें आहे कीं, हा शेंडीबुरूज वारंवार कोसळून पडत असे. पुढें बेदरच्या बादशाहाला असें स्वप्न पडलें कीं, कोणाचा तरी वडील मुलगा व त्याची बायको यांना त्या ठिकाणीं बळी दिल्याशिवाय बुरूज कायम राहणार नाहीं. बादशाहा जागा झाल्यावर त्यानें येसाजी नाईक नांवाच्या आपल्या एका इनामदाराला बोलावून आणलें, व त्याला तो सर्व मजकूर सांगितला. तेव्हां त्यानें आपला वडील मुलगा नाथ नाईक व त्याची बायको

देवकी यांस आणून बादशाहाच्या स्वाधीन केलें; नंतर अश्विन वद्य ८ मीस[1] त्या ठिकाणीं त्यांना जिवंत पुरलें. त्यांना पुरण्याकरतां बुरुजाच्या डाव्या व उजव्या बाजूस ३० फूट चौरस व १२ फूट खोल असे दोन खळगे तयार केले होते, व त्या प्रत्येकांत २४ तोळ्यांची एक वीट अशा २९,००० विटा घालून यांना पुरलें. नंतर बुरुजाचें काम सुरू केलें, व तें निर्विघ्नपणें शेवटास गेलें. काम पुरें झाल्यावर बादशाहा स्वतः तो बुरूज पहाण्याकरतां आला, व अतिशय खुश होऊन त्यानें तो किल्ला येसाजी नाइकास दिला शिवाय त्याला ९१० होन किंवा जवळजवळ ४,०००[?] रुपये उत्पन्नाचे दोन गांव इनाम दिले[2]. शेंडी बुरुजावरून रस्ता पुढें साखरी तलावाकडे जातो. तलावाचें पाणी पिण्यासारखें आहे. पलीकडच्या अंगास एक दगडी भिंत बांधलेली आहे; व पुढें कांहीं यार्ड गेलें ह्मणजे एक दगडी कोठार लागतें. ह्यांत पूर्वी धान्य ठेवीत असत, व तें चौथे पेशवे थोरले माधवराव साहेब (इ० स० १७६१–१७७२) यांनीं बांधलें असें सांगतात. नंतर कांहीं पावलें चालून गेलें ह्मणजे पूर्वी आपण जेथून निघालों तेथें पुनः येऊन

१ शक उपलब्ध नाहीं.

२ ह्या संबंधाच्या दोन सनदा कॅपटन मॅकिंटॉश नांवाच्या साहेबानें प्रसिद्ध केल्या आहेत. ह्या उत्तरभाग कमिशनर कॅपटन् डॉडस् नांवाच्या साहेबांस त्यांच्या दप्तरांत सांपडल्या. त्यांपैकीं एक अस्सल व एक तिची नक्कल आहे; व हल्लीं त्या मद्रास येथील पदार्थसंग्रहालयामध्यें आहेत. एकीवर आरबी सन ५८७ म्हणजे इ० स० ११९१ दिला आहे. परंतु तो सन चुकीचा आहे. कारण सन ११९१ त बेदूर येथें बादशाही अंमल नव्हता.—क्यांबेल.

पोहोंचतों. हें एकंदर २॥ मैलांचें चक्र आहे, व वाटेनें ३ दरवाजे व ९ प्रसिद्ध बुरूज लागतात.

येथून पुनः ज्या टेंकाडावर देवालय बांधलें आहे, तेथें जाण्यास रस्ता आहे. हें टेंकाड किल्ल्यांतील सर्व टेंकाडांहून ऊंच आहे. त्यावर गेलें म्हणजे आसमंतात् भागाचा देखावा फार मनोहर दिसतो. सह्याद्रीचीं गगनचुंबित शिखरें, मोठमोठे तुटलेले कडे, निर्वृक्ष खडक, निबिड व एक सारखें लागत गेलेलें अरण्य, किर्र झाडीनें आच्छादलेलीं डोंगरांचीं खोरीं, मोठमोठीं व कितीएक कोसपर्यंत पसरलेलीं सपाट मैदानें, व त्यांच्यामधून नागमोडी तऱ्हेनें वेळणावळणांनीं वहाणारे नद्यानाले यांचे प्रवाह, या सर्वांचा देखावा एकसमयावच्छेदेंकरून प्रेक्षकांचे दृष्टीस पडतो, व त्या वेळीं सर्व शक्तिमान प्रभूचें अनंतत्व व त्याची अगाध शक्ति यांचा मनावर पूर्ण ठसा उमटून पहाणारा कांहीं वेळपर्यंत तटस्थ होऊन जातो.

नंतर खालीं उतरून महादरवाज्यांतून किल्ल्याचे माचीवर येतांना बावटा बुरुजाचे खालीं खडकांत खोदलेली एक मोठी खोली लागते. हिला आंतून तीन दगडी खांब दिलेले आहेत. ह्या रस्त्यानें वळणावळणांनीं २९०० फूट खालीं उतरलें म्हणजे मनुष्य क्यांटोनमेंट किंवा जेथें इंग्लिश लोकांनीं छावणीची जागा केली आहे, तेथें येऊन पोहोंचतें. येथून पुढें गेलें म्हणजे बहिरव खिड नावांचें एक डोंगराचें टोंक लागतें. येथें पूर्वीं एक दरवाजा होता. त्याला बहिरव दरवाजा असें म्हणत असत. हल्लीं त्याची पडापड होऊन गेली आहे. येथून पुरंदर किल्ल्याच्या बाहेरच्या प्रदक्षिणेस आरंभ होतो. ही प्रदक्षिणा ४ मैलांची आहे. हा रस्ता इ० स०

१८९६ त इंग्लिश सरकारानें बांधला. ह्या रस्त्यानें निघालें म्हणजे पुष्कळ वळणें लागतात. ठिकाठिकाणीं बसावयास जागा केलेल्या आहेत. उजव्या बाजूस वर पाहिलें म्हणजे वरच्या किल्ल्याचे भव्य बुरूज व भक्कम तट पाहून मनांत आश्चर्य व भीति हीं एकदम उभीं राहतात. डाव्या बाजूस खोल दऱ्या, वृक्षाच्छादित मैदानें व निरानदीचा वळणावळणांनीं वहात जाणारा प्रवाह पहात पहात पुढें गेलें ह्मणजे एक टेंकडी लागते. हिला फिटस् क्लारेन्स पॉइंट ह्मणतात. कारण फिटस् क्लारेन्स साहेब हे हिंदुस्थानचे कमांडर-इन्-चीफ (सेनापति) होते, तेव्हां ते आपल्या शिपाई लोकांस ह्या ठिकाणीं कवाईत शिकवीत असत. टेंकडीच्या माथ्यावर बराच सपाट प्रदेश आहे. ह्या ठिकाणीं एक अर्धें बांधलेलें तळें आहे. तें थोरले माधवराव पेशवे यांनीं बांधण्याला प्रारंभ केला होता असें सांगतात. ह्या टेंकडीवर वरील किल्ल्याचें जें टोंक आलें आहे, त्यावर फत्तेबुरूज बांधलेला आहे. नंतर पुढें गेलें ह्मणजे दुसरें एक उंचवट्याचें मैदान लागतें. येथून वर पाहिलें ह्मणजे आपण कोंकणी बुरुजाखालीं आलों असें पहाणारास दिसून येईल. नंतर एक दोन मोठीं वळणें घेऊन कोंकणी दरवाज्यांशीं मनुष्य येतें. हा दरवाजा हल्लीं कोसळून पडलेला आहे, व येथून ज्या टेंकडीवर दवाखाना बांधलेला आहे तेथें मनुष्य येतें. हें टेंकाड व वरचा किल्ला ह्यांच्या दरम्यान् एक भिंत बांधलेली आहे. ह्या भिंतीच्या वरच्या बाजूस पाहिलें ह्मणजे शेंडी बुरूज दृष्टीस पडतो. खालच्या बाजूस खडकांत खोदलेलीं तीन भुयारें आहेत. ह्यांपैकीं एक फारच मोठें आहे व त्याची खोली १६० फूट आहे; व ह्याला एकांत एक अशा तीन

खोल्या आहेत. दवाखाना ज्या टेंकाडावर बांधलेला आहे, त्याला लग्नमुख म्हणतात. दवाखाना व किल्लयाचे पायथ्याशीं असलेलें विश्रांतिगृह यांच्यामधील रस्ता सुमारें सवा मैल लांबीचा आहे. दवाखान्यावरून छावणीकडे रस्ता जातो. ही छावणीची जागा वरच्या किल्लयाच्या खालीं ३०० फूट आहे. वाटेनें उजव्या बाजूस मुकारशी नांवाचा एक तलाव लागतो. हा तलाव थोरले माधवराव पेशवे यांनीं बांधला; व त्याच्या वरच्या बाजूस एक बंगला बांधलेला आहे. ह्याच्या पुढें एक दोन बुरूज लागतात, व त्यांवर निरुपयोगी अशा बऱ्याच तोफा आहेत. ह्या तोफा शिवाजीनें पोर्तुगीज लोकांपासून घेतल्या असें सांगतात. येथून पुढें गेलें ह्मणजे एक लहानसें देऊळ लागतें. हें इ० स० १७९५ च्या सुमारास एका लोहारानें बांधलें असें सांगतात. येथें दोन रस्ते फुटतात. वरच्या रस्त्यानें निघालें ह्मणजे डाव्या हातास कांहीं पडक्या इमारती लागतात, व ह्यांच्या खालच्या बाजूस बिनी दरवाजा आहे. खालच्या किल्लयाच्या दरवाज्यांपैकीं एवढाच दरवाजा कायतो अद्यापि कायम आहे. ह्याच्याजवळ हल्लीं एक बंगला आहे. वर सांगितलेल्या रस्त्यानें आणखी पुढें गेलें म्हणजे एक दगडी देवालय व एक विहीर लागते. हें देवालय नाना फडनविसानें सवाई माधवराव साहेब पेशवे यांचा या किल्लयांत जन्म झाला, त्या वेळीं एकंदर लोकांनीं आपला आनंद प्रदर्शित करण्याकरितां ज्या ठिकाणीं दुधाच्या वगैरे कावडी आणून ओतल्या, त्या ठिकाणीं बांधलेलें आहे. देवालयाच्या पुढच्या अंगास हल्लीं एक बंगला बांधलेला आहे. हा बंगला नाना फडनविसाचा वाडा पूर्वी ज्या ठिकाणीं बांधलेला होता, त्याच ठिकाणीं व पुष्कळ

अशीं त्याच वाड्यांतेतों दम धरून राहवें. " त्यामुळें त्या
ह्याच्या पुढें दुसरा एक बदिवस तसेच नेटानें काढले. मोंग-
असून त्याला वाटोळा कोट लढाई द्यावी इतकें सामर्थ्य
ज्या ठिकाणीं पूर्वी थोरले माधवराझालें नव्हतें; तथापि मुरार
वाडा होता, त्या ठिकाणीं बांधलेलावानावर एकदा मोठ्या
खालच्या बाजूस अंबाजीपंत पुरंदरे यांनीं . गोळी लागून
देवालयें आहेत. येथून पुढें निघालें ह्मणजे. पुढें शिवा-
जागा लागते, व नंतर छावणींत मनुष्य येऊन प्रहास आपण

पुरंदरच्या संबंधानें इतिहासांत जो मजकूर ाशीं सलो-
आहे, तो बाहामणी राज्याच्या प्रारंभापासून आहे. हे किल्ले
बाहामणी राजा अल्लाउद्दीन हुसेन गंगू (इ० स० १३४लांचे
१३५८) यानें बहुतेक महाराष्ट्र देश काबीज केला, त्या वेळींा
पुरंदरचा किल्लाही त्यानें आपल्या अमलाखालीं आणिला;
व इ० स० १३५० त त्यानें त्या किल्ल्याच्या तटबंदीची नीट
दुरुस्ती केली. पुढें इ० स० १३८० त पांचवा बाहामणी राज
पहिला महमूद (इ० स० १३७८–१३९७) यानें पुनः
किल्ल्याची नीट दुरुस्ती केली, व त्याला अर्धवर्तुलाकृति
पुष्कळ बरूज बांधले. पुढें निजामशाही घराण्याचा मूळपुरुष
मालिक अहमद ह्यानें इ० स० १४८६ त तो किल्ला घेतला,
व पुढें एक शतकापेक्षां ज्यास्त वर्षें तो निजामशाही घरा-
ण्याच्या ताब्यांत होता. पुढें अहमदनगरचा राजा बाहादुर
निजामशाहा (इ० स० १५९६–१५९९) यानें शिवाजीचा
आजा मालोजी भोंसले ह्याला पुणें व सुपें हे प्रांत जहागीरी-
दाखल दिले, त्या वेळीं पुरंदरचा किल्लाही त्याला दिला.
इ० स० १६२७ पर्यंत तो मालोजीचा पुत्र शहाजी याच्या
ताब्यांत होता; व त्या वर्षी तो किल्ला शहाजीपासून मोंग-

कडून निरोप येईपावेतों दम धरून राहवें." त्यामुळें त्या लोकांनीं आणखी कांहीं दिवस तसेच नेटानें काढले. मोंगलांच्या सामन्यास उभें राहून लढाई द्यावी इतकें सामर्थ्य त्या वेळपर्यंत मराठ्यांचे अंगांत आलें नव्हतें; तथापि मुरार बाजीनें आपल्या लोकांसह दिलावरखानावर एकदा मोठ्या जोरानें हल्ला केला. परंतु त्यांत तो गोळी लागून पडल्यामुळें त्याचे लोक किल्ल्यांत पळून गेले. पुढें शिवाजीनें असा विचार केला कीं, ह्या वेळीं बादशाहास आपण शरण जाणेंच योग्य आहे. तेव्हां त्यानें जयसिंगाशीं सलोख्याचें बोलणें सुरू करून पुरंदर व सिंहगड हे किल्ले मोंगलांस दिले. हे किल्ले इ० स १६७० पर्यंत मोंगलांचे ताब्यांत होते; व त्या वर्षीं तान्हाजी मालुसरे याचा भाऊ सूर्याजी यानें ते दोन्ही किल्ले मोंगलांपासून परत जिंकून घेतले. इ० स० १७०५ त तो औरंगजेबानें परत जिंकून घेतला. नंतर इ० स० १७०७ त औरंगजेब मरण पावल्यावर ताराबाईचा सरदार शंकराजी नारायण सचिव यानें तो इ० स० १७०८ त पुनः मोंगलांपासून घेतला. पुढें त्याच वर्षीं शाहूमहाराज मोंगलांचे कैदेंतून सुटून दक्षिणेंत आले, व सातारा येथें गादीवर बसले. त्यांनीं सचिवास किल्ला खालीं करून देण्यास सांगितलें. परंतु तो ताराबाईच्या पक्षाचा असल्यामुळें त्यानें किल्ला खालीं करून दिला नाहीं. पुढें सचिव अकस्मात् मरण पावल्यामुळें शाहूमहाराजांनीं त्याचा लहान मुलगा नारो शंकर याच्या नांवानें सचिवपदाचीं वस्त्रें पाठवून दिलीं, व त्याला आपल्या पक्षाकडे ओढलें. इ० स० १७१० त धनाजी जाधवाचा पुत्र चंद्रसेन जाधव

याचा शाहूमहाराजांशीं बेबनाव झाल्यामुळें तो निजामास जाऊन मिळाला, व त्यानें एके प्रसंगीं मराठ्यांचा पराभव करून त्यांना गोदावरीपासून भीमेपर्यंत मागें हटवीत नेलें. शाहूमहाराजांनीं त्याचा समाचार घेण्याकरतां बाळाजी विश्वनाथ व हैबतराव निंबाळकर या दोघांस लगेच रवाना केलें. ते पुरंदर येथें जाऊन उतरले. त्या ठिकाणीं उभय पक्षांची फार मोठी लढाई झाली. ह्या लढाईत मराठे आपला जय झाला म्हणून म्हणतात; परंतु लढाई चालली असतां त्यांना सालपें घांटापर्यंत मागें हटत जावें लागलें, अशी खरी गोष्ट आहे. इ० स० १७१४ त दमाजी थोरात नांवाच्या एका बंडखोर ब्राह्मणानें शंकराजी नारायणाचा मुलगा नारो शंकर सचिव यास पुण्याचे पूर्वेस ४० मैलांवर हिंगणगांवच्या गढींत कैद करून ठेविलें. पुढें त्याची बाळाजी विश्वनाथानें मोठ्या युक्तीनें तेथून सुटका केली. तेव्हां सचिवाची आई लक्ष्मीबाई हिनें कृतज्ञतापूर्वक शाहूमहाराजांची आज्ञा घेऊन बाळाजी विश्वनाथास पुरंदर प्रांताचे सर्व हक्क व अडचणीच्या प्रसंगीं त्याच्या मुलांमाणसांच्या संरक्षणाकरतां पुरंदरचा किल्ला हे बक्षीस दिले. इ० स० १७६२ पर्यंत तो किल्ला पेशव्यांचे ताब्यांत होता; व त्याच वर्षी राघोबादादानें तो परत सचिवास दिला. इ० स० १७७३ त नारायणराव पेशवे यांचा खून झाल्यानंतर त्यांची स्त्री गंगाबाई ही गरोदर होती म्हणून नाना फडनविसानें तिला पुरंदरच्या किल्लयांत तारीख ३० जानेवारी इ० स० १७७४ रोजीं आणून ठेविलें. पुढें तारिख १८ एप्रिल इ० स० १७७४ रोजीं गंगाबाई प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. त्याचें नांव

सवाई माधवराव असें ठेविलें. कांहीं दिवसांनीं पुरंदरची हवा फार थंड असें वाटून नाना फडनवीस व सखाराम बापू यांनीं गंगाबाईस मुलासह सासवडास आणून ठेविलें. त्या वेळीं मोरोबादादा फडनविस, बजाबा पुरंदरे, चिंतो विठ्ठल रायरीकर, बाबाजी नाईक वगैरे सरदार राघोबाचे पक्षाचे होते, व त्यांनीं आंतून ह्या सर्व मंडळीस कैद करण्याचें कारस्थान चालविलें. परंतु त्यांचीं आपसांत खेळत असलेलीं पत्रें हरीपंत फडके यांनीं बऱ्हाणपुराजवळ पकडलीं. त्यानें एकंदर मसलत नानास कळवितांच त्यानें सर्व मंडळी पुनः पुरंदरास पाठविली; व सर्व राज्याचा कारभार नाना तेथें राहूनच पाहूं लागले. राघोबा पळून इंग्लिशांचे आश्रयास गेला. पुढें सन १७७६ त पेशव्यांचे वतीनें नाना व बापू व इंग्लिशांचे वतीनें कर्नल अपटन साहेब यांच्यामध्यें पुरंदर मुकामीं तह ठरला. त्यांतील कलमें येणेंप्रमाणें होतीं:– साष्टी प्रांत–उत्पन्न रुपये ३ लाख, भडोच व दुसरा ३ लाख रुपये उत्पन्नाचा आणखी मुलूख पेशव्यांनीं इंग्लिशांस द्यावा, व लढाईच्या खर्चाबद्दल १२ लाख रुपये रोख द्यावे; इंग्लिशांनीं रघुनाथरावाचा पक्ष सोडून एक महिन्यांत परत निघून जावें, व रघुनाथरावानें कांहीं नेमणूक करून घेऊन आपल्या चाकरमाणसांसह गोदावरीच्या कांठीं कोपरगांव येथें रहावें. पुढें इ० स० १७७८ त नानांचा चुलतभाऊ मोरोबादादा यांचें प्रस्थ बरेंच माजल्यामुळें नाना भीतीनें पुरंदरास पळून गेले, व राघोबादादास पुण्यास आणण्याचें त्यांनीं कबूल केलें. परंतु त्यांत त्यांनीं अशी शर्त ठेविली कीं, ह्या कामांत मला किंवा माझ्या मालमिळ-

कतीला कोणत्याही रीतीनें धक्का पोहोंचतां कामा नये. पुढें तारीख ८ जून इ०स० १७७८ रोजीं हरीपंत फडके व महादजी शिंदे हे नाना फडनविसास पुरंदर मुक्कामीं येऊन मिळाले; व होळकरास ९ लाख रुपये भरून त्यालाही त्यांनीं आपल्या पक्षाकडे ओढलें. इ०स० १७९६ त दौलतराव शिंदे व त्याचा दिवाण बाळोबा तात्या हे पुण्यावर स्वारी करणार अशी वदंता उठल्यामुळें नानांस भीति उत्पन्न होऊन ते पुन: पुरंदरास निघून गेले. इ०स० १८१७ त दुसऱ्या बाजीरावानें त्रिंबकजी डेंगळ्यास इंग्लिशांचे स्वाधीन करण्याबद्दल त्यांची खातरी व्हावी म्हणून जे तीन किल्ले त्यांना दिले त्यांत पुरंदर हा एक होता. पुढें कांहीं दिवसांनीं इंग्लिशांनीं तो किल्ला पेशव्यांस परत दिला. नंतर लौकरच इंग्लिश व पेशवे यांच्यामध्यें लढाई सुरू झाली, त्या वेळीं कर्नल एल्ड्रिज यानें तो किल्ला घेतला. इ० स० १८४९ त राघोजी भांग्र्याचे बंडाचे वेळीं बंडखोर लोक कदाचित् किल्ला बळकावून बसतील असें इंग्लिशांस वाटल्यावरून त्यांनीं या ठिकाणीं आपली कांहीं फौज नेऊन ठेविली होती. हा किल्ला अद्यापि बऱ्याच चांगल्या स्थितींत आहे.

गोष्ट ह्मटली ह्मणजे त्याचे दगड चुन्याशिवाय बसविलेले
आहेत. हिराकोट येथून महादरवाज्यावर तोफेचा मारा
लागू पडूं नये म्हणून सर्जाकोट नांवाचा एक बुरूज
किल्ल्याच्या उत्तरेच्या अंगास बांधलेला आहे. किल्ल्यांत
पडापड झालेलीं देवालयें व इमारती पुष्कळ नजरेस पडतात.

[illegible]देंही पुष्कळ आहेत. ईशान्य दिशेस पहारेकरी शिपा-

कुलाबा

[illegible]चूी. जागा असून तेथें दोन जुन्या तोफा आहेत.
पर्यंत आहे. त्याचें क्षेत्रफ[illegible]वरपर्यंत जेव्हां समुद्र अतिशय
इ० स० १८९१ त [illegible]वादें गलबत चुकून किल्ल्याकडे
कुलाबा जिल्ह्याची लो[illegible] येथें मोठा भयंकर खडक आहे
त्याचा वसूल सुमारें १२ [illegible]सूचना देण्याकरितां सोडतात.

ह्या जिल्ह्याचे उत्तरेस व[illegible] असून सागवानी लांकडाचा
सह्याद्रीची ओळ व तिला मोठे चोंचीचे खिळे मारलेले
संस्थान व सातारा जिल्हा; [illegible]लें म्हणजे दुसरा एक दर-
दिशांस रत्नागिरी जिल्हा; [illegible] एक मोठें तळघर आहे.
हबसाण; व वायव्येस सुमारें १८ मै[illegible]ठाल्या कोठ्या बांध-
[illegible] एकींत तांदूळ ठेवीत

ह्या जिल्ह्याचे अलीबाग, पेण, [illegible]ळ, साखर, गहूं वगैरे
माणगांव व महाड असे ७ तालुके [illegible]त्याच्या उजव्या बाजूस
अलीबाग तालुक्यांत ९, पेण तालुक्या[illegible]क लहानशी मूर्ति
क्यांत ७, कर्जत तालुक्यांत ४, रोहें तालु[illegible]त्या जागेवरच
गांव तालुक्यांत ३, व महाड तालुक्यांत [illegible]
डोंगरी व जंजिरे ( पाण्यांतील ) मिळून ३१ किल्ले आहेत.
त्यांचे तालुकेनिहाय वर्णन खालीं दिल्याप्रमाणें आहे.

देवीच्या पुजाऱ्याचें घर आहे. ह्या देवालयांत भवानीची, वेताळाची व गणपतीची अशा ३ मूर्ति आहेत. ह्या देवस्थानाला सालीना ६२ रुपयांची सरकारांतून नेमणूक मिळते. ह्याच्या पुढें पडापड झालेलीं बरींच घरें लागतात, व त्या घरांतून पूर्वी बकरे, मेंढे, हरणें वगैरे पशु व नाना तऱ्हेचे पक्षी ठेवीत असत. ह्या जागेच्या दक्षिणेच्या बाजूस दोन इमारती पूर्वी बांधलेल्या होत्या; परंतु हल्लीं त्या पडून गेल्या आहेत. ह्यांच्या दक्षिणेस आंग्र्यांनीं बांधलेले दोन वाडे होते; परंतु हल्लीं त्यांचा मागमूसही नाहीं. ह्यांपैकीं थोरल्या वाड्यास नानी साहेबांचा वाडा असें म्हणत असत. नानी साहेबांचें खरें नांव लक्ष्मीबाई असें होतें. ह्याच्या पुढें आंग्रेसरकारचा तिसरा खासगी वाडा लागतो. ह्यावर हल्लीं छप्पर वगैरे कांहीं नसून त्याच्या कांहीं भिंती जमीनदोस्त होऊन गेल्या आहेत, कांहीं पडत आहेत, व कांहीं पडण्याच्या बेतांत आहेत. वाड्याचा भव्य आकार व त्याची ती हल्लींची स्थिति पाहून कांहीं वेळपर्यंत मनाला दुःख झाल्याशिवाय राहतच नाहीं, व जणूं काय तो आपल्या गतवैभवावर शोक करीतच बसला आहे कीं काय, असा भास होतो. ह्या वाड्याच्या लाकडी सामानाचा इ० स० १८४२ त इंग्लिशांनीं लिलांव केला, व त्याचे दगड खणून इ० स० १८७९ त अलीबागेस पाणी आणण्याकरतां जो कालवा बांधला, त्याला नेऊन लावले. ह्या वाड्याला थोरला वाडा असें म्हणतात. हा वाडा पांचमजली होता, व तो इ० स० १८१६ त धाकट्या

१ हा पुजारी आग्री म्हणून एक जात आहे, त्या जातीचा आहे.

२ ही प्रसिद्ध कान्होजी आंग्रे यांची पत्नी होय.

राघोजी आंग्र्यानें बांधला. वाड्याच्या पूर्वेस धान्याचीं कोठारें व दुसऱ्या कांहीं इमारती कोसळून पडलेल्या आहेत; येथें जवळच एक पायऱ्यांची विहीर आहे, व तिच्या दक्षिणेच्या बाजूस ११५ फूट लांब व १०५ फूट रुंद असा एक पाण्याचा हौद बांधलेला आहे. ह्या हौदा-शेजारीं पूर्वीं आंग्रे सरकारचे दिवाण, दफ्तरदार, चिट-णीस, फडणीस व पोतनीस यांचे वाडे होते. हौदाच्या समोर गणपतीचें देवालय आहे. आंत गणपतिपंचायतन आहे,—म्हणजे गणपति, सांब, विष्णु, सूर्य आणि देवी अशा पांच मूर्ति आहेत. हें देवालय थोरला राघोजी आंग्रे (इ० स० १७५९–९३) ह्यानें बांधलें. गणपतीच्या देवालयाजवळच महादेवाचें देवालय आहे, व त्याच्या थोडें उत्तरेस मारुतीचें एक लहानसें देवालय आहे. गणपतीच्या देवालयाचे दक्षिणेस कान्होबाचें देवालय आहे. त्याची हल्लीं अगदीं पडापड झालेली आहे. जवळच देवालयाच्या डाव्या अंगास पूर्वीची सरकारी तुरुंगांची जागा आहे. किल्ल्याच्या धाकट्या दरवाज्याला यशवंत दरवाजा म्हणतात, व तो ह्या देवालयाजवळ आहे. दरवाज्याच्याबाहेर त्याची संरक्षक देवी बसविलेली आहे; तिला यशवंतदारी असें म्हणतात. किल्ल्याच्या दाक्षिणेस ८० पावलें लांब व ४० पावलें रुंद अशी एक मोकळी जागा आहे, व तेथें पूर्वीं गोदी होती असें सांगतात.

किल्ल्यांत फक्त दोन आग्री आपापल्या कुटुंबासह राह-तात. हे आंतील देवतांचे पुजारी आहेत. एकाला सालिना ६२ रुपयांची व दुसऱ्याला ४५ रुपयांची सरकारांतून नेमणूक आहे. चैत्री पौर्णिमेस येथें मोठी यात्रा भरत

असते. किल्ल्यांत एक मुसलमानाची कबर आहे; व तिला सालीना सरकारांतून १२ रुपयांची नेमणूक आहे. वर सांगितलेल्या इमारतींशिवाय किल्ल्यांत पूर्वी आणखी दोन इमारती होत्या. त्या येसाजी आंग्र्यानें बांधल्या होत्या. एकींत सदरकचेरी असे, व दुसरींत फक्त कारकून मंडळी बसे.

सतराव्या शतकाच्या मध्यंतरीं जेव्हां कल्याण परगणा व त्याच्या दक्षिणेकडचा कोंकणपट्टीचा बराच भाग शिवाजीनें घेतला, तेव्हां त्यानें त्या प्रांतांच्या संरक्षणाकरतां जे किल्ले बांधले, त्यांत कुलाब्याचें नांव आहे. प्रथमतः बांधलेला किल्ला फारसा मजबूत नव्हता, म्हणून इ० स० १६६२ त त्यानें कुलाब्याचा किल्ला पुनः बांधला, व तेथें तो आपलें आरमार ठेवूं लागला. शिवाजीच्या आरमाराचे मुख्य सरदार दर्यासागर व माणिक भंडारी हे दोन होते. त्यांचे वेळीं कुलाबा हे यांचे लोकांचे मुख्य ठाणें झालें होतें. हे सरदार पोर्तुगीज लोकांस अतिशय त्रास देऊं लागले, तेव्हां त्यांनीं तह करण्याकरतां शिवाजीकडे आपला वकील पाठविला. त्या तहांत असें ठरलें कीं, पोर्तुगीज लोकांनीं मराठ्यांस कांहीं तोफा, दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी सामान द्यावें, व मराठ्यांनीं त्यांच्या बंदरांस त्रास देऊं नये. ही दारूगोळ्याची मागणी मराठे पुढें दरवर्षी करूं लागले. वर सांगितलेल्या दोन सरदारांच्या मागें मराठी आरमाराचें काम सिधोजी गुजर याचेकडे आलें.

इ० स० १६९० त संभाजीच्या मागून राजाराम गादीवर बसला, व त्यानें कान्होजी आंग्रे यास, सिधोजी गुजर याच्या हाताखालीं दुय्यम नेमिलें. सिधोजीच्या

१ हा कान्होजी आंग्र्याच्या दासीपुत्रांपैकीं एक होता.

मागें त्याची जागा कान्होजीस मिळाली. कान्होजी मोठा धाडशी व शूर सरदार होता, व ह्या त्याच्या गुणांमुळें तो फार लौकर प्रसिद्धीस आला. बाहेरच्या देशांतून व्यापाराचीं गलबतें इकडे आलीं म्हणजे त्यांवर कान्होजीची धाड पडली नाहीं असें झालेंच नाहीं. मुंबईपासून त्रावणकोरपर्यंत त्याचा सारखा दरारा बसलेला होता. इ० स० १७१३ त [illegible] कान्होजी[1] व शाहूमहाराज यांच्यांत तह झाला, त्या वेळीं कुलाबा व दुसरे कांहीं किल्ले कान्होजीस देऊन शाहूमहाराजांनीं त्याला आपल्या पक्षाकडे ओढलें. इ० स० १७२२ त मुंबईचे इंग्लिश व्यापारी कान्होजीच्या लुटारूपणामुळें अगदीं त्रासून गेले, व पोर्तुगीज लोकांशीं सख्य करून दोघांनीं मिळून कुलाब्यावर स्वारी केली. ह्या स्वारींत इंग्लिशांचीं तीन गलबतें होतीं, व त्यांवर कमोदर माथ्यू हा मुख्य होता. लढाई सुरू होतांच पोर्तुगीज लोकांचें धैर्य खचून ते पळून गेले, व त्यांच्या साथीदार इंग्लिश लोकांचीही तीच अवस्था झाली. कान्होजी इ० स० १७२८ त मरण पावला.

कान्होजीस दोन[2] औरस पुत्र व तीन[3] दासी पुत्र होते. त्याच्यामागून त्याचा थोरला मुलगा सखोजी हा आपल्या बापाचा अधिकार चालवूं लागला. सखोजी पुढें लवकरच मरण पावला. त्या वेळीं त्याचा धाकटा भाऊ

---

१ कान्होजी प्रथमतः राजारामाची स्त्री ताराबाई हिच्या पक्षाचा होता, व त्या वेळीं शाहूमहाराज व ताराबाई यांच्यांत गादीविषयीं तंटा उपस्थित झाला होता.

२ सखोजी व संभाजी. ३ तुळाजी, येसाजी व मानाजी.

संभाजी हा आपल्या तीन सावत्र बंधूंसह सुवर्णदुर्ग किंवा घेरिया येथें होता. भावाच्या मरणानंतर त्यानें तुळाजीस आपणाजवळ ठेविलें, व येसाजी व मानाजी ह्यांना कुलाब्याचा बंदोबस्त करण्याकरितां पाठवून दिलें. येसाजी मुलकी काम पाहत असे, व मानाजी लष्करी काम पाहत असे. पुढें लवकरच येसाजी व मानाजी यांचें आपसांत [illegible] मानाजीनें पोर्तुगी[illegible] लोकांस [illegible]ज्याजवळचा कांहीं भाग देऊं केला, व त्यांच्या मदतीनें त्यानें कुलाब्यावर हल्ला करून येसाजीस कैद केलें, व त्याचे डोळे काढले. त्यानें त्याला प्रथमतः पोयनाड येथें व मागून अलीबाग येथें कैदेंत ठेविलें. पोर्तुगीज लोक कुलाब्याहून परत जातांच संभाजीनें मानाजीवर स्वारी केली, व कुलाब्यास वेढा घातला. परंतु मानाजीनें बाजीराव पेशव्याच्या मदतीनें तो वेढा उठविला; तेव्हां संभाजी हताश होऊन सुवर्णदुर्गास परत आला. मानाजीनें पोर्तुगीज लोकांस जो मुलूख देऊं केला होता, तो तो देईना; तेव्हां पोर्तुगीज लोकांस मोठा राग येऊन ते मानाजीचें पारिपत्य करण्याकरतां संभाजी आंग्र्यास जाऊन मिळाले, व त्यांनीं कुलाब्यावर स्वारी केली. मानाजीनें शाहूमहाराजांपाशीं मदत मागितली. त्या वेळीं शाहूमहाराजांनीं सालीना ७००० रुपये रोख, रुपेरी व चिनी मिळून ३००० रुपये किमतीचें सामान, व राजमाची व कोथळी हे

---

१ येसाजी अलीबागेहून पळून पेशव्यांकडे आश्रय मागण्याकरितां गेला, त्या वेळीं पहिले बाजीरावानें कुलाब्यावर तुझा कांहीं एक हक्क नाहीं असें त्यास सांगितलें, व त्याला सालीना १० खंडी भात व ४०० रुपये देण्याचा ठराव करून रेवदंड्यास पाठवून दिलें.

किल्ले त्याजपासून घेण्याचा ठराव करून बाजीरावास त्याच्या मदतीस जाण्यास सांगितलें. पेशव्याच्या मदतीनें मानाजीनें पोर्तुगीज लोकांस कुलाब्याहून हांकून दिलें. पुढें तीन वर्षांनीं म्हणजे इ० स० १७४० त बाजीरावाचें बहुतेक सैन्य उत्तर-हिंदुस्थानांत गुंतलें आहे असें पाहून संभाजीनें तुळाजीचे मदतीनें पुनः किल्ल्यास वेढा घातला, व आंतील शिबंदीचें गोडें पाणी बंद केलें. मानाजीनें शाहूमहाराजांपाशीं मदत मागितली, तेव्हां त्यांनीं बाजीरावाचा वडील मुलगा बाळाजी उर्फ नानासाहेब ह्याला कोंकणांत जाण्यास आज्ञा केली. तेव्हां तो आपणाबरोबर ९०० लोक घेऊन कोंकणांत गेला. त्याच्यापूर्वी त्यानें मदतीसाठीं मुंबईच्या इंग्लिश गव्हरनरास पत्र पाठविलें होतें.

बाळाजीच्या मदतीस बाजीरावानें ताबडतोब चिमणाजी आप्पास पाठवून दिलें. बाळाजी पांचव्या दिवशीं कुलाब्यास जाऊन पोहोंचला; व हिराकोटच्या आश्रयानें संभाजीची एक लहानशी टोळी होती, तिच्यावर हल्ला करून त्यानें तिचा पराभव केला, व तुळाजी आंग्र्यास कैद करून त्याला साताऱ्यास पाठवून दिलें. बाळाजी कुलाब्यास जाण्याच्या पूर्वीच इंग्लिशांचें आरमार तेथें येऊन पोहोंचलें होतें. त्यांनीं प्रथमतः संभाजीच्या आरमाराचा पराभव करून त्याला हांकून दिलें, व जमिनीवर जें संभाजीचें सैन्य होतें त्याचा बाळाजीनें पराभव करून त्याचीही तीच वाट लाविली.

पुढें बाळाजी व चिमणाजी आप्पा हे रेवदंडा घेण्याची मसलत करीत असतां त्यांना अकस्मात् बाजीरावाच्या

मृत्यूचें वर्तमान समजलें. त्यामुळें सर्व बेत जागच्याजागीं राहून बाळाजी व चिमणाजी आप्पा पुण्यास निघून आले (इ० स० १७४०). पुढें त्याच वर्षी जंजिऱ्याच्या शिद्दीनें कुलाब्यावर एक मोठें सैन्य पाठविलें; परंतु पेशव्यांच्या मदतीनें मानाजीनें त्याचा थळ व नागांव यांचे दरम्यान् पराभव केला. मानाजी इ० स० १७५९ त मरण पावला. त्याला १० दासीपुत्र होते. त्यांपैकीं थोरला राघोजी आंग्रे (पहिला) हा बापाच्या गादीवर बसला. इ० स० १७७१ त फोर्ब साहेब कुलाबा पाहण्यास गेला होता, त्या वेळीं त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, "राघोजी आंग्रे किल्ल्यांत राहत असून त्याचा वाडा, खजिना, तबेले वगैरे सर्व चीजवस्त अलीबागेस आहे." राघोजी पेशव्यांस सालीना २ लाख रुपये खंडणी देत असे. इ० स० १७७६ त सदाशिवराव भाऊ तोतया याचा शिंद्यानें राजमाची येथें पराभव केल्यावर तो कुलाब्यास गेला. परंतु तेथें त्याला राघोजी आंग्रयानें कैद केलें. त्याला सोडून देण्याविषयीं इंग्लिशांनीं राघोजीस पत्र पाठविलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. राघोजीनें त्याला पुण्यास पाठवून दिलें, व तेथें त्याला हत्तीच्या पायीं दिलें. राघोजी आंग्रे इ० स० १७९३ त मरण पावला. राघोजीस मानाजी व कान्होजी असे दोन औरस पुत्र, व जयसिंग नांवाचा एक दासीपुत्र असे तीन पुत्र होते. मानाजी व कान्होजी हे अज्ञान होते, व जयसिंग जाणता होता. तेव्हां जयसिंगानें मानाजीस गादीवर स्थापिलें, व त्याचा सर्व कारभार आपण पाहूं लागला. परंतु त्यानें पेशव्यांस ती गोष्ट न कळविल्यामुळें त्यांची त्याच्यावर अतिशय इतराजी झाली.

मानाजीची मातुश्री म्हणजे राघोजाची स्त्री आनंदीबाई हिला ती गोष्ट न आवडून तिनें जयसिंगाविरुद्ध कारस्थानें सुरू केलीं. जयसिंगास ती गोष्ट समजतांच त्यानें तिच्या दोन मुख्य मंत्र्यांस ठार मारिलें, चौघांस कैदेंत टाकिलें, व आनंदीबाई भोंसले कुळांतील होती, म्हणून भोंसल्यांच्या सर्व कुटुंबास कुलाब्याहून घालवून दिलें. तेव्हां पेशव्यांनीं माधवराव फडके व जिवाजीपंत या दोन सरदारांस जयसिंगावर पाठवून दिलें. दोन्ही सैन्याची खंडाळ्याजवळ जी लढाई झाली, तींत जयसिंगाचा पराभव होऊन पेशव्यांची फौज पुढें चाल करीत साखर नांवाच्या गांवापर्यंत गेली, व तिनें जयसिंगाचें आरमार जाळून टाकिलें. साखर येथें जयसिंगानें पुनः पेशव्यांच्या फौजेवर हल्ला केला, व या वेळीं त्यानें त्या फौजेची दाणादाण करून टाकिली. पेशव्यांकडून ज्यास्त मदत होण्याची आशा दिसत नाहीं, असें पाहून आनंदीबाईनें कांहीं फौज गोळा करून कुलाब्यावर हल्ला करून तो घेतला, जयसिंगास कैद केलें, व त्याच्या साथीदारांस ठार मारून टाकलें. पुढें ४ महिन्यांनीं जयसिंग आपल्या कैदेंतून पळून गेला, व कांहीं फौज गोळा करून त्यानें हिराकोटास वेढा घातला. पुढें त्याची व आनंदीबाईची फार मोठी लढाई होऊन तींत जयसिंगाचा पराभव होऊन फार नाश झाला, व तो पुण्यास पळून गेला. मध्यंतरीं जयसिंगाची स्त्री सकवारबाई हिनें कांहीं फौज गोळा केली, व नागोठणें घेतलें. नंतर जयसिंग पुण्याहून पुनः कुलाब्यास गेला, व त्यानें इ० स० १७९६ त आनंदीबाईचा पूर्ण पराभव केला. त्या वेळीं ती महाडास पळून गेली, व तेथें कांहीं

दिवसांनीं मरण पावली. जयसिंग अलीबागेस येऊन त्यानें हिराकोट, सागरगड व खांदेरी हे किल्ले सर केले.

मानाजीला मदत करण्याचें पेशव्यांनीं कबूल केलें, असें जयसिंगास कळतांच त्यानें दौलतराव शिंद्याचा सेनापति बाबूराव याजपाशीं मदत मागितली. पुढें मदत करण्याचे मिषानें बाबूराव अलीबागेस आला, व जयशिंगाशीं कुरापत काढून त्यानें दौलतराव शिंद्याच्या मदतीनें हिराकोट घेतला. जयसिंगास व मागाहून मानाजी व कान्होजी यांस कैद केलें. पुढें इ० स० १७९९ त मानाजी व कान्होजी बाबूरावाचे कैदेंतून सुटून पुण्यास गेले, व पेशव्यांचे मदतीनें परत कुलाब्यास आले. परंतु बाबूरावानें चौल व नागोठणें या दोन ठिकाणीं त्यांचा पराभव करून त्यांस पुनः कैद केलें. बाबूराव हा ज्या सखोजी आंग्र्याचे पहिला मानाजी यानें डोळे काढले होते, त्याचा पुत्र होता, व अशा रीतीनें तो सर्वांस कैद करून दुसरे बाजीराव पेशवे यांच्या संमतीनें सर्व संस्थानचा अधिकार बळकावून बसला. जयसिंगाची पत्नी सकवारबाई हिनें पुनः सैन्य गोळा केलें व खांदेरीचा किल्ला घेतला. बाबूरावानें खांदेरी परत घेण्याचा एक वेळ प्रयत्न केला, परंतु तो निष्फल झाला. तेव्हां "तुम्हीं खांदेरी मला द्याल तर मी जयसिंगास कैदेंतून मुक्त करितों," असें त्यानें सकवारबाईशीं बोलणें लाविलें. त्या वेळीं आपल्या नवऱ्याची सुटका करण्याकरितां तिनें खांदेरीचा किल्ला बाबूरावाचे स्वाधीन केला. परंतु किल्ला हातीं येतांच त्यानें विश्वासघात करून जयसिंगास ठार मारून टाकिलें, व सकवारबाई व तिचीं मुलें यांस कैदेंत ठेविलें. पुढें जयसिंगाचा थोरला मुलगा

मुंबईस पळून गेला, व तेथें त्यानें २००० लोक गोळा करून बचाजीशेट नांवाच्या रेवदंड्याच्या सोनारास आपल्या सैन्यावर मुख्य नेमिलें. त्यानें इ० स० १८०७ त हिराकोट व सागरगड हे किल्ले जिंकून घेतले. परंतु बाबूरावानें पेशवे व इंग्लिश यांचेपाशीं मदत मागितली, व बचाजीच्या लोकांस लांच देऊन त्यानें त्याला व त्याच्या मुख्य साथीदारांना कैद केलें, व त्यांपैकीं कांहींस फांशीं दिलें, व कांहींचा सागरगड किल्ल्यावरून कडेलोट केला. इ० स० १८१३ त बाबूराव मरण पावला, व त्याच्या मागें कुलाब्याचा अधिकार दुसरा मानाजी यास मिळाला. मानाजी इ० स० १८१७ त मरण पावला, व त्याच वर्षीं त्या संस्थानचा कारभार इंग्लिशांचे हातीं आला. त्याच्यामागें त्याचा पुत्र राघोजी हा गादीवर बसला. राघोजी इ० स० १८३८ त मरण पावला, व त्याच्यामागें त्याचा अज्ञान पुत्र कान्होजी याच्या नांवानें कारभार चालूं लागला. परंतु तो इ०स० १८४० त मरण पावला, व त्याच्यामागें इंग्लिशांनीं तें संस्थान खालसा केलें. कुलाबा इंग्लिशांचे हातीं आल्यानंतर तेथें कांहीं महत्त्वाची गोष्ट घडून आली नाहीं. ह्या किल्ल्याची अद्यापि साधारण स्थिति बरी आहे.

२. **खांदेरीचा किल्ला.**—खांदेरी हें बेट मुंबई बंदरांत शिरण्याचे पूर्वी मुंबईच्या दक्षिणेस ११ मैलांवर व अलीबागेच्या वायव्येस ६ मैलांवर आहे. त्याची लांबी दीड मैल व रुंदी अर्धा मैल आहे. हें बेट ह्याच्यासमोर उत्तरेच्या बाजूस उंदेरी म्हणून दुसरें एक बेट आहे, त्याच्यापेक्षां मोठें असून समुद्राच्या सपाटीपेक्षां ह्याची उंची बरीच

आहे, व दक्षिणेच्या बाजूस दीपगृहाजवळ जो वाडा आहे तेथपर्यंत त्याची जमीन उंच उंच होत गेलेली आहे. पूर्वी ह्या बेटाला तटबंदी केलेली होती. येथील दीपगृह उंच ठिकाणीं असून तें इ० स० १८६७ त इंग्लिशांनीं बांधलें.

**खांदेरी**च्या उत्तरभागांत सुमारें ५० यार्डांवर एक **वेताळा**चें देवालय आहे, व ज्या ठिकाणीं होड्या वगैरे लागतात, त्या ठिकाणीं **दाऊद पीर** नांवाच्या एका मुसलमान साधूची कबर आहे. दर्यावर्दी लोक आपणाला सफरींत चांगला फायदा व्हावा म्हणून ह्या दोन्हीं ठिकाणीं नवस करतात.

पोर्तुगीज सरदार **डॉन् जोओडा कास्ट्रो** ह्यानें सोळाव्या शतकांत **खांदेरी**चें असें वर्णन केलें आहे कीं, " हें बेट फार मोठें असून **चौल**च्या **उत्तरे**स ६ मैल आहे, व त्याला **चौल**चें बेट असें म्हणतात. " **शिवाजी**नें इ० स० १६७९ त ह्या बेटावर ३० मावळे शिपाई व ३०० मजूरदार लोक पाठवून तटबंदीचें काम सुरू केलें. पूर्वी येथें कोणी राहत नसे, परंतु जेव्हां **शिवाजी**नें तटबंदीचें काम सुरू केलें असें इंग्लिश व पोर्तुगीज लोकांस समजलें, तेव्हां त्या दोघांच्याही तोंडाला, हें बेट आपणास मिळावें म्हणून, पाणी सुटलें. पोर्तुगीज लोक ही आमची जुनी वसाहतीची जागा आहे, म्हणून त्या बेटावर आपला हक्क सांगूं लागले, व इंग्लिश लोक हें बेट **मुंबई**त मोडतें, असा बहाणा करून त्यावर आपला हक्क सांगूं लागले. पुढें इंग्लिशांनीं एक लहानसें आरमार तयार करून तें **खांदे**रीवर पाठवून दिलें. इंग्लिशांच्या सरदारानें तें बेट सोडून देण्याविषयीं मराठयांस निरोप पाठविला; परंतु मराठे त्याला

केशाची दाद देणार ! दर्या तुफान असल्यामुळें त्या वेळीं इंग्लिशांना विन्मुख परत यावें लागलें. पुढें तारीख १९ सपटेंबर इ० स० १६७९ रोजीं इंग्लिशांच्या एका सरदारानें त्या बेटावर जाण्याचा जोर केला. परंतु ऐन लढाईच्या प्रसंगीं हे सरदार साहेब दारू पिऊन धुंद झाले, व ऐन काटाकाटीच्या गर्दीत त्यांनीं यमपुरीचा रस्ता सुधारला; व त्याच्या बरोबरचे शिपाई लोक व खलाशी लोकही आपला सरदार कोणीकडे गेला याचा पत्ता काढण्याकरतां तो गेला होता त्याच मार्गानें निघून गेले. नंतर शिवाजीचा सरदार दौलतखान हा मोठें आरमार घेऊन चौलाहून येत आहे, असें वर्तमान इंग्लिशांस कळतांच त्यांनीं आपलें आरमार वाढविलें, व त्यावर किगविन् नांवाच्या साहेबास मुख्य नेमिलें. शिवाय २०० युरोपियन लोक ज्यास्त नोकरीस ठेविले. आक्टोबरच्या १८ व्या तारखेस मराठ्यांनीं इंग्लिशांचें एक लहानसें व्यापाराचें जहाज धरलें व बाकीचीं त्यांच्या तडाक्यांतून पळून गेलीं. पुढें किगविन् यानें मोठ्या पराक्रमानें मराठ्यांच्या आरमाराचा पराभव केला, त्यांचीं ५ जहाजें धरलीं व त्यांना नागोठण्याच्या खाडीपर्यंत पिटाळून लावलें. परंतु इतक्या गोष्टी झाल्या तरी मराठे खांदेरीस जी तटबंदी करीत होते, तिला इंग्लिशांकडून कांहीं अडथळा झाला नाहीं. खांदेरी येथें मराठ्यांनीं ज्यास्त कुमक पाठविली, व तेथें एक तोफ नेऊन ठेविली. पुढें तारीख ९ नवंबर रोजीं जंजिऱ्याचा शिदी मोठें आरमार घेऊन इंग्लिशांस येऊन मिळाला. परंतु खांदेरी बेट जिंकून घेतलें तर तें इंग्लिशांस देण्याचा शिदीचा बेत नाहीं असें

जेव्हां क्लिगविन् साहेबास दिसून आलें, तेव्हां त्यानें शिद्दीला मदत करण्याचें नाकारलें. तेव्हां दगडापेक्षां वीट मऊ ह्या म्हणीप्रमाणें शिद्दीपेक्षां मराठेच बरे असें त्याला वाटूं लागलें. पुढें शिद्दीनें उंदेरी बेटास तटबंदी केली. दौलतखानानें त्याला पुष्कळ अडथळा केला; परंतु मराठ्यांना न जुमानतां त्यानें तटबंदीचें काम पुरें केलें. एका झटापटींत दौलतखानास फार जबर जखम लागून तो घायाळ होऊन पडला, व मराठ्यांचें फारच नुकसान झालें. हा शिद्दी व मराठे यांच्यामधील झगडा पुढें फार वर्षेंपर्यंत चालला होता. इ० स० १६९३ त काफीखान यानें समुद्रकांठीं शिवाजीनें बांधलेल्या ज्या किल्ल्यांचें वर्णन केलें आहे, त्यांत कुलाबा व खांदेरी हे दोन किल्ले फारच बळकट आहेत असें वर्णन केलें आहे. इ० स० १७०६ च्या सुमारास मुंबईचा डेपुटी गव्हरनर स्कूट साहेब असें लिहितो कीं, " आंग्रयानें खांदेरीची तटबंदी बांधली असून आंत कांहीं घरें आहेत. " इ० स० १७१३ त हा किल्ला शाहूमहाराजांनीं कान्होजी आंग्रे यास दिला. इ० स० १७१८ त इंग्लिशांनीं खांदेरी घेण्याचा पुनः प्रयत्न केला; परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. ह्या वेळीं इंग्लिशांचा जो पराभव झाला तो इंग्लिशांचे नोकरींत रामा कामाठी नांवाचा एक मनुष्य होता त्याचे विश्वासघातामुळें झाला. त्यानें कान्होजीस असें पत्र पाठविलें कीं, तारीख १७ आक्टोबर रोजीं इंग्लिशांनीं खांदेरीवर हल्ला करण्याचें योजिलें आहे, करितां आपण बंदोबस्तानें असावें. त्यामुळें इंग्लिशांना या कामांत यश आलें नाहीं. ह्या रामा कामाठ्याची पुढें

चौकशी होऊन तारीख ४ मार्च इ० स० १७२० रोजीं त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली. इ० स० १७४० त इंग्लिश व शिद्दी यांच्यांत तह होऊन त्यांत असें ठरलें कीं, "दोघांनीं मिळून खांदेरी किल्ला घ्यावा व शिद्दीनें पुढें तो इंग्लिशांस द्यावा." परंतु त्या वेळीं किल्ला इंग्लिशांचे हातीं आला नाहीं. "खांदेरी व उंदेरी हे किल्ले शत्रूच्या ताब्यांत असतील तर इंग्लिशांचें फार मोठें नुकसान आहे," असें ग्रोस साहेबानें इ० स० १७५० त लिहिलें आहे. इ० स० १७५५ त खांदेरी किल्ला आपणांस द्यावा, म्हणून इंग्लिशांनीं मराठयांबरोबर बोलणें सुरू केलें. पुढें इ० स० १७७५ त राघोबादादा व इंग्लिश यांचेमध्यें सुरतचा तह झाला, तेव्हां खांदेरी इंग्लिशांस मिळाली. परंतु पुढें लवकरच पुरंदरच्या तहांत तो किल्ला मराठयांनीं परत घेतला. इ०स० १७८७त हा किल्ला राघोजी आंग्रयाच्या ताब्यांत होता असा लेख सांपडतो. इ० स० १७९९ त लेफ्टेनेंट हायीस साहेबास खांदेरी येथील लोकांनीं इंग्लिशांच्या व्यापारी गलबतांवरील मालाची अफरातफर केली होती ती भरून देण्याविषयीं खांदेरीस पाठवून दिलें होतें. तो असें लिहितो कीं, "खांदेरीचा किल्ला मोठा बळकट असून वर २०० तोफा आहेत." ह्या वेळीं इंग्लिशांचें जें नुकसान झालें, तें त्यांनीं आंग्रयापासून भरून घेतलें. ह्याच वेळेच्या सुमारास जयसिंग आंग्रयाची बायको सकवारबाई हिनें हा किल्ला घेतला. कारण ह्या वेळीं आंग्रयांचे गादीच्या संबंधानें आपसांत तंटे सुरू झाले होते. पुढें दौलतराव शिंद्याचा सेनापति बाबूराव यानें तिला

१ विशेष माहितीकरतां कुलाबा किल्ल्याचें वर्णन पहा.

अशी थाप दिली कीं, " तुम्ही हा किल्ला माझे स्वाधीन कराल तर मी तुमचे नवऱ्यास कैदेंतून मुक्त करितों. " तिनें विश्वासानें किल्ला बाबूरावाचे स्वाधीन केला. परंतु त्या मांगानें किल्ला हातीं येतांच जयसिंगास ठार मारिलें व सकवारबाईस कैदेंत टाकिलें. बाबूराव मरण पावल्यावर तो किल्ला मानाजी आंग्रयाचे ताब्यांत आला, व इ०स० १८१३ त त्यानें पेशव्यांनीं त्याला गादीवर बसविण्याचे कामीं मदत केली होती म्हणून तो त्यांना देऊन टाकला. इ०स० १८१८ त पेशव्यांचें राज्य इंग्लिशांनीं खालसा केलें तेव्हां तो इंग्लिशांचे हातीं आला.

**३. उंदेरी.**—हें एक बेट आहे, व तें मुंबई बंदराच्या मुखाशीं मुंबईपासून १२०० यार्डांवर खांदेरीच्या नैर्ऋत्येस १ मैलावर आहे. त्याच्या वाटोळा खडक असून खांदेरीपेक्षां तें लहान आहे. ह्या बेटाला इ० स० १६८० त शिद्दी कासम यानें तटबंदी केली. त्या वेळीं त्याच्या व मराठ्यांच्या दोन लढाया झाल्या; परंतु शिद्दीला त्या कामांत यश येऊन त्यानें तटबंदीचें काम पुरें केलें. शिवाजी निवर्तल्यावर इ० स० १६८० त संभाजीनें पुनः एकवार आपले दोनशें लोक उंदेरीस पाठविले. त्यांनीं एका काळोख्या रात्रीं उंदेरीवर हल्ला केला. परंतु शिद्दीला त्याची चाहूल लागतांच त्यानें मराठ्यांवर हल्ला करून सर्व लोक कापून काढले. इ० स० १६९९ त मानाजी आंग्रे वारल्यावर शिद्दीनें कुलाब्यावर हल्ला केला, त्या वेळीं राघोजी आंग्रयानें पेशव्यांच्या मदतीनें उंदेरीवर स्वारी केली, व तो किल्ला घेतला. पुढें आंग्रयानें तो किल्ला पेशव्यांस दिला. इ० स० १७६१ त राघोबादादानें

उंदेरी इंग्लिशांस देऊं केली, परंतु त्या वेळीं तें बेट इंग्लिशांस मिळालें नाहीं. आंग्र्यांचे अमलांत राजघराण्यांतील कैदी उंदेरी येथें ठेवीत असत. इ० स० १८४० त हें बेट कायमचें असें इंग्लिशांच्या हातीं आलें.

**४. सागरगड.**—हा किल्ला मुंबईच्या दक्षिणेस १९ मैल, **अलीबागेच्या** पूर्वेस ६ मैल व **धरमतरीच्या** पश्चिमेस ६ मैल **अलीबाग** तालुक्यांत एका १३५७ फूट उंचीच्या टेंकडीवर बांधलेला आहे. किल्ल्यावर जाण्याचे मुख्य रस्ते दोन आहेत. एक पूर्वेस आहे व दुसरा पश्चिमेस आहे. शिवाय नैर्ऋत्य दिशेस **अंदरजोड** नांवाच्या दऱ्यांतून एक व आग्नेयीस **वडवली** गावांतून एक असे दोन आडवळणी मार्ग आहेत. किल्ल्याचा दरवाजा उत्तराभिमुख आहे, व त्याच्या दोन्ही बाजूंस दोन बुरूज आहेत. दरवाज्याच्या आंत फरसबंदी रस्ता आहे. उजव्या बाजूस तंबू ठोकण्याकरितां नवीन फरसबंदी केलेली आहे. किल्ल्याची बाहेरची भिंत व आंतील भिंत यांच्यामध्यें २३० यार्डांचें अंतर आहे. आंत दुसरा दरवाजा आहे. टेंकडीच्या माथ्यावर एक बंगला आहे. येथून पुढें गेलें म्हणजे **बाले** किल्ल्याचा दरवाजा लागतो. **बाले** किल्ला २४० फूट लांब व १२० फूट रूंद आहे. पश्चिमेच्या बाजूस एक एकमजली घर आहे व कांहीं फुलझाडें आहेत. **बाले** किल्ल्याच्या पलीकडे दक्षिणेच्या बाजूस एक लहानसें वाटोळें तळें आहे.

किल्ल्यावर दोन युरोपियन लोकांचे बंगले आहेत. शिवाय दोन पडक्या जागा आहेत तेथें पूर्वी जनरल **फुलर** व **लसटॉक** [illegible]ीड म्हणून कोणी मोठे इंग्लिश कामगार होते, त्यांचे बंगले होते म्हणून सांगतात. शिवाय

मुंजोबा, गणपती, खरजाबाई व वेताळ यांचीं चार देवळें आहेत, व एक मुसलमानांचें पिराचें स्थान आहे. माथ्यावरील बंगल्याशेजारीं नांदुर्कीच्या झाडाखालीं एक महिषासुरमथनीची मूर्ति आहे. किल्ल्यांतील बंगल्यांची दुरुस्ती ठेवण्याकरतां किल्ल्यावर एक कायमचा नोकर ठेवलेला आहे. आंत पाण्याचीं तीन टांकीं आहेत. किल्ल्याच्या आसपास चित्ते, रानडुकर, भेंकरीं व क्वचित् वाघ हीं पारधीचीं जनावरें आहेत; व त्यांची पारध करण्याकरतां दरवर्षी पुष्कळ युरोपियन लोक तेथें जातात. आंग्र्यांच्या अमलाखालीं हा किल्ला होता तेव्हां त्याची चांगली भरभराट होती. इ० स० १७१३ त शाहूमहाराजांनीं जे १३ किल्ले कान्होजी आंग्र्यास दिले, त्यांमध्यें हा एक होता. इ० स० १७४० त संभाजी आंग्रे व मानाजी[१] आंग्रे यांच्यांत कलह सुरू होऊन संभाजीनें हा किल्ला घेतला. पेशव्यांच्या कारकीर्दीत ज्याला कडेलोटाची शिक्षा होत असे, त्याला या किल्ल्यावर वानरटोंक म्हणून एक जागा आहे तेथून गोणत्यांत त्या मनुष्याची मोट बांधून खालील भयंकर कड्यांत ढकलून देत असत.

५. कोरलई किल्ला.—कोरलई किल्ला व गांव हे एकेच ठिकाणीं आहेत. हा किल्ला डोंगरी असून तो रेवदंड्याच्या दक्षिणेस सुमारें १० मैलांवर रेवदंड्याच्या किंवा रोह्यांच्या खाडीच्या दक्षिण तीरावर आहे. त्याच्या तिन्ही बाजूंनीं पाणी आहे. येथें ख्रिस्ती लोकांचें एक देवालय आहे, व डोंगराच्या खालीं कोरलई गांव आहे. या गांवाचे वरचा गांव व खालचा गांव असे दोन भाग आहेत. वरच्या गांवांत

१ हे कान्होजी आंग्र्याचे पुत्र होते.

ब्राह्मणांची पांच सहा, व कुणब्यांची चार पांच, अशीं घरें आहेत, व खालच्या गांवांत कोळी, आग्री व किरिस्तात्र लोकांचीं बरींच घरें आहेत. कोरलई टेंकडी २७१ फूट उंच असून माथ्यापासून खालच्या सपाट प्रदेशापर्यंत तिला तट बांधलेला आहे. पुढच्या अंगास खडक असून त्यावर एक कोट बांधलेला आहे. मुख्य किल्ला व हा कोट ह्यांच्या मध्यें तीन आडव्या भिंती आहेत. ह्या तटबंदीविषयीं नैर्न साहेब असें वर्णन करितो कीं, "हिच्यासारखी बळकट तटबंदी ब्रिटिश सरकारच्या अमलाखालच्या सर्व कोंकण प्रांतांत दुसरी कोठेंही नाहीं."

सोळाव्या शतकांत युरोपियन लोक ह्या ठिकाणाला "चौलचा खडक" असें म्हणत असत. ह्या ठिकाणीं पूर्वी पोर्तुगीज व मुसलमान यांच्या भयंकर रक्तस्रावाच्या लढाया झाल्या. इ० स० १५२१ त अहमदनगरच्या बादशाहानें पोर्तुगीज लोकांस चौल येथें किल्ला बांधण्यास परवानगी दिली. त्या वेळीं त्यांनीं कोरलई टेंकडीच्या उत्तरेकडील पायथ्याशीं एक धक्का बांधला. पुढें खंबायत येथील गुजराथच्या आरमारानें कोरलईवर हल्ला केला. परंतु पोर्तुगीज लोकांनीं चौलाहून कोरलईस मदत पाठविली, व गुजराथच्या आरमाराचा पराभव करून त्यांना पिटाळून लाविलें. अहमदनगरचा बादशाहा बुऱ्हाण निजाम (इ०स०१५०८–१५५३) मरण पावल्यावर पुढें त्या राज्यांत जो घोटाळा माजला, तेव्हां इ०स०१५५७ त 'कोरलई आम्हांस पृथक् तोडून द्या,' असें पोर्तुगीज लोकांनीं मुसलमानांशीं बोलणें लाविलें. अहमदनगरच्या बादशाहानें तें बोलणें अमान्य करून कोरलई येथें मज-

बूत किल्ला बांधण्याकरतां आपले स्वतःचे लोक पाठवून दिले. पोर्तुगीज लोकांनीं त्यांना पुष्कळ अडथळा केला. त्यांच्या व मुसलमानांच्या बऱ्याच झटापटी होऊन शेवटीं असें ठरलें कीं, मुसलमानांनीं तेथें किल्ला बांधूं नये. ह्या वेळीं, पोर्तुगीज लोकांनीं पूर्वीं जो मुसलमानांनीं थोडासा भाग बांधला होता तोही पाडून टाकला. ह्या वेळची अशी एक चमत्कारिक दंतकथा सांगतात कीं, तट पाडला त्या वेळीं तेथें पोर्तुगीज लोकांनीं पूर्वीं एक लांकडी क्रूस पुरला होता, तो मात्र मुसलमानांच्या तरवारीनें तुटेना, व हत्ती लावले तरी त्यांच्यानें तो उपटून काढवेना.

पुढें दुसरा बुऱ्हाण निजाम ( इ०स०१५९०–१५९४ ) ह्यानें इ०स० १५९४ त तो किल्ला बांधला. किल्ल्याचें काम फारच बळकट केलें होतें. ह्या वेळीं किल्ला बांधण्याचें कारण असें झालें कीं, पोर्तुगीज व मुसलमान यांच्यामध्यें मोठी निकराची लढाई सुरू झाली होती, व कोरलई येथून रेवदंड्याच्या तटबंदीवर मुसलमानाचा चांगला मारा लागू पडत असे. इ० स० १५९४ च्या सपटेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेस पोर्तुगीज सरदार अब्रॉंचिस ह्यानें १५०० पोर्तुगीस व १५०० काळे लोक बरोबर घेऊन कोरलईच्या किल्ल्यावर हल्ला केला. ह्या वेळीं उभय पक्षांची फारच मोठी लढाई झाली. पोर्तुगीज लोकांनीं अहमदनगरच्या बादशाहाचा सरदार फत्तेखान याला कैद केलें व किल्ला सर केला. ह्या सरदारानें मरतांना खिस्ती धर्माची दीक्षा घेतली. त्या वेळीं त्याची बायको व मुलगी ह्याही पोर्तुगीज लोकांच्या हातीं सांपडल्या. बायकोला तिच्या भावाबंदांनीं पुष्कळ पैसे भरून सोडवून नेलें. मुलीनें मात्र खिस्तीधर्म स्वीकारला. तिला

त्यांनीं प्रथमतः गोव्यास पाठवून दिलें, व नंतर पोर्तुगाल देशाची राजधानी लिस्बोन येथें पाठवून दिलें. ह्या वेळीं पोर्तुगीज लोकांना अतिशय लूट सांपडली. परंतु किल्ल्याचें संरक्षण करण्यापुरती पोर्तुगीज लोकांजवळ शिबंदी नव्हती, म्हणून त्यांनीं टेंकडीच्या माथ्यावरील तटबंदी कायम ठेवून बाकीचा सर्व भाग पाडून टाकला, व वर थोडीशी शिबंदी ठेविली.

ह्या किल्ला पाडण्याच्यापूर्वीं डो कूटो यानें इ० स० १६०२ त याचें असें वर्णन केलें आहे कीं, "ह्या किल्ल्याइतका बळकट किल्ला सर्व पृथ्वींत विरळाच, असें ह्मटलें तरी चालेल. जमिनीकडच्या बाजूस मोठा खंदक असून त्यावर घालतां काढतां येण्यासारखा एक लांकडी पूल आहे. ह्या खंदकाचे आंतले बाजूस एक मोठी भक्कम व उंच अशी भिंत आहे. तिला दोन मोठे बुरूज असून त्यांच्यामध्यें एक मोठा पितळेचा सिंह बसविला आहे. ह्या सिंहावर ' माझ्याशीं लढल्याशिवाय मी पुढें जाऊं देणार नाहीं ' अशीं अक्षरें खोदलेलीं आहेत. टेंकडीच्या माथ्यावरील किल्ला अतिशय बळकट असून त्यावर सर्वांत उंच ठिकाणीं एक पितळेचा गरुड पक्षी बसविलेला आहे. ह्या गरुडपक्षावर ' एकदम पळ काढल्याशिवाय माझे जवळून जाण्याची कोणाची छाती नाहीं ' अशा अर्थाचा लेख लिहिलेला आहे. किल्ल्यांत बरींच घरें आहेत. किल्ल्याच्या रक्षणार्थ मोठमोठ्या ७० तोफा व कायमची शिबंदी ८००० आहे. फक्त मूर लोक मात्र किल्ल्याच्या बाहेर राहतात. किल्ल्याला लागूनच बाजाराची जागा आहे, व तेथें ७००० लोकांची वस्ती आहे; येथें व्यापार फार मोठा चालतो."

यानंतर हा किल्ला पोर्तुगीज लोकांनीं पुनः एकवार दुरुस्त केला. इ० स० १७२८ त या किल्ल्याचें असें वर्णन केलेलें आहे कीं, " ह्यावर १३० पहारेकरी लोक आहेत." ह्या किल्ल्याची हल्लींची लांबी २८२८ फूट व रुंदी ८९ फूट आहे. किल्ल्यांत जाण्याला एकंदर ११ दरवाजे आहेत. त्यांपैकीं ४ बाहेर व ७ आंत आहेत. पूर्वेकडील तट शिवाय करून बाकीचा भाग अद्यापि कायम आहे. किल्ल्याला एकंदर ७ बुरूज असून प्रत्येकाला ७ पोर्तुगीज साधूंचीं निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत.

हा किल्ला इ० स० १७३९ त मराठ्यांनीं घेतला, व तेव्हांपासून इ०स०१८१८ पर्यंत तो मराठ्यांचें ताब्यांत होता. याची मुख्य खूण म्हटली म्हणजे मराठे लोकांनीं वर सांगितलेल्या ७ बुरुजांना त्यांचीं पोर्तुगीज नांवें काढून टाकून मराठी नांवें दिलीं आहेत. शिवाय किल्ल्यांत गणपति, मांजरादेवी, वेदिका देवी वगैरे २९४ देवतांचीं पडापड झालेलीं देवालयें आहेत. किल्ल्यांत थोड्याशा तोफा आहेत, परंतु त्या गंजून गेलेल्या आहेत.

---

१ (१) साम् थिआगो, (२) साम् फ्रान्सिस्को झेविअर, (३) साम् पेड्रो, (४) साम् इग्नाशिओ, (५) साम् फिलीप, हीं पांच वाचतां येतात, (२) वाचतां येत नाहींत.

२ (१) पुस्ती, (२) गणेश, ३ पश्चिम, (४) देवी; (५) चौबुरजी, (६) राम, (७) पाण (बुरूज).

# पेण तालुका.

—०:※:०—

**६. रतनगड.**—हा किल्ला पेणच्या आग्नेयीस ६ मैलांवर एका टेंकडीवर बांधलेला आहे. त्याची उंची १८०० फूट आहे. ह्या किल्ल्याला लागूनच पूर्वेच्या बाजूस मिऱ्या[१] डोंगर आहे. सुरगड किल्ल्याप्रमाणें पूर्वी हा किल्ला एक मैल लांबीच्या डोंगरावर बांधलेला असावा, असें अनुमान होतें. परंतु हल्लीं तेथें तटाची किंवा दुसरी कशाचीच खूण नसल्यामुळें खातरीनें कांहींच सांगतां येत नाहीं. ईशान्य व पश्चिम या बाजूंस दाट अरण्य आहे. किल्ल्यांत पाण्याचीं दोन उत्कृष्ट टांकीं आहेत. किल्ल्यावरील एक तोफ पायथ्याशीं असलेल्या भातखाचरांत पडली आहे. हा किल्ला बाबूराव पाशिलकर नांवाच्या कोणी मनुष्यानें बांधला असें सांगतात ह्याविषयींची ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

**७. सांकशी किल्ला.**—ह्याला बद्रुद्दीन किल्ला किंवा दरग्याचा किल्ला असेंही म्हणतात. ह्याला बद्रुद्दीन किल्ला हें नांव पडण्याचें कारण त्याच्या पायथ्याशीं बद्रुद्दीन नांवाच्या एका मुसलमान साधूचा दरगा आहे. हा किल्ला पेणच्या ईशान्येस ९ मैलांवर निदिवली नांवाच्या खेड्यांत

---

१ ह्या डोंगरावर पुष्कळ औषधी सांपडतात. याचेविषयीं अशी दंतकथा आहे कीं, राम व रावण यांचें युद्ध चाललें असतां इंद्रजिताची शक्ति लागून लक्ष्मण रणांत पडला. त्या वेळीं त्याला संजीवन करण्याकरितां द्रोणाचलावरील एका औषधाची गरज लागली. तेव्हां मारुती द्रोणाचल उपटून घेऊन चालला असतां त्याचें एक मिऱ्याएवढें ढेंकूळ खालीं पडलें, व त्यालाच पुढें मिऱ्या डोंगर असें म्हणूं लागले.

पोडतो. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता वर निर्दिष्ट केलेल्या दरग्याच्या बाजूनें जातो. किल्ल्यावर जातांना एकंदर ८ पाण्याचीं टांकीं लागतात. त्यांपैकीं पहिलें टांकें २४० फूट चढण चढून गेलें म्हणजे लागतें. ह्याच्या समोर गाजीशाहा नांवाच्या मुसलमानाची कबर आहे. येथून ४० फूटांवर दत्री या नांवाचें दुसरें टांकें आहे. ह्याच्या थोडेंसें वर पायरी म्हणून तिसरें टांकें आहे. ह्याला आंतून दोन दगडी खांब आहेत. ह्याच्या वरच्या बाजूस २० फुटांवर चौथें टांकें आहे. येथें खडकांत एक कोनाडा आहे त्यांत वज्राई किंवा जगमाता नांवाची मूर्ति बसविलेली आहे. ही राजा सांक ज्यानें हा किल्ला बांधला त्याची कन्या होती. तिचा बाप करनाळ्याच्या सरदाराबरोबर लढाई करीत असतां त्याला अपयश आल्याचें वर्तमान तिला कळल्यावरून तिनें त्या ठिकाणीं जीव दिला; त्यावरून त्या टांक्यालाही जगमाता टांकें हें नांव पडलें. जगमाता टांक्याच्या वर २० फूट गाजीशाहा नांवाचें पांचवें टांकें आहे. ह्याच्यावर आणखीं दोन टांकीं आहेत. त्यांपैकीं वरच्या टांक्यास गोवनी टांकें असें म्हणतात. हीं दोन टांकीं व गाजीशाहा टांकें ह्यांना आंतून चौकोनी दगडी खांब आहेत; व ह्या दोन टांक्यांच्या कांहींसें पूर्वेस ८ वें टांकें आहे. ह्या ठिकाणीं जाण्याचा रस्ता अवघड आहे. किल्ल्यांत पुष्कळ भुयारें आहेत. आंत एक चोरटांक नांवाची गुहा आहे, तींतून शेजारच्या डोंगरांत जाण्याला रस्ता आहे असें सांगतात. शिवाय आंत एक जमिनदोस्त झालेला वाडा आहे.

---

१ हा किल्ला येथून ८ मैलांवर; ठाणें जिल्ह्यांत आहे.

ई० स० १९४० त हा किल्ला अहमदनगरच्या राजानें गुजराथच्या मुसलमानी सैन्यापासून घेतला. त्या वेळीं गुजराथच्या लोकांनीं पोर्तुगीज लोकांची मदत मागितली, व त्यांच्या साहाय्यानें त्यांनीं अहमदनगरच्या फौजेचा पराभव केला. व किल्ला परत घेतला. परंतु अहमदनगराहून दुसरें एक मोठें सैन्य येत आहे, असें वर्तमान त्यांना कळतांच ते किल्ला सोडून पळून गेले, व जातांना त्यांनीं तो किल्ला पोर्तुगीज लोकांचे हवालीं केला. पोर्तुगीज लोकांचा सुभेदार **डी मेनेसेस** हा वसई येथें होता, त्यानें ह्या किल्ल्यावर ज्यास्त फौजफांटा पाठवून त्याचा चांगला बंदोबस्त केला. अहमदनगरच्या सैन्यानें दोन वेळ ह्या किल्ल्यावर हल्ला केला. परंतु त्यांना यश मिळालें नाहीं. पुढें **डी मेनेसेस** हा बरोबर मोठें सैन्य घेऊन आपल्या लोकांच्या मदतीस आला, व त्यानें मुसलमानांवर हल्ला करून त्यांचा अगदीं मोड करून टाकला. पोर्तुगीज लोकांनीं लिहून ठेवलेल्या इतिहासांत ह्या लढाईच्या वेळची एक चमत्कारिक गोष्ट आढळते. ती अशी कीं, " ट्रान्कोसो म्हणून एक शूर व बळकट पोर्तुगीज शिपाई होता, त्यानें लढाई चालली असतां एका मुसलमान शिपायास धरून त्याची मोट बांधली व त्याला आपल्या डाव्या हाताला बांधून लढाईचा शेवट होईतोंपर्यंत तो एकसारखा लढत होता. " मुसलमान लोक पुढें आपला पक्का सूड घेतील अशी काळजी पोर्तुगीज लोकांस पडून त्यांनीं अहमदनगरचा राजा बुऱ्हाण निजामशाहा याच्यापासून सांकशी व करनाळा हे दोन किल्ले १७५०० रुपयांस विकत घेतले. इ० स० १८०० मध्यें सांकशी प्रांताचें उत्पन्न २६८३० रुपये होतें, असा मराठी दप्तरांत

दाखला सांपडतो. इ० स० १८२७ त येथें इंग्लिश व कांहीं रामोशी लोक यांच्यामध्यें एक लहानशी लढाई झाली. इ० स० १८६६ पर्यंत सांकशी हें तालुक्याचें ठाणें होतें. पुढें हें तालुक्याचें ठाणें पेणेस गेलें.

८. **सोनगिरी**.—हा किल्ला पेणच्या आग्नेयीस ८ मैलांवर मिऱ्या डोंगराच्या दक्षिण बाजूस १००० फूट उंचीच्या एका टेंकडीवर बांधलेला आहे. त्याची लांबी अर्धा मैल व रुंदी ८० फूट आहे. दक्षिण व पश्चिम या बाजूंस तुटलेला कडा आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता पूर्वेच्या बाजूस कोंडवी नांवाच्या खेड्यावरून आहे. किल्ल्याची सर्वत्र पडापड झालेली आहे. आंत पाण्याचीं कांहीं टांकीं आहेत, परंतु हल्लीं तीं गाळानें भरून गेलीं आहेत. किल्ल्यावरील एक तोफ पायथ्याशीं दिवाणमाळ म्हणून एक लहानसें खेडें आहे तेथें पडली आहे. हा किल्ला बाबराव पाशिलकर नांवाच्या एका मनुष्यानें बांधला. ह्याच्या संबंधानें इतिहासप्रसिद्ध अशी कांहीं एक गोष्ट उपलब्ध नाहीं.

---

# पनवेल तालुका.

—:o:—

९. **मलंगगड**.—याला बाबा मलंग असेंही म्हणतात. हा किल्ला कल्याणचे दक्षिणेस १० मैलांवर कल्याण व पनवेल या तालुक्याचे सीमेवर आहे. हा किल्ला अतिशय बळकट असून त्याचा चढाव फारच बिकट आहे. येथें सुमारें ७०० वर्षांपूर्वी नळ नांवाचा राजा राहत असे, व

त्यानें वर जाण्यास सोपें जावें म्हणून माथ्यापासून तळा-पर्यंत लोखंडी पायऱ्या बसविल्या होत्या. नळ राजाच्या कारकीर्दींत हज्जी अबदुल रहमान नांवाचा एक आरबस्थानांतील मुसलमान साधु आपल्या अनुयायांसह येथें आला, व त्यानें किल्ल्याच्या खालच्या उंचवट्याच्या प्रदेशावर आपला तळ दिला. त्याच्या साधुत्वाची कसोटी लावण्याकरितां नळ राजानें आपली सुस्वरूप कन्या त्याच्याकडे पाठवून दिली. परंतु त्या साधूचे मनांत कोणताही विकार उत्पन्न झाला नाहीं. त्यानें तिला आपल्या कन्येप्रमाणें वागविलें. तेव्हां त्याच्या सद्गुणाविषयीं नळ राजाची खातरी होऊन त्यानें तिचें त्या साधूशीं लग्न लावून दिलें. ह्या गोष्टीस आज ७०० वर वर्षें होऊन गेलीं, परंतु त्या साधूची कीर्ति अद्यापि कायम आहे. हज्जी अबदुल रहमान याच्यापूर्वीं दोन मुसलमानी धर्माच्या पुरुषांनीं त्या डोंगरावर जाण्याचा प्रयत्न केला होता. त्यांपैकीं एक त्याच्या पायथ्याशींच मरून पडला, व त्याची कबर कुंभारली नांवाच्या दरींत गायमुखाजवळ आहे. दुसऱ्याचें नांव बख्त्यार असें होतें, व तो वर चढत असतां वाटेंतच मरण पावला. त्याची ही तेथें कबर आहे. इ० स० १७८० त कांहीं इंग्लिश लोक कल्याण येथें जाऊन राहिले, व ते दोन वर्षेंपर्यंत तेथें होते. पुढें ते तेथून निघून गेले. त्या वेळीं वर सांगितलेल्या साधु पुरुषाच्या प्रभावानें इंग्लिश लोक तेथून निघून गेले असें सर्वांस वाटलें, व पेशव्यांनीं त्या वेळा त्या साधूस एक चादर पाठवून दिली. ही चादर भरगच्ची असून तिला मोत्यें लाविलेलीं होतीं, व तिला चार रुप्याचे पाय बसविलेले होते. काशिनाथपंत

नांवाच्या कल्याण येथील एका ब्राह्मणानें ही चादर मोठ्या थाटानें त्या साधूस अर्पण करण्याकरितां आणिली. तेव्हांपासून त्या कबरेची सर्व व्यवस्था काशिनाथपंताकडेच होती. पुढें इ० स० १८१७ चें सुमारास कल्याणचे मुसलमान लोकांस ती व्यवस्था पसंत न पडून ते व काशिनाथपंताचे वारस यांच्यांत तंटा उपस्थित झाला. तेव्हां हैदाद म्हणून त्या कबरीचा मुजावर होता, त्याच्या नांवानें त्यांनीं कल्याणच्या सुभेदारापुढें इ० स० १८१७ त फिर्याद आणिली. त्या वेळीं चिठ्या टाकून ज्याच्या नांवानें चिठ्ठी निघेल त्यानें त्या कबरेची व्यवस्था पहावी असें ठरलें. पुढें तीन वेळ चिठ्या टाकल्या, व तीन्ही वेळ काशिनाथपंताचे वारसाचे नांवानें चिठ्ठी निघाली. तेव्हांपासून त्याच घराण्यांतील पुरुष त्या कबरेची व्यवस्था पहात आहेत. दरवर्षास या ठिकाणीं दोन वेळ जत्रा भरत असते. एक मे महिन्यांत भरते, व दुसरी फेब्रुवारी महिन्यांत किंवा माघ शुद्ध पौर्णिमेस भरते. ही जत्रा फारच मोठी असते, व तिला कल्याण, पनवेल, ठाणें, मुंबई येथून हजारों हिंदुमुसलमान लोक येतात.

ता० ४ आगष्ट इ० स० १७८० रोजीं कर्नल आबिंगटन नांवाच्या एका गोऱ्या सरदाराच्या हाताखालच्या इंग्लिशांच्या फौजेनें मलंगगडावर हल्ला केला, व त्यांनीं खालच्या किल्ल्याचा भाग आपले ताब्यांत घेतला. त्या वेळीं तेथील शिबंदी वरच्या किल्ल्यांत निघून गेली. इतक्यांत मराठ्यांची तीन हजार फौज आली, व त्यांनीं आबिंगटनचा कल्याणास परत जाण्याचा रस्ता रोखून धरला. त्या वेळीं किल्ल्यांतील शिबंदीनें त्याच्यावर वारं-

वार हल्ले करून त्याला अगदीं जेर करून सोडिलें. पुढें त्याची मुक्तता करण्याकरितां आक्टोबर महिन्यांत कर्नल हार्टले साहेब मुंबईहून निघून कल्याण येथें कपतान जेमसन साहेब यास येऊन मिळाला, व त्यांनीं आर्बिगटन याची मुक्तता केली. इ० स० १८१७ त सर्व कोंकणप्रांत इंग्लिशांचे हातीं आला, परंतु मलंगगडावरील शिबंदी तो किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन करिना. पुढें इ० स० १८१८ त कर्नल केनेडी नांवाच्या साहेबानें शिड्या लावून किल्ल्यावर हल्ला करून तो सर केला.

मलंगगडास जाण्याचा सोपा रस्ता म्हटला म्हणजे प्रथमतः कल्याणास जावें. तेथून सुमारें ८।९ मैल पायवाटेनें गेलें म्हणजे किल्ल्याचे पायथ्याशीं मनुष्य पोहोंचतें. ज्या शिखरावर हा किल्ला बांधलेला आहे, त्याचा आकार तीन मजली हवेलीप्रमाणें आहे, असें म्हटलें तरी चालेल. सुमारें १८०० फूट चढून गेलें म्हणजे पहिल्या मजल्यावर मनुष्य येऊन पोहोंचतें. येथें बरीच झाडी आहे. तसेंच येथें कांहीं कौलारू घरें आहेत, व तेथेंच बाबा मलंगाची कबर आहे. येथून वरचें शिखर सुमारें ९०० फूट उंच आहे. नंतर दुसऱ्या मजल्याची चढण सुरू होते. त्यावर जाण्यास खडक फोडून पायऱ्या तयार केलेल्या आहेत. प्रत्येक पायरीची रुंदी कमींत कमी तीन फूट तरी आहेच. सुमारें ३०० फूट चढाव चढून गेलें म्हणजे दुसऱ्या मजल्यावर मनुष्य येऊन पोहोंचतें. याला खालचा किल्ला असें म्हणतात. या ठिकाणीं झाडझुडूप वगैरे कांहीं एक नसून पाण्याचीही चांगलीशी सोय नाहीं. पूर्वीच्या तटबंदीची बहुतेक पडापड होऊन हल्लीं तेथें फक्त एक लहा-

नशी भिंत, एक मोडकळीस आलेला दरवाजा, व जमीनदोस्त झालेल्या इमारतींचे कांहीं चौथरे एवढेंच कायतें दृष्टीस पडतें. ह्या दुसऱ्या मजल्याच्या पश्चिमेच्या बाजूस तिसऱ्या मजल्यावर किंवा शिखरावर जाण्यास खडक फोडून जिना तयार केलेला आहे. ह्या जिन्याची वाट वांकडीतिकडी असून फार बिकट आहे, व त्याची उंची सुमारें १०० फूट आहे. त्याची प्रत्येक पायरी सुमारें छाती इतकी उंच आहे, व कांहीं ठिकाणीं तिची रुंदी सरासरी २० इंच आहे. कांहीं ठिकाणीं हात पाय ठेवण्यास आधार मिळावा म्हणून खडकांत कोनाडे केलेले आहेत. अशा रीतीनें मोठ्या कष्टानें वरच्या किल्ल्यांत मनुष्य येऊन पोहोंचतें. वरच्या किल्ल्याची लांबी सुमारें ९० यार्ड व रुंदी सुमारें २० यार्ड आहे. आंत औदुंबराचा एक जुना वृक्ष आहे. वर जुनीं टांकीं, व पडापड झालेल्या इमारतींचे चौथरे वगैरेंच्या बऱ्याच खुणा आहेत. या टांक्यांतील पाणी बहुतकरून बारामास टिकतें, व खालच्या किल्ल्यांत पाण्याचा पुरवठा होण्याकरितां येथून एक तांब्याच्या नळ खालीं नेलेला आहे. ह्या ठिकाणाहून पुष्कळ दूरवरच्या प्रदेशाची शोभा फारच रमणीय दिसते.

१०. **चंदेरीगड.**—हा किल्ला पनवेल तालुक्यांत पनवेलच्या नैर्ऋत्येस १० मैलांवर तामसई नांवाच्या खेड्यांत मोडतो. हा किल्ला मलंगगड व पेब किल्ला यांचे मध्यंतरीं एका टेंकडीवर बांधलेला होता. हल्लीं किल्ल्याला तटबंदी वगैरे कांहीं नाहीं. वर फक्त दोन टांकीं व जमीनदोस्त झालेल्या कांहीं घरांच्या खुणा मात्र दृष्टीस पडतात. ह्या किल्ल्याचे संबंधानें ऐतिहासिक अशी कोणतीच गोष्ट उपलब्ध नाहीं.

११. **पेबचा किल्ला.**—यालाच त्रिकटगट असें दुसरें नांव आहे. हा किल्ला पनवेलच्या ईशान्येस नऊ मैलांवर मालदुंगें नांवाच्या खेड्यांत मोडतो. ज्या शिखरावर हा किल्ला बांधलेला आहे, त्याची उंची सुमारें १००० फूट आहे. इ० स० १८१८ त क्याप्टन डिकिन्सन यानें या किल्ल्याची पाहणी केली. त्या वेळीं किल्लयावर जाण्यास दोन रस्ते होते, व ते किल्लयाच्या दरवाज्याशीं दोन बाजूंनीं येऊन मिळत असत. हा दरवाजा शिखराच्या माथ्यापासून सुमारें २० फूट खालीं एका उंच दरीच्या माथ्यावर असून त्याच्या उंबरठयाच्या खालीं सुमारें १८ फूट तुटलेली कड आहे. ह्या किल्ल्याच्या सभोंवार बहुतेक तुटलेला कडा आहे. इ० स० १८६२ त या किल्लयाची बहुतेक पडापड झालेली होती. किल्लयावरील टांक्यांचें पाणी पिण्याच्या लायकीचें नव्हतें, व अन्नसामाग्रीचा पुरवठा जवळपास मिळण्यासारखा नव्हता.

इ० स० १८८१ च्या पाहणींत या किल्लयाचें असें वर्णन केलें आहे कीं, नेरळ स्टेशनापासून सुमारें ६ मैलांवर हा किल्ला असून त्या बाजूनें किल्लयावर जाण्याची वाट बरीच सोपी आहे. किल्ल्याचे पायथ्याशीं पेबी नांवाच्या देवीचें देवालय आहे, व त्यावरून त्या किल्लयाला पेब हें नांव पडलें असावें. टेंकडीच्या सुमारें मध्यावर म्हशा देवाचें देवालय आहे. येथून सुमारें पाव मैलावर दोन गुहा असून एक खडकांत खोदलेलें टांकें आहे. येथून वर जावयाचें असेल तर खडकांत मेखा मारून व त्याला दोर बांधून वर चढलें पाहिजे. माथ्यावर मोठमोठ्या इमारतींचे अवशेष भाग आहेत, व एक टांकें आहे. त्यांत पाणी

बारामास असतें. याशिवाय वर ४०।५० ल्हान ल्हान घरांच्या खुणा दृष्टीस पडतात.

१२. **प्रबळचा किल्ला.**—हा किल्ला पनवेलच्या पूर्वेस ८ मैलांवर व माथेरानच्या पश्चिमेस ४ मैलांवर प्रबळ नांवाच्या एका उथळ टेंकडीवर बांधलेला आहे. समुद्राचे पृष्ठभागापासून याची उंची २३२५ फूट आहे. या किल्लयाची हल्लीं सर्वत्र पडापड झालेली आहे. परंतु पूर्वी या किल्लयाच्या तटाला ११ बुरूज असून त्याला दोन दरवाजे होते. इ० स० १८१८ त या किल्लयाच्या पडापडीस प्रारंभ झाला होता, व किल्लयावर फक्त तीन चार इमारतींच्या भिंती मात्र शिलक होत्या. त्या वेळीं किल्लयाच्या माचींवर लागवड केलेली होती. किल्लयांत कांहीं लोक आपलीं गुरें-ढोरें घेऊन राहत असत. तसेंच त्या वेळीं माथ्यावर एक लहानसें तळें होतें.

इ० स० १८२८ त पुरंदरच्या आसपास रामोशी लोक उठून त्यांनीं त्या प्रांतास फारच उपद्रव दिला होता. त्या वेळीं त्यांची ३०० लोकांची एक टोळी कोंकणांत उतरली, व ते प्रबळ किल्लयाचे आश्रयास येऊन राहिले. त्यांनीं त्या वेळीं एक जाहीरनामा सर्व लोकांत वाटला. तो जाहीरनामा येणेंप्रमाणें:—

" तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, आम्ही राजेश्री उमाजी नाईक व भुराजी नाईक—मुख्य तळ पुरंदर-किल्ला—सुरुसन सुम्मा अश्रीन मैयातैन व अलफ १८६७ या सालीं दक्षिण-कोंकणांत रत्नागिरी व उत्तर-कोंकणांत साष्टी या दोन प्रांतांतील खेड्यांतील पाटील, महार, व इतर लोक ...

आपल्या खेड्यांत होणाऱ्या उत्पन्नाबद्दल ब्रिटिश सरकारास एक पैही वसूल देऊं नये. हा हुकूम जो कोणी अमान्य करील, त्याची चीजवस्त जाळून टाकून त्याला आमचे तरवारीस बळी दिलें जाईल. सर्व वसूल आम्हांस देत जावें. ह्या जाहिरनाम्याची प्रत करून तुम्हीं आपणापाशीं ठेवाल म्हणून हा तुम्हांकडे पाठविलेला आहे. हुकुमाप्रमाणें कुरकुर न करतां तुम्हांला वागलेंच पाहिजे. हा हुकूम अमान्य कराल तर तुमच्या सर्व खेड्यांचा विध्वंस करून टाकूं. ता० २९ दिजंबर इ० स० १८२७ रोजीं हा जाहिरनामा आमच्या खुद्द शिक्क्याखालीं प्रसिद्ध केला आहे.

इ० स० १८८१ च्या पाहणींत या किल्ल्याचे संबंधानें असें लिहिलेलें आहे कीं, किल्ल्याच्या तटाची पडझड झालेली आहे. आंत पूर्वेच्या बाजूस दोन व पश्चिमेच्या बाजूस एक मिळून तीन टाकीं आहेत. तटबंदी पैकीं सहा बुरूज जीव धरून आहेत. इतिहासप्रसिद्ध अशी एखादी गोष्ट या किल्ल्यांत घडून आल्याबद्दल कोठें माहिती मिळत नाहीं.

**१३. विशाळगड.**—हा किल्ला मलंग किल्ल्याच्या दक्षिणेस, व चौकच्या उत्तरेस तीन मैलांवर लडळ नांवाच्या खेड्यांत मोडतो. ज्या टेंकडीवर हा किल्ला होता, तिला तेथील लोक जिनखोड असें म्हणतात, व माथेरान येथें हवा खाण्याकरितां जाणारे इंग्लिश लोक तिला सॅडल् हिल असें म्हणतात. किल्ल्याला तट वगैरे कांहीं नाहीं. फक्त माथ्यावर खडकांत खोदलेलीं सहा पाण्याचीं टाकीं, व चार खडकांत खोदलेल्या कोठड्या आहेत. त्यांपैकीं एका कोठडींत

विशाळा देवीची मूर्ति बसविलेली आहे. या किल्ल्याचे संबंधानें ऐतिहासिक माहिती कांहीं नाहीं.

१४. **माणिकगड.**—हा **माणिक** नांवाच्या डोंगरावर बांधलेला असून त्याची उंची १८७८ फूट आहे. हा किल्ला **पनवेलच्या** आग्नेयीस सुमारें १९ मैलांवर असून त्याचे पायथ्याशीं **माणिकगड** नांवाचें खेडें आहे. किल्ल्याच्या पूर्व, पश्चिम व उत्तर या बाजूंस तुटलेला कडा असल्यामुळें वर जाण्याची मुळींच सोय नाहीं. फक्त दक्षिणेच्या बाजूकडून वर जातां येतें. किल्ल्याचें बांधकाम ओबडधोबड असून तो **आंग्रयांनीं** बांधला असावा, असें वाटतें. इ० स० १७१३ त **शाहूमहाराज** व **कान्होजी आंग्रे** यांच्यामध्यें **बाळाजी विश्वनाथाच्या** मध्यस्थीनें सलोखा झाला, त्या वेळीं **शाहूमहाराजांनीं** तो **कान्होजीस** दिला. किल्ल्यावर पाण्याची सोय चांगली आहे. हल्लीं त्याची बहुतेक पडापड झालेली आहे. याचे संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

१५. **करनाळा किल्ला.**—हा किल्ला **पनवेलच्या** दक्षिणेस ८ मैलांवर, **वेगवती** नदीच्या वायव्येस एका १५६० फूट उंचीच्या टेंकडीवर बांधलेला आहे. हा किल्ला **बोरघाटांतून पनवेलीवरून आपट्याकडे** जो हमरस्ता जातो, त्या रस्त्याला लागूनच असल्यामुळें त्याला पूर्वीं विशेष महत्त्व आलेलें होतें. या किल्ल्याचे वरचा किल्ला व खालचा किल्ला असे दोन भाग आहेत. वरच्या किल्ल्याला मध्यभागीं एक सुमारें १०० पासून १५० फूटपर्यंत उंचीचा सुळका आहे. खालच्या किंवा बाहेरच्या किल्ल्याला मजबूत तट असून आंत जाण्यास वायव्य

दिशेच्या कोंपऱ्यांत एक दरवाजा आहे. ह्या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे तेथूनच आंतल्या किंवा वरच्या किल्ल्यावर जाण्याचा रस्ता लागतो. वरच्या किल्ल्याच्या सभोंवारही तट बांधलेला आहे. वर जाण्यास खडक फोडून पायऱ्या तयार केलेल्या आहेत. ह्या पायऱ्या सुरू होतात तेथें, व त्या संपतात त्या ठिकाणीं, असे दोन दरवाजे बांधलेले आहेत. येथून पुढें गेलें म्हणजे एक दुहेरी दरवाजा लागतो, व त्याच्या मध्यंतरीं एक खोली आहे. हे दरवाजे व मागें सांगितलेला डोंगराच्या मध्यभागीं असलेला सुळका यांचे-मध्यें पडापड झालेल्या इमारतींच्या खुणा आहेत. ह्या सुळक्याच्या उत्तर बाजूस त्याच्या पायथ्याशीं कांहीं पाण्याचीं टांकीं व धान्यसामग्री ठेवण्याकरितां कांहीं कोठड्या खडक पोंखरून तयार केलेल्या आहेत. ह्या सुळक्याला पांडवकृत्य असें म्हणतात. ह्या सुळक्यावर बहुतकरून मधमाशांचीं पोळीं असतात, व तीं काढण्या-करितां क्वचित् प्रसंगीं लोक वर चढतात. ह्या किल्ल्याच्या वायव्य बाजूस बरीच झाडी आहे, व येथून मुंबई बंदराचा देखावा फारच मजेचा दिसतो. ह्या किल्ल्यांत एक मराठी व एक फारशी असे दोन शिलालेख आहेत. मराठी भाषेंत लिहिलेला लेख खालचे दरवाज्याचे आंतले अंगास आहे. ह्यांतील मजकूर फार त्रोटक लिहिलेला असल्यामुळें तो वाचतां येत नाहीं. फक्त दुसऱ्या व तिसऱ्या ओळींत " मालूजी गंभीरराव ठाणदार " येवढें नांव वाचतां येतें. फारशी भाषेंतील शिलालेख वरच्या दरवाज्याच्या बाहेरच्या बाजूस आहे, व त्यांत " सय्यद नूरुद्दिन महमदखान,

हिजरी ११४६, " ( इ० स० १७३९ ), असें नांव लिहिलेलें आहे.

जरवीस साहेबांनीं कोंकणचा जो इतिहास लिहिला आहे, त्यांत ते असें लिहितात कीं, देवगिरीचे यादव राजे ( इ० स० १२४८-१३१८ ), व दौलताबादचे मुसलमान बादशाहा ( इ० स० १३१८-१३४७ ) या दोन राजघराण्यांच्या कारकीर्दीत त्यांच्या उत्तर-कोंकणांतील प्रांताचें मुख्य ठाणें करनाळा येथें होतें. इ० स० १५४० पर्यंत तो किल्ला गुजराथी सैन्याच्या ताब्यांत होता. परंतु त्याच वर्षीं अहमदनगरच्या मुसलमानी फौजेनें तो त्यांच्यापासून घेतला. त्या वेळीं गुजराथी सरदार पोर्तुगीज लोकांजवळ मदत मागण्याकरितां वसई येथें आले. त्या वेळीं पोर्तुगीज लोकांनीं आपले ३०० लोक त्यांचे मदतीस दिले, व त्यांनीं तो किल्ला मुसलमानांपासून परत घेतला. पुढें थोड-क्याच काळानें अहमदनगरचें सैन्य पुनः तो किल्ला घेण्याकरितां आलें. त्या वेळीं गुजराथी सैन्याचा मुख्य सर-दार वसई येथें गेला, व " तुम्हीं या किल्ल्याचें रक्षण केल्यास मी तो तुमच्या स्वाधीन करीन " असें त्यानें पोर्तुगीज लोकांशीं बोलणें लाविलें. त्या वेळीं वसई येथील पोर्तुगीज सैन्याचा सरदार कपतान मेनेसेस हा आपल्या फौजेसह करनाळा येथें आला, व त्यानें अहमदनगरच्या सैन्यास पिटाळून लाविलें. पुढें कांहीं वर्षांनीं अहमद-नगरचा बादशाहा बुऱ्हाण निजामशाहा यास खुश करण्याकरितां त्याच्यापासून सालीना १५९०० रुपये घेण्याचा ठराव करून पोर्तुगीज लोकांनीं तो किल्ला यास दिला. इ० स० १६७० त शिवाजीनें हा किल्ला

मोंगलांपासून जिंकून घेतला. शिवाजी वारल्यावर तो किल्ला पुनः औरंगजेबानें जिंकून घेतला, व किल्ल्यांतील फारशी शिलालेखावरून तो इ० स० १७३९ पर्यंत मोंगलांचे ताब्यांत असावा, आणि पुढें लौकरच तो मराठ्यांचे हातांत गेला असावा असें वाटतें. कारण इ० स० १७४० त त्या प्रांतांत पेशव्यांचा सर्वत्र अंमल बसला होता. इ० स० १८०३ च्या मे महिन्यांत इंग्लिशांच्या १३ व्या पायदळ पलटणीची एक टोळी दुसरे बाजीराव पेशवे यांच्या वतीनें तो किल्ला घेण्याकरितां गेली, व तिनें दरवाज्यावर एकदम मोठा नेट करून किल्ला आपले ताब्यांत घेतला. इ० स० १८१८ त कर्नल प्रोथर यानें हा किल्ला मराठ्यांपासून जिंकून घेतला. हल्लीं या किल्ल्याची बरीच पडापड झालेली आहे.

---

## कर्जत तालुका.

—:o*o:—

१६. **तुंगी किल्ला.**—हा किल्ला कर्जत तालुक्यांत नेरळच्या पूर्वेस १२ मैलांवर खानदस नांवाच्या खेड्याजवळ आहे. ज्या टेंकडीवर हा किल्ला बांधलेला आहे, तिची उंची २०१९ फूट आहे. नेरळ स्टेशनावरून भिमाशंकराच्या पायथ्याशीं जो पठाराचा प्रदेश आहे, तिकडे दृष्टि फेंकिली म्हणजे हा किल्ला दृष्टीस पडतो. ज्या डोंगरावर हा किल्ला बांधलेला आहे, त्याचा स्वतस्सिद्ध बदोबस्त फार चांगला आहे. ह्या किल्ल्याचे संबंधानें इतिहासप्रसिद्ध अशी गोष्ट उपलब्ध नाहीं.

**१७. कोटळीगड.**—हा किल्ला नेरळच्या पूर्वेस १२ मैलांवर व कर्जतच्या ईशान्येस १४ मैलांवर एका सुळक्यावर बांधलेला असून तो पेठ नांवाच्या खेड्यांत मोडतो. याची लांबी १६० यार्ड व रुंदी ६० यार्ड आहे. पेठ हें खेडें सह्याद्रीच्या एका उंचवट्याच्या प्रदेशावर आहे; व याच उंचवटयाचा एक सुळक्यासारखा भाग उंच गेलेला आहे, त्यावर हा किल्ला बांधलेला आहे. वर सांगितलेल्या उंचवट्याच्या प्रदेशाची चढण बरीच अवघड आहे. कौलाचा घाट व नाकिंद घाट हे या किल्ल्याच्या माऱ्यांत आहेत. ह्या किल्ल्याचा चढाव इतका बिकट आहे कीं, किल्ल्यांत अगदीं थोडे लोक असले तरी ते, जवळ धान्यसामग्री असेल तर, केवढयाही सैन्यास दाद देणार नाहींत. किल्ल्याचा दरवाजा शाबूत असून आंत दोन पाण्याचीं टांकीं आहेत. त्याची तटबंदी साधारण रीतीचीच आहे.

इ० स० १८१७ च्या नवंबर महिन्यांत बापूराव नांवाच्या एका मराठ्यानें दुसरे बाजीराव पेशवे यांच्या वतीनें हा किल्ला इंग्लिशांपासून घेतला. परंतु लगेच दिसेंबर महिन्याच्या ३० व्या तारखेस इंग्लिशांचा सरदार कप्तान ब्रूक्स यानें तो परत जिंकून घेतला. इ० स० १८६२ पर्यंत हा किल्ला नीट दुरुस्त होता, व तेथें पाणी व धान्यसामग्री यांची सोय फार चांगली होती. इ० स० १८८०त या किल्ल्याचे संबंधानें अशी हकीकत लिहिलेली आहे कीं, या किल्ल्याला तीन तट असून तीन दरवाजे आहेत. किल्ल्यावर जाण्याच्या पायऱ्या उभ्या असून कांहीं ठिकाणीं खडक फोडून तयार केलेल्या आहेत, व कांहीं ठिकाणीं खडक पोंखरून तयार केलेल्या आहेत, किल्ल्याच्या शिख-

राजवळ एक गुहा किंवा तळघर असून त्याचे दगडी खांब फार सुरेख आहेत. किल्ल्यांत सुमारें पांच फूट लांबीच्या कांहीं तोफा, व कांहीं पंचरशी व कांहीं लोखंडी असे तोफांचे गोळे पडलेले आहेत.

१८. भिवगड.—याला भीमगड असेंही म्हणतात. हा किल्ला कर्जतच्या पूर्वेस सुमारें ३ मैलांवर एका ५०० पासून ६०० फूट उंचीच्या टेंकडीवर बांधलेला आहे. किल्ल्यांत दोन तीन पाण्याचीं टांकीं आहेत. त्याच्या तटाची हल्लीं बहुतेक पडापड झालेली आहे. या किल्ल्याचे संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

१९. ढकचा किल्ला —हा किल्ला कर्जतच्या पूर्वेस सुमारें पांच सहा मैलांवर सह्याद्रीच्या पश्चिमेकडे फुटलेल्या एका २८९८ फूट उंचीच्या शिखरावर बांधलेला आहे. ज्या टेंकडीच्या शिखरावर हा किल्ला बांधलेला आहे, तिच्या वायव्येकडील उतरणीवर कांहीं कोरींव लेणीं आहेत, परंतु तेथें जातां येत नाहीं. किल्ल्याची एक भिंत बरीच लांब गेलेली आहे. याचे संबंधानें ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं.

## रोहें तालुका.

—:०*०:—

२०. अवचितगड—हा किल्ला कुंडलिका नदीच्या उत्तरेस रोह्यापासून तीन मैलांवर रोहें आणि अलीबाग व पेण या तालुक्यांच्यामध्यें जो डोंगर आहे, त्याच्या एका शिखरावर बांधलेला आहे. या शिखराची उंची सुमारें

९७७ फूट आहे. दक्षिण बाजूस रोह्याकडून व उत्तर बाजूस मेढें म्हणून एक गांव आहे, तेथून किल्ल्यावर जाण्याला वाटा आहेत. दरवाज्याच्या दोन बाजूंस दोन बुरूज आहेत. परंतु त्यांपैकीं एक हल्लीं पडला आहे. दरवाज्याच्या पुढच्या बाजूस एक कंगोऱ्यासारखा डोंगराचा भाग आहे, तेथें पूर्वी दरवाज्याच्या संरक्षणाकरितां एक बुरूज बांधलेला होता असें सांगतात.

किल्ल्याचा तट बिनटांकीच्या मोठमोठ्या दगडांनीं बांधलेला आहे. त्याच्या दोन्ही टोंकांस दोन गोपुरासारखे उंच बुरूज आहेत. दक्षिणेकडील बुरुजाच्या भिंतींत "श्रीगणेशायनः श्रीजयदेव शके १७१८ नलनामसंवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा" असा शिलालेख आहे. वर सांगितलेल्या दोन्ही बुरुजांवरून सभोंवारच्या प्रदेशाचा देखावा फार भव्य व मनोहर दिसतो. उत्तरेस मिऱ्याडोंगर व रतनगड हे डोंगर आपली डोकीं उंच करून आपणाकडे टक लावून पहात आहेत असें वाटतें. दक्षिणेस व पश्चिमेस वळणावळणांनीं वाहत जाणारी कुंडलिका नदी व तिच्या कांठचा हिरवा गार सुपीक प्रदेश दृष्टीस पडतो, व पूर्वेस सह्याद्रीचीं उंच गेलेलीं शिखरें—विशेषतः खंडाळा व ड्यूक्स नोज हीं शिखरें—खालचा कोंकणचा सुपीक प्रदेश पाहून आपली स्थिति त्यांच्याप्रमाणें नाहीं असें पाहून त्या प्रदेशाचा हेवा करीत आहेत कीं काय असें वाटतें. किल्ल्यांत एक मोठी व दोन लहान अशा तीन तोफा आहेत. किल्ल्याचा दक्षिण भाग उत्तर भागापेक्षां रुंद असून त्याची तटबंदीही मजबूत आहे. तटाला मध्यंतरीं एक बुरूज आहे, व त्याच्या पश्चिमेकडील टोंकास दुसरा एक लहानसा बुरूज

आहे. त्यावर एक लहानशी तोफ आहे. दुसरी एक तोफ बालेकिल्ल्याच्या वायव्येकडील टोंकावर पडलेली आहे, व पूर्वीं तोफेच्या तोंडीं देण्याची एखाद्याला शिक्षा झाली म्हणजे त्याला ह्या तोफेच्या तोंडीं देत असत असें सांगतात. येथें जवळच एक सपाट जागा असून तेथें कांहीं लहान लहान खळगे आहेत. तेथें पूर्वीं वधस्तंभ पुरलेले होते असें सांगतात.

किल्ल्यांत पाहण्यासारख्या इमारती उत्तरेकडील बुरुजाजवळ आहेत. येथें एक पडापड झालेला वाडा आहे. त्यांत पूर्वीं किल्ल्याचा सुभेदार राहत असे. त्याच्या एकंदर स्थितीवरून तो वाडा पूर्वीं फार मोठा व सुंदर असावा असें अनुमान होतें. त्याच्या ईशान्येस एक बुरूज असून त्याच्या दक्षिणेकडील भिंतींत एक दरवाजा आहे. मुख्य दरवाज्याच्या समोर सदरकचेरीची इमारत होती. हल्लीं तिचा एक कोंपरा मात्र अवशेष आहे. हिची लांबी ६० फूट व रुंदी ४० फूट आहे. हिच्या दक्षिणेस बालेकिल्ला आहे. हा ३०० यार्ड लांब व १०० यार्ड रुंद आहे. बालेकिल्ल्याच्या उत्तरेच्या बाजूस दोन्ही टोंकांशीं दोन दरवाजे असून शिवाय दक्षिणेकडच्या भिंतींतही एक दरवाजा आहे. बालेकिल्ल्याचा तट भक्कम असून त्याला पुष्कळ बुरूज आहेत. आंत एक द्वादश कोनी पाण्याचा हौद असून त्याला खालीं उतरण्यास पायऱ्या आहेत. आंत सुमारें १२ फूट पाणी आहे. जवळच पश्चिमेच्या अंगास खडकांत खोदलेलीं पाण्याचीं ७ टांकीं आहेत. ह्यांपैकीं एक महार लोकांसाठीं होतें. ह्या टांक्यांच्या मध्यभागीं बापूजी पाशिलकर म्हणून पूर्वीं कोणी किल्ल्याचा हवालदार होता, त्या-

थडगें आहे. ह्याला सरकारांतून सालीना ३२ रुपयांची नेमणूक आहे. ह्या थडग्याच्या पुढें एक दिपमाळ आहे, व तेथें बापूजीची प्रतिमा खोदलेली आहे. बालेकिल्लयाच्या वायव्येस महादेवाचें देवालय आहे, व आंत गणपति, पार्वती व विष्णु अशा आणखी तीन मूर्ति आहेत. बाले-किल्ला व मुख्य किल्लयाची दक्षिणबाजू यांच्या दरम्यान पुष्कळ जमीनदोस्त झालेलीं लहान लहान घरें आहेत.

इ० स० १८१८ च्या फेब्रुवारी महिन्यांत कर्नल प्रोथर साहेब ह्यानें हा किल्ला सर केला. हा किल्ला शिवाजीनें बांधला अशी दंतकथा सांगतात. किल्लयाचें काम शेख महंमद नांवाच्या मनुष्यानें केलें. किल्लयाचें एकंदर काम फार घाईघाईनें केलेलें दिसतें, व त्यामुळेंच त्याला अवचितगड हें नांव दिलें असावें.

२१. **बिरवाडीचा किल्ला.**—हा किल्ला रोह्याच्या नैर्ऋत्येस ६ मैलांवर रोहें तालुक्यांतून नैर्ऋत्य दिशेनें जी डोंगरांची रांग पसरली आहे, तिच्या शेवटीं आहे. ईशान्य बाजू शिवायकरून बाकी सर्व दिशांनीं किल्लयाच्या पायथ्याशीं भातशेती आहे. हा किल्ला फक्त रेवदंडयाच्या खाडींतून दृष्टीस पडतो. बाकी दुसऱ्या आसपासच्या ठिकाणांहून त्याच्या सभोंवार दुसरे उंच डोंगर असल्यामुळें तो दृष्टीस पडत नाहीं. किल्लयावर जाण्याचा एक रस्ता रोह्याहून बिरवडीस जो रस्ता येतो त्यांतून फुटतो. दुसरा एक रस्ता खर नांवाच्या खेड्यांतून आहे. ह्या रस्त्यानें किल्लयावर जाण्याला निघालें म्हणजे वाटेनें एक ओसाड गांव दृष्टीस पडतें, किल्लयाच्या तटाची पुष्कळ ठिकाणीं पडापड झालेली आहे. दरवाजा उत्तरेकडील कोंपऱ्यांत असून

त्याच्या दोन्हीं अंगांस दोन बुरूज आहेत. आंत पाण्याचीं ४ टांकीं आहेत. त्यांपैकीं एक फुटून गेल्यामुळें त्यांत पाणी नाहीं. किल्ल्यांतील अतिशय उंच शिखर त्याच्या तटापासून २०० फूट व त्याच्या पायथ्यापासून ८०० फूट उंच आहे. ह्या शिखरावर पूर्वी एक ४० फूट लांब व ३० फूट रुंद अशी इमारत होती. तिचा हल्लीं एक लहानसा कोंपरा मात्र अवशेष राहिला आहे ह्या शिखरावरून आसपासच्या प्रदेशाचा देखावा रमणीय दिसतो. परंतु तो फार लांब दृग्गोचर होत नाहीं. ईशान्य बाजूस सह्याद्रीचीं गगनचुंबित शिखरें दृष्टीस पडतात. पूर्वेच्या बाजूस कांहीं थोडा लांबचा प्रदेश नजरेस पडतो. येथून रेवदंड्याच्या खाडीचा वळणावळणांनीं वाहत जाणारा प्रवाह व किल्ल्याच्या खालच्या अंगास खाडीच्या किनाऱ्यावर असलेलीं [1]बिरवाडी, चन्हेरें, खेर, चाडगांव, तळवडें वगैरे खेडीं ह्यांचा देखावा पाहून मनाला फार आनंद होतो. किल्ल्याच्या पायथ्याशीं एक मुसलमानाचें थडगें आहे, व तें फार जुनें असावें असा तर्क आहे; व त्यावरूनच त्या खेड्याला शेखबिरवाडी हें नांव पडलें असावें. शिवाजीनें इ०स० १६४८त कल्याण परगणा काबीज केला, त्या वेळीं तिकडील मुलुखाच्या बंदोबस्ताकरितां त्यानें प्रथमतः बिरवाडी व लिंगाणा हे दोन किल्ले बांधले. इ० स० १८१८ त हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला.

**२२. घोंसाळगड किंवा घोंसाळें किल्ला.**—हा किल्ला रोह्याचे दक्षिणेस ६ मैलांवर रेवदंड्याची खाडी व साळव्याची खाडी यांच्यामध्यें जो डोंगरी प्रदेश आहे,

---

१ बिरवाडी नांवाचें दुसरें एक गांव महाड तालुक्यांत आहे.

त्यापैकीं एका टेंकडीवर बांधलेला आहे. ह्याच्या दक्षिण, पूर्व व उत्तर ह्या बाजू बऱ्याच सखल आहेत, व खाडीच्या भरतीचें पाणी किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत येतें. फक्त पश्चिमेच्या बाजूस मात्र डोंगराची बाजू बरीच उंच आहे. ह्याची उंची सुमारें १००० फूट आहे. तळें येथील किल्ला ह्याच्या शेजारींच आहे. फक्त मध्यें खाडी मात्र आहे. किल्ल्यावर जाण्याचा चांगला रस्ता उत्तरेच्या बाजूनें आहे, व तो घोंसाळें नांवाच्या खेड्यांतून फुटतो. किल्ल्याची पडापड झाल्यामुळें दरवाजा कोठें होता तें कळत नाहीं. किल्ल्याजवळ भवानीचें एक व गणपतीचें एक अशीं दोन देवालयें आहेत. तटाची रुंदी ४ फूट आहे. किल्ल्याच्या पश्चिम भागाला खेंकडा असें म्हणतात. येथें एक बुरूज आहे, व त्याच्या मध्यंतरीं एक खळगा आहे. तेथें पूर्वीं निशाणकाठी होती. पूर्वीं ज्या ठिकाणीं किल्ल्याचा दरवाजा होता, म्हणून सांगतात, तेथें एक पडापड झालेली इमारत आहे. ही पूर्वीं बंदीखान्याची जागा होती. ह्या इमारतीच्या दक्षिणेकडच्या भिंतींत एक कमानदार दरवाजा आहे, व तेथून खालीं उतरण्यास पायऱ्या आहेत. ह्या पायऱ्या पूर्वीं किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत असाव्या असा तर्क होतो. येथें पुष्कळ कमावलेले दगड पडले असून त्यांपैकीं दोन दगडांवर वाघाचीं चित्रें खोदलेलीं आहेत. हे वाघ पूर्वीं दरवाज्यावर बसविलेले होते, असें सांगतात. किल्ल्यांत कांहीं पाण्याचीं टांकीं आहेत, परंतु त्यांचें पाणी पिण्यासारखें नाहीं. घोंसाळें किल्ला कधीं व कोणीं बांधला तें कळत नाहीं. सोळाव्या शतकांत तळें, घोंसाळें व रायगड हे किल्ले निजामशाही घराण्याच्या

ताब्यांत होते, असा दाखला सांपडतो. इ० स० १६३० त तो विजापुरच्या बादशाहाच्या अमलाखालीं असून जंजिऱ्याच्या शिद्दीच्या ताब्यांत होता. शिद्दीनें त्यावर एक मराठा किल्लेदार नेमिला होता. त्यानें इ० स० १६४८ त तो किल्ला शिवाजीला दिला. इ० स० १६५९ त विजापुरच्या बादशाहाचा सेनापति अफझुलखान शिवाजीला धरून नेण्याची प्रतिज्ञा करून इकडे आला, तेव्हां शिद्दीनें ह्या किल्ल्याला वेढा दिला. परंतु पुढें अफझुलखानाच्या मृत्यूचें वर्तमान शिद्दीला कळतांच तो वेढा उठवून पळून गेला. इ० स० १७३५ त तो किल्ला पहिले बाजीराव पेशव्यांनीं घेतला, व पुढें शिद्दी व मराठे यांच्यांत जो तह झाला, त्यांत तो मराठ्यांस मिळाला. इ० स० १८१८ त रायगडास वेढा देण्याच्या पूर्वीं तो किल्ला कर्नल प्रोथर साहेबानें घेतला. ह्यापुढें त्याच्या संबंधानें कांहीं एक गोष्ट घडून आली नाहीं.

**२३. सुरगड.**—हा किल्ला रोह्यापासून ८ मैलांवर एका लांब पण अरुंद अशा टेंकडीवर बांधलेला आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीं भातशेतीचीं मोठमोठीं खाचरें आहेत. उत्तर, पूर्व व पश्चिम या दिशांकडे भयंकर तुटलेला कडा असल्यामुळें त्या बाजूंस तट वगैरे कांहीं नाहींत. वर जाण्याचा रस्ता दक्षिणेच्या बाजूस आहे. वर चढतांना वाटेंत अणसाई भवानीचें देवालय लागतें. किल्ल्याच्या ह्या बाजूस मात्र तटबंदी आहे. आंत पाण्याचीं कांहीं टांकीं, मारुतीचें एक व महादेवाचें एक अशीं दोन देवालयें, व एक बिनछपरी घर येवढें आहे. ह्या घराला अंधारकोठडी असें म्हणतात. याशिवाय आंत एक मुसलमानांचा दरगा आहे. व सदरकचेरीची जागा आहे. किल्ल्यांत बाले-

किल्ला आहे. त्याला बुरूज असें म्हणतात. तो त्रिकोणाकृति असून त्याची प्रत्येक बाजू १९० यार्ड लांबीची आहे. आग्नेयीकडील एका बुरुजाजवळ एक दगड आहे, व त्यावर आरबी व देवनगरी या लिपींत लिहिलेला एक शिलालेख आहे. त्याचा सारांश असा आहे कीं, " हा किल्ला शिदी साहेब याच्या हुकमावरून बांधला. किल्ला बांधणाराचें नांव सुर्याजी व किल्लयाच्या सुभेदाराचें नांव तुकोजी हैबत." इ० स० १८१८ च्या फेब्रुवारी महिन्यांत कर्नल प्रोथर यानें हा किल्ला घेतला. हा किल्ला शिवाजीनें बांधला अशी दंतकथा सांगतात. वर सांगितलेल्या इमारतींशिवाय किल्लयांत दुसरीं पुष्कळ जमीनदोस्त झालेलीं घरें दृष्टीस पडतात.

---

## माणगांव तालुका.

—:०*०:—

**२४. तळगड किंवा तळें किल्ला.**—हा किल्ला समुद्राच्या पृष्ठभागापासून १००० फूट उंच व तळें गांवापासून ४०० फूट उंच असून तो देवाचा डोंगर किंवा भुरा डोंगर याच्या अगदीं पूर्वेकडच्या टोंकावर बांधलेला आहे. किल्लयाच्या पायथ्याशीं सर्व बाजूंची चढण फार सोपी आहे. परंतु जसजसें माथ्याकडे जावें, तसतशी ती चढण अगदीं उभी होत गेली आहे, त्यामुळें वर जाण्यास फार प्रयास पडतात. हा किल्ला घोसाळें किल्लयावरून स्पष्ट दिसतो. त्याचा दरवाजा आग्नेयी दिशेस आहे, व वर जाण्याचा रस्ता तळें गांवच्या पूर्वेच्या बाजूनें फुटतो. वर

चढतांना एक पोलीसचौकी व राजपुरीच्या महालकऱ्याच्या कचेरीची जागा लागते. ह्या कचेरीच्या बाहेरच्या बाजूस १६ तोफा आहेत, व वरच्या बाजूस एक मशीद आहे. किल्ल्याला तिहेरी तट आहे, व दरवाज्याच्या दोन बाजूंस दोन बुरूज आहेत. परंतु हल्लीं त्यांची पडापड झालेली आहे. किल्ल्याच्या दरवाज्याला हनुमान दरवाजा असें म्हणतात. दरवाज्याच्या आंत एक मोठें टांकें आहे, व त्यांत पाणी विपुल आहे. किल्ल्याची लांबी ४०० यार्ड व रुंदी ३० यार्ड आहे. आंत सदरकचेरीची एक इमारत, एक मशीद, खडकांत खोदलेल्या पुष्कळ खोल्या, धान्याचीं भुयारें, तळघरें, पाण्याचीं टांकीं, रत्नाकर महादेवाचें देवालय—याला कोणी भवानीचें देवालय असेंही म्हणतात— वगैरे पाहण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. महादेवाचे देवालयाचे पश्चिमेस एक खपरेल नाहीं असें घर आहे, याला लक्ष्मीकोठी असें म्हणतात.

इ० स० १६४८ त हा किल्ला शिवाजीनें विजापुरकरांपासून घेतला. इ० स० १६५९ त जंजिऱ्याच्या शिद्दीनें या किल्ल्याला वेढा दिला होता. परंतु शिवाजीनें अफजुलखानास ठार मारून विजापुरच्या सैन्याचा फडशा उडवून दिला, ही बातमी शिद्दीस कळतांच तो वेढा उठवून पळून गेला. पुढें शिवाजीच्या मरणानंतर शिद्दीनें तो घेतला. परंतु इ०स० १७३९त पहिले बाजीराव पेशव्यांनीं तो शिद्दीपासून घेतला; व पुढें मराठे व शिद्दी यांच्यांत जो तह झाला, त्यांत तो मराठ्यांकडेच राहिला. इ०स० १८१८ त तो प्रोथर साहेबानें घेतला. त्यानें माणगांव तालुक्यांतील इंदापूर नांवाच्या गांवाहून कॅपटन रोझ व मेजर मूर या दोन

सरदारांस बरोबर सैन्य देऊन किल्ला घेण्याकरतां पाठवून दिलें. त्यांनीं किल्ल्यावर हल्ला करून तो घेतला, व किल्लेदारास कैद केलें. हल्लीं या किल्ल्याची बरीच पडापड झालेली आहे.

२५. **विश्रामगड**.—हा किल्ला **पुणें** जिल्हा, **कुलाबा** जिल्हा व **भोर** संस्थान यांच्या तिठ्ठयावर **माणगांवच्या** आग्नेयीस १३ मैलांवर समुद्राच्या पृष्ठभागापासून २००० फूट उंच अशा, **सह्याद्रीच्या** एका एकीकडे झुकलेल्या फांद्यावर बांधलेला आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता **जितें** नांवाच्या खेड्यावरून आहे. हा किल्ला ७० फूट लांब व ३८ फूट रुंद आहे. किल्ल्याची हल्लीं पडापड झालेली आहे. किल्ल्याच्या तीन बाजूंस खोल खोल कडे असल्यामुळें तिकडे भिंत वगैरे बांधलेली नाहीं. फक्त पूर्वेच्या बाजूस २४ फूट उंचीची भिंत बांधलेली आहे. पूर्वेकडे एक मोठा बुरूज आहे, त्यावरून घोर अपराध करणारांस पूर्वीं ढकलून देत असत. किल्ल्यांत स्वच्छ पाण्याचीं तीन टांकीं आहेत. शिवाय धान्य सांठविण्याकरतां खडकांतून कांहीं भुयारें खोदलेलीं आहेत. किल्ल्यांत १०० फूट उंचीवर एक खोली आहे. तेथें पूर्वीं एक मोठा सिद्ध पुरुष राहत असे असें सांगतात. ह्या ठिकाणीं हल्लीं जातां येत नाहीं. हा किल्ला **शिवाजीनें** बांधला. इ० स० १८१८ त तो कॅप्टन **सोपीट** नांवाच्या साहेबाच्या लष्करानें घेतला.

२६. **मानगड**.—हा किल्ला **माण** तालुक्यांत **बोरवाडीच्या** आग्नेयीस दीड मैलावर, व **माणगांवच्या** आग्नेयीस ८ मैलांवर **चाच** व **मसजितवाडी** या गांवांच्या सीमेवर **सह्याद्रीच्या** **धानोई** नांवाच्या एका डोंगरावर बांधलेला

आहे. याला कोणी विंझाईचा किल्ला असेंही म्हणतात. मसजितवाडी हें खेडें मोंगलाई अमलांत वसलेलें असून तें किल्ल्याच्या पायथ्याशीं आहे. या खेड्यांत प्रवेश केल्याशिवाय किल्ल्याच्या चढावास प्रारंभ होत नाहीं. किल्ल्याच्या उत्तर दिशेकडूनही वरतीं जाण्यास एक मार्ग आहे; मसजितवाडीच्या बाहेरच्या बाजूस मैदानांत श्रीभवानीशंकराचें देवालय आहे. मोंगलांनीं या देवालयाचा विध्वंस केला, त्या वेळीं तेथील मूर्ति दोन कोसांवर गांगोली नामक गांवीं तलावानजीक प्रगट झाली, अशी दंतकथा आहे. या देवालयाचा पाषाणी चौथरा, अवशिष्ट राहिलेल्या पडक्या भिंती, व अर्धांगनष्ट नंदी यांच्या डौलावरून पूर्वी तें एक टुमदार व प्रेक्षणीय देवालय असावें असें अनुमान होतें.

मानगड किल्ल्याचा चढाव सुमारें दीड मैल आहे. सुमारें एक मैल चढून गेलें म्हणजे विंझाई देवीचें देवालय लागतें; हें एक झोपडेंच आहे. देवी अष्टभुजा असून पूर्वाभिमुख आहे. नवरात्रांत धूपदीपनैवेद्य यांसाठीं तिला सरकारांतून सालीना १२ रुपयांची नेमणूक आहे. देवीच्या पार्श्वभागीं गेल्यावर बुरूज इत्यादिकांवर जाण्याचा मार्ग दृष्टीस पडतो. हा किल्ला अतिशय लहान आहे. म्हणजे त्याची लांबी १४९ फूट व रुंदी अवघी १३ फूट आहे. वरतीं एकंदर १४ पाण्याचीं टांकीं आहेत. ह्यांपैकीं २ टांकीं हल्लीं होरलेलीं आहेत. बाकीचीं टांकीं उन्हाळ्यांत देखील पाण्यानें तुडुंब भरलेलीं असतात. आंत एक २० फूट लांबीची व १९ फूट रुंदीची डोंगरांत कोरलेली खोली आहे. तिच्यामध्यें दोन लहान लहान हौद आहेत. पूर्वी

तिच्यांत शिबंदी लोकांची धान्यसामग्री ठेवीत असत, असें म्हणतात. हल्लीं ही खोली किल्ला पहाण्यास जाणारे लोकांस धर्मशाळेऐवजीं उपयोगीं पडते. किल्ल्याच्या माथ्यावर एक पिराचें स्थान आहे, व मसजितवाडी येथील मुसलमान लोक दर शुक्रवारीं येथें नमाज पढण्याकरितां जमतात. या पिराच्या अघाडीस व पिछाडीस सरनौबत, हवालदार, कारखाननीस यांचीं घरें होतीं असें म्हणतात. पिराच्या दक्षिणेस बरेंच लांब गेलें म्हणजे एक विस्तीर्ण पटांगण लागतें. ह्यावर पूर्वीं दांडपट्टा, कुस्ती, बोथाटी वगैरे लष्करी व्यायाम चालत असे असें म्हणतात. या पटांगणाच्या टोकेवर उभें राहून आसमंतात् भागीं नजर फेंकल्यास बरेंच सृष्टिसौंदर्य दृग्गोचर होतें. सभोंवतालीं गर्द झाडी असून त्यांतून मधून नदी-नाल्यांचें नागमोडी आकृतीनें स्वेच्छाचारवर्तन सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें असतां घटकाभर प्रेक्षकाचे अंतःकरणास आनंद होतो. तेथून रायगड फक्त पांच कोस आहे. ह्या डोंगराची फक्त डागडुजी करून येथें किल्ला बांधण्यांत एक मोठा मुद्दा असा होता कीं, रायगडावर अगर त्याच्या सन्निध असलेल्या मराठ्यांच्या प्रांतावर शत्रु-विशेषतः हबशी-चाल करून येऊं लागल्यास त्याची चाहूल हटकून येथें लागावयाचीच. चाहूल लागल्याबरोबर सरनौबत यानें तोफ सोडावी, असा त्यास हुकूम असे. तोफेचा इशारा मिळतांच रायगडावरील फौज गाफिल असल्यास सावध होई. पूर्वीं सरनौबतीचा अधिकार ढुले या उपनांवाच्या मराठी घराण्याकडे होता. त्याचे वंशज हल्लीं मौजे चाच येथें हयात आहेत. हवालदारीचा अधिकार गोविंदजी मोरे यांचेकडे होता. त्यांचे नातू

तुकारामजी मोरे, मौजे चाच येथील खोत, हे अद्यापि हयात असून फार थोर, बाणेदार मराठे गृहस्थ आहेत. कारखानीस परभू जातीचे गृहस्थ होते. त्यांचे वंशज बळवंतराव व सितारामजी हे उभयतां बंधु मसजितवाडीस राहतात. सितारामजी हे भिवंडीस सावकारी नोकरीवर असून या किल्ल्याच्या साद्यंत हकीकतीचे कांहीं जुनाट कागदपत्र यांचेपाशीं असावेत असें अनुमान आहे. असे महत्वाचे कागद त्यांचेजवळ असल्यास ते ते प्रसिद्ध करतील अशी आशा आहे.

हा किल्ला शिवाजीनें बांधला अशी दंतकथा सांगतात. परंतु आंतील पिराचे स्थानावरून तो मुसलमान लोकांनीं बांधला असावा असें अनुमान होतें. इ० स० १८१८ च्या मे महिन्यांत कर्नल सोपीट साहेबानें हा किल्ला सर केला.

---

# महाड तालुका.

—०:*:—

**२७. रायगड.**—याला पूर्वी रेडी असें म्हणत असत. नंतर त्याचें रायरी किंवा रायगिरी असें नांव पडलें. प्रथमतः हिंदुस्थानांत जे युरोपियन लोक आले, ते याला "पूर्वेकडील जिब्राल्तर" असें म्हणत असत. समुद्राच्या सपाटीपासून याची उंची २८९१ फूट आहे. हा किल्ला महाडच्या ईशान्येस १६ मैलांवर व जंजिऱ्याच्या पूर्वेस ४० मैलांवर एका उंच डोंगरावर बांधलेला आहे. सह्याद्रीची मुख्य ओळ व हा

---

१ हें वर्णन केसरींतून घेतलेलें आहे.

डोंगर यांच्यामध्यें एक मोठी खिंड आहे. या किल्ल्याच्या
सभोंवार सह्याद्रीचीं उंच उंच शिखरें असल्यामुळें हा
फार लांबून दिसत नाहीं. तोरणा किल्ला याच्या
पेक्षां १००० फूट उंच आहे, व त्यामुळें तेथून हा किल्ला
चांगला दिसतो. लिंगाणा किल्ल्याच्या माथ्या रू-
नही हा दृष्टीस पडतो.

रायगडास जाण्याचे मुख्य रस्ते तीनआहेत. एक पुण्या-
हून भोरावरून ६० मैल लांबीचा आहे; दुसरा महाबळेश्व-
राहून ३२ मैल लांबीचा आहे; व तिसरा महाडावरून आहे.
अपरिचित मनुष्याला रायगडास जाण्याचा सोपा रस्ता
म्हटला म्हणजे, प्रथमतः महाडास जाऊन तेथून कसबे नातें
येथें जावें. येथपर्यंत बैलगाड्या जाण्याचा मार्ग आहे.
नंतर गांधारी नदीच्या तीरानें ६|७ मैलांवर कोंझर
म्हणून गांव आहे, तेथपर्यंत पावसाळा नसेल तर गाड्या
नेतां येतात. पुढें चांगला बांधीव रस्ता लागतो, त्यानें
पाचाड येथें जावें. हा रस्ता शिवाजी महाराजांनीं बांधला, असें
सांगतात. या रस्त्याचे दुतर्फा जुनी आंबराई आहे. कांहीं
ठिकाणीं ह्या रस्त्याचा हल्लीं मागमूसही दृष्टीस पडत नाहीं.
कोंझर गांवाहून पाचाड येथें येत असतां वाटेनें एक
ओढा लागतो, व तेथेंच एक थडगें लागतें; याला सांव-
ताचें थडगें असें म्हणतात. पूर्वीं त्या ठिकाणीं चौकी
असून तेथें सांवत या आडनांवाचा एक शूर सरदार
राहत असे. ह्या थडग्या शेजारींच दुसरें एका सरदाराचें
थडगें आहे, व त्याचा नातु अद्यापि पाचाड येथें आहे.
वर निर्दिष्ट केलेल्या जागेस हल्लीं सांवत असें नांव पडलें
... थोडेंसें पुढें गेलें म्हणजे पाचाड येथील श्रीगण-

# किल्ल्यातील ठिकाणें


| | |
|---|---|
| नागेंदरवाजा | १७ मारुती |
| खुबलढा बुरुज | १८ छत्रपती |
| राजवाडा | १९ कुंभाची |
| पीर | २० तलाव |
| टकमकटोक | २१ हौद |
| माहादरवाजा | २२ दारुखाना |
| तलाव | २३ श्री गोंदा टोक |
| काठी | २४ राइनाथकोठेवाड |
| गंगासागर | २५ भाग्याची टेकडी |
| सातमाडया | |
| राजवाडा | |
| मनोरे | |
| शिरकादेवी | |
| कुशावर्त | |
| चोरदरवाजा | |
| बाजारपेठ | |



गार यांच्य
नोंवार र
र लांबून
तां १००
गला
ही हा द
रायग
न भोरा
हून ३२
अपरिचित
हटला म्हा
थें जावें.
तर गां
म्हणून गां
नितां येता
पाचाड ये
मांगतात



# किल्लारायगड



पतीचें देवालय लागतें. या गणपतीला कांहीं जमीन इनाम दिलेली आहे; परंतु या देवालयाची व्यवस्था चांगलीशी ठेवलेली नाहीं. येथून थोडेंसें पुढें गेलें म्हणजे एक तट घातलेलें आवार लागतें. या तटाला चार बुरूज आहेत. येथें पूर्वी शिवाजी महाराजांच्या मातुश्री जिजाबाईसाहेब यांचा वाडा होता, व तो त्यांना पावसाळीं रायगडची हवा सोसेना म्हणून शिवाजी महाराजांनीं बांधून दिला होता. पाचाड येथें पूर्वी बाजारपेंठ होती, व किल्ल्यावर लागणारे सर्व जिन्नस येथून नेत असत. येथें जवळच पाचाड, वाडी व रायगड येथील मिरासदार महार लोकांची सुमारें तीनशें घरांची वाडी लागते. येथून कांहीं अंतरावर मार्गाचे उजवे बाजूस रायगडावरील पिराचे मुजावराचें घर लागतें. अपरिचित मनुष्यास किल्ला पहावयास जाणें असेल तर ह्या मुजावरास बरोबर घेऊन जावें, म्हणजे तो किल्ल्यांतील सर्व जागा दाखवितो. नंतर पुढें थोडासा चढाव लागतो, व तो चढून वर गेलें म्हणजे एक खिंड लागते. या जागीं पूर्वी एक दरवाजा होता, व तेथें पूर्वी चौकीपहारा असे असें सांगतात. हाच रायगडचा नैर्ऋत्य दरवाजा होय. परंतु पूर्वीच्या दरवाज्याची हल्लीं तेथें कांहींच खूण दृष्टीस पडत नाहीं. याच ठिकाणीं छत्रीनिजामपुराहून राय-

---

१ हें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, शिवाजी महाराज एके वेळीं किल्ल्यावर फिरत असतां टकमक नांवाच्या टोंकाजवळ आले. त्या वेळीं वारा फार जोरानें वाहत असल्यामुळें त्यांचा छत्रधर त्या टोंकावरून उडाला, व खालीं पडून निजामपूर नांवाच्या खेड्यांत मरण पावला. ज्या ठिकाणीं तो पडला तेथें एक निशाण पुरलेलें आहे, व त्या वेळेपासून त्या खेड्यास छत्री-निजामपूर असें नांव पडलें.

गडावर जाण्याच्या रस्ता येऊन मिळतो. या खिंडीचे उत्तरेस वाडी नांवाचें खेडें आहे. हें खेडें समुद्राच्या सपाटीपासून ६०० फूट उंच आहे, व या खेड्यावर किल्ल्याचें शिखर २२५० फूट आहे. येथून वर जाण्याचा रस्ता समारें ४ मैल लांबी वा आहे. वर सांगितलेल्या खिंडीच्या पूर्व बाजूस एक विहीर, एक हौद व मुख्य किल्ल्यापासून अलग असा एक बुरूज आहे. या बुरुजाला खूबलढ असें नांव आहे. खिंडींतून बांधीव रस्त्यानें थोडासा उतार उतरून गेलें म्हणजे रस्याचे दोहों बाजूंस तटाच्या खुणा दृष्टीस पडतात. तेथें पूर्वी शिवाजी महाराजांची तालीमखान्याची जागा होती, व तेथेंच कांहीं आंबे, फणस, निंब वगैरे जुनाट वृक्ष दृष्टीस पडतात. हा पूर्वी महाराजांचा बाग होता असें सांगतात. तेथून थोडासा चढाव चढून गेलें म्हणजे प्रथमतः किल्ल्याचे पायथ्याशीं एक लहानसा दरवाजा लागतो. याला नाना[1] दरवाजा असें म्हणतात. खूबलढ बुरुजावर जाण्याची पाऊलवाट येथूनच आहे. या दरवाज्याचे तटावर दोहों बाजूंस दोन बुरूज आहेत, व आंतले बाजूस एक पोटकमान असून दोन्ही बाजूंस पहारेकरी लोकांच्या देवडयांची जागा आहे.

---

१ हा दरवाजा नाना फडनवीस यांनीं बांधला, व त्यामुळें त्याला नाना दरवाजा असें नांव पडलें, असें कांहींचें मत आहे. परंतु या दरवाज्याचें बांधकाम लक्ष्यपूर्वक पाहिलें म्हणजे तें काम नाना फडनवीस यांचे रियासतीचे पूर्वी पुष्कळ वर्षे झालें असावें असें वाटतें. क्यांबेल साहेब या संबंधानें असें लिहितात कीं, हा दरवाजा लहान असल्यामुळें त्याला ‘ लहाना ’ दरवाजा ह्मणत असत. ‘ लहाना ’ याचें कुणबी भाषेंत ‘ न्हाना ’ असें रूप होतें, व ‘ न्हाना ’ म्हणतां म्हणतां त्याचें ‘ नाना ’ हें नांव पडलें असावें.

या दरवाज्यांत शिरण्यापूर्वी तटाला एक कोनाडा असून त्यांत एक उंटाचें चित्र आहे. या उंटाचे संबंधानें अशी दंतकथा सांगतात कीं, शिवाजी महाराजांचे अंतकाळीं त्यांचा ज्येष्ठ पुत्र संभाजी त्यांचेजवळ नव्हता. संभाजीस महाराजांच्या अत्यावस्त प्रकृतीचें वर्तमान कळतांच त्यांना भेटण्याकरितां तो सांडणीवर बसून निघाला. परंतु सदर दरवाज्यांत तो येतो आहे, तोंच महाराजांच्या अंत झाला, असें वर्तमान त्यास समजलें. तेव्हां त्यानें लगेच आपली तरवार म्यानांतून बाहेर काढिली, व तो त्या सांडणीला म्हणाला, "जर तूं यापेक्षां जलद चालतीस तर महाराज मला भेटले असते. याकरितां तुझ्या कसुरीबद्दल तुला हें बक्षीस घे," असें म्हणून त्यानें त्या सांडणीचें शीर तोडून टाकलें. त्या सांडणीचें हें चित्र काढलेलें आहे. परंतु ही दंतकथा खरी नाहीं. कारण महाराजांचें प्राणोत्क्रमण होण्यापूर्वी बरेच दिवस त्यांनीं संभाजीस पन्हाळा किल्ल्यावर कैदेंत ठेविलें होतें, व महाराज वारल्यानंतर कांहीं महिन्यांनीं संभाजी रायगडास आला, असा दाखला सर्व मराठी बखरींत व इंग्रेजी ग्रंथांत मिळतो. आतां कदाचित् अशी गोष्ट झाली असेल कीं, महाराजांचा एखादा परम स्नेही अंतकालीं त्यांना भेटण्याकरितां म्हणून सांडणीस्वार होऊन निघाला असेल, व त्याला या दरवाज्यापाशीं महाराजांच्या मृत्यूचें वर्तमान कळल्याबरोबर त्यानें आपल्या सांडणीस रागानें ठार मारिलें असेल. असो.

नाना दरवाज्यांतून पुढें गेलें म्हणजे थोडासा चढाव लागतो, व नंतर डोंगराचे लवणांतून सपाट रस्ता लागतो तेथें जवळच डावे बाजूस ७० फूट लांबीची व २१३ फू

ग्यासाची अशी एक तोफ पडलेली आहे. जवळच पडा-पड झालेल्या दोन इमारतींचे अवशेष भाग आहेत. त्यांपैकीं एक इमारत पूर्वीचा राजवाडा होती असें सांगतात. येथें जवळच एक पिराचें स्थान ( दरगा ) आहे. या पिराला शहादीनदारमदार असें म्हणतात. कोणी यास मदरशाहाचा दरगा असेंही म्हणतात यालाच क्यांबेल साहेबांनीं 'मदनशाहा' असें म्हटलें आहे. तेथून सुमारें ४०० यार्डांवर खडकांत खोदलेल्या तीन खोल्या लागतात. या खोल्यांत पूर्वीं धान्य भरून ठेवीत असत असें सांगतात. नंतर रस्ता उजवे बाजूस वळतो; येथें खडकांत खोदलेल्या पायऱ्या लागतात, व त्यांचा चढावही बराच बिकट आहे. त्या चढतचढत सुमारें तीनशें फूट वर गेलें म्हणजे किल्ल्याचा मुख्य दरवाजा दृष्टीस पडतो. याला महादरवाजा असें म्हणतात. बत्तीस पायऱ्या चढून गेलें म्हणजे या दरवाज्याशीं मनुष्य येऊन पोहोंचतें. नाना दरवाजा व महादरवाजा यांच्यामधील चढाव १००० फूट उंचीचा आहे.

महादरवाज्याच्या दोन्ही बाजूंस ७५ व ६५ फूट उंचीचे असे दोन भक्कम बुरूज आहेत. हा दरवाजा किल्ल्याच्या हिरकणी नांवाच्या पश्चिम टोंकाच्याखालीं ४०० फूट व बालेकिल्ल्याच्याखालीं ६०० फूट आहे. ह्या दरवाज्यापासून वायव्य बाजूस एक भक्कम तट बांधलेला आहे. येथून २०० फूट उंचीवर दुसरी एक भक्कम भिंत लागते, व हिच्यापुढें २०० फूट उंचीवर अशाच प्रकारची दुसरी एक भिंत लागते. येथून पुन: २०० फूट उंचीवर व बालेकिल्ल्याच्याखालीं २०० फूटांवर तिसरी एक भिंत लागते. परंतु हल्लीं तिची

पडापड झालेली आहे. महादरवाज्याला जीं दारें आहेत, तीं फार जुनीं नसून बरींच अलीकडचीं दिसतात. किल्ल्याला दक्षिणेच्या बाजूनेंही एक दरवाजा आहे. याला चोरदरवाजा म्हणतात. परंतु तिकडे जाण्याला खालून रस्ता वगैरे कांहीं नाहीं. किल्ल्याच्या माथ्याची लांबी १॥ मैल व रुंदी १ मैल आहे; व त्याचीं पश्चिमेस हिरकणी, उत्तरेस टकमक व पूर्वेस भवानी हीं तीन टोकें पुढें गेलेलीं आहेत. श्रीगोंदा म्हणून चौथें एक टोंक आग्नेयी दिशेस आहे, परंतु तें फार लहान आहे. आंत पडापड झालेलीं ठिकाणें व खडकांत खोदलेलीं टांकीं, कोठारें, व भुयारें पुष्कळ आहेत. पूर्व, दक्षिण व पश्चिम या दिशांस खोल खोल तुटलेले कडे आहेत, त्यामुळें तिकडे तटबंदी केलेली नाहीं.

महादरवाज्यापासून सुमारें पाऊण मैलावर पूर्वीं सांगितलेल्या मदारशाहा नांवाच्या पिराचें मुख्य स्थान असून त्याच्यापुढें ६ फूट उंच व २ फूट परिघाचा असा एक लोखंडी खांब पुरलेला आहे. वर सांगितलेल्या मदारशाहाची हातांत घेण्याची ही काठी होती, अशी त्या खांबासंबंधानें दंतकथा सांगतात. परंतु ती खरी असेल असें वाटत नाहीं. हा शिवाजी महाराजांचा मल्लखांब होता, असें कांहींचें म्हणणें आहे, व तेंच ज्यास्त सयुक्तिक दिसतें. या खांबावर कांहीं अक्षरें लिहिलेलीं आहेत. परंतु हल्लीं तो खांब गंजून गेल्यामुळें तीं वाचतां येत नाहींत. थोडेंसें पुढें गेलें म्हणजे दोन हौद लागतात. हे नेहमीं पाण्यानें भरलेले असतात. परंतु महार लोक त्यांचें पाणी पीत असल्यामुळें इतर हिंदु तें पाणी पीत नाहींत. उजवे बाजूस एक १२० फूट लांब व ७० फूट रुंद असें तळें लागतें. परंतु उन्हा-

ळ्यांत तें कोरडें असतें. वर सांगितलेल्या पिरापासून सुमारें १०० यार्डांवर दुसरा एक तलाव लागतो. ह्याचें पाणी फार चांगलें असून आंत अतोनात संपत्ति आहे असें सांगतात. याला **गंगासागर** हें नांव आहे. **शिवाजी** महाराजांचे लष्करास पाण्याचा मुख्य पुरवठा या तलावापासून होत असे. याच्या दक्षिणेस १०० फूट अंतरावर ४९ फूट उंचीचे असे दोन दुमजली मनोरे आहेत. ते पूर्वी ९ मजली होते असें सांगतात. ते द्वादशकोनी असून त्यांच्या प्रत्येक बाजूंत एक खिडकी आहे. ह्या मनोऱ्यांच्या पश्चिमेस ३१ पायऱ्यांचा एक दगडी जिना लागतो. या जिन्याच्या दोन्ही बाजूंस उंच व भक्कम असा तट घातलेला आहे. हा जिना चढून वर गेलें म्हणजे **पालखी** दरवाजा लागतो; याची रुंदी ६ फूट आहे. ह्या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे बालेकिल्ल्यांत प्रवेश होतो. हा बालेकिल्ला ३०० यार्ड लांब व १६० यार्ड रुंद आहे. पश्चिमेच्या अंगास **पालखी** दरवाज्यापासून तों दक्षिणेच्या बाजूच्या तटाला दुसरा एक दरवाजा आहे, तेथपर्यंत १५० यार्ड लांबीचा एक रस्ता आहे, व त्याच्या दोन्ही बाजूंस पडापड झालेल्या इमारती आहेत. उजव्या बाजूस सात मोठमोठे वाडे होते, व त्यांतून **शिवाजी** महाराजांचा परिवार राहत असे. त्याला **सात**-माड्या असें म्हणतात; व दुसरे बाजूकडच्या इमारतींतून पहारेकरी लोक व दासदासीजन राहत असत असें म्हणतात. वर सांगितलेल्या सात वाड्यांस एकांतून दुसऱ्यांत जाण्याकरितां मध्यंतरीं दरवाजे ठेवलेले आहेत. **सात**माड्यांच्या पूर्वेस मुख्य राजवाड्याची जागा आहे. **पालखी** दरवाज्याच्या आंतले अंगास डावे बाजूस

एक रस्ता जातो, व त्या बाजूनें गेलें म्हणजे सरकारी कचेरीची जागा लागते. ह्या इमारतीला हल्लीं दरवाजा वगैरे कांहीं नाहीं. तिच्या भिंती मात्र अद्यापि शाबूत आहेत. हिची लांबी १२० फूट व रुंदी ५० फूट आहे. मध्यभागीं एक उंच जागा आहे, तेथें पूर्वीं शिवाजी महाराजांचें सिंहासन होतें असें सांगतात. सिंहासनाच्या सभोंवार जी फरसबंदी आहे, तिला मराठे लोक अद्यापि इतका मान देतात कीं, वर जावयाचें असल्यास ते आपले जोडे अगोदर एकीकडे काढून ठेवितात, व महार लोक तर मुळींच वर जात नाहींत. ह्या इमारतीला लागून कांहीं धान्याचीं कोठारें व खजिन्याच्या खोल्या आहेत, व समोर नगारखान्याची जागा आहे. हा नगारखाना बालेकिल्ल्याच्या पूर्वेकडील तटांत किंवा मुख्य दरवाज्यावर आहे. ह्या ठिकाणीं गेलें म्हणजे आसमंतात् भागाचा व फार दूरचाही देखावा फारच मनोहर दिसतो. बालेकिल्ल्यांत पूर्वी रंगमहाल होता. हल्लीं तेथें इमारत नाहीं, परंतु त्याच्या सभोंवतालचा तट मात्र कायम आहे.

पूर्वदरवाज्यांतून नगारखान्याच्या बाहेरच्या बाजूस आलें म्हणजे जें मोठें मैदान लागतें, त्याला होळीचा माळ असें म्हणतात. जरा पूर्वेस कुशावर्त म्हणून एक पाण्याचें कोरडें तळें आहे; व ह्या बाजूच्या टोंकाला श्रीगोंदा हें नांव आहे. ह्या भागांत पूर्वीं वाकनीस, पोतनीस आदीकरून कामगार मंडळीचे वाडे होते. ह्याच्याजवळच दारूखाना आहे, व बारा पाण्याचीं टांकीं आहेत. बालेकिल्ल्याच्या उत्तर बाजूस २०० कदमांवर बाजारपेठेची जागा होती. या पेठेचीं उंच जोतीं व काळे दगडांच्या भिंती अद्यापि

कायम आहेत. या पेठेंत सुमारें २४४ दुकानांचे अवशेष भाग दृष्टीस पडतात. हीं दुकानें इतकीं उंच होतीं कीं, गिऱ्हाइकें घोड्यावर बसून माल खरेदी करीत असत, असें सांगतात. ही बाजारपेठ बहुतकरून लष्करी लोकांकरितां होती असें वाटतें. या पेठेंत नागशेट नांवाचा एक श्रीमान व्यापारी असे. त्याचें स्मारक म्हणून त्याचे दुकानासमोर ४।९ हात लांब व एक हात रुंद असा एक चौकोनी दगड असून त्यावर एक नागाचें चित्र काढलेलें आहे. या नागशेटीचा किल्ल्याच्या पायथ्याशीं वाडी येथें पूर्वी एक बाग होता. त्याला हल्लीं नाग्याबाग असें म्हणतात. ह्याच्या थोडेंसें पुढें गेलें म्हणजे पडापड झालेल्या पूर्वीच्या पीलखान्याची जागा दृष्टीस पडते. बाजाराच्या खालच्या बाजूस पूर्वी ब्राह्मणवस्ती होती, व तेथेंच ब्राह्मणांचें म्हणून एक निराळें तळें आहे. बालेकिल्ल्याच्या ईशान्येस सुमारें अर्ध्या मैलावर एक महादेवाचें देवालय आहे. याला जगदीश्वराचें देवालय असें म्हणतात. देवालयाच्या मागच्या बाजूच्या दरवाज्याच्याबाहेर एक तीन फूट उंचीची मारुतीची सुंदर मूर्ति आहे. जगदीश्वराचे देवालयाची इमारत शाबूत आहे. देवालयास सभामंडप असून शिवाय गाभारा आहे. गाभाऱ्याची जागा खोलगट आहे परंतु आंत लिंग नाहीं. या संबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, औरंगजेबानें संभाजीस ठार मारल्यावर त्याच्या कुटुंबास कैद करण्याकरितां बादशाहाचे हुकुमावरून त्याचा सरदार झुलपिकारखान यानें रायगडास वेढा दिला. त्या वेळीं मुसलमानांचे ताब्यांत किल्ला गेला तर ते कदाचित् तें लिंग फोडतील, या भीतीनें किल्ल्यांतील लोकांनीं तें लिंग तेथून काढून नेऊन

असबे नातें या गांवीं त्याची स्थापना केली. लिंग काढून नेलेल्या जागेंतून हल्लीं केंसासारखा झरा वाहत आहे. सभामंडपाचे मध्यंतरीं कांसवाचें चित्र असून त्याचे चिरे हल्लीं निखळलेले आहेत. त्याच्याबाहेर मुसलमान लोकांनीं छिन्नविछिन्न केलेला भव्य नंदी आहे. देवालयास बाहेरून तट आहे, व नंदीचे मागचे बाजूस तटाला मोठा दरवाजा असून त्यावर नगारखान्याची जागा आहे. नगारखान्याचे बाहेर दक्षिणे बाजूच्या तटावर दोन संस्कृत श्लोक आहेत. ते येणेंप्रमाणेः—

श्लोक.

॥ प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोऽनुज्ञया ॥
॥ श्रीमच्छत्रपतेः शिवस्य नृपतेः सिंहासने तिष्ठतः ॥
॥ शाके षण्णव बाणभूमिगणनादानन्द संवत्सरे ॥
॥ जोतीराजमुहूर्तकिर्तिमहिते शुक्लेशसार्पे तिथौ ॥ १ ॥
॥ वापीकूपतडागराजिरुचिरं रम्यं वनं वीथि (ति)के ॥
॥ स्तंभैः कुंभिगृहे नरेंद्रसदनैरभ्रंलिहैर्मीहिते ॥
॥ श्रीमद्रायगिरो गिरामविषये हीराजिना निर्मितो ॥
॥ यावच्चंद्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जृंभते ॥ २ ॥

जगदीश्वराचे देवालयांत शिरण्याच्या मुख्य दरवाज्याच्या समोर परंतु जरा उतरणीवर छत्रपति शिवाजी महाराजांची अष्टकोनी समाधि बांधलेली आहे. या ठिकाणीं महाराजांचें दहन केलें. या समाधीचे पूर्व बाजूस ३ हात औरस चौरस अशी दुसरी एक समाधि आहे. ही महाराजांचे आवडते कुत्र्याची होय. यासंबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, महाराजांचा अंत झाल्यावर त्यांचें प्रेत पालखींत घालून दहनभूमीवर आणलें, त्या वेळीं त्यांचा आवडता कुत्राही बरोबर आला

होता. दहनविधि आटोपल्यावर पालखींत महाराज नसून ती रिकामी चालविली आहे, असें त्या कुत्र्यानें पाहतांच त्यानें धांवत जाऊन एकदम महाराजांच्या चितेंत उडी घातली, व आपणास जाळून घेतलें. पुढें महाराजांची समाधि बांधली, तेंव्हां तिच्या शेजारीं या कुत्र्याचीही समाधि बांधली. या समाधीच्या संबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, सुमारें २०।२५ वर्षांपूर्वी सातारचा भोंसले या उपनांवाचा कोणी गृहस्थ कुलाबा पोलीसापैकीं २ शिपायी बरोबर घेऊन रायगडावर आला. त्याचे जवळ कांहीं जुने कागद होते, त्यांचे आधारावर जगदीश्वराचे देवालयाची दोन प्रहरीं जेथें छाया पडली, त्या जागेंत द्रव्याच्या आशेनें त्यानें तीन चार ठिकाणीं खोदून पाहिलें, राजवाड्यांत २।३ ठिकाणीं खोदलें, गंगासागर तलावांत पाणबुडे घातले, सिंहासनाची जागा सुद्धां खोदली, शेवटीं त्या लोभी व नीच मनुष्यानें महाराजांची समाधीही फोडली. परंतु त्याला तेथें एक कपर्दीही मिळाली नाहीं. पुढें हताश होऊन तो मनुष्य तेथून निघून गेला. ही गोष्ट खरी असेल तर वर सांगितलेल्या मनुष्याला त्याच्या अधमपणाबद्दल काय उपमा द्यावी तेंच समजत नाहीं. सुमारें ८।९ वर्षांपूर्वी कुलाबा जिल्ह्याचे फारेस्टसेटलमेंट खात्याचे मुख्य अधिकारी मे० सिंक्लेअर साहेब हे रायगडावर गेले असतां ते ह्या समाधीजवळ आले. समाधीची ती छिन्नविच्छिन्न स्थिति पाहून त्या थोर पुरुषास फार वाईट वाटलें, व जवळचे कारकून मंडळीस ते म्हणाले कीं, "तुम्हां हिंदुलोकांना मनुष्य म्हणण्यापेक्षां जनावरें म्हणणें फार चांगलें दिसेल. ज्यानें आपलें शिर हातावर घेऊन

करून तुम्हां लोकांना कांहीं दिवस स्वातंत्र्य दिलें होतें त्याचे समाधीची अशी स्थिति!" पुढें साहेब मजकूर यांनीं स्वतःचे पैशानें त्या समाधीची दुरुस्ती केली, व सरकारांत लिहून समाधीचे दुरुस्तीसाठीं सालीना पांच रुपयांची मंजुरी आणिली. ह्या समाधीचे जीर्णोद्धाराबद्दल हल्लीं मोठी जारीनें तयारी सुरू आहे.

किल्ल्यांत कालकुंड नांवाचें आणखी एक मोठें तळें आहे. लिंगाणा किल्ल्याकडे जें रायगडचें टोंक गेलें आहे, त्याला भवानी टोंक असें म्हणतात, व अगदीं पश्चिमेकडील टोंकास हिरकणी टोंक हें नांव आहे. ह्या ठिकाणीं फार खोल तुटलेला कडा आहे. ह्या टोंकाला हिरकणी हें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, शिवाजी महाराजांच्या वेळीं वाडी येथून हिरकणी नांवाची एक गौळण किल्ल्यांतील लोकांना दुध घालण्याकरितां येत असे. एके दिवशीं तिला कांहीं कारणामुळें किल्ल्यांत उशीर लागला व रात्र पडली. हिरकणी लगबगीनें दरवाज्यापाशीं आली तों दरवाज्याला कुलपें पडलेलीं तिच्या दृष्टीस पडलीं. हिरकणी किल्ल्यांत आली त्या वेळीं ती आपलें तान्हें मूल घरीं निजवून आली होती. आपण किल्ल्यांत अडकून पडल्यामुळें घरीं आपलें तान्हुलें दुधावांचून तडफडून मरेल, अशा प्रकारच्या विचारांनीं तिचें मन उद्विग्न झालें. शेवटीं कांहीं झालें तरी घरीं गेलेंच पाहिजे, असा तिनें निश्चय केला, व ती किल्ल्याच्या एका टोंकावरून खालीं उतरली. ती कशी खालीं उतरली असेल हें तिचें तिला माहीत. दुसऱ्या दिवशीं ती गोष्ट बाहेर फुटली, व शिवाजी महा-

राजांनीं त्या गौळणीस बोलावून आणून संपूर्ण वृत्तांत तिचें मुखानें ऐकून घेतला. तिचें धैर्य पाहून महाराजांना मोठा अचंबा वाटला. नंतर जेथून ती खालीं उतरली होती त्या ठिकाणीं त्यांनीं एक बुरूज बांधला, व त्या टोंकाला हिरकणी हें नांव दिलें. किल्ल्याच्या ईशान्येस जें अतिशय उंच टोंक आहे, त्याला टकमक असें म्हणतात. येथें खालीं फार खोल तुटलेला कडा आहे. ह्यावरून पूर्वीं कडेलोट करीत असत. किल्ल्यांत रात्रीस उतरण्यासारख्या जागा म्हटल्या म्हणजे वर सांगितलेल्या दोन मनोऱ्यांचे तळमजले किंवा नगारखान्याची जागा ह्या होत.

रायगड किल्ला अतिशय बळकट असून तो दक्षिणमहाराष्ट्र व समुद्र या दोहींचेंही नाकें आहे. या गोष्टीमुळें त्याला पूर्वींपासून फार महत्त्व आलेलें आहे. शिवाय इ०स० १६६४ पासून इ०स० १६८० पर्यंत तर तो मराठ्यांच्या राज्याची राजधानी म्हणून गाजत होता. त्या वेळच्या त्याच्या वैभवाची कल्पनाच केली पाहिजे. ह्या एकंदर गोष्टींमुळें त्याचें जितकें वर्णन करावें.तितकें थोडेंच.

इसवी सनाच्या बाराव्या शतकांत हा किल्ला पाळेगार लोकांच्या हातीं होता; व ते आपणास विजयानगरच्या हिंदु राजांचे अंकित असें म्हणवीत असत. सन १४३६ त दुसरा अल्लाउद्दीनशाहा बाहामणी यानें तो किल्ला जिंकून घेतला. इ०स० १४७९त तो अहमदनगरच्या निजामशाही सरकारच्या ताब्यांत गेला. इ० स० १६३६ पर्यंत त्याचें स्वामित्व निजामशाही सरकाराकडे होतें. पुढें मोंगलांनीं निजामशाही घराणें बुडविल्यानंतर त्यांनीं तो किल्ला आदिलशाही सरकारास दिला. त्यांनीं त्याचें नांव इस्लामगड

असें ठेविलें, व जंजिऱ्याच्या शिदीस त्याची वहिवाट करण्यास सांगितलें. शिदीनें कांहीं मराठी शिबंदी किल्ल्याच्या संरक्षणाकरितां ठेविली. पुढें इ०स० १६४८पासून शिवाजी आपली सत्ता भराभर वाढवूं लागला, त्या वेळीं मराठ्यांनीं तो किल्ला घेतला. इ०स० १६६२ त राजगड किल्ला आपल्या मुलामाणसांच्या रक्षणार्थ चांगलासा उपयोगी पडणार नाहीं, असें वाटून शिवाजीनें रायगडास आपली गादी स्थापण्याचा निश्चय केला. किल्ल्याचें अगदीं पूर्वींचें नांव रायरी होतें, तें बदलून शिवाजी महाराजांनीं, त्याला रायगड ( राजाचा किल्ला ) हें नांव दिलें. त्यांनीं कल्याणचा सुभेदार आबाजी सोनदेव याला किल्ल्यांत इमारती बांधण्यास हुकूम दिला. त्यानें एकंदर ३०० दगडी इमारती किल्ल्यांत बांधल्या. नंतर महाराजांनीं मुख्य रस्ता कायम ठेवून किल्ल्यावर येण्याच्या दुसऱ्या पायवाटा होत्या, त्या सर्व बंद केल्या. शिवाय त्यांनीं ठिकठिकाणीं तट व बुरूज बांधून किल्ल्याला अतिशय बळकटी आणली. ह्याविषयीं खाफीखान असें लिहितो कीं, "सर्व वाटा बंद केल्यावर कदाचित् एखादी वाट चुकून शिल्लक राहिली असेल अशी शिवाजीला शंका येऊन त्यानें तिची निर्वृत्ति करण्याकरितां खालीं दिलेली युक्ति योजिली. एके दिवशीं त्यानें आपल्या सर्व मावळी व इतर लोकांस बोलावून आणिलें, व आपणापुढें एक मोहरांची पिशवी व ३९० रुपये किंमतीचें एक सोन्याचें कडें ठेवून त्यानें त्या मंडळीस असें सांगितलें कीं, 'मुख्य रस्ता शिवाय करून दुसऱ्या वाटेनें जो किल्ल्याच्या तटावर निशाण लावील त्याला ही मोहोरांची पिशवी व हें सोन्याचें कडें बक्षीस मिळेल.' हें ऐकून एक महार पुढें आला, व

मुजरा करून ठीक आहे म्हणून निघून गेला. नंतर निराळ्या वाटेनें कड्यांतून वर चढून त्यानें तटाला निशाण लाविलें, व परत येऊन शिवाजीस मुजरा करून हात जोडून उभा राहिला. शिवाजीनें त्याची मोठी तारीफ करून लगेच त्याला तें बक्षीस दिलें, व तो ज्या वाटेनें वर चढून आला, ती वाट उत्तम तऱ्हेनें बुजवून टाकिली." अशा रीतीनें शिवाजीनें या किल्ल्याचा बंदोबस्त केला होता.

इ० स० १६६४ त शिवाजीनें सुरत शहर लुटून तो लुटीचा अगणित खजिना या किल्ल्यांत आणून टाकला, व त्याच वर्षी तेथें आपल्या गादीची स्थापना केली. पुढें त्याच वर्षी शिवाजीचा बाप शहाजी मरण पावला, व तेव्हांपासून शिवाजी आपणास राजा असें म्हणवूं लागला. त्यानें आपल्या नांवाचें नाणें पाडलें, व आपल्या मुलुखाची अंतस्थस्थिति सुधारण्याकरितां कांहीं दिवस तो तेथें राहिला. इ० स १६६५ त औरंगजेबानें जयपूरचा राजा जयसिंग याला शिवाजीचा बंदोबस्त करण्याकरितां दक्षिणेंत पाठवून दिलें. आपण दोघेही हिंदु असून एकमेकांबरोबर लढाई करून आपल्याच लोकांच्या नाशास कारणीभूत व्हावें ही गोष्ट शिवाजीला बरी न वाटून "मी औरंगजेबाचा मांडलिक आहें," असें कबूल करून त्यानें जयसिंगाशीं तह केला. इ० स० १६६६ त दिल्लीस बादशाहाचे भेटीस जाण्याचे पूर्वी शिवाजीनें आपल्या सर्व सरदार व मानकरी लोकांस रायगडास बोलावून आणिलें, व आपला दिल्लीस जाण्याचा मानस त्यांना कळवून आपल्यामागें मोरो तिरमल पिंगळे, आवाजी सोनदेव, व अण्णाजी दत्तो यांच्या हुकुमाप्रमाणें चालावें, म्हणून

त्यानें त्यांस आज्ञा केली. तो इ० स० १६६६ च्या मार्च महिन्यांत दिल्लीस गेला. तेथें औरंगजेबानें विश्वासघात करून त्याला अटकेंत ठेविलें. परंतु मोठ्या युक्तीनें तो तेथून निसटला, व बैराग्याच्या वेषानें त्याच वर्षीं डिसेंबर महिन्यांत तो रायगडास परत आला. शिवाजी जोग्याच्या वेषानें किल्ल्यांत आला, त्या वेळीं त्याची ओळख कोणाला पटली नाहीं. त्यानें आपली दाढीमिशी वाढविली होती, व अंगांत एक भगवी कफणी अडकविली होती. त्यानें वाड्यांत प्रवेश करून प्रथमतः आपल्या मातुश्रीच्या पायांवर मस्तक ठेविलें. जिजाबाईचे पंचप्राण शिवाजीकडे लागल्यामुळें प्रथमतः तिनें त्याच्याकडे पाहिलें सुद्धां नाहीं; व पाठीमागून पाहिलें तेव्हांही हा आपला शिवबाच आहे, अशी तिची खातरी होईना. पुढें शिवाजीनें आपल्या अंगावरचीं भिकार भगवीं वस्त्रें फेंकून देतांच जिजाबाईची ओळख पटून तिनें आनंदाच्या भरांत शिवाजीला आपल्या पोटाशीं धरलें. त्या वेळीं त्या मायलेंकरांना जो आनंद झाला असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी. शिवाजी दिल्लीस गेला, त्या वेळीं संभाजी त्याचे बरोबर होता. पुढें औरंगजेबाच्या कैदेंतून सुटल्यावर त्यानें संभाजीला मथुरेस एका ब्राह्मणाचे स्वाधीन केलें होतें, व मी रायगडास जाऊन पोहोंचलों म्हणजे तुम्हीं याला माझ्याजवळ आणून पोहोंचवावें असें सांगितलें होतें. शिवाजी रायगडास येऊन पोहोंचल्यावर थोड्याच दिवसांनीं तो ब्राह्मण संभाजीस मुलीचा वेष देऊन रायगडास घेऊन आला. त्या वेळीं शिवाजीला जो आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. त्यानें किल्ल्यांत

मोठा उत्साह सुरू केला. व लाखों रुपयांची खैरात केली, त्यानें त्या ब्राह्मणास ४ लाख रुपये देऊन संतुष्ट केलें. इ० स० १६६८-६९ या सालांत शिवाजी रायगडाहून फारसा बाहेर गेला नाहीं; परंतु त्या काळांत त्यानें लोकोपयोगी असे पुष्कळ कायदे केले, व आपल्या राज्याची अंतस्थ स्थिति सुधारली; परराष्ट्रांशीं आपल्या व्यवहाराच्या संबंधाचे कांहीं नियम केले. इ० स० १६७२ त शिवाजीनें चाकणचा किल्ला घेतला, त्या वेळीं पुष्कळ थोर थोर गृहस्थ त्याच्या हातीं सांपडले. त्यानें त्या सर्व मंडळीस रायगडास पाठवून दिलें, व त्यांची चांगली सुश्रूषा ठेवून त्यांना लढाईत ज्या जखमा वगैरे लागल्या होत्या त्या बऱ्या केल्या, व पुढें त्यांनीं मोठ्या मानमरातबानें त्यांच्या घरीं पोहोंचतें केलें. काय हा थोरपणा ! व किती ही भूतदया ! ! अशा प्रकारचे मोहोरे ज्या देशांत निपजले व निपजतील तो देश धन्य होय.

इ० स० १६७४ त शिवाजीनें मोठ्या थाटमाटानें आपणास रायगड येथें राज्याभिषेक करवून घेतला. दहा वर्षांपूर्वींच त्यानें आपणास राजा हा किताब घेतला होता, व आपल्या नांवाचें नाणें पाडलें होतें. परंतु आपण स्वतंत्र राजे आहों, हें सर्व जगास कळविण्याचा व आपल्या नांवाचा शक सुरू करण्याचा हेतु त्याच्या मनांत फार दिवस घोळत होता. हे दोन्ही हेतु आपणास राज्याभिषेक करवून सिद्धीस नेण्याचा त्यानें निश्चय केला. तिथिनिश्चय करण्याकरितां त्यानें काशीस गागाभट्ट म्हणून एक विद्वान ब्राह्मण होता त्याला पाचारण केलें. पुढें तिथिनिश्चय होऊन आनंदनाम संवत्सरीं ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीस म्हणजे

तारीख ६ जून इ० स० १६७४ रोजीं त्यानें आपणास विधिपूर्वक राज्याभिषेक करून घेतला. ह्या वेळीं इंग्लिशांचा वकील हेनरी आग्झेंडाम हा रायगड येथें होता. ह्या वेळीं शिवाजीनें सोन्यानें आपली तुळा करविली, व एकंदर ३५०००० रुपये किमतीचें सोनें ब्राह्मणांस वांटून टाकलें. याशिवाय त्यानें लाखों रुपयांचा दानधर्म केला. त्यानें आपणास " क्षत्रियकुलावतंस श्रीराजाछत्रपति " हा. किताब घेतला; व ह्याच वेळीं त्यानें आपल्या अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. त्यांचीं नांवें:—१ मोरोपंत पिंगळे पेशवा अथवा मुख्य प्रधान. २ रामचंद्रपंत डावेडकर मुजुमदार किंवा पंतअमात्य. ३ अण्णाजी दत्तो पंतसचिव. ४ दत्ताजीपंत वाकनीस किंवा मंत्री. ५ हंबीरराव मोहिते सरनौबत किंवा सेनापति. ६ जनार्दनपंत हणमंते डबीर किंवा सुमंत. ७ बाळाजीपंत न्यायाधीश. ८ रघुनाथपंत न्यायशास्त्री किंवा पंडितराव.

इ० स० १६८० त शिवाजीनें जालना प्रांतावर स्वारी केली. परंतु त्या स्वारीवरून परत आल्यावर तो आजारी पडला, व आपल्या वयाच्या ५३ व्या वर्षी रायगड येथें मरण पावला. त्याच्या मृत्यूचीं निरानिराळीं तीन कारणें सांगतात:—१ कोणी म्हणतात कीं, तो गुडघी रोग होऊन मरण पावला; २ कोणी म्हणतात कीं, अतिशय श्रमांमुळें त्याची छाती फुटून तो मरण पावला; ३ व कोणी असें म्हणतात कीं, जालना प्रांतांत त्यानें मुसलमान लोकांचा अतिशय छल केल्यामुळें त्याला पुष्कळ मुसलमान साधूंनीं शाप दिले, व त्यांमुळें तो मेला. असो. तो इ० स०

१६८० च्या एप्रिल महिन्याच्या पांचव्या तारखेस रायगड येथें मरण पावला, व तेथेंच त्याचें दहन केलें.

शिवाजीच्या मागून गादीविषयीं तंटे उपस्थित झाले. शिवाजीला संभाजी व राजाराम असे दोन पुत्र होते. संभाजीला शिवाजीनें त्याच्या गैरवर्तनाबद्दल पन्हाळ्यास कैदेंत ठेविलें होतें. तेव्हां राजारामाची आई सोयराबाई हिनें अष्टप्रधानांपैकीं कांहीं लोक आपणाकडे वश करून घेतले, व त्यांनीं राजारामास गादीवर बसविण्याचा बेत केला. परंतु हें वर्तमान संभाजीला कळतांच तो रायगडास आला. त्याला पहातांच सर्व शिपाई लोक त्याला मिळाले, व त्यानें सोयराबाईच्या पक्षाचे लोकांस एकदम कैद केलें. तो इ० स० १६८० च्या जून महिन्याच्या अखेरीस गादीवर बसला. त्यानें प्रथमतः सोयराबाईस भिंतींत चिनून ठार मारलें, अण्णाजी दत्तो सचिव याला हत्तीच्या पायीं दिलें, व कांहींचा कडेलोट केला. अशा रीतीनें त्यानें शिवाजीच्या वेळच्या शहाण्या, अनुभवी व शूर माणसांचा संहार आरंभिला, व तो मनास वाटेल त्याला मोठमोठे अधिकार देऊं लागला. त्यामुळें लौकरच शिवाजीच्या वेळची सर्व व्यवस्था नाहींशी होऊन एकंदर राज्यांत घोटाळा माजला. इ० स० १६८८ च्या सुमारास संभाजीनें रायगड किल्ला सोडून दिला, व तो पन्हाळा, प्रतापगड व संगमेश्वर येथें चैन करीत आलटून पालटून राहूं लागला. पुढें इ० स० १६८९ त त्याला मोंगलांनीं कैद केलें, व औरंगजेबाच्या हुकुमावरून त्याला तुळापूर येथें ठार मारिलें.

पुढें संभाजीचा मुलगा शिवाजी ( शाहू ) याच्या नांवानें राजाराम रायगड येथें राज्याचें काम पाहूं लागला.

त्यानें शाहू व त्याची आई येसूबाई यांना रायगडास ठेविलें, व आपण येथेंच राहिलों तर कदाचित् सर्वच मोंगलांच्या हातीं पडूं, ह्या भीतीनें तो बाहेरील दूरदूरच्या किल्ल्यांवर आलटून पालटून राहूं लागला. पुढें मोंगल व शिद्दी यांनीं, रायगडास संभाजीचें कुटुंब आहे अशी त्यांना बातमी लागल्यावरून, त्या किल्ल्याला वेढा दिला. सात महिने मराठ्यांनीं मोंगलांस दाद दिली नाहीं. पुढें सूर्याजी पिसाळ नांवाच्या एका मनुष्यानें विश्वासघात करून किल्ल्याच्या चोरवाटा मोंगलांस दाखवून दिल्या, व अशा रीतीनें तो किल्ला मोंगलांनीं घेतला. मोंगलांनीं येसूबाई, तिचा पुत्र शिवाजी व इतर मंडळी यांस कैद केलें व त्यांना औरंगजेबाकडे पाठवून दिलें. औरंगजेबानें पुढें तो किल्ला जंजिऱ्याच्या शिद्दीच्या स्वाधीन केला (इ० स० १६९० ).

इ० स० १७३६ त फत्तेसिंग भोंसले व श्रीपतराव प्रतिनिधी यांनीं याकुबखान म्हणून एक शिद्दीचा सरदार होता, त्याला वश करून घेऊन तो किल्ला हस्तगत करून घेतला. इ० स० १७७२ त पहिले माधवराव पेशवे यांचे कारकीर्दींत रायगडच्या किल्लेदारानें बंड केलें. परंतु पुढें नारायणराव गादीवर बसल्यानंतर इ० स० १७७३ त

---

१ मराठ्यांचे बखरींत " आपणाला जय मिळणें कठीण व पुढें लढाई वगैरे केली तर औरंगजेबास राग येऊन आपण त्याचे हातीं सांपडलों तर आपली व आपल्या मुलाची तो फार वाईट दशा करील " अशी येसूबाईस भीति पडून तिनें शहाणपणानें मोंगलांचा सरदार झुलपिकारखान याचे स्वाधीन रायगड किल्ला केला असें लिहिलें आहे.

त्याचा मोड झाला. इ० स० १७२६ त नाना फडनविसानें या किल्ल्याची चांगली दुरुस्ती केली. इ० स० १८०२ त होळकरानें पुणें घेतल्यावर दुसरा बाजीराव सिंहगडाहून आपल्या मुलांमाणसांसह रायगडास पळून गेला. येथें पूर्वीं बाजीरावानें माधवराव रास्ते याला कैद करून पाठविलें होतें. पुढें त्याला बंधमुक्त करून सैन्य गोळा करण्यास त्यानें आज्ञा दिली. पुढें आक्टोबर महिन्यांत तो किल्ला यशवंतराव होळकरानें घेतला. परंतु इ० स० १८०३ मध्यें पेशवे व होळकर यांचा सलोखा होऊन होळकरानें तो किल्ला बाजीरावास परत दिला. इ० स० १८१७ त पुणें येथें इंग्लिश व बाजीराव यांच्यामध्यें जो तह झाला, त्यांतील कलमांप्रमाणें बाजीराव चालणार नाहीं असा इंग्लिशांस संशय आल्यावरून त्यांनीं आपली खातरी करून घेण्याकरितां रायगड, सिंहगड व पुरंदर हे तीन किल्ले बाजीरावापाशीं मागितले. परंतु फक्त रायगड मात्र त्या वेळीं त्यानें इंग्लिशांस दिला. पुढें त्यांनीं तो पेशव्यास परत दिला.

इ० स० १८१७ च्या नोवेंबर महिन्यांत बाजीराव व इंग्लिश यांच्यांत लढाई सुरू झाली, तेव्हां बाजीरावानें आपली पत्नी वाराणशीबाई हिला बरोबर पुष्कळ पैसा व जवाहीर देऊन रायगडास पाठवून दिलें. पुढें इ० स० १८१८ त प्रोथर साहेबानें, विसापूर, लोहगड, कुवारी, तळें, घोंसाळें व मानगड हे किल्ले घेतल्यावर, ८९ व्या पलटणीचा मुख्य मेजर हाल याच्या हाताखालीं २०० काळे व २०० गोरे लोक देऊन त्याला रायगडास जाण्यास हुकुम दिला. त्यानें ...

पाचाड येथें पेशव्याचे ३०० लोक होते त्यांचा पराभव केला,
व तारीख २९ रोजीं आपल्या लोकांच्या लहान लहान टोळ्या
करून त्यानें रायगडास वेढा दिला. नंतर ४ मे च्या सुमारास
हाल साहेबास मुंबई व मालवण येथून मदत येऊन मिळाली.
तेव्हां किल्ल्याचे फार हाल झाले. त्यानें आपला
तोफखाना किल्ल्यावर सुरू केला. तोफांच्या भडि-
मारामुळें किल्ल्यांतील पुष्कळ इमारतींचा नाश झाला.
कांगोरी व प्रतापगड येथून किल्ल्यांतील मराठे लोकांस
मदत येत होती, परंतु त्या लोकांचा कर्नल क्रासबी यानें
वाटेंतच मोड केला. किल्ल्याला इंग्लिशांचा वेढा ११
दिवस पडला होता. १२ व्या दिवशीं किल्ल्याचा तट फुटला.
तेव्हां वाराणशी बाईच्या सांगण्यावरून किल्लेदार किल्ला
इंग्लिशांचे स्वाधीन करण्यास कबूल झाला. पुढें वाडी येथें
तोडजोडीचीं बोलणीं होऊन पांच तासांच्या आंत मरा-
ठ्यांनीं किल्ला सोडून निघून जावें, असें इंग्लिशांनीं त्यांना
सांगितलें. परंतु पुढें पांच तासांत किल्ला सोडून
देण्याची मराठ्यांची कांहींच हालचाल दिसली नाहीं.
तेव्हां इंग्लिशांनीं पुनः किल्ल्यावर आपला तोफखाना सुरू
केला. पुढें किल्ल्याचा अमलदार शेख अबुद हा स्वतः
तहाचें बोलणें लावण्याकरतां खालीं आला. त्याचा व
इंग्लिशांचा तह झाला तो येणेंप्रमाणें:—१०० आरब
शिपाई व शिद्दी, मराठे, पठाण, व गोसावी मिळून ८००
शिपाई यांना त्यांचीं हत्यारें, चीजवस्त व मुलेंमाणसें यांसह
इंग्लिशांनीं बिनहरकत जाऊं द्यावें, वाराणशीबाईबरोबर
कोणीही मराठा शिपाई राहतां कामा नये, व तिला इंग्लि-
... व इतक्या गोष्टी होत

तोंपर्यंत शेख अबुद यानें इंग्लिशांचे छावणींत ओलीदाखल रहावें. तारीख १० मे रोजीं प्रोथर साहेब किल्ल्यांत गेला. त्या वेळीं त्याला किल्ल्यांत वाराणशीबाई, तिचीं चाकरमाणसें व शेख अबुद याचीं मुलेंमाणसें येवढींच कायतीं मनुष्यें आढळलीं. इंग्लिशांच्या तोफांच्या गोळ्यांनीं बहुतेक घरें ढांसळून पडलीं होतीं, व शिवाजीचा वाडा जमीनदोस्त होऊन गेला होता.

कर्नल प्रोथर साहेब वाराणशीबाईच्या भेटीस गेला त्या वेळीं ती जुन्या वाड्यांत होती. पुढें तिच्याबरोबर चांगला लवाजमा व १०० शिपाई लोक देऊन त्यानें तिला पुण्यास पोहोंचतें केलें. या किल्ल्यांत इंग्लिशांना ५ लाख रुपये मिळाले.

२८. **कांगोरी किंवा मंगळगड.**—हा किल्ला महाड तालुक्यांत महाडाच्या पूर्वेस सुमारें ११ मैलांवर सह्याद्रीच्या एका नीट उंच गेलेल्या शिखरावर बांधलेला आहे. त्यावर झाडझुडूप कांहीं नाहीं, व त्याची उंची समुद्राच्या सपाटीपासून २४२७ फूट आहे. किल्ल्यावर जाण्याचा रस्ता अरुंद असून २ मैल लांबीचा आहे. हा किल्ला १४८५ फूट लांब व २६४ फूट रुंद आहे. किल्ल्यावरील बहुतेक इमारती पडून गेल्या आहेत. किल्ल्याचा दरवाजा दुरुस्त नसून त्याचा तटही पुष्कळ ठिकाणीं पडून गेला आहे. इ० स० १६४८ त हा किल्ला शिवाजीनें घेतला. सातारच्या राजाचा भाऊ चतुरसिंग याला इ० स० १८१२ त या किल्ल्यांत कैद करून ठेविलेलें होतें. तो इ० स० १८१८ त ह्या किल्ल्यावर मरण पावला. इ० स० १८१७ त हंटर व मारिसन हे दोन इंग्लिश सरदार

हैदराबादेहून पुण्यास येत असतां त्यांना मराठ्यांनीं वाटेंत उरुळी येथें कैद करून ह्या किल्ल्यांत आणून ठेविलें होतें. त्यांचा ह्या ठिकाणीं फार छळ झाला. पुढें बापू गोखले याच्या हुकमावरून त्यांना साताऱ्या जिल्ह्यांत वासोटा किल्ल्यावर नेऊन ठेविलें. पुढें त्याच वर्षी तो किल्ला इंग्लिशांनीं घेतला तेव्हां त्यांची सुटका झाली. बापू गोखले यानें ह्या ठिकाणीं त्यांना फार चांगल्या तऱ्हेनें ठेविलें होतें. इ० स० १८१८ त रायगड किल्ला इंग्लिशांचे हातीं आल्यावर पुढें लवकरच कांगोरी किल्ला कर्नल प्रोथर साहेबानें घेतला. किल्ल्याची हल्लीं सर्वत्र पडापड झालेली आहे.

२९. **कौलाकिल्ला.**—हा किल्ला महाडच्या आग्नेयीस १९ मैलांवर पारमाची नांवाच्या खेड्यांत आहे. हा किल्ला सह्याद्रीच्या उत्तरेकडे फुटलेल्या एका उंच शिखरावर बांधलेला आहे. याची उंची २१२४ फूट आहे. महाडाहून भोरास येण्याकरितां निवालें म्हणजे वाटेनें हा किल्ला दृष्टीस पडतो. याच्या संबंधानें इतिहासप्रसिद्ध कांहींच गोष्ट घडून आलेली नाहीं.

३०. **लिंगाणा.**—हा किल्ला महाडच्या आग्नेयीस १९ मैलांवर सह्याद्रीच्या एका फांट्यावर तोरणा व रायगड यांच्या दरम्यान् बांधलेला आहे. किल्ल्याची उंची २९६९ फूट आहे, व त्याचा एकंदर चढाव ४ मैलांचा आहे. त्याच्यावर जाण्याकरतां पूर्वी खडक खोदून ज्या पायऱ्या केलेल्या होत्या त्या हल्लीं फोडून टाकल्या आहेत, त्यामुळें माथ्यावर जातां येत नाहीं. किल्ल्याची तटबंदी पडून गेली आहे, व वर इमारतीची वगैरे कांहीं खूण दिसत नाहीं

वर कांहीं पाण्याचीं टांकीं आहेत असें म्हणतात. मराठ्यांचे वेळीं येथें घोर अपराध करणारे कैद्यांस अंधारकोठड्यांतून ठेवीत असत.

लिंगाणा व **बिरवाडी** हे किल्ले शिवाजीनें आपल्या मुलुखावर शिदीला हल्ला करतां येऊं नये या उद्देशानें इ० स० १६४८ त बांधले. हा किल्ला इ० स० १८१८ त **प्रोथर** साहेबानें सर केला.

**३१ चंद्रगड.**—हा किल्ला **महाडच्या** आग्नेयीस १६ मैलांवर व ' **आरथर सीट** ' म्हणून एक **महाबळेश्वरावर** ठिकाण आहे, त्याच्या ईशान्येस. २ मैलांवर **धावली** नांवाच्या खेड्यांत एका सखल टेंकडीवर बांधलेला आहे. ह्या किल्ल्याची उंची समुद्राच्या सपाटीपासून २२६८ फूट. आहे. ह्याच्या संबंधानें इतिहासांत कोठेंच उल्लेख केलेला आढळत नाहीं.

याशिवाय **चांभारगड**, **सोनगड** वगैरे किल्ले या तालुक्यांत आहेत, परंतु त्यांच्या संबंधानें कांहींच माहिती उपलब्ध नाहीं.